म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८७१

श्री.के. क्षीरसागर

नेहरू आणि काश्मीर

REFBK-0023249

अमेय प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा दंडणी भरावी लागेल.

30 NOV 1981

(क्र. मा. प.)
५०००-४-८०

संदर्भ
निबंध
२८७९
२३२४९
२८८८

केशवसुत आणि तांबे

श्री. के. क्षीरसागर

REFBK-0023249

अमेय प्रकाशन

प्रकाशन क्रमांक पन्नास
प्रकाशक मनोहर पिंपळापुरे, अमेय प्रकाशन, रुईकर मार्ग, नागपूर ४४० ००२
वितरक पिंपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, रुईकर मार्ग, नागपूर ४४० ००२
प्रथमावृत्ती २६ जाने. १९८०
© सौ. शकुंतला क्षीरसागर, बॅन्डमन्स क्वार्टर्स, पुणे विद्यापीठ, पुणे, ४११००७
मुद्रक दिवाकर धाकस, नाग मुद्रणालय, रुईकर मार्ग, नागपूर ४४०००२
मुखपृष्ठ जयंत गायकवाड
किंमत अठरा रुपये पन्नास पैसे

देवासचे राजकवी गोविंद झोकरकर यांस
गेल्या पंचवीस वर्षांतील पत्रमैत्रीचे स्मरण म्हणून
प्रेमादरपूर्वक समर्पण

श्री. के. क्षी.

पुणे
१२-१२-७९

प्रास्ताविक

या संग्रहातील प्रमुख लेख केशवसुतशताब्दीच्या वर्षात आणि तांबे शताब्दीच्या वर्षात लिहिलेले आहेत. केशवसुत आणि तांबे हे आधुनिक मराठी कवींपैकी प्रमुख कवी होत. आधुनिक कवितेचा काळ केशवसुतांपासून ते मर्ढेकरांपर्यंत आहे असे स्थूलमानाने म्हणता येईल. या साठ वर्षांतील कविता म्हणजेच 'आधुनिक' कविता होय. या आधुनिक कवितेसंबंधी आजवर जे लिखाण झाले आहे, त्यावरून त्या कवितेचे यथार्थ स्वरूप समजावून देण्याला अद्यापही अवकाश आहे असे म्हणावे लागते. तेच कार्य या दोन थोर कवींच्या गौरवोत्सवाच्या निमित्ताने या पुस्तकातील लेखांत केले आहे.

दुर्दैवाची गोष्ट म्हणजे केशवसुतसंप्रदायी कवितेचे अर्धे-मुर्धे आकलन होते ना होते तोच, त्या कवितेच्या अगदी विरुद्ध वृत्तीची 'नवकविता' जन्माला आली. म्हणजे आधुनिक मराठी कवितेचे अपक्व वाचक सौंदर्यवादी कवितेपासून आणखीच दूर गेले! आधुनिक कवितेतील प्रमुख सुरांचे आकलन व्हावयाला हवे असेल, तर या दोन प्रमुख कवींच्या कवितेचे यथार्थ आकलन व्हायला हवे. त्यांच्या यथार्थ आकलनाच्या आड आधी कित्येक वर्षांत झालेले 'अयथार्थ आकलन'च येते. या पुस्तकातील पाचव्या प्रकरणामध्ये मी म्हटले आहे :

" पण केशवसुतांचा मूळ पिंड आणि वेळोवेळीची वृत्ती समजावून न घेता, त्यांच्या वाचनातील पुस्तके धुंडाळल्यास—" परि तू जागा चुकलासी " असे म्हणण्याची वेळ येते... त्यांचे काव्य वा त्यांचे अध्ययन समजावून घेण्यापेक्षाही त्यांचे व्यक्तिमत्त्व समजावून घेणे अधिक अगत्याचे आहे. पण त्याकरिता पांडित्य आणि परिश्रम यांचा उपयोग नसून, वाङ्मयीन 'सपिंडत्वा'चा,— निदान कल्पक सहानुभूतीचा अधिक उपयोग आहे. केशवसुतांच्या काव्याच्या अभ्यासाला ही नवी दिशा लावण्याचा यत्न मी या शतसांवत्सरिक वर्षातील माझ्या सर्व लेखांत केला आहे."

तांबे यांची वृत्ती आणि शैली समजण्याला तर अभ्यासकांत याहूनही सजातीयत्व असण्याची गरज आहे. पण मुळात 'सपिंडत्व' नसले तरी 'कल्पक सहानुभूती' अथवा (जुन्या भाषेत म्हणजे) 'सहृदयत्व' असल्यास, या दोन थोर कवींच्या अंतरंगात शिरणे अवघड नाही. या सहृदयत्वाच्या वाटेनेच मी या दोन कवींची आजच्या

वाचकांकरिता मीमांसा केली आहे. पण मी आधुनिक कवितेसंबंधी किंवा या दोन कविवर्योसंबंधी आणखी अनेक जागी लिहिले आहे. या पुस्तकातील भूमिका अधिक समजावून घेण्याकरिता, माझ्या अन्य ग्रंथांतील त्यांच्या संबंधीचे लेखन उपयुक्त ठरेल. मुख्यतः 'टीकाविवेक' या ग्रंथातील काही भाग, तसेच ' तसबीर आणि तकदीर 'हा माझा आत्मचरित्रपर ग्रंथ, या ग्रंथातील कल्पक समीक्षा समजावून घेण्याला उपयोगी आहेत.

नागपूर विद्यापीठाचे डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या सूचनेवरूनच मी हे पुस्तक नागपूर येथे प्रकाशित करण्याचे ठरविले. डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी या पुस्तकाच्या प्रकाशनात आरंभापासूनच मनःपूर्वक लक्ष घातले होते. मी प्रकाशनस्थलापासून दूर, पुण्यात, असल्याने पुस्तकाची संपूर्ण मुद्रणप्रत वाचून काढणे वगैरे परिश्रम त्यांनी घेतले, याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे. पण पुस्तकाची छपाई चालू असताच ते आजारी पडले. नाहीतर आणखीही लक्ष घालणे त्यांस शक्य झाले असते. श्री. मनोहर पिंपळापुरे यांनी या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या बाबतीत मनःपूर्वक परिश्रम घेतल्यानेच हे पुस्तक इतक्या लवकर अमेय प्रकाशनाच्या लौकिकास साजेसे निघाले. आतापर्यंतची माझी सुमारे बीस पुस्तके मुंबई व पुणे येथेच प्रकाशित झाली. आज या पुस्तकाच्या निमित्ताने नागपूरच्या प्रकाशनाशी माझा प्रथमच संबंध येत आहे.

या पुस्तकाची मुद्रणप्रत करण्यात माझी लेखिका कु. शैला सिद्धपाठकी हिची तर मदत झालीच, पण शिवाय पुणे विद्यापीठातील श्री. भा. बा. कुमठेकर यांनी काही लेखांच्या फोटो कॉपीज त्वरित मिळवून देण्यास मोलाची मदत केली, याबद्दल मी उभयतांचा आभारी आहे. लेख शोधण्यात, लेखांची निवड करण्यात, ग्रंथाची नामसूची तयार करण्यात आणि इतरही अनेक गोष्टीत माझ्या पत्नीचे फार साहाय्य झाले. या ग्रंथाचे शुद्धिपत्र तयार करण्यात प्रा. कु. मीरा सिद्धपाठकी यांनी मदत केली. त्यांना धन्यवाद. माझ्या इतर पुस्तकांप्रमाणे हे पुस्तकही वाङ्मयाभ्यासकांना व सर्वसामान्य रसिकांना प्रिय होईल अशी आशा आहे.

२६–१२–१९७९
पुणे विद्यापीठपरिसर

श्रीकृष्ण के. क्षीरसागर

लेखांचे मूळ प्रकाशन : स्थान आणि वर्ष

१. केशवसुतांनी केलेल्या क्रांतीचे आकलन झाले आहे काय ?
(महाराष्ट्र साहित्य पत्रिका, एप्रिल–जून १९६६, पृ. ७–१२)

२. केशवसुत : आधुनिक मराठी काव्याचे जनक
(मांडवी, दिवाळी १९६६ पृ. ७–९)

३. केशवसुतांचे भांडवल
(जळगाव समाचार. केशवसुत खास अंक २८–११–१९६६ पृ. १५–१८)

४. सौंदर्य आणि केशवसुत
(युगवाणी वर्ष २१ अंक ६, पृ. २२९–२३२)

५. परि तू जागा चुकलासी
(यशोदीप वर्ष ४ अंक ४, १९६७ पृ. १–९)

६. केशवसुत आणि मर्ढेकर
(सह्याद्री दिवाळी १९६६, पृ. १७–२२)

७. सौंदर्यवादाचे प्रणेते केशवसुत
(केशवसुतसमीक्षा पृ. ३९७ ते ४०४)

८. प्रो. जोगकृत केशवसुत (परीक्षण)
(सह्याद्री मार्च १९४८, पृ. २४–३०)

९. केशवसुत आणि तांबे
(साहित्य, जुलै–ऑगस्ट १९५०, पृ, २१–२७)

१०. रोमँटिक प्रेम आणि कविवर्य तांबे
(महाराष्ट्र साहित्य पत्रिका ऑक्टोबर १९७३–मार्च १९७४, पृ. ४५–५४)

११. गूढवाद : केशवसुत आणि तांबे
(टीकाविवेक पृ. २६०–२६८)

मुंबई मराठी साहित्यसंघातर्फे झालेली व्याख्याने

१२. कविवर्य तांबे : जन्मशतसांवत्सरिक उत्सव व्याख्यान १ ले अप्रकाशित

१३. कविवर्य तांबे : जन्मशतसांवत्सरिक उत्सव व्याख्यान २ रे अप्रकाशित

१४. पूर्णाहुती
(मधुघट रसदर्शन पृ. २२१–२२१)

अनुक्रम

१.	केशवसुतांनी केलेल्या क्रांतीचे आकलन झाले आहे काय ?	१
२.	केशवसुत : आधुनिक मराठी काव्याचे जनक	९
३.	केशवसुतांचे भांडवल	१६
४.	सौंदर्य आणि केशवसुत	२१
५.	" परि तू जागा चुकलासी "	२७
६.	केशवसुत आणि मर्ढेकर	३७
७.	सौंदर्यवादाचे प्रणेते केशवसुत	४२
८.	प्रो. जोगकृत केशवसुत (परीक्षण)	४९
९.	केशवसुत आणि तांबे	६३
१०.	रोमँटिक प्रेम आणि कविवर्य तांबे	७१
११.	गूढवाद : केशवसुत आणि तांबे	८०
१२.	कविवर्य तांबे : जन्मशतसांवत्सरिक उत्सव. व्याख्यान १ ले	८८
१३.	कविवर्य तांबे : जन्मशतसांवत्सरिक उत्सव. व्याख्यान २ रे	१०८
१४.	पूर्णाहुती	१२१

केशवसुतांनी केलेल्या क्रांतीचे आकलन झाले आहे काय ?

केशवसुतांनी मराठी कवितेत क्रांती केली हे प्रायः त्यांच्या काळापासूनच मराठी अभ्यासकांनी मान्य केले आहे. तथापि त्या क्रांतीचे गमक वेगवगळ्या टीकाकारांनी वेगवेगळे मानले आहे. काहींनी तर त्यांचे क्रांतिकारकत्व अशा चलाखीने मांडून दाखविले आहे, की ते पातळ होऊन वाहून जावे ! काहींनी त्यांना केवळ इंग्रजी काव्यसंपर्काचे ' फळ ' मानून त्यांचे स्वयंभूत्व अमान्य केले आहे. मर्ढेकरांच्या व नवकवितेच्या ' नियतकालिक ' बोलबाल्याच्या काळात, ' मर्ढेकर केशवसुतांच्या अनेक योजने पुढे आहेत ' असा ' फैसला ' काहींनी दिला. पण आज सरकारी पुरस्काराने केशवसुत शताब्दि–उत्सव साजरा होणार असे ठरल्यावर, नवकवी व नवटीकाकारही केशवसुतांच्या जयजयकारात सामील होत आहेत ! अर्थात हे लोक रवीन्द्रनाथांच्या शताब्दि–उत्सवातही सामील झाले होते ही गोष्ट लक्षात घेतली, तर त्यांच्या केशवसुतगौरवाचे नवल वाटण्याचे कारण नाही; कारण रवीन्द्रनाथ तर नवकाव्याचा उघड उपहास करणारे होते !

सामर्थ्यवान कवीचा गौरव त्यांच्या हयातीत व नंतर होणे अपरिहार्य असते; पण तो योग्य कारणाकरिताच होईल अशी खात्री नसते. समर्थ कवीतही त्याचे म्हणून काही दोष असतात. पण पुष्कळदा भलत्या गुणांप्रमाणेच भलते दोषही कवीच्या अंगी चिकटविले जातात. ' तुतारी ' ही केशवसुतांची सर्वश्रेष्ठ कविता होय.–निदान त्यांची प्रातिनिधिक कविता होय, हे मत अशा विपरीत गुणग्रहणांचेच द्योतक होय. एकदा ' केशवसुत म्हणजे तुतारी ' हे सामान्य ' ग्राहका ' करिता केलेले समीकरण मान्य झाले, म्हणजे " आगरकर + काव्य " = " केशवसुत " हेही समीकरण मान्य होण्यास पंचाईत पडत नाही. या ढोबळ गुणग्रहणाला विरोध करण्याची ज्यांना कधीच गरज भासली नाही किंबहुना ज्यांना मर्ढेकररूपी सवाई केशवसुतांच्या चिंतनात केशवसुतांच्या नामोच्चारालाही फुरसत झाली नाही, तेही आता ' शताब्दी 'च्या निमित्ताने, रवीन्द्रनाथ, केशवसुत इ. ' अवास्तव ' कवींच्याकडे वळत आहेत, हा शताब्दीमुळे होणारा फायदाच म्हणायचा.

चुकीच्या गुणनिर्देशाप्रमाणेच चुकीचा दोषनिर्देशही केशवसुतांच्या वाट्याला भरपूर आला आहे. त्यांचे काव्य स्त्रैण आहे, ते स्वतः दुबळे, रडवे आणि किरकिरे आहेत, इ. दोष माडखोलकरांसारखे पहिले मातब्बर टीकाकार व अलीकडचे वाङ्मयेतिहासकार यांनी उच्चारले आहेत. केशवसुतांच्या कवितांचा एकैकशः अभ्यास प्रसिद्ध करणाऱ्या विद्यापीठीय पंडितांनी केशवसुतांचे क्रांतिकारकत्व पातळ व पारदर्शक करून दाखविले आहे. अशा पंडितांत कै. माधवराव पटवर्धनही मोडतात. 'जे आंग्ल भाषेच्या संपर्काने आले नसते असे केशवसुतांच्या काव्यात काहीच नाही' हा या पंडितांच्या प्रतिपादनाचा निष्कर्ष असतो. 'तुतारी' भक्तांना सामाजिक क्रांतीचे गीत लिहिणे ही काव्यातील क्रांती वाटते, तर तंत्र-भक्त टीकाकारांना केशवसुतांनी केलेल्या भाषिक व वृत्तविषयक प्रयोगांचे महत्त्व अधिक वाटते. सारांश, रूढीविरुद्ध बंड आणि तंत्रविषयक प्रयोग एवढ्यातच केशवसुतांचे क्रांतिकारकत्व सामावले आहे असा मराठीतील टीकेचा सामान्य सूर अथवा concensus आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. याचा अगदी ताजा पुरावा हवा असेल तर साहित्य ॲकॅडमीचे ताजे (मे महिन्याचे) बुलेटिन पाहावे.

कै. माटे यांच्या कारकीर्दीत १९४६ मध्ये साहित्यपरिषदेने आयोजित केलेल्या व्याख्यानमालेत, 'सौंदर्यवाद' अथवा 'रोमँटिसिझम' याविषयांवरील माझ्या व्याख्यानात मी जेव्हा रोमँटिक पिंड हा केशवसुत संप्रदायी कवींचा विशेष होय असे प्रतिपादिले, तेव्हा इंग्रजी वाङ्मयाच्या व मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना त्याचे सारखेच नवल वाटले. मराठीच्या अभ्यासकांना रोमँटिक मनोवृत्तीत अंतर्भूत असलेल्या अनेकविध–बाह्यतः परस्परविरुद्धदेखील–स्वभावविशेषांची ओळख नव्हती तर इंग्रजीच्या अभ्यासकांनी आधुनिक मराठी कविता आम्हा मराठी अभ्यासकांच्या आत्मीयतेने वाचलेली नव्हती, नव्हे थोड्या उच्चपदस्थ तुच्छतेने वा 'पेट्रनायझिंग' वृत्तीनेच वाचलेली होती. कुठे वर्डस्वर्थ आणि कुठे केशवसुत ! अशी ती वृत्ती असे. पण दर्जा एक नसला, विकास सारखा नसला तरी दोन कवींची जात एक असू शकते, हे मान्य करण्याइतके औदार्य या इंग्रजी पंडितांत नसे. (शिवाय 'केशवसुत म्हणजे केवळ वर्डस्वर्थ' अशीही स्थिती नव्हती. रोमँटिक संप्रदायी कवी व इमर्सन, व्हिटमन या सर्वांच्या संपर्काने आकारलेला भावनापूजक, सौंदर्यपूजक नवमहाराष्ट्रीय हे केशवसुतांचे खरे स्वरूप होते.)

केशवसुतांच्या वेगळ्या संप्रदायाचे वा त्यांनी मराठी काव्यात केलेल्या क्रांतीचे स्वरूप सामान्यतः त्रिविध तऱ्हेने सांगण्यात येई. अगदीच ढोबळ आणि अशास्त्रीय तऱ्हा म्हणजे 'तुतारी' च्या वळणावर समाज–क्रांतीच्या कविता लिहिणारे कवी म्हणून केशवसुत क्रांतिकारक होत, ही होय. दुसरी म्हणजे कवितेच्या शैलीत, वृत्तात व काव्यप्रकारात जाणीवपूर्वक बदल करणारे म्हणून ते क्रांतिकारक होत, ही होय, आणि तिसरी म्हणजे त्यांचे काव्यविषयच वेगळे होते व त्यात 'आत्मलेखन' होते म्हणून ते वेगळे, ही होय.

कवितेच्या बाह्य स्वरूपात जाणीवपूर्वक बदल करणे म्हणजे काव्यक्षेत्रातील भरीव

कामगिरी होय, ही समजूत अर्वाचीन मराठी काव्याच्या क्षेत्रात बरीच रूढ आहे. निर्यमक कविता लिहिण्याचा प्रयोग, छंदोहीन वा मुक्तछंदी लिहिण्याचा प्रयोग, सुनीत हा युरोपीय प्रकार मराठीत आणण्याचा प्रयोग या गोष्टी वस्तुतः किरकोळ आहेत. त्या गोष्टी विशिष्ट कवीच्या आशयाला अपरिहार्य होत्या का ?– पोषक झाल्या का ? हे प्रश्नच अधिक महत्त्वाचे आहेत. या प्रश्नांचे उत्तर जरी अस्तिपक्षी मिळाले, तरीही या उपक्रमांना क्रांतिकारकत्वाचा मान देणे थोडे विचित्रच होय. पण वाङ्मयातील पुढचे पाऊल वा भरीव कामगिरी गुणवत्तेच्या, उत्कटतेच्या वा उदात्ततेच्या मापाने मोजायची नसून शैलीच्या, वृत्ताच्या वा काव्यप्रकाराच्या नावीन्याने मोजायची आहे, ही दृष्टी केवळ तांत्रिक होय. या दृष्टीला महत्त्व देणारे लोक पाश्चात्त्य देशातही आहेत व आपल्याकडेही अर्वाचीन काळात बरेच झाले. केशवसुतांनी यावर फार भर दिलेला नव्हता. रविकिरण मंडळाने व वऱ्हाडातील देशपांडेद्वयाने काव्यप्रकार व वृत्तप्रकार यांचे प्रयोग केले. नवकवितेच्या पिढीत तर 'प्रयोगप्रधानम् हि काव्यशास्त्रम्' असेच सूत्र प्रायः तयार झाले ! पण केवळ आकाराचे नावीन्य म्हणजे काव्यातील क्रांती नव्हे. आशयातील वेगळेपणा व त्याला अपरिहार्य असेल तरच बाह्य अभिव्यक्तीत वेगळेपणा, हे क्रांतीचे स्वरूप आज सामान्यतः मान्य झाले आहे.

अखेर, केशवसुतांच्या आशयात आमूलाग्र बदल दिसतो की नाही ? दिसत असल्यास त्याचे मूळ कशात ? त्या बदलाला क्रांती म्हणता येईल की नाही ? त्या क्रांतिकारक काव्यामुळे एखादा नवा संप्रदाय उदयाला आला की नाही ? हे प्रश्न महत्त्वाचे ठरतात. ऐहिकपरता हे केशवसुतांच्या कवितेचे वेगळेपण म्हणावे तर ती ऐहिकपरता इंग्रजी राजवटीतील केशवसुतपूर्व कवितेतही होती. आत्मपर स्फुट कविता हे त्यांचे वैशिष्ट्य म्हणावे तर अभंगादी भक्तिपर स्फुट कवितांत व रामदासांच्या अनुतापपर कवितांत ते वैशिष्ट्य होते. काही लावण्यांतही आत्मनिष्ठा (मर्ढेकरी अर्थाने नव्हे, subjective attitude या खऱ्या अर्थाने) होती. सृष्टिवर्णन म्हणावे तर ते मुक्तेश्वरातही आहे, नव्हे वाल्मीकीय रामायणात सर्वोत अधिक आहे. अखेर सामाजिक बंडखोरी हा केशवसुतांचा व्यवच्छेदक गुण असे म्हणणारे लोकच खरे लक्षण सांगत आहेत असे म्हणण्याचा मोह काही लोकांना होणे स्वाभाविक होते आणि हाच ढोबळ समज 'तुतारी म्हणजे केशवसुत' या कल्पनेत सूचित होतो.

केशवसुतांच्या सामाजिक कविता आवेशयुक्त आहेत यात शंका नाही. पण त्यांनाच महत्त्व देण्याने दोन गफलती झाल्या आहेत. एक म्हणजे, 'जे आगरकरांनी गद्यात सांगितले तेच केशवसुतांनी पद्यात सांगितले' ही समजूत होय; व दुसरी म्हणजे 'तुतारी,' 'गोफण,' 'नवा शिपाई' या कविता लिहिणारे केशवसुत क्रांतिकारक होत, तर 'पुष्पाप्रत,' 'सिंहावलोकन,' 'वातचक्र' या कविता लिहिणारे केशवसुत रडवे आणि स्त्रैण होत, ही कल्पना होय. किरकिरेपणा, हळवेपणा, स्त्रीपूजन, प्रेमपूजन, आत्मविश्वास, स्वातंत्र्यप्रेम, निसर्गप्रेम ही सर्व ज्या वृत्तिविशेषात एकत्र आढळतात, नव्हे

परस्परपोषक ठरतात अशा वृतिविशेषाचा वा पिंडाचा विचार केशवसुतांच्या टीकाकारांनी बहुधा केलाच नाही आणि ज्यांनी केशवसुतांच्या पिंडाचा, व्यक्तिमत्त्वाचा आणि चरित्राचा विचार केला त्यांनी त्यांना त्यांच्या बंडखोर कवितांच्या मानाने दुबळे आणि रडवे ठरविले. अर्थात या विचारात केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वापेक्षा रोमँटिक व्यक्तिमत्त्व वा पिंड म्हणून जी वस्तू आहे तिचाच विचार अधिक व्हायला हवा होता.

आमच्याकडील टीकाकारांना रोमँटिसिझम् हा शब्द वा स्वभावविशेष माहीत नव्हता असे नव्हे, इंग्रजी वाङ्मयाच्या संदर्भात त्यांनी तो वाचलेला, ऐकलेला होता पण ज्या मूलकंदातून त्याचे विविध शाखापल्लव अंकुरतात, त्याच्यापर्यंत ते पोहोचलेले नव्हते– नव्हे त्या शाखापल्लवांच्या वैचित्र्यपूर्ण वा 'विसंगत' आविष्काराने ते बावरून जात असत. मी ज्यावेळी त्या विषयावर पहिले व्याख्यान दिले तेव्हा गोंधळून जाऊन एका टीकाकाराने मला विचारले, "काय केशवसुतही रोमँटिक, रे. टिळकही रोमँटिक, तांबेही रोमँटिक, गडकरीही रोमँटिक आणि माधव ज्यूलियनही रोमँटिक ?"

वस्तुतः इंग्रजीच्या अभ्यासकांना रोमँटिक कंदांतून निघणाऱ्या या बहुरंगी शाखा-पल्लवांचे नवल वाटण्याचे कारण नाही. आधुनिक मराठी कवींचे मन इंग्रजीचे अभ्यासकच अधिक आपुलकीने ओळखू शकले असते. पण त्यांच्या रसिकतेतील पहिली अडचण–इंग्रजीचा उसना अभिमान–वर सांगितलीच आहे. दुसऱ्याही काही अडचणी सांगितल्या पाहिजेत. या लोकांच्या वाचनात आलेले रोमँटिसिझमचे विवेचन, केवळ 'एक वाङ्मयीन चळवळ' वा प्रवाह या स्वरूपाचे असे. फ्रान्समध्ये व इंग्लंडमध्ये एका काल-खंडात जो कृत्रिम क्लॅसिसिझम् (अभिजात आदर्शवाद) फोफावला होता, त्याच्या विरुद्ध प्रतिक्रिया, ही रोमँटिसिझमसंबंधीची कल्पना असे. अर्थात साधी भाषा, साधे वैशिष्ट्य, कृत्रिमतेचा अभाव एवढाच त्यांच्या रोमँटिक संप्रदायाचा अर्थ असे. वर्डस्-वर्थच्या काव्यापासून व काव्यविचारापासून रोमँटिसिझमचा उदय मानणाऱांना वरील विशेष प्रामुख्याने मनात येणे स्वाभाविक आहे. पण काव्यातील रोमँटिक चळवळ आणि व्यक्तिमत्त्वातील रोमँटिक प्रवृत्ती, यात फरक आहे. एका फ्रेंच टीकाकाराने समर्पक शब्दांत निर्दिष्ट केलेला फरक सांगायचा झाला, तर Perennial Romanticism (सनातन सौंदर्यपूजक वृत्ती) आणि Historic Romanticism (इतिहासक्रमातील सौंदर्यवादी चळवळ) या दोहोंत फरक आहे. आमच्याकडील इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासात वाङ्-मयीन चळवळीच्या अभ्यासावर काम भागत असे, Perennial Romanticism पर्यंत मजल क्वचितच जात असे.

पण दुर्दैव केवळ एवढेच नव्हते. वेगवेगळ्या कारणांस्तव, रोमँटिसिझम् अथवा सौंदर्यवाद हा विसाव्या शतकात अधिक्षेपाचा विषय झाला होता. एक चळवळ एवढाच अर्थ ज्यांना माहीत होता, ते ती एक इतिहासजमा बाब मानीत. मराठी टीकेच्या क्षेत्रात असे मानणारे महाभाग आजही बरेच आहेत ! ज्यांना ती एक मानवी प्रवृत्ती आहे हेही ज्ञात आहे, ते तिला अपक्व, अशास्त्रीय आणि तर्कविरोधी ठरवून मोकळे

होतात ! कदाचित याला कारण सौंदर्यवादातील सकस भागाशी गाठ पडण्याऐवजी, क्षीण, नकली वा विकृत भागाशीच त्यांची गाठ पडली हेही असू शकेल. पण कल्पना करा, की एखाद्या मनुष्याला भक्तिमार्ग आणि भक्ताची वृत्ती यांचाच तिटकारा असला तर तो मीराबाईची पदे, तुकारामाचे अभंग वा रवींद्रांची गीतांजली यांचे आकलन कितपत करू शकेल ? तीच गत रोमँटिक काव्याच्या 'अँटीरोमँटिक' अभ्यासकांची होते ! रोमँटिसिझम् ही एक इतिहासजमा चळवळ आहे, रोमँटिसिझम् म्हणजे एक मनोविकृती आहे, यांसारखी फसवी वचने घोकणारे लोक अठराव्या व एकोणिसाव्या शतकांतील कित्येक जबरदस्त युरोपीय प्रतिभावंतांना अडाणीपणाने विकृतवर्गात लोटतात, याची त्यांना कल्पनाही नसते. 'सौंदर्यवाद ही एक विकृती आहे' असे (सहज खाजगी संभाषणात) म्हणणाऱ्या गटेचे नाव रोमँटिकांचा मुकुटमणी म्हणून घेतले जाते हे ते विसरतात ! बाह्यतः भिन्न प्रकृतीच्या अनेक युरोपीय प्रतिभावंतांची नावे 'रोमँटिक' प्रतिभावंतांत अन्तर्भूत होतात. रूसो, वर्डसवर्थ, शेले, बायरन्, शातोब्रियाँ यांच्या प्रकृती विकृत माना, की अविकृत माना, जबरदस्त प्रभावी होत्या, हे इतिहासाने मान्य केले आहे. पण ज्यांना 'रोमँटिक' प्रकृतीचे आकलनच झालेले नाही, त्यांना वरील प्रतिभावंतांच्या व्यक्तिमत्त्वाचे व लेखनाचेही आकलन होणार नाही. भिन्नप्रकृतित्वामुळे रोमँटिक प्रकृतीच्या प्रतिभावंतांना शिव्या देण्याचा प्रकार पाश्चात्त्य लोकांनीही भरपूर केला आहे. १९३२ मध्ये जेव्हा कविश्रेष्ठ गटे याच्या मृत्यूचा शताब्दि–उत्सव झाला, तेव्हा त्याच्या वाट्याला विद्वानांच्या दुर्व्यांपेक्षा शिव्याच अधिक आल्या.

" This was because scholarship too was of the party. From its deliverances one learned that the Romantics had bungled every opportunity. they couldnot write scientific history...they endangered true scicnce by espousing vitalism and pantheism... "

विद्वानांचा हा रोमँटिसिझम्–विद्वेष नमूद करणारा फ्रेंच इतिहासकार पुढे म्हणतो :

" As a student of history, and particularly of cutlural history...I thought I saw clear evidence that the twentieth century notion of Romanticism was an illusion. "

आजकालच्या अनेक पाश्चात्त्य लेखकांची आणि प्रायः सर्व मराठी लेखकांची रोमँटिसिझम्संबंधी कल्पनाच 'रोमँटिक' असते, असा निष्कर्ष–वरील इतिहासकाराप्रमाणेच–आपणालाही काढावा लागतो.

ही अडचण केशवसुतांच्या सम्यक् आकलनात तर अधिकच गोंधळ घालते. आमच्याकडील सौंदर्यपूजक, भावनापूजक पिंडाचा कवी पाश्चात्त्य रोमँटिक कवीचे काव्य, आणि इमर्सन–व्हिटमनसारख्यांचे जीवनपूजक तत्त्वज्ञान वाचून कधी हळवेपणाची,

तर कधी बंडखोरीची, कधी दुःखिताची तर कधी प्रेषिताची भाषा बोलतो. त्याच्या विविध काव्यविषयांचे शालेय वर्गीकरण करण्याने त्याच्या कुळीची ओळख कधी पटणार ? आणि त्याच्या पिंडाची आणि त्याच्या कुळीची ओळख पटली नाही, तर त्याची सुखदुःखे, त्याचे रागद्वेष टीकाकाराला कसे कळणार ? ' आम्ही कोण ? ' ही कविता वाचून केशवसुतांना आढ्यताखोर ठरविणे, निराशेच्या कविता वाचून रडवे ठरविणे, ' तुतारी ' वाचून सुधारक ठरविणे आणि अखेर कर्वे–आगरकरांप्रमाणे ' भरीव ' काम केले नाही, म्हणून सुधारकांतही खालचा नंबर देणे, हा सर्वच प्रकार काव्यपरीक्षेच्या प्रांतात न शोभणारा आहे !

केशवसुत, काव्यातील प्रयोगांमुळे क्रांतिकारक नव्हते, की काव्याच्या निर्दोष आविष्कारामुळे[1] श्रेष्ठ नव्हते. ते श्रेष्ठ आहेत नव्या व्यक्तिमत्त्वामुळे, नव्या पिंडामुळे. ऐहिक जीवनातील ज्या अनेकविध विषयांमुळे केशवसुतांचे मन उचंबळून येत असे, त्या विषयांचा आमच्या जुन्या कवींच्या मनावर काष्ठलोष्टांइतकाही परिणाम होत नसे ! त्यांना फक्त विठोबाचे ध्यानच काय ते सुंदर वाटत असे. बिचाऱ्यांनी कधी स्वस्त्रीकडे तरी सौंदर्यदृष्टीने पाहिले की नाही, देव जाणे ! स्त्रीसौंदर्याचे या पारमार्थिक मंडळींना कुपथ्य वाटले असे म्हणावे, तर बालकाच्या अव्याज मनोहरतेवरही त्यांना कधी काव्य करावेसे वाटले नाही. काव्य हा त्यांच्यापैकी बहुतेकांनी कोरड्या परमार्थाचा राखीव प्रांत करून टाकला होता ईश्वरभक्तीखेरीज कोणत्याही भावनेचा ओलावा त्यांना जणू माहीतच नव्हता ! शिवाजीसारखा अवतारी पुरुष झाल्यावरही त्याच्या लोकोत्तर गुणांनी आणि कृतींनी एका रामदासाखेरीज कुणाच्या प्रतिभेला द्रव आला नाही. गांधारीप्रमाणे डोळे बांधून घेऊन आपल्या परमार्थ विषयांशी एकनिष्ठ राहणाऱ्या या कवींचे काव्य सौंदर्याने भरलेल्या अखिल वसुंधरेच्या बाबतीत आंधळेच होते ! जीवनातील अनेक आस्वाद्य विषयांच्या बाबतीत त्यांनी अकारण उपोषणव्रत घेतले होते. केशवसुतांनी बंड केले ते अन्यायाविरुद्ध नव्हे, तर मुख्यतः या भावनात्मक उपोषणाविरुद्ध केले. त्यांनी जीवनगौरव

---

[1] *केशवसुतांची शैली खडबडीत असे, इतकेच नव्हे, तर तिजमध्ये भाषेच्या हास्यास्पद चुकाही दाखविता येतात. त्यांच्या खडबडीतपणाचे मूळ भावनेच्या आवेगात आहे. ' अत्यंत प्रसादपूर्ण ' म्हणून काही विद्वानांनी वाखाणलेल्या ' सतारीचे बोल ' मधील पुढील ओळींसारख्या अनेक ओळी केशवसुतांच्या कवितेत दाखविता येतात.*

' एका खिडकीतुनि सूर तदा
पडले दिडदा, दिडदा, दिडदा '

' खिडकीतून सूर पडले ' हा प्रयोग हास्यास्पद आहे. कानी पडले असे म्हणायचे असावे ! ' स्ववशता विसरूनि बसलो ' हा त्याच कवितेतील प्रयोग असाच हेंगाडा आहे.

वर्ज्य मानला नाही, इतकेच नव्हे, तर जीवनपूजनाचा, सौंदर्यपूजनाचा, मानवपूजनाचा, काव्यपूजनाचा नवा संप्रदाय मराठीत उभा केला. हा केवळ, काव्यप्रकारातील फरक नव्हता, केवळ काव्यविषयातील फरक नव्हता केवळ काव्यशैलीतील फरक नव्हता, तर व्यक्तिमत्त्वातील व जीवनदृष्टीतील फरक होता. या जीवनपूजक, सौंदर्यपूजक व्यक्तिमत्त्वाला ' रोमँटिक व्यक्तिमत्त्व ' हेच एक नाव आहे. ' रोमँटिक व्यक्तिमत्त्व ' म्हणून त्याचा अभ्यास केला नाही, तर त्यातील परस्परविरोधी पण परस्परसंबद्ध धागे उकलणारच नाहीत.

केवळ इंग्रजी कवितेच्या वाचनामुळे ऐहिक विषयावर कविता लिहिणारे केशवसुतपूर्व कवी, अर्वाचीन कवितेचा पाया घालू शकते नाहीत ही गोष्टही लक्षात घेण्यासारखी आहे. याचा अर्थच असा की, अर्वाचीन केशवसुतसंप्रदाय हा केवळ ऐहिकपर काव्यसंप्रदाय नसून, स्त्रीसौंदर्य, सृष्टिसौंदर्य, प्रेम, स्वातंत्र्यांनी हृदय उचंबळून येणारांचा संप्रदाय होता. या संदर्भात आणखीही एकदोन गोष्टींसंबंधी निर्णयात्मक विधान करणे आवश्यक आहे. केशवसुत ज्याप्रमाणे केवळ इंग्रजी वाचनाचे फळ (Product) नव्हते, पिंडाने रोमँटिक होते, तसेच ते सौंदर्यवादी असले तरी सौंदर्यवादी संप्रदायाचे मूळ संस्थापक नव्हते, तर हाडाचे सौंदर्यवादी असलेले पहिले मराठी कवी होते. आणखी एका गोष्टीतील ' घालवेडेपणा ' आपण निक्षून उघड केला पाहिजे. ' केशवसुतही बंडखोर, नवकवीही बंडखोर, ' ' केशवसुतांनीही काव्यात क्रांती केली, नवकवींनीही काव्यात क्रांती केली ' असे म्हणत, केशवसुतांचीच क्रांती नवकवींनी पुढे नेली असे प्रतिपादणारे काही टीकाकार आढळतात. नवकवींची जीवनविषयक वृत्ती रोमँटिक कवींच्या अगदी विरुद्ध आहे हे लक्षात घेतल्यास वरील भ्रामक प्रतिपादन करण्याचे धाडस कोणी करणार नाहीसे वाटते. काव्याच्या बाह्यांगातील नावीन्य आणि सामाजिक बंडखोरी, एवढीच केशवसुतांची वैशिष्ट्ये होत असे मानणारे लोक केशवसुत आणि नवकवी यांना एकाच, बंडखोर प्रयोगवादी वर्गात घालण्याची जी चूक करतात, ती चूक केशवसुतांचा रोमँटिक पिंड ओळखल्याने टळते, हे वरील विवेचनावरून ध्यानात येईल.

आणखीही एक भेद स्पष्ट केला पाहिजे. जीवितपराङ्मुख संतकवी आणि परपुष्ट पंडितकवी यांच्याहून वेगळा असा शाहिरांचा वर्ग होता. सौंदर्यवादासंबंधी वरवर कल्पना असणारे लोक लावणीकार शाहिरांना ' रोमँटिक ' वर्गात घालण्याची कधीकधी चूक करतात. लावणीवाङ्मयातील मनमोकळ्या शृंगाराचे आणि अस्सल जोमदार शैलीचे महत्त्व असाधारण आहे. तथापि, लावणीतील शृंगारिकता आणि ऐहिकपरता ' सौंदर्यवादा 'ची जागा घेऊ शकत नाही. रोमँटिक प्रवृत्तीच्या प्रेमकाव्यात केवळ लावणीकाव्यातील रोखठोक शरीरासक्ती नसून अन्तर्मुख चिंतनशील प्रेमभावना असते. तसेच रोमँटिक काव्यात केवळ स्त्रीविषयक आसक्ती नसते, तर अखिल सृष्टीबद्दल, जीविताबद्दल व मानवाबद्दल आकर्षण व आशावाद असतो. केशवसुत–संप्रदायातील विविध वृत्तींचा (moods) व भूमिकांचा (attitudes) नीट अर्थ लागण्यास रोमँटिक अथवा

सौंदर्यवादी मनाच्या या विशिष्ट स्वरूपाचे नीट आकलन होणे जरूर आहे. प्रमुख मराठी टीकाकारांना आधी या गोष्टीची जाणीव नव्हती; व ती जाणीव करून दिली तरीही रोमँटिसिझमचा उपहास करणारे वाङ्मयच त्यांच्या वाचनात येण्याचा संभव अधिक असे. याखेरीजही एक मूलभूत अडचण उरत असे. ती म्हणजे समानधर्मित्वाची. एखाद्या धार्मिक वा वाङ्मयीन संप्रदायाचा खरा अर्थ समान वृत्तीच्या लोकांना जेवढा कळतो, तेवढा भिन्नवृत्तीच्या लोकांना कळत नाही. पाश्चात्त्य टीकावाङ्मयात समानधर्मित्वाची उणीव 'कल्पक सहानुभूती'ने (imaginative Sympathy ने) भरून काढलेली अनेकदा दिसते.

अर्वाचीन मराठी काव्याच्या वाट्याला मात्र, उपहासाच्या निमित्ताने जेवढी कल्पकता येते, तेवढीही हे अनोखे रोमँटिक 'मूड्स्' समजून घेताना आलेली दिसत नाही. टीकाकारांची एक पिढी बुद्धिवाद व सुधारणावाद यांना सर्वस्व मानणारी असल्याने सौंदर्याला पारखी होती;—आणि त्यानंतर उघडपणे सौंदर्यवादाची प्रतिक्रिया म्हणून जन्माला आलेल्या काव्याची व टीकेची पिढी चालू झाली ! त्यामुळे स्वतःला मान्य नसलेले गुण न ओळखणे, आणि स्वतःला मान्य असलेले (पण मूळ काव्यात नसलेले) गुण चिकटविणे या दोन्ही प्रकारांनी केशवसुतांचे सदोष आकलन व विवेचन आजही चालू आहे.

या लहानशा लेखात रोमँटिसिझमचे व त्याच्या अनुषंगाने केशवसुतांच्या कवितेचे सविस्तर विवेचन करणे शक्य नव्हते. जिज्ञासू वाचकांकरिता येथे एक गोष्ट सांगणे क्षम्य ठरेल अशी आशा आहे. माझ्या लेखातील मुख्य प्रमेय, 'वाङ्मयीन मूल्ये,' 'वादसंवाद' आणि 'टीकाविवेक' या माझ्या तीन पुस्तकांतील काही प्रकरणात विस्ताराने मांडलेले आढळेल.

• •



केशवसुत : आधुनिक मराठी काव्याचे जनक

केशवसुत हे अर्वाचीन मराठी कवितेचे जनक होत, ही गोष्ट सामान्यतः कोणीही मराठी टीकाकार वा इतिहासकार अमान्य करीत नाही. तथापि या विधानाचा अर्थ प्रत्येकजण आपापल्या पूर्वकल्पनांना जुळेलसा घेतो. कोणी 'अर्वाचीन काव्य' या संज्ञेचा अर्थ शिथिलपणे लावतात; तर कोणी 'काव्याचे जनक' या शब्दांचा अर्थ लावताना सूक्ष्म दृष्टीचा अभाव दाखवितात. वरील दोन्ही विधानांइतकेच आणखीही एक विधान बहुतेक मराठी टीकाकारांनी केलेले आढळेल. ते म्हणजे : 'केशवसुतांनी मराठी काव्यात क्रान्ती केली.' पण हे विधान करणाऱ्या सर्व टीकाकारांच्या मनात 'क्रान्ती' या शब्दाने मात्र वेगवेगळे अर्थ उभे राहतात असे दिसून येईल.

'केशवसुत' हे या क्रान्तिकारक कवीचे केवळ काव्यातील नाव असून त्याचे मूळ नाव कृष्णाजी केशव दामले हे होते, हे मराठी वाचकांना सुपरिचित असले, तरी सर्वच हिंदी वाचकांना ठाऊक असेल असे नाही. केशवसुतांची आज उपलब्ध असलेली पहिली कविता इ. स. १८८५ मधील आहे. त्यावेळी ते १९ वर्षांचे होते. ते वयाच्या ३९ व्या वर्षी प्लेगने वारले. त्यांच्या समग्र संग्रहात आज उपलब्ध कवितांची संख्या केवळ १३२ आहे. केशवसुतांच्या निधनानंतर बारा वर्षांनी म्हणजे १९१७ साली, मराठीतील सर्व-श्रेष्ठ कादंबरीकार कै. हरी नारायण आपटे यांनी त्यांच्या काव्यसंग्रहाची पहिली आवृत्ती प्रकाशित केली. केशवसुतांनी पूर्वायुष्यात आपल्या काही कविता नष्ट करून टाकल्या होत्या, ही गोष्ट व त्यांचे निधन चाळिशीच्याही पूर्वी झाले ही गोष्ट लक्षात घेऊनही, त्यांनी विपुल रचना केली असे म्हणता येत नाही. त्यांच्या हयातीत त्यांना सामाजिक महत्त्व येण्यासारखी अन्य परिस्थिती नव्हती. शिक्षण जेमतेम प्रवेश परीक्षेपर्यंत; नोकरी अल्पवेतनी शिक्षकाची व तीही अस्थिर; स्वभाव भिडस्त, संकोची व सात्त्विक; वास्तव्य नागपूरपासून हुबळीपर्यंत अनेक ठिकाणी, या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या, तर समकाली-नांत लोकप्रियता मिळविण्यास त्यांना बऱ्याच अडचणी होत्या हे सहज ध्यानात येईल.

आणि तरीही त्यांच्या निधनानंतर केवळ दहाच वर्षांत हरिभाऊ आपटे आणि राम गणेश गडकरी यांसारखे विख्यात आधुनिक लेखक उघडपणे स्वतःला केशवसुतांचे भक्त म्हणवीत होते, ही गोष्ट अर्थपूर्ण आहे.

केशवसुतांचे महत्त्व परिपक्व वा अभिजात काव्याचे निर्माते म्हणून नसून वेगळ्या आणि प्रक्षोभक काव्याचे जनक म्हणून आहे. त्यांच्या काव्याच्या वेगळेपणाने आणि प्रक्षोभकतेने त्यांच्या काळातील व नंतरच्या समग्र मराठी कवितेलाच वेगळे वळण लागले. या अर्थानेच त्यांना क्रान्तिकारक म्हणतात व नव्या कवितेचे जनकही म्हणतात. तथापि केशवसुतांनी केलेल्या क्रान्तीचे नेमके स्वरूप टीकाकारांनी ओळखले आहे, असे आजही म्हणणे कठीण आहे. काहींच्या डोळ्यांपुढे क्रान्ती म्हणताच सामाजिक क्रान्ती उभी राहते. रूढी मोडणे, जाती तोडणे, स्त्रियांची परवशता नाहीशी करणे, हा या लोकांच्या क्रान्तीचा अर्थ असतो. केशवसुतांच्या काव्यात हे विषय व हे विचार आहेत पण त्यांनी काव्यात केलेल्या क्रान्तीचे गमक हे आहे असे म्हणणे म्हणजे त्यांचे काव्य समजले नाही असे कबूल करण्यासारखे आहे. काही लोक त्यांनी काव्याच्या छंदात व शैलीत फरक केला हे त्यांच्या क्रान्तिकारकत्वाचे गमक मानतात तर काहीजण त्यांच्या सर्वच वेगळेपणाचे मूळ इंग्रजीच्या अनुकरणात मानतात. नव्हे, मराठी कविता इंग्रजी वळणावर नेण्याचा केशवसुतांनी सहेतुक प्रयत्न केला एवढेच त्यांचे वैशिष्ट्य मानतात. या सर्व लोकांच्या म्हणण्यात तथ्य कितपत आहे, हे पाहण्यापूर्वी केशवसुतकालीन कवितेचे व काव्याभिरुचीचे स्वरूप पाहणे जरूर आहे.

ब्रिटिश राज्य आणि इंग्रजी विद्या यांच्या संपर्कानंतर हिंदुस्तानच्या प्रत्येक प्रांताच्या हरएक जीवनांगात बदल झाला. शिक्षण, प्रवास, न्यायदान, गद्यवाङ्मय यासारख्या अनेक क्षेत्रात वेगळेयुग सुरू झाले. तथापि काव्याच्या क्षेत्रात केवळ अशा बाह्य संपर्काने बदल होणे शक्य नसते. त्याही क्षेत्रात, इंग्रजीचा आदर्श ठेवून बदल करण्याचे प्रयत्न केशवसुतांपूर्वीच्या काही कवींनी केले. इंग्रजी राजवटीतील अशा कवींपैकी प्रमुख म्हणजे कुंटे, महाजनी, आगाशे, कानिटकर हे होत. यापैकी प्रत्येकाचे शिक्षण व वाचन केशवसुताहून अनेक पटींनी अधिक होते. पण त्यांतील एकजणही 'आधुनिक मराठी कवितेचा जनक' या पदवीला पात्र ठरला नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे. यांनी इंग्रजी वाचनाच्या जोरावर मराठी कवितेत सहेतुकपणे कोणते फरक केले ते पाहण्यासारखे आहे.

कुंट्यांनी 'राजा शिवाजी' हा विषय घेऊन महाकाव्य अथवा 'वीरचरित' लिहिण्याचा यत्न केला. या काव्याला त्यांनी लिहिलेल्या इंग्रजी प्रस्तावनेवरून काव्यातील क्रान्तीची त्यांची कल्पना कळते. त्यात त्यांनी गद्याची भाषा आणि पद्याची भाषा यांत फरक असण्याचे कारण नाही असे प्रतिपादले आहे. केशवसुतांचेही मत असेच दिसते व त्यानंतर रविकिरण मंडळाच्या कवींपासून ते आजच्या नवकवींपर्यंत, सर्वांनी "पद्याच्या भाषेला गद्याच्या भाषेकडे ढकलण्याचा प्रयत्न म्हणजेच आधुनिकता" ही

कल्पना चिकाटीने उचलून धरली आहे. कुंट्यांनी दुसऱ्याही एका बाबतीत सहेतुक क्रान्ती केली. ती बाबत म्हणजे काव्याच्या विषयाची. ब्रिटिश अंमलापूर्वी मराठी काव्याचे विषय सामान्यतः धार्मिक वा पौराणिक असत. प्राचीन संस्कृतात ऐहिक विषयावरच प्रायः काव्यरचना आहे. मग मराठीतच तेवढे धार्मिक विषय का आवश्यक ठरावे ? अशी ही आधुनिक काव्यदृष्टी होती. पण हे सर्व 'क्रान्तिकारक' विचार इंग्रजी प्रस्तावनेत सांगणारे कुंटे अर्वाचीन कवितेचे जनक मात्र ठरले नाहीत !

कुंट्यांप्रमाणे इतरही काही काव्यप्रेमी मंडळी मराठी कवितेत क्रान्ती करण्याच्या प्रयत्नात होती. त्यांच्या काव्यावरून पाहता ऐहिकपर विषय आणि काव्याचे स्फुट स्वरूप हे दोन त्यांनी काव्याच्या आधुनिकत्वाचे विशेष म्हणून ठरविले होते असे दिसेल. महाजनी, आगाशे, कानिटकर यांच्यासारख्या कवींनी ऐहिक विषयांवर स्फुट कविता लिहिली. केशवसुतांनी तरी दुसरे काय केले ? अशी स्थूल विचारसरणी पुष्कळदा मांडण्यात येते. याचा अर्थ केशवसुतांच्या काव्यातही ऐहिक विषय, स्फुट रचना आणि गद्यसदृश शैली एवढीच काय ती वैशिष्ट्ये आहेत असे या टीकाकारांचे मत दिसते. तथापि सर्वसामान्य मराठी रसिकांचा अखेरचा निर्णय मात्र केशवसुतांनीच मराठी काव्यात क्रान्ती केली असाच आहे. केशवसुतांच्या काव्यात इंग्रजी राजवटीतील त्यांच्या आधीच्या काव्याहून वेगळे काय आहे ?

ते ओळखण्याकरिता आपली काव्यक्षेत्रीय क्रान्तीची कल्पना तपासून घेतली पाहिजे. अर्वाचीन मराठी काव्यात केशवसुतांपासून जी क्रान्ती झाली, ती केवळ शैलीत वा काव्यविषयात झालेली क्रान्ती नव्हती. त्या क्रान्तीचे मूळ केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वात होते. केशवसुतांनी ब्रिटिश अंमलातील त्यांच्यापूर्वीच्या कवींप्रमाणे केवळ ऐहिक विषयावर लिहिले असे नव्हे, तर ऐहिक विषयांकडे त्यांनी वेगळ्या दृष्टीने पाहिले. त्या दृष्टीला केवळ (Secular) वा ऐहिकपर दृष्टी म्हणण्याने तिचे वेगळेपण कळणार नाही. केशवसुतांच्या दृष्टीचा वेगळेपणा सौंदर्यपूजनात, भावनापूजनात व अन्तर्मुखतेत होता. जी माणसे जीविताच्या सौंदर्याकरिता व भावनांच्या उत्कटतेकरिता जगतात, ती केवळ 'ऐहिकनिष्ठ' असतात असे म्हणण्याने त्यांचे पूर्ण वर्णन होणार नाही. त्याचे वर्णन सौंदर्यपूजक, भावनापूजक व आत्मनिष्ठ (Subjective) या विशेषणांनी करावे लागेल. इंग्रजीतील 'रोमँटिक' या शब्दाने ज्या विशिष्ट काव्यमय, सौंदर्यपूजक वृत्तीचा बोध होतो, तोच केशवसुतांच्या वृत्तीत व काव्यातही झाला. या वृत्तीने जीविताकडे आणि काव्याकडे पाहणारा केशवसुतासारखा कवी कुंटे–आगाशे यांच्यासारख्या केवळ इंग्रजी-शिक्षित ऐहिकनिष्ठ कवींपेक्षा किती वेगळे काव्य लिहितो ते केशवसुतांचे काव्य वाचण्यानेच ध्यानात येण्यासारखे आहे.

केशवसुतांनी सहेतुकपणे काव्याला नवे वळण लावले असे नसून केशवसुतांच्या रूपाने एक 'नवा मानव' जन्माला आला होता. तो भावनापूजक होता; मानवपूजक होता; निसर्गपूजक होता; स्वातंत्र्यपूजक होता; प्रेमपूजक होता; आत्मपूजक होता व

काव्याच्या सामर्थ्यावर अपार श्रद्धा ठेवणारा होता. यांपैकी एकही विशेषण त्यांच्या आधीच्या इंग्रजी शिक्षित ऐहिकनिष्ठ कवींना लावण्यासारखे नव्हते. जे लोक काव्याच्या बाह्यांगात केशवसुतांनी केलेली क्रान्ती शोधतात, ते खादीच्या कपड्यात गांधीवादाचे हृदय शोधणारांइतकेच वेडे असतात.

केशवसुती क्रान्तीचे हृदय सर्वस्वी वेगळ्या रोमँटिक व्यक्तिमत्त्वात आहे–केवळ इंग्रजी काव्यवाचनात नाही की ऐहिक विषयांच्या निवडीत नाही, हे ज्या मराठी टीकाकारांनी ओळखले नाही, त्यांच्या मूल्यमापनात गमतीच्या, पण ढोबळ चुका झाल्या आहेत. त्यांनी केशवसुतांच्या समाजसुधारणेच्या व रूढिभंजनाच्या कवितांना सर्वांत अधिक महत्त्व दिले. तुतारी, गोफण, निशाण या केशवसुतांच्या कविता त्यांच्या उत्तम कवितांपैकी आहेत यात शंका नाही. पण या लढवय्येपणाकरिता आणि ओजोगुणाकरिता केशवसुतांना क्रान्तिकारक ठरविणाऱ्या या टीकाकारांना केशवसुतांच्या कवितांतील प्रेमळपणा, हळवेपणा, खिन्नता, आत्मानुकंपा, गूढगुंजन, आत्मगौरव या वृत्ती कमी महत्त्वाच्या वाटलेल्या आहेत– नव्हे, त्या केशवसुतांना कमीपणा आणणाऱ्या वाटलेल्या आहेत.

आम्ही कोण म्हणून काय पुसता ? आम्ही असू लाडके
देवाचे,
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती
द्यावया सौंदर्यातिशया...

यांसारख्या ओळींत 'केशवसुतांचा हास्यास्पद अहंकार दिसतो' अशी टीका काही विद्वान् टीकाकारांनी केली आहे तर काहींनी त्यांच्यावर रडवेपणाचा आणि स्त्रैणपणाचा आरोप केला आहे. त्यांच्या समाजक्रांतीच्या ओजस्वी कविता तेवढ्या चांगल्या; आत्मानुकंपेच्या वा आत्मगौरवाच्या कविता म्हणजे त्यांचे काव्यक्षेत्रांतील 'स्खलन' होय असे म्हणण्याचा प्रसंग मराठीतील काही विद्वान टीकाकारांवर आला आहे ! त्या टीकाकारांचे वैगुण्य दाखविण्याकरिता मी हे येथे सांगत नाही; कारण हिंदी वाचकांनी त्यांची टीका वाचलेली असण्याचाही संभव नाही. ही परस्परविरोधी आणि अर्धवट मते सांगण्यातील माझा हेतू वेगळाच आहे. केशवसुत–संप्रदायी कविता म्हणजे बाह्यांगातील किरकोळ फेरफार नसून कवीच्या जातीतीलच फरक होय हे सांगणे हा माझा हेतू आहे . जीविताकडे प्रेमिकाच्या हळव्या दृष्टीने पाहणाऱ्या, पण अन्यायामुळे बंडखोर माणसाप्रमाणे खवळणाऱ्या नव्या रोमँटिक मानवाची मनोमन ओळख पटली नाही तर केशवसुतांच्या काव्यातील विविध आणि विरोधी सुरांची ओळख पटणार नाही, हे मला सांगावयाचे आहे.

केशवसुतांचा सृष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोणही जुन्या संस्कृत काव्यात घोळून निघालेल्या माणसांना कळण्यासारखा नाही. 'पुष्पाप्रत' या त्यांच्या कवितेत त्यांनी बालपणी आपण पुष्पाला अधिक जवळ होतो; आता प्रौढपणी शेकडो निराशांत पोळून

निघाल्यावर पुष्पाला स्पर्श करण्याचीही आपली लायकी उरली नाही असा विलाप केला आहे. त्यांनी—

चिरतरुणारे ! चिररुचिरारे !

या शब्दांत फुलाला संबोधिले आहे. ' फूलपाखरू ' या कवितेत त्यांनी फुलपाखराला अमर ठरविले आहे आणि विचारले आहे

फूलपाखरू मरण देखिले
आहे का कोणी ? ।

या नव्या कवीची आत्मलक्षी भावनाप्रधान भूमिका न ओळखता, ज्यांनी वस्तुनिष्ठ निसर्गवर्णनाची अपेक्षा केली, त्यांना या दोन्ही कवितांत दोष दिसले आहेत. ' पुष्पाप्रत ' या कवितेवरून ती कविता कोणत्या फुलाला उद्देशून आहे हे कळत नाही; अर्थात कवीचे निसर्गावलोकन स्थूल तरी असले पाहिजे, नाहीतर ' सेकंडहँड ' तरी असले पाहिजे, असा ठपका काही टीकाकारांनी ठेवला आहे तर ' फुलपाखरू कधी कोणी मेलेले पाहिले आहे का ? ' असे विचारणाऱ्या केशवसुतांना " होय आम्ही पाहिले आहे ! " असे बजावून पराभूत करणारे शूर टीकाकारही निघाले आहेत !

या सर्व पांडित्याला अप्रयोजकपणा हे एकच नाव देता येण्यासारखे आहे. कीट्स्च्या निधनानंतर, ' कीटस् मरणे शक्य नाही ' असे ९०० ओळींच्या काव्यात प्रतिपादणारा शेले; आणि केशवसुतांच्या निधनानंतर ते ' मेले नाहीत ' असे सांगणारे गोविंदाग्रज या दोघांनाही या पढिक पंडितांनी डॉक्टरचे सर्टिफिकेट दाखवून पराभूत केले असते, असे मला वाटते ! कवी कोणत्या भूमिकेवरून बोलत आहे हे न ओळखता, हे टीकाकार वैज्ञानिक बिनचूकपणाची अपेक्षा करीत आहेत, हे उघड आहे. या दोन्ही कवितांत कवी बाह्य वस्तूंचे वर्णन करीत नसून, स्वतःच्या मनःस्थितीचे वर्णन करीत आहे. आत्मनिष्ठ भावनापूजक कवींच्या काव्यात वस्तुनिष्ठ निसर्ग–वर्णनाची अपेक्षा करण्याची चूक अनेक पंडित टीकाकारांनी केलेली आहे याचे कारण ते टीकाकार केशवसुतांसारख्या नवमानवाशी समरसच झालेले नव्हते. हा नवा मानव सृष्टिसौंदर्याचा वा स्त्रीसौंदर्याचा अनुभव घेताना जुन्या संस्कृत कवींहून अधिक अन्तर्मुख होता. तो वस्तूपेक्षा स्वतःच्या वृत्तीत अधिक मग्न होता. सौंदर्यास्वाद घेताना स्वतःच्या भावनेला व वृत्तीला महत्त्व देणाऱ्या या कविवर्याला सौंदर्यवादी अथवा रोमँटिक हे नाव आहे. या कविवर्याची जीविताकडे पाहण्याची नवी वृत्ती समाजावून न घेताच त्यांचे काव्य वाचल्यास आपणांस त्यांचे काव्य आवडणारच नाही असे नव्हे; पण ते न आवडण्यापेक्षाही एक अधिक वाईट अशी गोष्ट घडेल. आपणांला ते चुकीच्या कारणाकरिता आवडेल. आपणाला त्यांत चुकीची वैशिष्ट्ये दिसतील. आपण त्या कवींच्या अंगी भलतीच एखादी क्रांती चिकटवू ! केशवसुतांच्याबाबतीत नेमके तेच झाले. ' त्यांनी समाजसुधारणेची तुतारी फुंकली '; ' जे आगरकरांनी गद्यात केले तेच केशवसुतांनी पद्यात केले ' हे तरी त्यांच्या क्रांतीचे सार

म्हणून सांगितले जाते; नाहीतर त्यांनी वृत्तांचे, यमकांचे आणि सुनीतांचे प्रयोग केले हे तरी त्यांच्या क्रांतीचे सार म्हणून सांगितले जाते.

वास्तविक केशवसुतांनी महाराष्ट्रीय मानवाचे पूजाविषयच बदलून टाकले. पूर्वी तो एक पंढरीच्या विठोबाकरिता तरी रडे, नाहीतर पुराणातली दुःखे उकरून तरी रडे. देशाकरिता रडणे, स्त्रीकरिता रडणे, स्वतःचेच गत आयुष्य आठवून रडणे, पुष्परूपी सहचराला जीवनकथा सांगून मन मोकळे करणे, अनामिक दुःखांनी दुःखित झाल्यावर 'सतारीच्या बोलां'नी सान्त्वन पावणे, हे भावनांचे खेळ जुन्या मराठी मानवाला अज्ञात होते. पुराणातली रामकृष्णांची सुखदुःखे तरी त्यांच्या काव्याचे विषय होत नाही तर ईश्वराबद्दलची खरी-खोटी तळमळ तरी त्याच्या काव्याचा विषय होई. सामान्य मानवाची सामान्य सुखे आणि सामान्य दुःखे ही क्षुद्र मानली जात. त्यांना काव्यविषय बनविणे उचित मानले जात नसे. इंग्रजी कविता वाचल्यावर काहींनी असे सामान्य मानवाचे विषय निवडले, पण त्यात अनुभूतीचा अस्सलपणा नसून काव्यरचनेचा खटाटोपच अधिक असे. ज्याच्या भावना विविध, उत्कट व अस्सल व ज्याचे काव्य त्या भावनांतून अपरिहार्यपणे उफाळलेले असा केशवसुत हा मराठीतील पहिलाच कवी होय. जुन्या भक्तिमार्गी कवींच्या भावना उत्कट असत, त्यांची शैलीही अस्सल मराठी असे. पण त्यांनी भक्तीखेरीज इतर भावना जाणूनबुजून मारलेल्या असल्यामुळे आधुनिक मानवाला त्यांचे काव्य एकादशीच्या 'मेन्यू' प्रमाणे वाटे. ज्या कवीच्या काव्यात कोणत्याच भावनेला अटकाव नव्हता आणि ज्या कवीला जीवनातील कोणतीही उत्कट भावना सारखीच रक्षणीय वाटे असा केशवसुत हा पहिलाच मराठी कवी होय. मराठी काव्याच्या अर्वाचीनतेचे लक्षण कवीच्या स्वतःच्या रसरशीत व्यक्तिमत्त्वाची जाणीव हे होते. सामान्य मानवाच्या भावनाही काव्याला उदात्तविषय पुरवू शकतात, हे केशवसुतांच्या काव्याने प्रथमच सिद्ध केले. निसर्गाविषयीची, स्त्रीसौंदर्याविषयीची व स्वतःविषयीची व्याकुळता ईश्वरविषयक तळमळीइतकीच रमणीय व उदात्त बनू शकते, हेही केशवसुतांच्या काव्यानेच सिद्ध केले. देश, काव्य आणि कवी यांच्या विषयीचा अभिमान हा विषयही केशवसुतांच्या काव्यानेच प्रथम गौरविला. "इंग्रजीतून मराठीत काही काव्यप्रकार आणून मराठी कवितेत मी बदल करीत आहे," अशी केशवसुताची कल्पना नव्हती. मी माझ्या सौंदर्यपूजक भावनाप्रधान मनाच्या उसळणाऱ्या ऊर्मींना वाट करून देत आहे ही त्यांची कल्पना होती. स्वहृदयाचे स्वातंत्र्य व भावनात्मक सचोटी हे त्यांच्या काव्यविषयक दृष्टीचे पहिले सूत्र होते. या स्वातंत्र्यातून व सचोटीतूनच त्यांच्या सामाजिक वा राजकीय स्वातंत्र्य-प्रीतीचा जन्म होता. वृत्तपत्रसंपादकांचे 'सुधारणापूजन' आणि त्यांचे सुधारणापूजन यांत मूलतःच फरक होता.

ही रसरसती आणि सर्वांगीण भावनात्मक सचोटी केशवसुतांपूर्वीच्या कोणाही कवीत नव्हती. संत कवीतही नव्हती कारण भक्ती आणि विरक्ती याखेरीज अन्य भावना मारून टाकण्याच्या धडपडीमुळे त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोण कृत्रिम, खोट

आणि शुष्क बनलेला होता. जुने संत आणि नवे सुधारक या दोहोंहूनही केशवसुतांची जीवनदृष्टी अधिक निकोप आणि रसरशीत होती. पण जुन्या विदग्ध संस्कृत कवींच्या-इतकी ती कृत्रिम आणि कामुक मात्र नव्हती. पाश्चात्त्य रोमँटिकांचा आद्य ऋषी रूसो याचे सूत्र 'निसर्गाकडे परत चला!' (Return to Nature) हे होते; तर केशवसुतांचे महासूत्र 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे।' हे होते. सौंदर्यपूजकांची (रोमँटिकांची) स्वातंत्र्य कल्पना आणि तर्कनिष्ठांची (Rationalists) स्वातंत्र्यकल्पना वेगळी होय, हे प्रमुख मराठी टीकाकारांनी ओळखलेले नाही. सुधारकांना केवळ रूढींपासून मुक्तता हवी होती; राजकीय चळवळ्यांना ब्रिटिश राज्यकर्त्यांपासून मुक्तता हवी होती तर केशवसुतसंप्रदायी कवींना रुक्ष, पोटार्थी सौंदर्य-विहीन 'Philistine' जीवनदृष्टीपासून मुक्तता हवी होती.

'कोठे स्वर्गसमक्षता प्रकटते हे नेहमी पाहणे' हा त्यांचा संदेश, 'गोफण हाणा', 'रूढी मोडा' या संदेशाहून अधिक महत्त्वाचा आणि अधिक 'त्यांचा' असा आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय कार्यक्रमांना काव्याहून अधिक महत्त्व देणारे लोक केशवसुतांच्या काळीही केशवसुतांना छेडीत होते.

"झाकायास तनूस वस्त्रहि न तें आता पुरेसे मिळे
यावेळेस कसे कवे तुज सुचे गाणे न माते कळे"

असे विचारून कवीला हिणविणारे लोक त्याकाळी होते. त्यांचेच आजचे वंशज केशवसुतांच्या सामाजिक कविताच तेवढ्या खऱ्या, केशवसुत संप्रदायी कविता आणि त्यांच्या हळव्या भावनापूजक, सौंदर्यपूजक कविता मात्र रडव्या आणि लाजिरवाण्या कविता होत, असे प्रतिपादित आहेत!

समाजातील अन्याय दूर करणे एवढेच केशवसुतांच्या काव्याचे उद्दिष्ट नव्हते; तर व्यक्तिमात्रांची अहृदयता व अंधता नाहीशी करणे, हे त्यांचे खरे उद्दिष्ट होते.

पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया—
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करामाजिया

असा त्यांचा कविवर्गाविषयीचा आणि कवींच्या 'Mission' संबंधीचा गर्व होता. उपयुक्ततावादी टीकाकार आणि शून्यवादी नवकवी, हे दोघेही आज केशवसुतांना शताब्दिमहोत्सवाच्या पर्वणीमुळे 'आपले' म्हणत आहेत. पण म्हणून केशवसुतांचे 'खरे गोत्र' निःसंदिग्धपणे सांगण्याची अधिकच गरज आहे!

● ●

केशवसुतांचे भांडवल

ज्या आद्य आधुनिक कवीच्या जन्माला यंदा शंभर वर्षे पूर्ण होत आहेत व ज्याच्या स्मृतीला शताब्दीची पूजा बांधण्यात विविध संस्था आणि व्यक्ती यांमध्ये आज चुरस लागून राहिली आहे, त्याच्या चरित्राचा आणि कर्तृत्वाचा विचार केला म्हणजे काळाच्या कर्तृत्वाचे कौतुक वाटू लागते. स्वतः केशवसुतांना काळाने दिलेल्या या निवाड्याचे आश्चर्यही वाटले नसते, की त्यामुळे आनंदही झाला नसता. ज्यांना आपल्या पात्रतेची आणि दुर्दैवाची सारखीच जाणीव असते, अशा स्वाभिमानी वर्गात केशवसुत मोडतात. साठ वर्षांमागे जेव्हा ते अचानक प्लेगच्या भक्ष्यस्थानी पडले, तेव्हा जर त्यांना १९६६ मध्ये तुमच्या विवाह्य फोटोवरून तुमच्या नावाची सरकारी तिकिटे निघतील असे कोणी भविष्य सांगितले असते, तर त्यांना नवलही वाटले नसते अन् आनंदही वाटला नसता. भोवतालच्या जगाची वाङ्मयीन, वैयक्तिक आणि सामाजिक मूल्ये बदलण्याकरिता ज्याचा जीव घडपडत होता त्याचे, त्या जगाला उशिरा का होईना, जाग आल्याचे समाधान खिन्न मनाच्या हास्यासारखेच असणार.

वीस वर्षांमागे व्याख्यानानिमित्त मी सोलापूर येथे गेलो होतो. व्याख्यानातील प्रतिपाद्याच्या ओघात मी आधुनिक कवितेबद्दल–नव कवितेबद्दल नव्हे–गौरवोद्गार काढले. अर्थात केशवसुतांचाही गौरवपर उल्लेख केला. अध्यक्षस्थानी संतकवींचे अभिमानी असलेले एक स्थानिक प्रोफेसर होते. व्याख्यानानंतर एकाच टांग्यातून दोघे घरी येताना त्यांनी आधुनिक कवींसंबंधी–विशेषतः केशवसुतासंबंधी–जे रागाचे आणि तुच्छतेचे उद्गार काढले, ते माझ्या आजही ध्यानात आहेत. "कुणीकडे संतकवी ? किती विपुल त्यांची रचना ! केवढं त्यांचं वैराग्य ! अन् कुठे हा बीस रुपये पगार मिळवणारा असंतुष्ट मास्तर ! त्याच्यासारख्या दहा कवींची कविता एकत्र केली, तरी आमच्या संत कवींपैकी एकाच्या निम्मीही भरणार नाही !"

हे संतांचे भाटच तेवढे केशवसुतांना कमी लेखतात असे नव्हे. इंग्लिश आणि संस्कृत

कवीचे स्तुतिपाठकही हीच भाषा वापरतात, निदान वापरीत असत. ... ! कारण आता केशवसुतांचा शताब्दी महोत्सव झाल्यावर आणि केशवसुतांची तिकिटे निघाल्यावर ही भाषा त्यांना जरा जपूनच वापरावी लागेल. कुणी म्हणतो केशवसुतांचे काव्यवाचन 'गोल्डन ट्रेझरी' या पुस्तकातल्या शेले–कीटसच्या वेच्यांपलीकडे नव्हतं. कुणी त्यांच्या कविता इंग्रजीतील कल्पनांवर आधारलेल्या आहेत, हे सिद्ध करण्याकरिता इंग्रजी पुस्तके उलथीपालथी करतो. कुणी त्यांच्या कवितांतील निराशेवरून त्यांचा चिरचिरेपणा गृहीत धरतो, कुणी त्यांच्या कवितेतील आत्मविश्वासावरून त्यांना घमेंडखोर ठरवतो. त्यातल्या-त्यात केशवसुतांचे सामाजिक विचारच आमच्या या विद्वान टीकाकारांच्या पसंतीला उतरतात, असे म्हणता येईल. पण तिथे पुन्हा ते आगरकरादी वीरांच्या मानाने कर्तृत्वात कमी भरतात ही या न्यायनिष्ठुर मंडळींना अडचण वाटतेच! सारांश आमच्या 'भारी' मूल्यांच्या दृष्टीने पाहता हा मनुष्य हलकाच ठरतो!

पण तसे म्हणू लागावे, तर कित्येक गोष्टी या टीकाकारांना फार अडचणीच्या भासतात. हरी नारायण आपटे केशवसुतांचे चाहते, अन् त्यांनीच त्यांच्या कवितांची पहिली आवृत्ती काढलेली. राम गणेश गडकऱ्यांसारखा प्रज्वलित प्रतिभेचा कवी उघडपणे स्वतःला केशवसुतांचा 'चेला' म्हणवी. केशवसुतांवर मराठीत जेवढे वाङ्मय निर्माण झाले आहे तेवढे दुसऱ्या कोणाही आधुनिक कवीवर झालेले नाही. त्यांच्या चाहत्यांत व उघड अनुयायांत रे. टिळकासारखे श्रेष्ठ व ज्येष्ठ कवीही होते. आजही त्यांची कविता अभ्यासताना व अध्यापिताना तिच्यामधील जोम व जातिवंतपणा जाणवतो, त्यांनी मराठी कवितेला वेगळे वळण लावले यामुळे तर त्यांचे नाव वाङ्मयाच्या इतिहासात अमरच राहील. या निर्धन अल्पशिक्षित आणि अल्पायुषी कवीच्या सामर्थ्याचे गमक आहे तरी कशात?

केशवसुतांबद्दल तुच्छतेचे उद्गार काढणारे मराठी विद्वान् म्हणजे काही केशवसुतांचे वैयक्तिक वैरी नव्हेत. पण तरीही त्यांना हरिभाऊ आपटे, गडकरी, रेव्ह. टिळक यांच्या मताविरुद्ध मत हिरिरीने मांडण्याची हिंमत होते, ही केवळ वैयक्तिक लहर नव्हे. यात आमची वाङ्मयीन, नैतिक आणि सामाजिक मूल्ये सूचित होतात. काव्याच्या आणि कविचरित्राच्या थोरपणाची कसोटी कोणती? पण या कसोट्या बदलण्याकरिताच ज्याचा जन्म, त्याच्या काव्याला चुकीचे मूल्यमापन आले तर नवल कसचे? नवल हे की अद्या-पही केशवसुत–पूर्वमूल्यांच्या पलीकडे न गेलेले विद्वान महाराष्ट्रात असावेत! या विद्वा-नांच्या मते चांगले काव्य म्हटले की ते दीर्घ पाहिजे; निदान विपुल असावे, तसेच ते 'विदग्ध' असावे. म्हणजे त्यात विद्वत्ता आणि आलंकारिकता यांचे दर्शन घडावे. आणि चांगला श्रेष्ठ कवी कसा असावा? तो द्रव्याने, दानतीने आणि कर्तृत्वाने प्रतिष्ठा पावलेला असावा. केशवसुत मोठ्या आणि सुखवस्तू घराचे घटक असले, तरी व्यक्तिशः दरिद्री होते. अन् मॅट्रिक होऊन हायस्कूलच्या खालच्या इयत्ता शिकवत बसलेल्या मास्तरचे कर्तृत्व ते काय असणार? उरला उरली दानत. केशवसुतद्वेष्ट्या या विद्वानांना

केशवसुतांच्या दानतीसबंधी प्रतिकूल बोलायला सापडत नाही. यात त्यांची थोडी निराशाच होत असणार ! माधव ज्यूलियन, गडकरी, विनायक यांच्यासबंधी जशा भरपूर वदन्ता त्यांच्या मित्रांनी आणि शत्रूंनी उपलब्ध करून ठेवल्या आहेत, तशा केशवसुतासंबंधी असत्या तर आणखी बहार झाली असती ! पण स्वतःच्या हयातीत उपेक्षित असलेला आणि एकटा पडलेला हा कवी, लोकापवादाच्याबाबतीतही उपेक्षितच ठरला ! त्यामुळे त्याच्या दानतीबद्दल या रसिकांना काही बोलण्यासारखे मिळतच नाही. मात्र अशा उपेक्षणीय कवीचा गाजावाजा होत असलेला पाहून या मंडळींना नवल वाटते.

नवल करणाऱ्या या मंडळीत केवळ हे जुन्या प्रतिष्ठित मूल्यांचे भोक्तेच आहेत असे नव्हे. नवे क्रांतिकारकही केशवसुतांच्या या मरणोत्तर वैभवामुळे चकित होतात. या कवीने क्रान्ती केली तरी कोणती ? स्वतःला आणि स्वतःच्या भावनांना पूजणारा हा कवी, कसला आला आहे क्रांतिकारक ? हा तर रोगट रोमँटिक ! बरे, कवितेच्या बाह्यरूपात तर याने काहीच क्रान्ती केली नाही. थोडा फार वेगळ्या छंदांचा वापर केला पण वृत्त आणि यमक अजिबात लाथाडण्याचा पराक्रम त्याने केलाच नाही. 'मानवी भावना झूट आहेत', 'मानवी संस्कृती हे ढोंग आहे', 'काव्यातील वृत्तयमकादी अंगे म्हणजे कृत्रिम आणि त्याज्य बहिरंग आहे' येथपर्यंत ज्यांची मजल गेली, ते मर्ढेकरोत्तर कवी खरे क्रान्तिकारक !

सारांश, विदग्ध कवी, प्रतिष्ठित पुढारी, शून्यवादी क्रांतिकारक यापैकी काहीच नसणारा हा कवी, युगप्रवर्तक मानला जावा, हे आमच्या विद्वानांना अद्यापही मान्य नाही. पुण्यातील एका ग्रंथपालनतज्ज्ञ विदुषींनी केशवसुतांच्या समग्र काव्याची "शब्द संयोजनसूची" (Concordance) तयार करण्याचे काम हाती घेतले आहे, हे ऐकताच एका विद्वानांच्या चेहऱ्यावर उपहासाची रेषा उमटली, "हँ ! यंदा आता केशवसुतांचं हे लोक जे जे करतील, ते थोडंच आहे !" कारण 'vedic-concordance', 'शेक्सपीरियन् कंकॉर्डन्स्', 'ज्ञानेश्वरीचे कंकॉर्डन्स्' हे एकवेळ क्षम्य आहे, पण केशवसुतांची कविता ती काय ? अन् तिचे कंकॉर्डन्स् कसलं करता ?

पण प्रतिष्ठितांना अन् पढिकांना केशवसुतांचे मोठेपण समजत नाही. यातच त्यांचे मोठेपण अन् क्रांतिकारकत्व साठवलेले आहे. विद्वत्ता आणि सामाजिक पुढारीपण यांत साठवलेले मोठेपण महाराष्ट्राच्या परिचयाचे होते; पण विजनवासात स्वतःच्या "काल्पनिक" सुखदुःखांची गाणी रचित बसलेल्या अविद्वान्, एकलकोंड्या कवीचे मोठेपण महाराष्ट्राला नवीन होते. हां, तेही त्यांनी पाहिलेले होते; पण त्या मोठेपणाला सन्तपणाची बैठक असे. हा मनुष्य संतही नव्हता, पुढारीही नव्हता, विदग्ध आणि पढिक कवीही नव्हता, याचे भांडवल होते तरी कोणते ? त्याच्या मोठेपणाबद्दल वाद माजोत, पण फार मोठ्या लोकांना त्याचे मोठेपण व वेगळेपण जाणवले आहे, यात शंका नाही.

केशवसुतांच्या मोठेपणाचे रहस्य ओळखायचे असेल तर एक वेगळे मूल्य आपण पत्करायला हवे. ते मूल्य नैतिकही आहे आणि वाङ्मयीनही आहे. त्याचे नाव

" Sincerity " किंवा ' प्रांजलपणा ' हे होय. विद्वत्ता किंवा संघटना सर्वांनाच साधेल असे नव्हे. पण विद्वान, पुढारी आणि संत यांच्याखेरीज कुणापुढे आपले मस्तक नमतच नाही की काय ? जो अंतर्बाह्य प्रांजल आणि अंतर्बाह्य सारखाच आहे, ज्याची किंमत, 'त्याने कशाचा संग्रह केला आहे,' यावर अवलंबून नसून, तो स्वतः काय आहे, यावर अवलंबून आहे, अशा माणसांचे महत्त्व सर्व जग स्वयंस्फूर्तीने कबूल करते. आणि जेव्हा असा मनुष्य आपल्या प्रांजल भावनांचे महत्त्व स्वतःच ओळखतो—नव्हे, ते एकमेव धन मानतो; ते शब्दांच्या द्वारे दुसऱ्याला नजर करण्यात धन्यता मानतो, तेव्हा त्या निर्धन मनुष्याला एका वेगळ्या जातीचे विभूतिमत्त्व प्राप्त होते !

केशवसुतांना भाषाप्रभुत्व लाभलेले नव्हते. त्यांना बिचाऱ्या मराठी भाषेच्या शब्दांशी झटापट करावी लागे. त्यांच्या अल्पशा कवितासंग्रहातही भाषादारिद्र्य सहज दाखविता येण्यासारखं आहे. पण हृदयाच्या श्रीमंतीशेजारी उभ्या असलेल्या त्या दारिद्र्याकडे आपले लक्षही जात नाही.

" जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे " ही वृत्ती हीच त्यांच्या हृदयाची श्रीमंती ! आणि ही रम्यता रंगवताना कृत्रिमतेचा वा पढिकतेचा स्पर्श होऊ न देणे हाच त्यांचा प्रांजलपणा. एखाद्या श्रीमंत माणसाने डामडौलाची, पोषाखाची पर्वा करू नये, तशी त्यांची स्थिती होती. रम्यत्वाबद्दल वाटणारे वेड हीच त्यांची श्रीमंती. फुलांचे सौंदर्य, मुलांचे मुग्धत्व, काव्याचे सामर्थ्य, स्वतःच्या जीवितकार्याबद्दलचा विश्वास, अन्यायाविरुद्ध लढतानाची वीरश्री, ध्येयवेडामुळे वाट्याला येणारा एकलेपणा हे सर्व त्यांना रम्य या अर्थाने सुंदर वाटे.

केशवसुतांसारख्या आत्मरत कवीच्या काव्यातील सौंदर्यकल्पना आणि प्रेमकल्पना बहिर्मुख टीकाकारांना समजली नाही, त्याबद्दल कवीलाच दोष लावण्याची वृत्ती मात्र कीव करण्यासारखी आहे ! केशवसुत कोणा स्त्रीवर प्रेम करण्याऐवजी कवितेलाच प्रिया समजत होते, ही माडखोलकर, माधवराव पटवर्धन यांच्यासारख्या रसिकांना विकृती वाटावी, ही गोष्ट फार चिंतनीय आहे. येथे मनोविकृती कवीत नसून टीकाकारात आहे ! ज्याला भावनांचे धन लाभले आहे, पण ते ज्याच्या किंवा जिच्या पायी वाहावे अशी व्यक्ती लाभलेली नाही, तो कदाचित कल्पनवरही प्रेम करील. काव्याकडे पाठ फिरवून राजकारणाकडे वळणाऱ्या माडखोलकरांना हे कळले नाही तर नवल नाही; पण ध्येयात्मक प्रेमाचे मराठीतील. गडकऱ्यानंतरचे एकमेव शाहीर माधव ज्यूलियन् यांनाही कल्पनीयावरील प्रेम समजू नये ही गोष्ट आश्चर्याची होय.

किती रहावे तुजविण आतां ! धीर न मजला क्षण धरवे !
गेले गेले वय हे वाया—मरणहि ते वाटे बरवे !

या आर्त आक्रोशात " मासिकात चार महिन्यात नाव आले नाही ! " म्हणून केशवसुत रडत आहेत, असे ज्यांना वाटते, त्यांच्या कल्पना—दारिद्र्याची कीव करावी, की भावनाशून्यतेची कीव करावी हेच मला समजत नाही !

'पुष्पांनो तर दूर सरा
कंटक हो ! मार्गी पसरा
प्रकाश नलगे तिमिर बरा'

या ओळीतील 'मूड' असल्या भिकार गोष्टीकरिता येणेच शक्य नाही. ही व्याकुळता कुणाकरिता आहे, हे कदाचित् स्वतः केशवसुतांनाही माहीत नसेल. महत्त्व आहे ते व्याकुळतेचे आहे,–उद्दिष्टाचे नव्हे ! नेहरूंसारखे मार्क्सवादी, वास्तववादी पुढारीदेखील जर "Nameless Sadness" चे गाणे गाऊ शकतात, तर केशवसुतांचा तसलाच 'मूड' विकृत कसा ? सोयीखातर त्यांनी ती कविता कवितादेवीला उद्देशून लिहिली म्हणूनच की काय ?

शूल कपाली कंडण हृदयी कंप शरीरी भरलासे ।
सलील लोचनी शीण अवयवी हाय निराशा मनी वसे ॥

या ओळी वाचून मला एका श्रेष्ठ उर्दू लेखकाच्या ओळी सही सही आठवल्या–

"जिगरमें दाग है; आँखोंमें आसू;
लबपे नाला है; बियाबाने आलम है...
यही इनाम था किया मेरी मेहनत और मोहोबत का ।
जमानेसे तेरा इन्साफ अय शीरीन निराला है ।

हृदयात व्रण आहे. डोळ्यांत पाणी, ओठावर आक्रोश. दुनियेत वैराण आहे...
माझ्या मेहनतीचं आणि मोहब्बतीचं पारितोषिक हेच दिलंस ना ?
[१] हे शीरीन् ! जगापेक्षा तुझा न्याय काही औरच म्हणायचा !

ही उत्कटता, ही व्याकुळता, ही प्रांजलता, हे केशवसुतांचे भांडवल होत. हे त्यांचे धन होत. ते त्यांनी कुणावर उधळले हे गौण आहे. शेलेने "ओड टू इंटलेक्चुअल ब्युटी" कुणावर लिहिली ? रवीन्द्रांची 'उर्वशी' केशवसुतांच्या कवितादेवीहून कमी काल्पनिक होती का ?

ज्या समाजात केशवसुतांना कवी आणि टीकाकारही अहृदय भेटले, त्या समाजात एकलेपणाने जगत असता त्यांनी कवितादेवीवर प्रेम करायचे नाही, तर कुणावर करायचे ?

• •

[१] *मूर्तिकार फरहाद याचे प्रेमस्थान झालेली प्राचीन इराणची राणी.*

सौंदर्य आणि केशवसुत

केशवसुतांना सौंदर्यदृष्टी नव्हती असे एक मत विद्वानांनी मांडले आहे. या मतामुळे आजच्या काळात कवीची फारशी बे-अब्रू होण्याचा संभव नाही, हे मी जाणतो. कारण रूढ मूल्यांना धक्का देणे आणि रूढ 'प्रतिमां'चा परित्याग करून नव्या वापरणे यात कवीची 'महात्मता' आहे, या मताची आज चलती आहे. पण एखाद्या चुकीच्या मतामुळे कवींची बेअब्रू होत नसली, तरीही ते मत तपासून पाहणे जरूर आहेच. किंबहुना दुसऱ्या एखाद्या चुकीच्या मतामुळे आमच्या कवीची योग्यता वाढवून दिसत असली, तरीही त्या मताची निरर्थकता दाखवून देणे हे टीकाकाराचे काम आहे.

केशवसुतांच्या काव्यात तत्त्वप्रतिपादनाचा भाग अधिक आहे, असे म्हणून कविवर्य तांबे त्यांच्या काव्याला नाक मुरडीत, हे मी स्वतः पाहिले आहे. तांब्यांच्या काव्यासंबंधी व काव्यविचारासंबंधी मला नितांत आदर असूनही हे मत मी जसेच्या तसे पत्करायला तयार नाही. पण तांब्यांच्याइतके शुद्ध कलेचे व्रत ज्यांनी चालविलेले नाही, असेही लोक केशवसुतांच्या सौंदर्यदृष्टीतील दोष काढून दाखवतात. सुंदर फूल पाहिल्यावर त्यांना निर्भेळ आनंद होत नसे; उलट आपले मुग्धत्व नाहीसे झाल्याचे दुःख आटवे ! सुंदर मुलीचा चेहरा पाहिल्यावरही त्यांना निर्भेळ आनंद होत नसे; उलट एक दिवस या चेहऱ्यातला मोहक अजाणपणा नष्ट होईल, म्हणून ते दुःख करीत. केशवसुतांच्या या 'अप्रस्तुत विलापा'ची कारणे आमच्या विद्वान टीकाकारांच्या मते दोन : एक तर केशवसुतांना सौंदर्यदृष्टीच बेताची होती; आणि दुसरे म्हणजे जी थोडीफार रसिकता त्यांच्या अंगी होती, तिचेही त्यांच्या तत्त्वदर्शनाच्या वेडामुळे खोबरे होई !

अशा तऱ्हेची टीका, माझ्या स्मृतीप्रमाणे पाहता, प्रथम माधवराव पटवर्धन यांनी केली व नंतर प्रो. रा. श्री. जोग यांनी केली. त्यानंतर अर्थात त्यांच्या शिष्यप्रशिष्यांनी पीएच. डी. करिता केलेल्या ग्रंथलेखनात हीच चुकीची मतपरंपरा पुढे चालविली. या टीकेमुळे दोन प्रश्न उपस्थित होतात. सौंदर्यदृष्टी म्हणजे काय ? आणि कवीचा खरा वर्ण्य

विषय कोणता ? बाह्य सौंदर्य, की स्वतःच्या भावना ? काही लोकांच्या मते सुंदर फूल किंवा सुंदर चेहेरा पाहिल्यावर कवी जर त्याचे सूक्ष्म वा अतिशयोक्त वर्णन करू लागेल, तरच त्याला 'सौंदर्य-दृष्टी' आहे. पण यातही आपापल्या मताप्रमाणे वा संप्रदाया-प्रमाणे वेगवेगळे आग्रह धरता येतीलच. वर्णन यथावत असेल, तरच कवीची सौंदर्यदृष्टी सच्ची; वर्णन अतिशयोक्त असेल, तरच कवीची संवेदना तीव्र; वर्णनात जितक्या समर्पक उपमा (प्रतिमा ?) वापरलेल्या असतील तितकी कवीची सौंदर्यदृष्टी अधिक कला-त्मक. इ. इ.

पण या सर्व अपेक्षांत सुंदर वस्तूचा कविमनावरील एक प्रकारचाच परिणाम वा 'असर' अपेक्षिलेला दिसेल. तो म्हणजे "त्या वस्तूचे चित्र काढावेसे वाटणे !" म्हणजे या सर्व अपेक्षा, वस्तुनिष्ठ कलाप्रवृत्तीच्या वा संप्रदायाच्या द्योतक आहेत. पण याखेरीजही प्रवृत्ती असू शकतात; याखेरीज वेगळ्या जातीचीही मने असू शकतात. सौंदर्य पाहिल्यावर (रांगोळी काढताना पाहून जसा काढला, तसा) त्यातून 'मोठा आशय' काढण्याची प्रवृत्ती तत्त्वशोधक, Didactic, अतएव विकृत होय, असे या पंडितांचे म्हणणे. 'डायडॅक्टिक्' काव्य कमी प्रतीचे होय, असे मीही इतरत्र प्रतिपादिले आहे. पण जो कवी सूक्ष्म 'फोटोग्रॅफिक्' वर्णन, वा अत्युक्त उत्प्रेक्षापूर्ण वर्णन करणार नाही, तो लगेच 'डायडॅक्टिक्' प्रवृत्तीचा ठरतो काय ? या प्रश्नाचे उत्तर केवळ काव्य-संप्रदायांच्या अभ्यासाने देता येणार नाही, सौंदर्यपूजक मनांच्या अवलोकनाने वा अनुभवानेच देता येईल. एखाद्या मुलीशी आपले नाते फोटोग्राफरच्या नात्याहून अधिक जवळचे असू शकणार नाही का ? मला राहून राहून या गोष्टीचे दुःख वाटते की, मराठीतील काव्यसमीक्षेच्या प्रान्तात पढिक पंडित आणि व्यवहारी 'Philistines' यांनीच आतापर्यन्त रस्ते खोदलेले आहेत. आज 'नवटीका' डोके वर काढीत आहे, तीही अधिक 'दिल' दार होण्याऐवजीय अधिक एकदेशी, पुस्तकी आणि ठोकळेबाज होत आहे. सौंदर्याचा आपल्या स्वतःच्या मनावर काय परिणाम होतो, हे यातील एकही मायेचा पूत अन्तर्मुख होऊन पाहणार नाही. कारण यातील बहुतेकांवर सौंदर्यापेक्षा सौंदर्यविवेचक पुस्तकांचाच परिणाम अधिक झालेला असणार ! 'बहुतेकां'वर असे भीत भीत म्हणण्याचे कारण, वरील पुस्तकी टीकाकारांत मला माधवराव पटवर्धनांसारख्या रोमँटिक् मनाच्या कवीचाही अन्तर्भाव करावा लागला आहे. पण माधवरावांच्या पुष्कळशा टीकेवरूनच काय, पण कवितेवरूनही त्यांनी आपल्या खऱ्या मनाला 'सल्लागार' करण्याऐवजी 'गुन्हेगार' ठरविले होते, असे मला राहून राहून वाटते !

अत्यंत संवेदनक्षम मनांवर सौंदर्याचा परिणाम याहून फार खोल होतो. ते मन समोरच्या वस्तूचे रंगरूप पाहण्याच्या, लांबीरुंदी मोजण्याच्या, मनःस्थितीत राहात नाही. ते मन सौंदर्यदर्शनाने ढवळून निघते; तरल बनते; पाहिलेल्या वस्तूशी वा व्यक्तीशी त्याचे नाते केवळ शब्दचित्रकाराचे राहात नाही. मित्राचे, सहोदराचे नाते जडते. त्याला

स्वतःचा भूतकाळ आठवतो; पाहिलेल्या वस्तूचा भविष्यकाळ दिसू लागतो. सारांश अशा मनाच्या कवींचा वर्ण्यविषय 'समोरची वस्तू' नसून 'आतील वस्तू' असते. शेलेचे 'स्कायूलाक'चे वर्णन हे 'स्कायूलार्क'चे वर्णन नव्हे, हे ज्याला कळले, त्यालाच ती कविता कळली! जे त्या कवितेत विशिष्ट पक्ष्याच्या दिनक्रमाचा तपशील शोधतील, ते "शेलेला सौंदर्यदृष्टी नव्हती" असाच निकाल देतील! 'स्कायूलार्क' हा पक्षी शेलेला वाटतो तितका आनंदी नसतो, हे पंडित माधवराव पटवर्धनांनी सहज सिद्ध करून दाखवले असते! त्या कवितेत शेलेने "जे नाही त्याकरिता आम्ही झुरत बसतो; आमच्या अगदी मनापासूनच्या हास्यावरही वेदनांचा भार असतो" अशी जी 'फिर्याद' केली आहे, ती विकृत आहे हे, माडखोलकर, जोग, पटवर्धन यांसारखा एखादा पंडित लीलया सिद्ध करील. पण सुंदर वस्तू पाहिल्यावर, ती समोरची वस्तू विसरून, एका गोड तंद्रीत बुडून जाणे,—नाही नाही ती दुःखे आठवणे, अकारण खिन्न होणे, या प्रतिक्रिया विकृत नसून अधिक खोल, अधिक सौंदर्यदर्शी आहेत. रम्य वस्तूंच्या दर्शनाने, सुंदर आलापांच्या श्रवणाने सुखी मनाला देखील हुरहूर लागते, या रोमँटिक् अनुभवाला वाचा फोडणारा कालिदासाचा प्रसिद्ध श्लोक आमचे पंडित पिढ्यान् पिढ्या फुकटच पाठ करीत आले का?

पण या बाबतीतील जोगांचा पक्ष अमूकच असे गृहीत धरणे तितकेसे सोपे नाही! केशवसुतांवर इतरांनी केलेले आरोप खोडून काढण्याच्या निमित्तानेच जोग बहुधा त्या आरोपांचा उच्चार करतात! पण नंतरचे त्यांचे समर्थन मात्र ज्या वकिलाने विरुद्ध पक्षकारांकडूनही थोडी फार 'फी' स्वीकारली आहे, अशा वकिलाच्या 'Damaging defence' सारखे, वा मुद्दाम केलेल्या लंगड्या समर्थनासारखे असते! "केशवसुतांना सौंदर्याचा निर्भेळ आस्वाद घेता येत नाही, अशी कल्पना होण्याचा संभव" जोगांनी अशाच लंगड्या थाटात खोडून दाखविला आहे! (प्रस्तावना, पाचवी आवृत्ती : केशवसुतांची कविता.) केशवसुतांवरील 'स्थिर नैराश्य' आणि 'रोगट वृत्ती' या आरोपांचा उच्चारही जोगांनी "असे एखाद्याला वाटणे साहजिक आहे" असे म्हणत केला आहे! व नंतर त्या आरोपांचे मोठ्या संकोचाने निवारणही करून दाखविले आहे!

केशवसुतांसारख्या नितान्त संवेदनक्षम मनावर, सौंदर्यदर्शनाचा परिणाम जसा वेगळा होतो, तसा त्यांच्यासारख्या ध्येयपूजक जीवांवर वास्तवतेचा परिणामही इतरांहून वेगळा होतो. त्यांना इतरांहून अधिक वेळा व अधिक तीव्र निराशा अनुभवाला येते. अशा क्षणांची नोंद अत्यंत दुःखपूर्ण—अन् म्हणूनच अत्यंत रमणीय अशा गीतांच्या द्वारे होत असते.

Our sweetest songs are those
That tell of saddest thought.

अशा कवितांचा आस्वाद 'विशिष्ट क्षणांची नोंद'— किंबहुना विशिष्ट क्षणीच्या निराशेवर कलात्मक शब्दाविष्काराने मिळविलेला विजय!— या दृष्टीनेच घ्यायचा असतो. जीवनातील यशापयशाचा हिशेब करून त्या कवितांतील निराशा तपासायची नसते. केशवसुतांवर

तरुणपणी जर कुठलीही दुःखे कोसळली नव्हती, तर ऐन पंचविशीतच

"मृत आशांच्या चितावरुनिया ।
पिशाच माझे भटकत आहे ।"—

—असे ते कसे म्हणू शकतात ? माझ्या विद्वान मित्रांनो ! कवींच्या निराशेचा प्रश्न बाह्य सुखदुःखांच्या जमाखर्चाने सुटत नसतो. मनुष्याचे दुःख आणि नैराश्य त्याच्या संवेदनक्षमतेच्या आणि आदर्शपूजनाच्या प्रमाणात वाढत असते. जनावराच्या मानाने मनुष्य दुःखी असण्याचेही कारण हेच होय. (दुःखासंबंधीचा हा सिद्धांत शोपेनहौर याने प्रथम अत्यंत परिणामकारकपणे मांडला.) आणि जनावरे आणि माणसे यात या बाबतीत जेवढे अंतर, तेवढेच पोटभरू वृत्तीचे लोक (Philistines) आणि रोमँटिक् लोक यात अंतर ! केशवसुतांनी आपली निराशा अमेरिकन कवी एड्गर ॲलन् पो याचेकडून उसनी घेतली होती, की शेलेकडून उसनी घेतली होती, याची चर्चा करण्यापेक्षा, रोमँटिक् मन ही काय चीज आहे, याची आमच्या टीकाकारांनी चौकशी केली असती, तर मराठी टीकेवर अधिक उपकार झाले असते. जोगांच्या पिढीने ते केले नाही, अन् नंतर मर्ढेकरांची Anti romantic (सौंदर्यपूजनविरोधी, सिनिकल्) पिढीच पुढे आली.

"कुणाला कीर्ती आहे, कुणाला स्वास्थ्य आहे तर कुणाला प्रेम आहे" असे म्हणून स्वतःची कीव करीत शेले म्हणतो :

Others have these and call life pleasure;
To me that cup is dealt in another measure.

शेले जर दुर्दैवाने महाराष्ट्रात जन्मला असता, तर त्याच्या द्रव्यप्राप्तीची, कीर्तीची, प्रेमसाफल्याची व स्वास्थ्याची चौकशी होऊन त्याचे हे वैराग्य 'उसने' खास ठरले असते. इनामदाराच्या (Squire च्या) पोटी जन्म, वांच्छित स्त्रियांशी दोन विवाह, मर्जीला आले तेव्हा पहिलीचा त्याग, सज्जन आणि काव्यमर्मज्ञ स्नेही, सुंदर स्त्रीलाही शोभेल असा चेहरा, बर्फासारखा वर्ण...या तरुण आंग्ल कवीला दुःखी व्हायला झालं होतं काय ? सौंदर्याचा रोमँटिक् मनावरील परिणाम इतरेजनांना समजण्यासारखा नाही, त्याचप्रमाणे नैराश्याचे रोमँटिक मनाशी असलेले नातेही इतरेजनांना समजण्यासारखे नाही. पण म्हणून त्या नैराश्याला उसने वा रोगट ठरवून मोकळे होण्यापेक्षा, रोमँटिक् काव्याच्या वाटेलाच न जाणे अधिक चांगले नाही का ?

हजारो ख्वाहिशे ऐसी कि हर ख्वाहिशपे दम निकले ।
बहुत निकले मेरे अर्मान लेकिन फिर भी कम निकले ॥

"असे हजारो मनोरथ आहेत की, एकेकाच्या स्मरणाने प्राण कासावीस होतो. माझी हौस भरपूर पुरवली गेली. पण तरीही कमीच वाटते."

या पंक्तीत कविश्रेष्ठ गालिब यशाची कबूली देत आहे की अपयशाची ? कधी कधी हे कवी आपल्या नाजुक, हळव्या मनाचे उघड उघड लाड करीत असतात, असेही दिसून येईल. त्यांची दुःखे खरीखोटी ठरविण्याच्या भानगडीत निदान विद्वान टीकाकारांनी

तरी पडू नये ! फ्रेंच कवी शातोब्रियाँ याचा एक नायक म्हणतो :

" A man is as great as his sorrow "

माझ्या एका विद्वान टीकाकार–मित्रांनी मी अन्यत्र केलेल्या शोकनाट्यविवेचनासंबंधी लिहिताना त्याला ' misery–mongering ' हे नाव दिले होते ! कोणतेही नाव द्या ! कृपाकरून कुणाचं दुःख समजावून न घेताच खोटं ठरवू नका !

सारांश, सौंदर्यदर्शनाने खिन्नतेचा ' मूड ' येणे हे संवेदन–शून्यतेचे लक्षण नव्हे, तर संवेदनातिरेकाचे लक्षण आहे. पण सौंदर्य आणि खिन्नता यांचा याहून निकट संबंध सौंदर्यवादी लोकांना जाणवला आहे; मग तो आलंकारिक काव्याचे अन् पोषाखी जीवनाचे भोक्ते खरा मानोत की खोटा मानोत. अमेरिकन् रोमँटिसिस्ट् एड्गर ॲलन् पो ह्याचे एक आवडते मत उद्धृत केले जाते. तो म्हणे :

" There is no great beauty without
a touch of melancholy "

आता हे लोकविलक्षण मत, खोल अनुभवाच्या प्रकाशातच छानले पाहिजे. त्याला घसमुसळेपणाने ' विकृत ' ठरवून कसा निभाव लागेल ?

सामान्य पोटभरू माणसाच्या प्रतिक्रिया तेवढ्या निकोप मानणे, आणि असामान्य (Exceptional) माणसांच्या प्रतिक्रिया विकृत ठरविणे हा घटिंगणपणाचा प्रकार फ्रॉइड्चे ग्रंथ हिंदुस्थानात आल्यापासून सुरू झाला. ध्येयात्मक प्रेमाचे आणि रोमँटिक् खिन्नतेचे अनुभव उत्कटपणे चितारणारे माधवराव पटवर्धनच जेथे उत्तरायुष्यात फ्रॉइडच्या मापाने मनाचे आरोग्य मोजू लागले, तिथे इतर प्रापंचिक संशयात्म्यांची कथा काय ? काव्यात शास्त्राची दृष्टी घुसडणे–अन् तीही फ्रॉइड्च्या शास्त्रासारख्या विवाद्य आणि एकदेशीय शास्त्राची दृष्टी घुसडणे–हे, शास्त्रात काव्याची दृष्टी घुसडण्याहूनही अशास्त्रीय होय !

केशवसुतांच्या मनाची जात समजावून न घेता, त्यांच्या कवितांचे वर्गीकरण वा मूल्यमापन करणे हास्यास्पद आहे. अन् हेच आजवरच्या केशवसुतविषयक बहुतेक लेखनात झाले आहे. त्या मानाने कै. ना. के. बेहेरे आणि नारायण वामन टिळक या ' दोघां नारायणां 'नी केलेले केशवसुतांचे मूल्यमापनच अधिक निर्दोष आहे.

पण आज विद्यापीठांतून अभ्यासिल्या जाणाऱ्या केशवसुतविषयक मूल्यमापनात केवळ फ्रॉइडनेच गोंधळ उडविला आहे असे नव्हे. आधुनिक काव्याकडे पाहताना हवी असलेली निर्भेळ काव्यदृष्टीच आमच्या प्रोफेसर–टीकाकारांनी मारली. एकीकडून त्यांच्या मनात संस्कृतमधील ' विदग्धते 'ची अपेक्षा लपून असते; तर दुसरीकडून सामाजिक, राजकीय क्षेत्रात वृत्तपत्रांनी वाढीला लावलेली मूल्ये गर्दी करीत असतात. ' विदग्धता म्हणजेच काव्य ' या कल्पनेमुळे त्यांना नितान्त आत्मनिष्ठ (Subjective) कवीच्या सौंदर्यविषयक प्रतिक्रिया कळू शकत नाहीत; तर वर्तमानपत्री मूल्यांमुळे केशवसुतांनी जे काव्यात सांगितले, ते आगरकरांनी आधीच सांगून ठेवले होते, हा हास्यास्पद अभिप्राय

तयार होतो ! काव्यात नवीन Social analysis ची, किंवा नव्या सामाजिक 'Blue Print'ची मातब्बरी नसते;—तर उत्कटतेची, आत्मीयतेची मातब्बरी असते. काव्य आपण माहितीकरिता वा युक्तिवादाकरिता वाचीत नसतो, तर उत्कटतेचा स्पर्श व्हावा, केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्पर्श व्हावा, म्हणून वाचीत असतो. केशवसुतांच्या सामाजिक कविता, याच त्यांच्या खऱ्या कविता, असे मानणाऱ्यांपैकी मी नाही. परंतु त्या कवितांचे महत्त्व आणि 'स्पर्शित्व' आगरकरांच्या अग्रलेखाइतपतच आहे, असे मी कधीच म्हणणार नाही ! केशवसुतांच्या सामाजिक कविता म्हणजे एक 'आग' आहे,—नुसता थंड युक्तिवाद नव्हे. केशवसुतांच्या सौंदर्यविषयक कवितांत जे आहे, तेच त्यांच्या समाजविषयक कवितांत आहे. ते म्हणजे उत्कटता, आग, आणि ध्येयपूजन ! विद्यापीठीय टीकाकारांच्या समरसताशून्य टीका वाचल्यावर, जिगर मुरादाबादीप्रमाणे केशवसुतही म्हणाले असते—

जिगर ये मये अगरवानी नहीं है ।
अरे, आग है आग ! पानी नहीं है ॥
मिरा किस्सये इश्क फानी नहीं है ।
ये मुर्दा दिलों की कहानी नहीं है ॥

* * *

समझ सोचकर पाव आगे बढाना ।
हकीकत है दुनिया कहानी नहीं है ॥

"अरे, ही गुलाबी दारू नव्हे ! ही आग आहे आग ! बाबारे, हे पाणी नव्हे ! माझ्या प्रेमाची ही कथा क्षणभंगुर नव्हे. ती काही मेलेल्या मनाची कहाणी नव्हे ! ... समजून उमजून (या क्षेत्रात) पाऊल पुढे टाकायचं असतं बरं ! कारण जग म्हणजे कठोर सत्य आहे– ती काही काल्पनिक कादंबरी नव्हे !"

केशवसुतांचे सौंदर्यप्रेम आणि सामाजिक ध्येयवाद, ही दोन्ही नकली वा उसनी म्हटल्यावर केशवसुत, आगरकर, मर्ढेकर हे सर्व एकाच गोत्राचे वाटल्यास नवल नाही ! मर्ढेकरी कविता ही सौंदर्यवाद व ध्येयवाद यांच्याविरुद्ध झालेली cynical प्रतिक्रिया होय. तर उलट सौंदर्याने मनात उभी राहणारी स्वप्ननगरी आगरकरांना सांगूनही समजण्यासारखी नव्हती ! आणि तरी हे तिघे एकच असे जी टीका सांगते, तिची मूल्ये तरी कोणती ?

प्रो. जोग विचारतात : "म्हणून केशवसुतांचा संप्रदाय वेगळा होता व आजचा संप्रदाय वेगळा असे समजण्याचे कारण काय ?"

उत्कटतेचा, प्रेमाचा, आणि ध्येयवादाचा भोक्ता जिगर मुरादाबादी यानं जे उत्तर देऊन ठेवलं आहे, तेच या प्रश्नाचे उत्तर !

"अरे, आग है आग ! पानी नहीं है !"

● ●

" परि तू जागा चुकलासी "

केशवसुतांच्यासंबंधी आमच्या विद्वानांची भूमिका अद्यापही चाचरती आणि परस्पर विरोधीच आहे. त्यांची प्रतिभा ' अलौकिक होती ', हे थोडे सढळ व अतिरेकी विधान करण्याला त्यांना संकोच वाटत नाही. पण हेच लेखक अन्यत्र " प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना आपले पंख पुरे पुरे पसरून आकाशात भराऱ्या मारता आल्या नाहीत",[1] असेही म्हणतात व लगेच पुढे " त्यांना समाजाची सर्वांगीण सुधारणा आवश्यक वाटत होती. त्यासाठी कविता हे त्यांचे साधन होते "[2] असेही त्यांच्या कवितेचे अव्याप्त आणि व्यवहारोपयोगी प्रयोजन सांगतात, केशवसुताच्या बंडखोरीचा आणि नैराश्याचा समन्वय लावता न आल्याने, त्यातील एक ते इंग्रजीतून उसने घेतलेले ठरवतात, तर दुसरे आगरकरांच्या तार्किक गद्यातून स्फुरल्याचा निर्वाळा देतात. केशवसुतांचा बालसदृश हळवेपणा आणि त्यांचे विश्वात्मक भावनेचे उद्‌गार यांच्यातही त्यांना विसंगती दिसते. अर्थात त्यांचे तत्त्वज्ञान जुजबी आणि परकीय ठरविण्याचा प्रसंग येतो. काहींनी त्यांचे नैराश्य विकृत ठरविले आहे; तर काहींनी त्यालाच ' वैराग्य ' ठरविले आहे. त्यांच्या मानवतावादी कविता आणि सामाजिक अन्यायाविरुद्धच्या कविता देखील त्यांच्या वेळच्या क्रमिक पुस्तकातील कवितावरून सुचल्याचे सूचित केले गेले आहे. मग केशवसुतांच्या अन्यायविरोधी कविता इतक्या ओजस्वी का झाल्या ? याचे उत्तर ? " त्या तात्पुरत्या व प्रासंगिक होऊ नयेत म्हणून केशवसुतांनी त्यांचे स्वरूप निर्भेळ भावनामय ठेवण्याचा प्रयत्न केला." यत्न करून निर्भेळ भावनामय व ओजस्वी कविता लिहिता येतात, हेच ज्यांचे काव्यासंबंधीचे मत आहे, त्यांची काव्याविषयीची कल्पना आमच्या कल्पनेहूनच केवळ नव्हे, तर केशवसुतांच्या काव्यकल्पनेहूनही फार वेगळी आहे असे म्हटले पाहिजे !

या सर्व चांचरत्या टीकेत कवीची विसंगती उघड झाली आहे, की टीकाकारांची सदोष व पुस्तकी काव्यदृष्टी व्यक्त झाली आहे ? आमचे टीकाकार वस्तुनिष्ठ कथनपर दीर्घ काव्याचे निकष घेऊन आत्मनिष्ठ वृत्ति–वर्णनपर भावगीतांची परीक्षा करीत आहेत की

काय, अशीही कधी कधी शंका येते. कधी कधी अशी शंका येते की, विद्वत्तेचे निकष घेऊन कवितेचे, अन् त्यातूनही आत्मनिष्ठ सौन्दर्यवादी कवितेचे परीक्षण करीत आहेत. कधी कधी असे वाटते की, बहिर्मुख व्यवहारी मनुष्य हा मानवी आदर्श मानून, ते अन्तर्मुख कवीचे मूल्यमापन करीत आहेत.

दुःखाची व नवलाची गोष्ट म्हणजे रेव्ह. टिळक, तांबे, रहाळकर यांच्यासारख्या अल्पविद्वत्तेच्या रसिकांनी केशवसुतांच्या कवितेचे जेवढे निर्दोष गुणग्रहण केले तेवढेही प्रो. राजवाडे, माधवराव पटवर्धन, जोग, भ. श्री. पंडित यांनी करू नये ! माहितीच्या बारकाव्यात यातील सर्वच फार जबरदस्त आहेत; तर्काच्या कसरतीत पहिल्या दोहोंचे नाव विख्यात आहे आणि तरी विद्वत्तेच्या व तर्कशास्त्राच्या पसाऱ्यात कवितेचे मर्म नेमके हुकण्याचा पंडिती पायंडा मात्र यातील पहिल्या दोन पंडितांनीच पाडला व शेवटच्या पंडितांनी तो थोडाफार पुढे चालवला !

गेल्या काही महिन्यांत केशवसुत–शताब्दीच्या निमित्ताने मला केशवसुतांसंबंधी बऱ्याच टिकाणी लिहावे लागले आहे. त्यात केशवसुतांच्या यथार्थ आकलनात आमच्या विद्वानांचे कोणते स्वभावदोष व पूर्वग्रह आड येत आहेत, याचाच विचार मला विशेष करावा लागला आहे. माझी स्वतःची आधुनिक (केशवसुती) काव्यासंबंधीची उपपत्ती मी ' वाङ्मयीन मूल्ये, ' ' वादसंवाद ' व ' टीकाविवेक ' या माझ्या पुस्तकांतील सौंदर्यवादविषयक प्रकरणात मांडलेलीच आहे. या लेखात केशवसुतासंबंधीच्या विपर्यस्त उपपत्तींचे परीक्षण, मी मुख्यतः प्रो. भ. श्री. पंडित यांच्या पुस्तकाच्या अनुरोधाने करणार आहे. प्रो. पंडित यांनी आपल्या एका पुस्तकात केशवसुतांच्या ' चिन्तनिकांचा ' विचार केला आहे व " केशवसुतांनी आपले काव्यविषयक बहुतेक विचार इमर्सनपासून उचलले..." असे म्हटले आहे. अनेक चिन्तनपर कवितांतील आशयावरही इमर्सनच्या विचारांचा परिणाम आहे हे दाखविण्याकरिता त्यांनी विपुल उतारे दिले आहेत

त्यांनी आणखीही एका प्रसिद्ध गोष्टीचा निर्देश केला आहे. ती म्हणजे इमर्सनवर भारतीय तत्त्वज्ञानाचा परिणाम होता. या गोष्टी प्रत्यक्ष प्रमाणानीच दाखविता येणाऱ्या असल्याने त्यांच्यासंबंधी वाद होण्याचे कारण नाही. तथापि एका ग्रंथकाराला दुसऱ्या ग्रंथकाराची माहिती होती, एक दुसऱ्याचा चाहता होता, एकाने दुसऱ्यापासून स्फूर्ती घेतली, एकाने दुसऱ्यापासून उसनवारी केली, या वेगवेगळ्या विधानांतील फरक पुष्कळदा लक्षात घेतला जात नाही आणि मग ' सतारीचे बोल ', ' म्हातारी ' यासारख्या उत्कृष्ट कवितांतील विचार व भावना केशवसुतांच्याच आहेत असे समजणे चुकीचे आहे, यासारखे मत तयार होते. जे आगरकरांनी निबंधात सांगितले, जे हरिभाऊ आपट्यांनी कादंबरीत सांगितले, तेच केशवसुतांनी पद्यात सांगितले हे मत तयार होते. या प्रकारच्या उपपत्तीत खऱ्या कवीचा अन्य ग्रंथांशी वा ग्रंथकाराशी संबंध कोणत्या प्रकारचा असतो या संबंधीची चुकीची कल्पना दिसून येते. एका इतिहाससंशोधकाने दुसऱ्या संशोधकाचे सिद्धान्त पल्करणे आणि एका कवीच्या काव्यात दुसऱ्या कवीच्या वा पंडितांच्या कल्पना आढळणे,

यात फरक आहे. यातील एक वर्ग माहिती ' fact ' अथवा ' सिद्धान्त जसाच्या तस घेत असतो; तर दुसरा म्हणजे कवीचा वर्ग ' जसेच्या तसे ' काहीच घेत नसून दुसऱ्याच्या विचारातून फक्त स्फूर्ती घेत असतो. ' अ ' ने ' ब ' कडून काड्यांची पेटी घेणे आणि त्या काडीने पेटीवरील रासायनिक विलेपनापासून ' पेट घेणे ' या दोहोत ' घेणे ' हाच शब्द असला तरी ते ' घेणे ' एक नव्हे. पण केशवसुतांच्या टीकाकारांची कल्पना मात्र स्थूलमानाने तशीच दिसते ! त्यांच्या कवितांतील एकेका ओळीला असणारे इंग्रजी आधार शोधण्याची यातायात करणाऱ्या विद्वानांनी त्याच कवितेतील बाकीचे विचार पूर्ण स्वतंत्र आणि ओजस्वी आहेत; हे ओळखलेले नसते. ज्या लेखकांचे उद्‌गार केशवसुतांच्या कल्पनांचे मूळ म्हणून दाखविले जातात, त्यांच्या देशातील टीकाकारांचे उसनवारी संबंधीचे विचार आमच्या विद्वानांच्या विचारांपेक्षा फारच वेगळे आहेत. केशवसुतांच्या विचारांत इमर्सनचा वा आगरकरांचा जेवढा आधार दाखविता येतो, त्यापेक्षा किती तरी अधिक प्रमाणात कोलरिज आणि कार्लाइल यांच्या विचारांना जर्मन तत्त्ववेत्त्यांचा आधार दाखविता येतो. पण या बौद्धिक आणि भावनात्मक ऋणाचे स्वरूप आणि प्रमाण, पाश्चात्य टीकाकार कोणत्या सूक्ष्म तराजूने जोखतात ते पाहण्यासारखे आहे !

कार्लाइल जन्मभर फ्रान्समध्ये उदय पावलेल्या बुद्धिवादाविरुद्ध लढला. तत्कालीन वैचारिक युद्धात त्याने एकदा हा पक्ष न्याय्य ठरविल्यामुळे जर्मनीतील आदर्शवादी, गूढवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार करणे त्याला योग्य वाटले. त्यांच्या तत्त्वज्ञानात हर्डर, (Fichte) फिक्टे, शेलिंग, गटे इत्यादी जर्मन तत्त्ववेत्त्यांकडून उसन्या घेतलेल्या अनेक कल्पना दाखविता येतात. विशेषतः Sartor Resortus या त्यांच्या ग्रंथातील असंख्य कल्पनांचा उगम जर्मन तत्त्वज्ञानात सापडतो. पण इतके म्हटल्यावरही त्यांच्याकडील मान्यवर वाङ्मयइतिहासकार या वाङ्मयऋणाचे कसे सूक्ष्म गणित करतात, ते केशवसुतांच्या टीकाकारांनी लक्षात घेण्यासारखे आहे. लेग्वा आणि कझॅमियन् हे इंग्रजी वाङ्मयाच्या आपल्या विख्यात इतिहासात म्हणतात : " He did not become the apostle of another country's suggestion but it was the magnetism of German thought which helped him to polarise very definitely the instincts of his nature.

[तो अन्यदेशीय कल्पनांचा वाहक बनला नाही. तर जर्मन विचारातील ' मॅग्नेटिक ' आकर्षणाने त्याला स्वतःच्या मूळच्या प्रवृत्तींना निश्चित दिशा लावण्याला मदत केली.]

आमच्या टीकाकारांपुढे काहीसा हाच प्रश्न उभा आहे. आमच्या मराठी कवितेत पूर्वी कधी नव्हते ते, सौंदर्यपूजनाचे, निसर्गपूजनाचे काव्यपूजनाचे, विश्वात्मकतेचे, सूर निघू लागले ! त्यांनी विस्मित आणि पुलकित होऊन ते सूर काढणाऱ्या कवीच्या वेगळ्या पिंडाचा शोध घेण्याऐवजी, आम्ही त्याच्या पाचपंचवीस ओळींना असलेले परकीय आधार शोधण्यात आपली विद्वत्ता खर्ची घालीत असतो. केवळ आधार शोधणे, ही चूक नव्हे. त्या आधारांकडे आमचे विद्वान ज्या दृष्टीने पाहात आहेत ती दृष्टी चुकीची होय.

केशवसुतांनी आपले सृष्टिविषयक आणि काव्यविषयक तत्त्वज्ञान इमर्सनकडून घेतले असे ठरविल्यावर पुढे भ. श्री. पंडित जे सूचित करतात ते विशेष लक्षात घेण्यासारखे आहे, त्यांच्या म्हणण्याचा रोख असा की, हेच Transcendentalism केशवसुतांना आमच्या वेदान्तात आढळले असते. उलट इमर्सनचे Transcendentalism च त्याने आमच्या प्राचीन ग्रंथातून घेतले आहे. म्हणजे केशवसुतांच्या कवितेतील 'विश्वात्मकतेचे सूर उसने आहेत, आणि जर उसनेच तत्त्वज्ञान सांगायचे तर पूर्वजांचे तरी नाव सांगावे ! परदेशी ग्रंथकाराचे कशाला ? ही सर्वच विचारसरणी स्वयंस्फूर्तता आणि उसनवारी यांच्या संबंधीच्या तांत्रिक आणि पुस्तकी कल्पनांवर आधारलेली आहे. बर्नार्ड शॉ ची सर्व कथानके स्वतंत्र आहेत. तर उलट शेक्सपियरची अनेक कथानके उसनी आहेत हे सत्य असले तरीही शेक्सापियरची प्रतिभा बर्नार्ड शॉच्या प्रतिभेपेक्षा फारच श्रेष्ठ दर्जाची मानावी लागते. याचे कारण शेक्सपिअरसारखे प्रतिभावन्त जे उसने घेतात, त्याचे सोने करतात, किंवा ते मूळचेच सोने असेल तर ते त्यांच्या प्रतिभेतील सुवर्णाला केवळ निमित्तमात्र म्हणूनच आवश्यक असते. गीता आणि उपनिषदे यांची भाषांतरे उपलब्ध नसती तरीही इमर्सनची 'ट्रॅन्सेडेंटल्' दृष्टी प्रकट झालीच असती. तसेच इमर्सनचे स्फूर्तिदायक तत्त्वज्ञान केवशवसुताऐवजी कुंट्यांनी वाचले असते, तर ते 'नवा शिपाई' सारखी कविता लिहू शकले असते असे नव्हे. फार कशाला ? केशवसुतांनी जे भारतीय तत्त्वज्ञान मुळातून वाचले नव्हते त्याची कुंट्यांनी पारायणे केलेली होती. मग कुंट्यांच्या काव्यात इमर्सनइतके,-निदान केशवसुतांइतके तरी ! ट्रॅन्सेडेंटॅलिझम् का दिसू नये ? याला एकच उत्तर आहे. हा प्रश्न 'वाचण्यात काय आले' याचा नसून, मूळ पिंडात काय आहे याचा आहे. म्हणूनच असे म्हणावे लागते की, वैजनाथ काशीनाथ राजवाड्यांपासून भ. श्री. पंडितापर्यन्तच्या विद्वान प्रोफेसरांनी केशवसुतांच्या विचारातील उसने कपटे शोधीत बसण्याऐवजी, त्यांच्या पिंडाचा शोध घेतला असता, तर त्यांचे मराठी काव्याच्या अभ्यासकांवर अधिक उपकार झाले असते.

प्रो. पंडित यांनी केशवसुतांच्या चिन्तनपर कवितांची, त्यांच्या 'वैराग्याची आणि नैराश्याची' जी मीमांसा केली आहे तीवरून त्यांना केशवसुतांच्या पिंडाचा शोध घेण्यात इतर मराठी विद्वानांइतकेच अपयश आले आहे, असे दिसून येईल. पहिली गोष्ट म्हणजे वैराग्य आणि नैराश्य यात राजवाडे यांनीही गोंधळ केला आहे, व तो नंतरच्या विद्वानांनी पुढे चालवला आहे. जगाला विटलेल्याची जी वृत्ती ती विरक्ती होय. जगावर प्रेम करणाराच्या वाट्याला अधूनमधून जी खिन्नता येते, ती रोमँटिक खिन्नता होय. केशवसुतांच्या नैराश्यात 'अनुदिनि अनुतापे तापलो रामराया' यांतले वैराग्य पाहणे हास्यास्पद होय. आणि त्यांनी संतवाङ्मय वाचले असते, तर त्यांच्या मनाला शान्ती मिळाली असती, असे म्हणणे तर त्याहून हास्यास्पद होय. केशवसुतांची खिन्नता, त्यांची विश्वात्मकता, त्यांना क्षणैक दिपवून जाणारी द्वंद्वातीत वृत्ती यांचा सन्तांच्या

वैराग्याशीही संबंध नाही, की सन्ताच्या अद्वयानंदाशीही संबंध नाही. केशवसुतांनी सन्तवाङ्मय वाचले असते, तर इतिहासाचार्य राजवाड्याप्रमाणे ते कदाचित त्या 'टाळ-कुट्या संताळ्या' वर सन्तापलेही असते, इतका त्यांचा पिंड संतांच्या पिंडापेक्षा भिन्न होता. व्यक्तिमत्त्वाच्या अनन्तभेदाप्रमाणेच 'ट्रॅन्सेडेंटल' वृत्तीचेही अनेक प्रकार संभवतात. इमर्सन् आणि शोपेन–हौर दोघांवरही उपनिषदांचा परिणाम झाला होता. पण शोपेनहोर दुःखवादी झाला, तर इमर्सन आनन्दवादी झाला. म्हणून केशवसुतांवरील इमर्सन्च्या परिणामाचा विचार करताना आणि केशवसुतांच्या नैराश्याचा विचार करताना त्यांच्या वेगळ्या पिंडांचा विचार प्रथम झाला पाहिजे. आवेश, आनंद, आदर्शपूजन व खिन्नता या चारही वृत्ती, ज्या व्यक्तिमत्त्वातून उदय पावतील त्या व्यक्तिमत्त्वाची आपण ओळख करून घेतली पाहिजे. त्या व्यक्तिमत्त्वाचा अद्वयानंदही वेगळ्या भूमिकेवरील असणार, व त्याचे नैराश्यही वेगळ्या कारणातून निघालेले असणार. जगन्मिथ्यावादी संतांचा प्राप्यविषय वेगळा होता, जगसौंदर्यप्रेमी 'रोमँटिकाचा' प्राप्यविषय वेगळा होता. केशवसुतादी सौंदर्य–पूजकांचा पूजाविषय, त्यांची आशानिराशा एकवेळ 'खोटी' म्हणता येईल,. पण सन्तांचे वैराग्य आणि केशवसुतांचे नैराश्य एक म्हणणे, म्हणजे मात्र केशवसुतसंप्रदाय समजाऊनच न घेणे होय.

आमच्या विद्वानांनी केशवसुतांच्या नैराश्याची दोन प्रकारांनी व्यवस्था लावली आहे. माधवराव पटवर्धन व त्यांचे अनुवादक केशवसुतांची निराशा इंग्रजी काव्यातून उसनी घेतलेली होती, असे म्हणतात. भ. श्री. पंडित व इतर काही, त्यांची निराशा सामाजिक अपयशातून उद्भवलेली होती म्हणतात व त्यांच्या तुटपुंज्या चरित्रसामग्रीत त्याचे पुरावे शोधतात. व्यावहारिक अपयशातून निघणारी निराशा व मुमुक्षुत्वातून निपजणारी विरक्ती या दोहोखेरीजही एक विलक्षण निराशा असू शकते. पूर्णत्वाची, भूलोकीच्या स्वर्गाची, प्रौढत्वींच्या शैशवाची, सौंदर्याच्या व निसर्गाच्या अमरत्वाची स्तोत्रे गाणारे कवी, 'वेडे की शहाणे' हा प्रश्न वेगळा. पण त्यांचे हे स्वप्नपूजन त्यांच्या पुरते खरे व उन्नतिकारक (Edifying) असते हे त्यांच्या चरित्रावरून दिसून येईल. शिवाय पैशाला वा पोराबाळांना दैवत मानणाऱ्या व्यवहारी लोकांना तरी सौंदर्यवादी कवींच्या या भ्रमांना हसण्याचे कारण नाही. पण पूर्णत्वाचा भास हा उन्नतीचे काही टप्पे ओलांडण्याला मदत करीत असला, तरी भास तो भासच व म्हणून पूर्णत्वाच्या स्वप्नामागे धावणारे आदर्शवादी कवी मधूनमधून निराशेच्या पंकात रुतून कण्हताना दिसतात ही त्यांची निराशा त्यांच्या नोकरीतील अपयशाच्या आधाराने वा 'किरकिऱ्या' स्वभावाच्या कबूली जबाबाने (?) स्पष्ट करून दाखविणे, म्हणजे त्यांचा आदर्शवाद साफ डोळ्याआड करणे होय, त्यांचे आन्तरजीवन अजिबात न समजावून घेणे होय आणि कवीच्या बाबतीत तर बाह्यजीवनापेक्षा आन्तर जीवनालाच महत्त्व अधिक आहे !

" मच्चित्ताच्या क्षितिजावरती
नृत्याला जी स्वप्ने करिती "

ती स्वप्ने म्हणजेच कवीचे आदर्श जीवन, ती साकार न होणे हेच त्याच्या निराशेचे कारण. त्याचे नैराश्य म्हणजे त्याच्या आदर्शवादाचीच दुसरी बाजू होय. त्याचा क्रान्तिवाद तेवढा निकोप, आणि त्याचे नैराश्य त्याने नशिबापुढे फोडलेला टाहो, त्याने सिंहावलोकनात गाळलेले अश्रू...हे सर्व मात्र रोगट असे म्हणणाऱ्यांना केशवसुत कळलेच नाहीत ! कारण त्यांनी रोमँटिक् मन समजावून घेण्याचा यत्न केला नाही. पाश्चात्य टीकाकारात जे टीकाकार स्वतः सौंदर्यवादी नाहीत त्यांनीही शेले कीट्स यांच्यासारख्या सौंदर्यवादी कवींच्या आशा निराशा समजावून घेऊनच त्यांच्या काव्याचे मूल्यमापन केलेले आढळेल. या दृष्टीने ब्रॅड्ले यांनी शेलेच्या निराशा–वादाची लावलेली संगती लक्षात घेण्यासारखी आहे.

शेलेच्या काव्यकल्पनेचा विचार करीत असता ब्रॅडले यांनी त्याच्या काव्याच्या आनंदमय स्वरूपाशी त्याची विषण्णगीते ही कशी विसंगत नाहीत, यांचे कल्पक सहानुभूतीच्या बळावर सुंदर विवेचन केले आहे. पूर्णत्वासंबंधीची आनंदमय ओढ ही जर शेलेच्या मते काव्याचा खरा विषय होय तर, त्याच्या विषण्ण गीतांची उपपत्ती काय ? असा प्रश्न विचारून ब्रॅडले म्हणतात : " Shelley's theory rightly understood will take in .. everything really poetic ... The poet he says, can colour with the hues of the ideal, everything he touches ... thus to take the instance of Shelley's melancholy lyrics, clearly the lament which arises from the loss of the ideal, and mourns the evanescence of its visitations or the desolation of its absence is indirectly an expression of the ideal.... "

रोमँटिक् कवींना पूर्णत्वाचे केवळ स्वप्न पडून गेलेले असते. ते स्वप्नातील दर्शन जागृतीत व्हावे, निदान तेच स्वप्न पुन्हा दिसण्याकरिता तीच गोड 'तंद्री' पुन्हा लागावी म्हणून ते तळमळत असतात. या तळमळीला ब्रॅड्लेने " the desolation in its absence असे म्हटले आहे. अशा तळमळीसंबंधीचे काव्य–अथवा आदर्शाच्या अप्राप्तीसंबंधीचें विषण्णगीत, म्हणजे ज्याला पोटार्थी माणसांनी हसावे असे 'रडगाणे' खास नव्हे, तेही अप्रत्यक्षपणे पूर्णत्वगीतच असते (.....is indirectly an expression of the ideal) सारांश, सौन्दर्यवाद्याचे " रडगाणे " देखील पोटभरू लोकांच्या (Philistines च्या) वीरश्रीपेक्षा श्रेष्ठ होय, हे ब्रॅडलेसारख्या कल्पक टीकाकारांना समजू शकते ! पण शेलेची आनंदमीमांसा याच्या पलीकडे जाते. शेले म्हणतो 'माणसांच्या व्यक्तिमत्त्वातील श्रेष्ठतम अंशाला होणारा आनंद त्याच्याच कनिष्ठ अंशाच्या यातनांशी संबद्ध असतो; तसेच त्या 'दुःखापासून होणारे सुख प्रत्यक्ष सुखापासून होणाऱ्या सुखाहूनही गोड असते' इतकेच नव्हे तर शेलेच्या मते आदर्शाचीं वा पूर्णत्वाची काव्यरूप अभिव्यक्ती पुष्कळदा भीषणतेचे, विषण्णतेचे वा नैराश्याचे रूपच अधिक पसंत करते !'

ज्यांना जीवनातील दुःखाचा वा शोकनाट्यातील विनाशाचा आध्यात्मिक अर्थ कळतो त्यांना निरीश्वर शेलेने वरील उद्‌गारात केवढी भरारी मारली आहे ते कळेल. आदर्शवाद्यांची दुःखे आणि निराशा, आदर्शवाद्यांनाच कळण्यासारखी असतात. तसेच 'सौंदर्यवादी' हे एका जातीचे आदर्शवादीच असतात. कारण ते नश्वर सौंदर्यात शाश्वत सत्य पाहण्याची धडपड करतात. कीटस्‌च्या "Truth is beauty, beauty truth" ..... या महावाक्याचा अर्थ या आदर्शवादी भूमिकेवरून पाहिला तरच समजण्यासारखा आहे. नाही तर–

"फुलपाखरु–मरण
पाहिले आहे का कोणी ?"

या प्रश्नाचा राजवाडे पटवर्धनांसारखे लोक जो अर्थ घेऊन केशवसुतांना मूर्खात काढतात, तसलाच अर्थ घेऊन कीट्‌सलाही मूर्ख ठरविणारे शास्त्रीय टीकाकार आहेतच !

केशवसुतांच्या काव्यात आढळणारी विश्वात्मकतेची कल्पना, दिव्यत्वाची कल्पना, बाल्यगौरवाची कल्पना, द्वंद्वातीत अवस्थेचा निर्देश, अमरत्वाची कल्पना, कवीच्या उन्मनस्कतेची कल्पना यांपैकी एकाचाही अर्थ जुना वेदान्त वा जुने सन्तवाङ्मय यांच्या आधारे लावणे विपर्यासकारी होईल. 'झपूर्झा' या कवितेसंबंधी प्रो. भ. श्री. पंडित यांनी जे उद्‌गार काढले आहेत ते पाहिले म्हणजे जुना वेदान्त काखेत घेऊन नवी, अनुभूतिप्रधान, कविता वाचण्याचे विपरीत फळ दिसून येईल. पंडित म्हणतात,

..."मला वाटते कवितान्तर्गत सुंदरतेशी तन्मयता पावण्याचा केशवसुतांचा प्रयत्न चालू होता, तो झपूर्झा लिहिताना यशस्वी झाला. तन्मयतेच्या प्राप्तीकरिता जी 'निर्विशेष निरहंकार मनःस्थिती' हवी, तिचे वर्णन केशवसुतांनी पहिल्या कडव्यात केले आहे. गीतेच्या दुसऱ्या अध्यायात किंवा बाराव्या अध्यायात स्थितप्रज्ञाची किंवा देवभक्ताची जी लक्षणे सांगितली आहेत त्यांचाच अनुवाद त्या कडव्यात आहे."

मला वाटते वरील उपपत्तीतील दिशाच (approach) केशवसुत व त्यांच्या वृत्तींचे लोक यांना मान्य होणार नाही. सुंदरतेशी तन्मयता पावण्याचा केशवसुतांचा 'प्रयत्न चालू होता.' हा शब्दप्रयोगच सौन्दर्यवाद्यांना हास्यास्पद वाटेल ! सौन्दर्य-शरणता हा प्रयत्नाचा प्रान्त नसून असाह्यतेचा, मजबूरीचा–प्रान्त आहे!–'Hit or miss' चा मामला आहे ! सौन्दर्याला 'कुर्निसात' आपोआप दर्शनाबरोबर झाला तरच होतो, नाही तर जन्मभर ओढून ताणून कण्हत कुथत सौंदर्याची मोजमाप चालू राहते ! पहिल्या म्हणजे कुर्निसातवाल्या लोकांना सौंदर्यवादी म्हणतात, दुसऱ्या म्हणजे फूटपट्टीवाल्या लोकांना 'सौंदर्यशास्त्री' म्हणतात. दुर्दैव आम्हा आधुनिक काव्याच्या टीकाकारांचे, की अद्याप मराठी टीकावाङ्मयात सौंदर्यवाद (Romanticism) आणि सौंदर्यशास्त्र (Aesthetics) या दोहोतला फरकही ओळखला जात नाही !

तसेच 'झपूर्झा' मध्ये वर्णिलेली स्थिती आणि प्राप्त झालेली स्थितप्रज्ञावस्था एक नव्हे. गीतेचा आणि 'झपूर्झा' वस्थेचा काडीचाही संबंध नाही. (गीतेचा व इमर्सनच्या

आनंदी अवस्थेचाही संबंध बेताचाच आहे!) 'झपूर्झातील' 'काय म्हणावे या स्थितीला' चे सादृश्य असलेच तर 'उत्तररामचरिता' च्या पहिल्या अंकातील रामाच्या अवस्थेशी आहे. रामाने सीतेला मांडीवर घेतले असून ती विशुद्ध सती विश्रब्धपणे झोपी गेलेली आहे. राम जागृतच पण अनिर्वचनीय अशा अवस्थेत आहे. तो म्हणतो,

विनिश्चेतुं शक्यो न सुखमितिवा दुःखमितिवा।
प्रमोहो निद्रा वा किमु विषविसर्पः किमुमदः॥
तव स्पर्शे स्पर्शे ममहि परिमूढेन्द्रियगणः।
विकारश्चैतन्यं भ्रमयतिच सम्मीलयतिचं॥

उत्तरराम चरितातील या प्रख्यात श्लोकात "हर्षखेद हे मावळले" आणि 'काय म्हणावे या स्थितीला' यात उल्लेखिलेल्या अवघड अवस्थेचे शक्य तितके स्पष्ट वर्णन आहे.

सीतेच्या अंगोपांगाचा प्रत्येक स्पर्श माझ्या (रामाच्या) इंद्रियगणाला वेडावून टाकीत आहे. माझे चैतन्य (Consciousness) भ्रान्तही होत आहे आणि सम्मीलित ही (concentrated) होत आहे 'या स्थितीला काय म्हणावे' हेच समजत नाही! दुःख म्हणावे की सुख म्हणावे? मोहावस्था म्हणावी की निद्रा म्हणावी? माझ्या अंगात (एकप्रकारचे) विष संचार करीत आहे की उन्माद संचारत आहे.

रामाची ही अवस्था स्थितप्रज्ञाची आहे असे जर आमची पंडित मंडळी समजत असतील तर ती मंडळी स्वतःच सर्व विकारांच्या पलीकडची मानावी लागतील! म्हणून केशवसुत आरंभीच म्हणत आहेत. "हर्ष आणि खेद या दोनच कोटी ज्यांना ठाऊक आहेत त्यांच्याशी काय बोलायचे? आनंद एका मर्यादापलिकडे अथवा n^{th} power पर्यंत गेला म्हणजे तो 'हर्ष खेदातीत' असतो. पण या अवस्थेला स्थितप्रज्ञाची अवस्था समजणे म्हणजे केशवसुत आणि गीता दोन्हीही समजली नाहीत, असे दाखविणे होय! आत्यन्तिक सुखावस्थेत दुःखानुभवाचाही अंश असतो, असा भवभूतीच्या श्लोकातील त्या विलक्षण अवस्थेचा अर्थ आहे. हाच अनुभव आधी उद्धृत केलेल्या शेलेच्या वचनांच्या बुडाशी आहे. प्रो. पंडित गीतेच्या सुरात म्हणतात, झपूर्झातील तन्मयता प्राप्त होण्याला 'निर्विशेष निरहंकार वृत्ती हवी'! वेदान्ताची भाषा पुस्तकातून आयती पत्करणारे जुने लोक, आधुनिक सौंदर्यपूजक लोकांच्या अस्सल अनुभवाचा अर्थ लावू लागले, म्हणजे घोड्यापुढे गाडी जोडण्याचा उलटा प्रकार करतात तो हा असा! आम्ही रोमँटिक् लोक, आधी तन्मयता पावतो व नंतर त्या तन्मयतेमुळे अहंभाव विसरतो. आमची सामग्री, यमनियम, अहंकारविजय इ. नसून 'Sensibility' ऊर्फ 'संवेदन शक्ती' ही आहे. Sensibility च्या तीव्रतेने आम्हांला 'झपूर्झा'ची अवस्था प्राप्त होते व या अवस्थेतच अहंकार नष्ट होतो. अर्थात रोमँटिक् लोक जीवन–मुक्तावस्थेच्या मागे नसून 'उत्कट क्षणा'च्या मागे असतात, ते Living in the moment चे भोक्ते असतात.

या कवितेच्या संदर्भातच पंडितांनी कवींना 'वेडे' म्हणण्याच्या परंपरेचा उल्लेख केला आहे. पण हा प्रश्न या कवितेच्या संदर्भात तरी अप्रस्तुत आहे. पंडित म्हणतात–

"व्यर्थी अधिकचि अर्थ वसे
तो त्यांस दिसे
ज्या म्हणति पिसे"

या कडव्यात केशवसुतांनी पिसे हा शब्द विपरीत रीतीने म्हणजे 'शाहणा' या अर्थाने वापरला आहे. वस्तुतः या कडव्याचा अर्थच सरळ व उघड आहे; व त्यात 'पिसे' हा शब्द 'वेडे' या अर्थीच म्हणजे नेहमीच्या अर्थानेच वापरलेला आहे. लोक ज्याला व्यर्थ (अर्थशून्य) समजतात. त्यांत विशेषच अर्थ असतो. हा व्यर्थातील अर्थ ज्याला दिसतो त्यालाच लोक वेडा समजतात. हे 'लोक–विरुद्ध' सत्य सांगायचे आहे, म्हणून तर कवी या कडव्याच्या आधी म्हणतो—

"हसतिल जरि ते आम्हांला
भय न धरू हे वदण्याला"

पण हा अर्थासंबंधीचा पंडितांनी केलेला घोटाळा दृष्टिआड केला, तरी कवींना वेडे समजण्याची कल्पना ते विचित्र व उसनी समजतात या गोष्टीचा विचार करणे जरूर आहे. बाल्याचा गौरव करणे आणि कवींना 'वेडे' हे उपपद लावणे, या गोष्टी पंडितांना विचित्र आणि विदेशीय का वाटाव्या हे कळत नाही. पोटापाण्याकडे दुर्लक्ष करून एकाच गोष्टीच्या मागे लागणाऱ्याला सामान्य पोटभरू लोक नेहमीच वेडा समजतात. यांत त्या 'वेड्या'ला कमीपणा नसून गौरवच आहे. 'अवलीया' 'मस्ताना' हे शब्द सुफीपंथी लोक अध्यात्मानुभवात वा ईश्वरी सौंदर्यात मस्त राहणाऱ्या लोकांना लावतात. त्यात कमीपणा आहे का? मुसलमानात सन्त व त्यांचे भक्त हे तर पाश्चात्य नाहीत ना? आपल्याकडे अशा उन्मनी अवस्थेतील परमहंसाचे वर्णन 'बालोन्मत्तपिशाचवत्' असे केलेले आहे. आमचे टीकाकार पढिकपणा, नीतिनियम आणि रूढाचार–सम्पन्नता (respectability) यांच्या बलयातून म्हणजेच (philistanism) मधून बाहेर पडलेले नसल्याने त्यांना 'वेडा' या शब्दाचा एवढा धसका वाटत असावा. बाल्यावस्थेचा गौरव ही कल्पनाही प्रो. पंडितांना परदेशीच वाटते व ते पुन्हा इमर्सनचीच वचने दाखल करतात. परंतु लहान मुलाच्या निष्पापपणाचा, सरलतेचा, आत्मिक गुणांचा गौरव उपनिषदापासून बायबलपर्यंत सर्व श्रेष्ठ धर्मग्रंथांनी केला आहे. 'पांडित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत्' हे श्रुतिवचन आपल्या समाजात लोकप्रिय आहे. रोमँटिक् लोक हे कृत्रिमतेचे द्वेष्टे आणि सहजतेचे भोक्ते असतात. वाङ्मयातील रोमँटिसिझम्चा जनक कोणीही असो, जीवनातील रोमँटिसिझमचा जनक रूसो होता, हे प्रसिद्ध आहे. त्यांचे महासूत्र 'Return to nature' हे होते. एकदा निसर्गावस्था ही विदग्धावस्थेपेक्षा (Sopistication पेक्षा) श्रेष्ठ मानली, म्हणजे अकारण लडिवाळपणा, अखंड निष्कपटपणा याचे जणू निर्झर असलेली बाळगोपाळ मंडळी, ही आपणांला गुरुस्थानी वाटू लागतात, हे मत

जागतिक आहे, भारतीय तर आहेच. काव्याच्या क्षेत्रांतही पढिकतेला महत्त्व देण्याच्या वृत्तीमुळे हा बाल्य-गौरव आमच्या विद्वानांना पाश्चात्य वाटू लागला असावा !

सारांश, रोमँटिसिझमचा संबंध सौंदर्यपूजनाशी जेवढा आहे, तेवढाच कृत्रिमतेच्या त्यागाशी आहे. सौंदर्य आणि सहजता यांच्या ओढीतून कवीला जशी बाल-सदृश उत्साहाची प्राप्ती होते, तशीच त्यांच्या अभावी असहायता, खिन्नता आणि एकलेपणा याची जोड होते. कृत्रिमतेच्या तिटकाऱ्यामुळेच कवी सामाजिक दंभावर कोरडे ओढतो. या सर्व परस्पर-संबद्ध पण मुळात एका विशिष्ट पिंडात (Romantic व्यक्तिमत्त्वात) आढळणाऱ्या वृत्तीचा कल्पक सहानुभवाने मागोवा घेतला, तर केशवसुतांच्या महत्त्वाच्या कवितांचा सुसंगत अर्थ लागतो. त्या कवितांवर केशवसुतांच्या वाचनात आलेल्या इंग्रजी कवितांचा वा निबंधाचा निमित्त-मात्र परिणाम नसेल असे नाही. पण केशवसुतांचा मूळ पिंड आणि वेळोवेळीची वृत्ती समजावून न घेता त्यांच्या वाचनांतील पुस्तके धुंडाळल्यास–

" परि तू जागा चुकलासी "

म्हणण्याची वेळ येते. केशवसुतांचे सृष्टिवर्णन हे संस्कृत कवींचे सृष्टिवर्णन नव्हे; त्यांचा विश्वात्मक भाव म्हणजे जुना अद्वैतानुभव नव्हे; त्यांचे नैराश्य म्हणजे संताचे वैराग्यही नव्हे की व्यवहारात पराभूत झालेल्यांचे Defeatism ही नव्हे.

त्यांच्या आकांक्षा व्यावहारिक नव्हत्या, ' Mundane ' नव्हत्या, त्या ideal वा आदर्शरूप होत्या. अर्थात त्यांचे हर्ष आणि खेद दोन्हीही ideal अथवा आदर्श-मूलक होते. त्यांच्या वाचनातील पुस्तके व नोकरीतील अवमान यांच्या संशोधनाने त्यांच्या फारच थोडया उद्‌गारांची संगती लागेल. अपेक्षी सुधारक म्हणून त्याच्या निराशेची संगती लागणे तर त्याहून निष्फळ ठरेल ! ते सिद्धहस्त कवी नव्हते, तर कणाकणात जिवंत असलेले व क्षणाक्षणाच्या अभिव्यक्तीकरिता धडपडणारे अग्रदूत वा Pioneer होते. त्यांचे काव्य वा त्यांचे अध्ययन समजावून घेण्यापेक्षाही त्यांचे व्यक्तिमत्त्व समजावून घेणे अधिक अगत्याचे आहे. पण त्याकरिता पांडित्य आणि परिश्रम यांचा उपयोग नसून वाङ्मयीन सपिंडत्वाचा, ' निदान ' कल्पक सहानुभूतीचा–अधिक उपयोग आहे. केशवसुतांच्या काव्याच्या अभ्यासाला ही नवी दिशा लावण्याचा यत्न मी या शतसांवत्सरिक वर्षातील माझ्या सर्व लेखांत केलेला आहे !

• •

केशवसुत आणि मर्ढेकर

केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वाचं आणि संदेशाचं अद्यापही पुरतं आकलन झालेलं नाही, असं मला अनेक लेखांतून व व्याख्यानांतून म्हणावं लागलं आहे. यंदाच्या त्यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षी ते अर्थातच मला अधिक वेळा व अधिक स्पष्टपणे म्हणावे लागते आहे. हेतू एवढाच की, या शताब्दीच्या निमित्तानं तरी केशवसुतांसंबंधी गेल्या पस्तीस वर्षांत अनेक विद्वानांनी मांडलेली चुकीची मतं तपासून पाहण्याची बुद्धी नव्या अभ्यासकांना व्हावी.

" केशवसुत म्हणजे सामाजिक बंड आणि जो जो कुणी रूढीविरोधी बंडाची भाषा करील तो तो केशवसुतांच्याच संप्रदायाचा होय. अर्थात मर्ढेकर संप्रदाय आणि केशवसुत संप्रदाय हे भिन्न मानण्याचे कारण नाही." अशा तऱ्हेचे प्रतिपादन जेव्हा केशवसुतांचे सर्वमान्य भाष्यकार करू लागतात, तेव्हा ते केवळ स्वतःचा वैचारिक गोंधळच व्यक्त करतात असं नव्हे, तर दोन पिढ्यांतील काव्यविचाराला भलती दिशा लावतात आणि म्हणूनच अशा भ्रान्त विचारसरणीची कठोर परीक्षा चालू शताब्दीच्या निमित्ताने तरी होणे जरूर आहे.

केशवसुतांच्या कवितेचा गाभा सामाजिक बंडखोरी हाच आहे का ? तसे असेल तर ' वातचक्र ', ' सिंहावलोकन ', ' सतारीचे बोल ', ' आम्ही कोण ? ', ' कवितेचे प्रयोजन ', ' थकलेल्या भटकणाराचे गाणे ' यासारख्या अनेक सुंदर कवितांचे स्थान त्यांच्या समग्र काव्यात गौण ठरवावे लागेल. शिवाय आगरकर, केशवसुत आणि मर्ढेकर तिघांच्याही लेखनात बंडाची आणि विध्वंसाची भाषा येते, एवढ्यावरून तिघे एकच संदेश देत आहेत असे म्हणावे लागेल. नाहीतर केशवसुतांच्या सौंदर्यपूजक व भावनापूजक कवितांना त्यांच्या जीवनमूल्यांच्या दृष्टीने महत्त्व नाही असे तरी म्हणावे लागेल. तीन बंडखोरांत बंडखोरीपुरते साधर्म्य असले, तरी त्यांची जीवित मूल्ये अगदी भिन्न असू शकतात. केशवसुतांना रूढीविरोधाखेरीज कित्येक ध्येये प्रिय आणि बहुमोल वाटत होती

हे त्यांचा काव्यसंग्रह वाचणारांच्या सहज ध्यानात येईल. मानवी सौंदर्य, मुलांचे मुग्धत्व, काव्यमय दृष्टी, काव्याच्या आविष्कारातील सहजता, सृष्टीतील गूढसाक्षात्कार, संगीताची मोहिनी यासारख्या अनेक गोष्टी केशवसुतांना–रूढीशी केलेल्या संग्रामाइतक्याच–प्रिय होत्या.

आगरकरांना सामाजिक समतेखेरीज इतर मूल्यांचे अगत्य होते असे निदान त्यांच्या लेखनावरून तरी दिसत नाही. पण साहित्यशास्त्राच्या आणि मानसशास्त्राच्या भाषेत बोलायचे, तर आगरकरांना फक्त काही सामाजिक अन्याय दूर करायचे होते, – त्यांच्या मनावर मोहिनी कशाचीच नव्हती. त्यांना कोणत्याच सौंदर्याचे वा उदात्ततेचे आकर्षण नव्हते. सारांश, ते कवी नव्हते, सुधारक होते. सुधारकांचे बळ त्यांच्या निषेधात होते– पण त्यांच्या जीवनात प्रेमस्थाने आणि आदरस्थाने नव्हती. किंबहुना अधिक स्पष्ट भेद सांगायचा झाला, तर जे सुशिक्षित महाराष्ट्रीय लोक व्हिक्टोरियन् युगातल्या उपयुक्त-वादाचे आणि जडवादाचे भोक्ते बनले, अशा रूक्ष लोकांत आगरकरांचे स्थान आहे. तर जे सुशिक्षित लोक वर्डस्वर्थ, शेले, इमर्सन्, व्हिट्मन यांच्या वाङ्मयाच्या रूपाने पाश्चात्य जगतात अवतीर्ण झालेल्या विश्वात्मक धर्माचे वा Pantheism चे भोक्ते बनले त्यांचे कुलगुरू केशवसुत हे होते. आगरकर जी बंडाची भाषा बोलत होते तीच भाषा केशवसुत काही कवितांत काढीत असले, तरी दोघांची पूजास्थाने आणि प्रेमस्थाने भिन्न होती. किंबहुना आगरकरांना बुद्धिवादी मिलखेरीज पूजास्थानच नव्हते, हीच त्यांच्या जन्माची शोककथा होती.

पण केशवसुतांच्या काव्यातील प्रेमाच्या आणि पूजनाच्या सुरापेक्षा बंडाच्या सुरांना महत्त्व देण्याची परंपराच मराठी टीकेत बळावली. याला कारण देशाच्या पारतंत्र्यामुळे राजकीय सामाजिक अन्यायासंबंधी ओरड पुढाऱ्यांनी आधीच करून ठेवली होती. परकीय सत्तेशी लढा, दुष्ट रूढीशी लढा, ही ध्येये केशवसुतांच्या काळी सामान्य बुद्धीच्या सुशिक्षितांपर्यंत पोहोचली होती. लढा आणि विरोध या गोष्टी सौंदर्यसंवेदना, आदर्श-पूजा यांच्या मानाने स्थूल आहेत. लढा आणि संग्राम स्थूल बुद्धीच्या माणसांनाही समजू शकतो, परंतु निसर्ग, संगीत, काव्यसामर्थ्य यांचे आकर्षण जाणवण्याला सूक्ष्म संवेदनक्षमता लागते. आमच्या टीकाकारांनी केशवसुतांच्या निसर्गविषयक कवितांचा व काव्यविषयक कवितांचा सर्वात जास्त विपर्यास केला, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. त्यांना सामाजिक व राजकीय कविता सर्वात महत्त्वाच्या वाटल्या पण त्याही त्यांना समजल्या असे नव्हे. कारण त्यात त्यांना आगरकरांच्या वर्तमानपत्री अग्रलेखाहून अधिक काही जाणवले असे दिसत नाही ! वास्तविक 'तुतारी', 'निशाण', 'नवा शिपाई', 'गोफण' या कवितांत आगरकरांच्या सुधारणावादाहून कितीतरी खोल, व्यापक आणि उत्कट जाणीव आहे. पण केशवसुतांच्या काव्यावरील बरीचशी टीका वाचल्यास, उत्कट भावनेच्या प्रतीतीपेक्षा या मंडळींना वर्तमानपत्री युक्तिवादच अधिक मोलाचा वाटतो असे दिसून येईल !

केशवसुतांचे आकर्षणविषय समजायचे म्हणजे केशवसुतांचे व्यक्तिमत्त्व समजायला हवे. इंग्रजी कवितेमधील विषय मंडळींच्या लक्षात येई; पण इंग्रजीतून उसने घेतलेले विषय कोणते आणि कवीच्या अनुभूतीतून, अंतःकरणातून निघालेले विषय कोणते हे कळण्याची बुद्धी त्या टीकाकाराला आहे!

सत्याकडे आणि सुखाकडे जाण्याचा बुद्धीखेरीजही एक श्रेष्ठ मार्ग आहे, यांची जाणीव आगरकरांना होती व ती जॉन स्टुअर्ट मिल् त्यालाही अखेर झाली होती. आगरकरांनी मात्र भावना, अंतःप्रेरणा, श्रद्धा यांचा एवढा धसका घेतला होता की, त्याच्या ओंजळीतून मिळणारे अमृत देखील त्यांना बुद्धिवादाच्याद्वारे मिळणाऱ्या विषाहून अधिक भयावह वाटत होते. "विद्वान डॉक्टरच्या हातून मरण पत्करेल, पण एखाद्या वैद्याकडून मिळणारे रोगनिवारण नको" या म्हणीत जी वृत्ती साठवलेली आहे, तीच वृत्ती बुद्धिवादाच्या मुळाशी असते. ही वृत्ती शास्त्राधिष्ठित असेल, सुरक्षितपणाचीही असेल, पण काव्याशी आणि सौंदर्यपंथाशी तिचा काही संबंध नाही. ज्या गोष्टींना स्वतःच्या हृदयाच्या ग्वाहीखेरीज कोणताच पुरावा नाही, अशा शेकडो गोष्टींवर कवींचा आनंदमय मनोव्यापार चालू असतो. या Speculation मध्ये, सट्टाबाजारात वा वायदेबाजारात, कवीचा व जगाचा अखेर फायदाच होतो. म्हणून तर प्रत्येक सुसंस्कृत राष्ट्रात कवींची एवढी महती आहे. बुद्धीच्या रोख व्यवहाराखेरीज आपण अन्य व्यवहार करणार नाही, असे म्हणणारे बुद्धिवादी, जीवनात अनेक अनुभवांना आनंदांना व सुखांना मुकतात. त्यांना समाधान एकच : "आम्ही कधी फसत नाही!" पण जे भावनेवर आणि हृदयाच्या ग्वाहीवर विश्वास ठेवीत नाहीत, त्यांना मोठा तोटाही नाही, तसा मोठा लाभही नाही! प्रेम, विश्वास, श्रद्धा ही हृदयाची घाडसं होत. घाडसाशिवाय मोठा व्यवहार वा मोठा लाभ होऊ शकत नाही. बुद्धिवादी लोक हे 'widow's account' वर जगणाऱ्या अभागी अबलेसारखे आहेत. बिचारीला कधी ठोकर लागू नये एवढीच तरतूद तिच्या दिवंगत भ्ताराने करून ठेवलेली असते. तिने काही नवे किफायतशीर धाडस करून जिंदगी करावी, अशी अपेक्षाच नसते. आमचे बुद्धिवादी सुधारकही जॉन स्टुअर्ट मिलने काढून दिलेल्या 'widow's account' वर जगत होते. सौंदर्यवाद आणि स्फूर्तिवाद ही धाडसाची आणि नवनिर्मितीची क्षेत्रे त्यांच्याकरिता नव्हती.

पण केशवसुतसंप्रदायी काव्याचा मूळ झरा आणि त्याच्या पाण्यावर बहरलेला बगीचा याचे स्वरूपच त्यांनी लक्षात घेतले नाही, त्यांनी केशवसुतांचे नाते भलभलत्या कुलहीन, गोत्रहीन संप्रदायाशी लावून दिले. केशवसुतांच्या रमणीय आणि टवटवीत काव्यसृष्टीला जीवन पुरविणारा झरा बंड हा नसून 'सौंदर्य प्रेम' आणि 'भावनापूजन' हा आहे. केशवसुतांचा संप्रदाय हा हळवा, प्रेमपूजक, रोमँटिक संप्रदाय आहे. त्याच्या तत्त्वज्ञानाची आणि काव्यसंप्रदायाची तीन सहज दिसणारी सूत्रे सांगायची झाली तर—

(१) जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे।
गाणे सवेचि मग होय मनात जागे॥

(२) प्रौढत्वी निजशैशवास जपणे बाणा कवीचा असे ।
(३) साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे ॥

या तीन सूत्रात सांगता येईल. होय, पण याच सौंदर्यपूजनातून आणि शैशवसंप्रदायातून आणखीही एक सूत्र निघते, ते म्हणजे आत्मपूजन आणि विश्वबंधुत्व यांचे होय.

जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत ।
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत ।
कोठेही जा—पायाखाली तृणावृता भू दिसते ।
कोठेही जा—डोईवर ते दिसते नीलांबर ते ।

या आत्मलीन ओळी गाणारा नवा शिपाई जॉन स्टुअर्ट मिलचा उपयुक्ततावादी 'युनिफार्म' घालून हिंडत नसून इमर्सनची प्रवचने आणि स्तोत्रे म्हणत हिंडत आहे. तो बुद्धिवादी नसून अतिन्द्रियानुभववादी आहे. आगरकरांप्रमाणे केशवसुतांच्याही हाती कधी कधी गोफण गोटे दिसत असले, तरी केशवसुत ज्या पिकाची राखण करीत आहेत, ते पीक आगरकरांच्या पिकापेक्षा फार वेगळे आहे ! 'न्याय आणि समता यावर मिलच्या उपयुक्ततावादी चेल्यांचे समाधान होते; तर सौंदर्य, मुग्धत्व आणि विश्वबंधुत्व यांच्याखेरीज इमर्सनसारख्या गूढवाद्याला समाधान नव्हते. केशवसुतांनी आगरकरांपासून आपले तत्त्वज्ञान घेतले म्हणणारांना हे सांगितले पाहिजे की केशवसुतांजवळ जे तत्त्वज्ञान होते ते आगरकरांना समजले तरी असते की नाही, याचीच शंका आहे ! ही जर आगरकरांची स्थिती, तर बिचारे मर्ढेकर याहूनही दूरचे ! मर्ढेकरांनी आपल्या काव्याचा श्रीगणेशा सौंदर्यवादी सुरांनी केला. त्यांच्या 'शिशिरागमा'तील ओळी उद्धृत केल्या, तर त्या आमच्या वाचकांना बहुधा माधवज्यूलियन यांच्या आहेत असे वाटेल ! पण आय्. सी. एस्. च्या उद्देशाने इंग्लंडला जाऊन आल्यावर मर्ढेकरांची कविता एकदम बदलली. जी पृथ्वी त्यांना एकेकाळी 'फुलांची परडी' वाटत होती, तीचीच आता 'तिरडी' बांधली आहे असे त्यांना वाटू लागले.

पृथ्वीची तिरडी । (एरव्ही परडी । फुलांनी भरली !)
जळो देवा भली ! ।

'प्रेमाचे लव्हाळे' शोधायला निघावे तर, त्या 'लव्हाळ्या' ऐवजी मुडद्यांची रासच त्यांना दिसू लागली. हाती शिर घेऊन लढणारा वीर केवळ भाकरीसाठी लढतो, असा साक्षात्कार होऊन वीरमरणातली उदात्तता त्यांना नाहीशी झालेली दिसली.

मर्ढेकरांना जो साक्षात्कार झाला, तो त्यांनी प्रत्यक्ष रणांगणावर (प्रेक्षक म्हणून का होईना) जाऊन पाहिला, की एझ्रापाउंड आणि इलियट यांच्या पुस्तकात पाहिला हा प्रश्न आपण तूर्त बाजूला ठेवू. पण ज्याला सुजला, सुफला भूमीची तिरडी बांधलेली दिसते, अन् ज्याला प्रेम करायला निघाल्यावर हॅम्लेटप्रमाणे प्रेताचीच कवटी हातात घेऊन विश्वाचा विचार करावासा वाटतो त्यांचा संप्रदाय, आणि

जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे ।

म्हणणारांचा संप्रदाय एकच म्हणणाऱ्या टीकाकारांची गम्मत वाटते !

ही गफलत विद्वान टीकाकारांकडूनही कशी व्हावी ? त्यालाही काही कारणे आहेत ! रचनेत 'प्रयोगशीलता' आणि विचारात 'बंडखोरी' या दोन गोष्टींना या शतकाच्या आरंभापासून पाश्चात्य टीकाकारांनीही एवढे अवास्तव महत्त्व देऊन ठेवले होते, की आमच्या टीकाकारांनीही त्याच दोन गोष्टीत काव्याची 'प्रगती' (?) साठविलेली आहे अशी कल्पना करून घेतली ! केशवसुतांचं युगप्रवर्तकत्वही त्यांच्या प्रयोगशीलतेत आणि सामाजिक बंडखोरीत आहे, अशी या लोकांनी कल्पना करून घेतली. मर्ढेकरातही नेमक्या याच गोष्टी आहेत, अर्थात् जे केशवसुतांनी केलं, तेच मर्ढेकर करीत आहेत,—प्रत्येक नव्या प्रयोगाला बिचकणारे टीकाकार नवकाव्याला उगीच बिचकत आहेत असे सर्वसमावेशक निर्णय द्यायला सौजन्यसंप्रदायी टीकाकारांनी प्रारंभ केला.

केशवसुतांनी अभिव्यक्तीत अडथळा नको म्हणून काही प्रयोग केले, पण प्राचीन दृढ वृत्तांऐवजी शिथिल जाती वापरणे या पलिकडे गेले नाहीत. पण केशवसुतांचे वैशिष्ट्य त्यांच्या स्वानुभूतिप्रधानतेत आहे, वृत्तस्वातंत्र्यात वा रीतिस्वातंत्र्यात नाही. उलट मर्ढेकरांचे शैलीचे प्रयोग येट इलियट् आणि पौंड यांच्या वळणावर आहेत. पठिक वाचकाच्या अंतर्मनात अनेक अर्थाच्याच नव्हे, तर अनेक भाषांच्या छटा उमटाव्या अशी योजना इलियट सारखे पंडित कवी करीत. 'लवाळे' शब्दात मराठी 'प्रेमा' बरोबर इंग्रजी 'Love' मनात येऊन 'Allusiveness' हा नवकाव्यपंडितांना मोलाचा वाटणारा काव्यगुण सिद्ध व्हावा, ही मर्ढेकरांची धडपड दिसून येईल.

असल्या क्लिष्ट पंडितीप्रयोगांचा संबंध केशवसुतांच्या भावनाविष्कारवादी संप्रदायाशी काडीचाही नाही हे उघड आहे.

भावनापूजन, सौंदर्यपूजन, (माफक) प्रयोगशीलता आणि आन्तरराष्ट्रीय जाणीव या केशवसुत संप्रदायी विशेषांचे सर्वात अधिक संगोपन कवी अनिल यांनी केले. पण माधव ज्यूलियन्, अनिल, बोरकर आणि कुसुमाग्रज हेच केशवसुत संप्रदायाचे शेवटचे प्रतिभावन्त वारस होत.

• •

सौंदर्यवादाचे प्रणेते केशवसुत

आधुनिक काव्याचे कुलगुरू केशवसुत ऊर्फ कृष्णाजी केशव दामले यांना दिवंगत झाल्याला हा लेख प्रसिद्ध होण्याच्या दिवशी पन्नास वर्षे पूर्ण होतील. त्यांचा स्मृतिदिन ता. ७ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात ठिकठिकाणी साजरा होणार आहे व त्या निमित्ताने त्यांच्या काव्याचे पुन्हा एकदा मूल्यमापन होत आहे हे स्वाभाविकच आहे.

केशवसुतांचा सूर मराठी काव्याच्या प्रांतात इतका नवीन होता, व काही दृष्टींनी इतका लहान होता की त्याचं आकलन त्यांच्या हयातीत अजीबात झालं नसतं तरी नवल नव्हतं. काही प्रतिभावंतांना त्यांच्या हयातीत कुणी सहचरच न मिळाल्याचंही वाङ्मयाच्या इतिहासावरूनच दिसून येईल. सुप्रसिद्ध 'इलेजी'चा कर्ता आंग्ल कवी ग्रे 'हा जन्मात कधी बोललाच नाही!' असं एका टीकाकारानं त्याच्या सहचरशून्यत्वाला अनुलक्षून आलंकारिक भाषेत म्हटलं आहे! केशवसुतांची कविता इतकी वेगळी होती व इतकी थोडी होती की, हरिभाऊ आपट्यांसारखे प्रातिभावंत समानधर्मे त्यांस लाभले नसते तर ती काही काळ विसरून जाण्याचाही संभव होता. पण हरिभाऊ आपटे, वासुदेव बळवंत, पटवर्धन यांच्यासारखे स्वतंत्र बुद्धीचे रसज्ञ, रेव्हरंड टिळकांसारखे उदार वृत्तीचे समकालीन कवी, आणि गोविंदाग्रजांसारखे उघडपणे स्वतःला सच्चा चेला म्हणवून घेणारे पुढच्याच पिढीचे विख्यात अनुयायी केशवसुतांना लाभले हे त्यांचं भाग्य होय यात शंका नाही. एवढ्या मोठ्या प्रतिभावंतांनी त्यांचं युगप्रवर्तकत्व आधीच मान्य करून ठेवलं नसतं, तर त्यानंतरच्या अस्थिर आणि चंचल बुद्धीच्या जमान्यात त्यांना कोणतं स्थान दिलं गेलं असतं हा एक प्रश्नच आहे.

वास्तविक प्रत्येक पिढीला अशा युगप्रवर्तक कवीचं मूल्यमापन अधिकाधिक स्पष्ट आणि निश्चित व्हायला हवं. ज्यांनी या अगदी नव्या आणि वेगळ्या अशा सुरांतला जोम आणि नाजुकपणा ओळखला, ते अर्थातच धन्यवादाला पात्र आहेत, पण त्यांच्यामागून येणाऱ्या टीकाकारांनी त्या सुरांचा उमाळा कुठून येतो आहे हे निश्चित विशद

करणं जरूर होतं. नवमत म्हटलं, की ते भिन्नच असायला पाहिजे, असं मानणाऱ्या आजच्या वैचित्र्यलोलुप जमान्यांत मूल्यांपेक्षा मतभिन्नतेलाच अधिक मोल आलं तर नवल नाही ! केशवसुतांच्या मूल्यमापनातली 'तेजीमंदी' शोधीत जाणं मोठं मनोरंजक होईल ! आजच्या अर्धशतसांवत्सरिक उत्सवाच्या प्रसंगी समोर पुस्तकांच्या–आणि विशेषतः मासिकांच्या फायली घेऊन बसणं हास्यास्पद ठरेल. पण स्थूलमानानं काव्यभक्तांना जे आठवत असेल त्याचं पुनःस्मरण या स्मृतिदिनाच्या निमित्तानं करायला हरकत नाही.

हरिभाऊ, रेव्ह. टिळक यांच्या पिढीनंतर आणि गोविंदाग्रजांच्या अकाली निधनानंतर काही काल मराठी काव्याच्या प्रांतात काही एक प्रकारची शून्यता भासू लागली होती. चंद्रशेखर आणि तांबे या काळात प्रतिभेच्या ऐन माध्यान्हीला होते हे खरं. पण हे मराठी शारदेचे सरदार दूरदूरच्या सुभ्यावर–बडोदे–ग्वाल्हेरला–अडकून पडले होते. अशा स्थितीत पुण्यात काही रावबाजींच्या करामतीला अवसर मिळाला असला तर नवल नाही. ज्या संधिकालात पुण्यात कोणी एक अनंततनय हेही दरबार भरवू शकत होते त्या काळाच्या मंदप्रभतेची कल्पनाच केलेली बरी ! याच सुमाराला काव्यात जाणीवपूर्वक आणि सहकार्यपूर्वक हालचाल करण्याकरिता काही तरुण कवी महाराष्ट्र शारदामंदिर या मोठ्या संस्थेतच सवता संसार स्थापून बसले. ते रविकिरण मंडळाचे कवी होत. या मंडळात नव्या दमाचे कवी होते तसे नव्या मूल्याचे टीकाकारही होते. नव्या मूल्याचा पहिला टीकाकार–माडखोलकर–याच मंडळानं महाराष्ट्राला दिला. माडखोलकरांनी आपल्या 'कविपंचकां'त क्रांतिकारक केशवसुतांचं रौद्ररसपूर्ण स्तोत्र गायिलेलं मजप्रमाणं अनेक काव्यभक्तांना आठवेल. पण याच माडखोलकरांनी त्यानंतर दहाच वर्षांनी आपल्या मूल्यमापनाचा, काव्य–भक्तीचा आणि क्रांतिपूजेचा 'फेरविचार' केला ! १९३५ च्या सुमारास श्रीमंत सयाजीराव यांच्या वाढदिवसाच्या निमित्तानं निघालेल्या समालोचन–ग्रंथांत, त्यांनी विष्णुशास्त्र्यांच्या तुलनेनं केशवसुतांना स्त्रैण ठरवून, त्यांच्या क्रांतीच्या ध्वजावर स्वतःच चढवलेल्या 'गृध्रा'ला त्यांनी स्वतःच अवघ्या दहा वर्षांच्या अवधीत 'चिमणी' ठरवून टाकलं !

पण याच्याही आधी, याच मंडळांतल्या एका प्रतिभावंत कवीनं आणि विद्वान पंडितांनी केशवसुतांच्या कवितेवर एक विद्वत्ताप्रचुर प्रबंध लिहून एका वाङ्मयीन कोशात प्रसिद्ध केला होता. हे पंडित म्हणजे आमचे माधवराव पटवर्धन होत. त्यांच्या या सुमारे ऐंशी पानांच्या निबंधाइतका सशास्त्र असा केशवसुत–काव्याचा अभ्यास यापूर्वी तर काय, पण यानंतरही झाला नाही असं मी म्हणेन. पण आजकाल बोकाळलेल्या काव्य–विनाशक शवविच्छेदनाचं खरं मूळ माधवरावांच्या या प्रामाणिक विद्वत्तापूर्ण पण भरकटलेल्या काव्यविवेचनातच आहे !

दरम्यान केशवसुतांच्या कवितेची भ्रान्त स्तुती आणि भ्रान्त निन्दा होतच होती. कोणी तिजमध्ये समाजक्रांतीला आवाहन आहे म्हणून ती क्रांतिकारक असे म्हणत; कुणी तिजमध्ये नैराश्य आहे म्हणून ती रडवी आहे असे म्हणत; कुणी यमक आणि वृत्ते

यांच्या परंपरा केशवसुती कवितेनं मोडल्या, यातच तिचं क्रांतिकारकत्व मानीत; तर कुणी हे सर्वच नाकारून इंग्रजी काव्याच्या वाचनानं जे सहज सगळीकडेच पसरलं, ते काव्यांतच तेवढं क्रांतिकारक कसं म्हणता येईल ? अशी शंका काढीत, तर कुणी केशवसुतांचं सामाजिक क्रांतिकारकत्वसुद्धा आगरकरांकडून उसनं घेतलेलं होतं असं ठरवून त्यांना एकट्यालाच नव्हे, तर सर्व काव्यालाच गद्याच्या मानानं नकली आणि 'सेकंड हँड' ठरवीत ! मधून मधून नकळत शहाणपणाचं मूल्यमापन आणि काव्यनिदान होत नव्हतं असं नाही, पण एकंदरीत वर संग्रहित केलेल्या शहाणपणाच्या ताऱ्यांच्या मानानं ते कमीच पडलं असं म्हटलं पाहिजे. नाहीतर आज केशवसुतांच्या निधनाला अर्धं शतक लोटल्यावर पुन्हा त्यांच्यासंबंधीच्या प्राथमिक शंका का निघाव्या ?

या निमित्तानं 'लोकसत्ते'नं प्रसिद्ध केलेल्या लेखांपैकी प्रो. जोगांच्या लेखात, केशवसुत काव्यदर्शनांतील आपलाच अखेरचा परिच्छेद जोगांनी उद्धृत केला आहे. त्यात ते 'केशवसुतांचे महत्त्व टीकाकारांनीही ओळखण्यास कोणता प्रत्यवाय असावा ?' असा प्रश्न विचारतात. या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या या विषयावरील अभ्यासग्रंथात तर सापडेलच, पण त्यांच्या 'लोकसत्ते'तल्या लहानशा लेखातही सापडेल. तपशील परिश्रमपूर्वक गोळा करावयाचा परंतु मूळ गड्ड्याला हात घालायलाच मात्र मोठ्या सौजन्यानं कचरायचं, आपल्या प्रतिपाद्य मताचं सर्वतोपरी समर्थन करायचं, पण अखेर (वाचकांच्या) कोर्टानं आपल्या पक्षकाराचा संपूर्ण दावा मान्य केलाच पाहिजे असं काही नाही असा अर्ज आपणच नेऊन गुदरायचा ! यासारख्या तऱ्हांमुळं मराठी टीकावाङ्मयात बाह्यतः समतोल वाटणारा, परंतु अंतस्थपणे निर्णयशून्य ठरणारा एक प्रवाह बराच मोठा आहे. या संप्रदायामुळंच मराठी वाङ्मयाच्या 'हाती' 'चांगला' माल कधी पुरेसा 'चांगला' म्हणून म्हटला जात नाहीं, आणि भिकार मालही पुरेसा 'वाईट' म्हणायला कुणाला धीर होत नाही ! भिकार आणि ओंगळ कविताही नांदू द्या ! म्हणून गळ घातली जाते; आणि उत्तम कविताही थोड्या तोऱ्यानंच Patronising वृत्तीनंच !– कोपऱ्यात बसवली जाते ! उबडच आहे. कुणालाही नांदवून घेण्याइतके सन्त टीकाकार घरघनी झाल्यावर जिला नांदवायला हवं तिला नांदवण्यात थोडी हयगय होणारच !

केशवसुतांची कविता प्राचीन कवितेच्या तुलनेनं "लौकिक, जीवननिष्ठ, आत्मलेखनात्मक भावगीत स्वरूपाची म्हणजेच वेगळी नाही काय ?" असं जोग आपल्या लेखात मोठ्या तळमळीनं विचारीत आहेत. पण लगेच "अर्वाचीन कवितेचे प्रणेते, युगप्रवर्तक ही विशेषणे केशवसुतास लावायची नसली तर लावू नयेत," अशी (प्रतिपक्षाला) औदार्याची सबलत देत आहेत ! आणि लगेच पुढे सर्वच सज्जनांना प्रिय होणारा 'दुहेरी निषेध' (Double Negative) वापरून ते लिहितात : 'पण तेवढ्याने मराठी कवितेला इंग्रजी कवितेच्या अभ्यासामुळे निराळे वळण मिळून मराठी कवितेचे, इतर मराठी वाङ्मयप्रकारांप्रमाणेच निराळे युग सुरू झाले नाही असे होत नाही." "पण एवढ्यानेच समाधान न होऊन, ते पुढे विचाऱ्या केशवसुतांना आणखीही काही

अभावात्मक आहेर (Left–handed compliments) करतात, ते पाहण्यासारखे आहेत ! ते म्हणतात ते स्थान कोणाला द्यावे याचा शोध घेता घेता अखेर केशवसुतां-समोरच येऊन थांबावे लागेल. परंतु फेरविचार करावयास काहीच हरकत नाही."

या "काहीच हरकत नसणाऱ्या" सौजन्यामुळेच श्री. आवळीकरांसारख्या नवीन लेखकांच्या मनात गोंधळ होतो आणि त्यांना सर्वमान्य गोष्टींचाही 'फेरविचार' करायला धीर होतो !

रा. आवळीकर यांचं इतर काही लिहिणं माझ्या पाहण्यात नाही, तरी या लेखावरून त्यांची काव्यविषयक रुची अविकृत दिसत आहे. कोमल भावनांचे केशवसुत, प्रेषितांच्या आवेशानं वज्रहृदय भासणारे केशवसुत आणि सहज गमतीनं एखादी बोधप्रद कल्पना सुचली म्हणून कविता लिहून टाकणारे केशवसुत अशी त्रिविध दत्तात्रेयस्वरूप मूर्ती त्यांच्या काव्यसंग्रहात दृष्टीस पडते, असं एखाद्यानं म्हटलं तरी त्यालाही माझी 'ना' नाही. फार काय, केवळ 'रियाज' म्हणून कालिदासाच्या एखाद्या सर्गाचं भाषांतर करणारं त्याचं चवथं मुखही त्यांत भरीला घालून त्यांना चतुरानन ठरवायलाही माझी तयारी आहे. पुष्कळ लोकांचं त्यांच्या भावनात्मक कवितांकडे दुर्लक्ष तरी झालं किंवा लक्ष गेलंच तर त्यांना रडवे ठरविण्याकरिता गेलं, हेही खोटं नाही. केशवसुत म्हटलं की तुतारी, गोफण; अशा ठराविक कविता लक्षात आणणारे लोक न कळत त्या कवितांतील ओजाचं आणि सौंदर्याचं मूळ कशात आहे हे विसरत असत. आणि म्हणूनच त्यांना 'स्त्रैण केशवसुत' आणि 'क्रांतिकारक केशवसुत' असं द्वैत तरी दिसे. नाही तर 'सुधारक' साप्ताहिकांत मिल, स्पेन्सरच्या कोट्या लढविणारे 'गद्यप्रेषित' आगरकर आणि त्याच विषयावर 'पादाकुलकात' नाही तर दोह्यात लिहिणारे 'पद्यप्रेषित' केशवसुत या दोघात अद्वैत तरी भासे !

पण वस्तुस्थिती निराळीच आहे. केशवसुतांचा रडवेपणा आणि केशवसुतांचा प्रक्षोभ, स्त्रैणपणा आणि त्यांचं पौरुष यातलं अद्वैत या मंडळींनी ओळखायला शिकलं पाहिजे, आणि प्रत्येक खरा काव्यभक्त ते ओळखून असतोही ! मजसारखा केशवसुत-भक्त केवळ काही विरोधाभासांच्या पकडी करून दाखवीत आहे किंवा Special Pleading करीत आहे असं ज्यांना वाटेल त्यांना मला एवढंच सांगायचं आहे की केशवसुतांचे उत्तम भाष्यकार आणि वकील केशवसुत हेच होत. त्यांनी आपल्या 'कवितेचे प्रयोजन' या कवितेत त्यांच्या पिढीच्या अरसिकांना ज्या गोष्टी समजाविल्या आहेत त्याच त्यांच्यावतीनं आजच्या पिढीतल्या 'रसिकांना' समजावून देणं आवश्यक दिसतं ! केशवसुत म्हणतात—

त्याचा स्त्रैणपणा असा प्रकटला वाटेल कोणा परी
धीरोदात्त असेचि तो श्रुत असे हे दूरहीं भूवरी
कालक्रीडित हे बघून रडला, हे व्यस्त काही नसे
प्रौढत्वी निजशैशवास जपणें बाणा कवीचा असे

ज्यांना इथं केशवसुतांनी सांगितलेल्या कवींचा विचित्र बाणा उमगला त्यांनाच आधुनिक कविता म्हणजे काय हे समजेल. त्यांनाच केशवसुत हेच तिचे प्रणेते का ते समजेल, आणि त्यांनाच आधुनिक कवितेचा खरा संप्रदाय कोणता आणि जुन्यांना ठाऊक असलेल्या काव्यसंप्रदायापासून तो वेगळा कसा ते समजेल. हे सर्व अवघड नाही; पण पांडित्याच्या जोरावर समजून घ्यायचं म्हटलं तर मात्र अवघड आहे; 'बाल्याच्या' ऋजुतेनं समजून घ्यायचं म्हटलं तर अवघड नाही !

जुन्या कवितेत जर कोणत्या एखाद्या काव्याला प्राणभूत अशा गोष्टीची गळचेपी होत असेल तर ती कवीच्या बालसदृश सहज भावनांची ! जुन्या काळात कवीला बालकाचं मुग्धत्व पाहून नाचावंसं वाटत नसे का ? त्याला महाराष्ट्राच्या निसर्गरम्यभूमीतील हिरवीगार रानं आणि सह्याद्रीच्या अजस्र कड्यांवरून आपली हिमधवल काया कुरवंडून टाकणारे जलौघ पाहून मंत्रमुग्ध होऊन उभं राहावंसं वाटत नसे का ? त्यांना जुन्या काळातल्या महाराष्ट्रीय रमणीचं ते सलज्ज सोज्ज्वळ मुखकमल पाहून सौंदर्यस्तोत्र गावंसं वाटत नसे का ? त्यांना त्यांच्याच समोर घडत असलेलं शिवप्रभूचं अलौकिक अवतारकृत्य पाहून अठरा पुराण गुंडाळून ठेवून एक नवंच महाकाव्य लिहावंसं वाटत नसे का ? इतके विविध काव्यविषय समोर असता, त्यांच्यातील पढिकांच्या काव्यात रूपावली, समासचक्र पढल्याचं आणि पुराणिकाचा धंदा केल्याचंच तेवढं प्रत्यंतर यावं आणि त्यांच्यातील 'अपंडितां'च्या काव्यात ईश्वरभक्ती, नाहीतर मोक्षपिपासा यासारख्या एखाद्याच वैयक्तिक भावनेचं दर्शन व्हावं हे कशाचं लक्षण ? अर्थातच काव्याची आणि कवीची सहजवृत्ती साफ मारून टाकण्यात आली होती या गोष्टीचच होय ! "तुम्ही संत म्हणून तरी लिहिलं पाहिजे, नाही तर हरिदासपुराणिक म्हणून तरी लिहिलं पाहिजे, नाहीतर तुमची गणना अशिक्षित आणि असभ्य शाहिरा–तमासगिरात करू !" अशी त्यावेळच्या कवींना सक्त ताकीद होती !

पण पुढे इंग्रजी अंमल आला ! होय, मला माहीत आहे की या इंग्रजी अंमलाच्या उपपत्तीमुळं अनेक टीकाकारांची साफ फसगत झाली आहे. इंग्रजी अंमलाबरोबरच लौकिक (प्रापंचिक व समकालीन) विषयावरची बंदी उठली हे खरं; पण लगेच कृष्णशास्त्री आणि कुंटे हे केशवसुतांसारखं लिहू लागले असं मात्र नाही ! केवळ ऐहिकपर कविता लिहिणं म्हणजे आधुनिक केशवसुती कविता नव्हे; फार काय, इंग्रजी कवितेचं अध्ययन करून कुंट्यांच्याप्रमाणे महाकाव्याची योजना आखणं म्हणजेही आधुनिक कवितेचा आरंभ नव्हे. पण काही पंडितांनी विष्णु मोरेश्वर महाजनी आणि कुंटे यांना केशवसुतांचे पितर ठरविले आहेत ! पण हे मत पंडितांपुरतंच राहिलं ! सर्वसामान्य काव्यभक्त आणि टिळक–गडकरी यांच्यासारखे प्रांजल आधुनिक कवी यांनी केशवसुतांचं कविकुलगुरुत्व ओळखलंही, आणि निरहंकारपणे मान्य केलंही !

कुंटे–महाजनी आणि केशवसुत यांच्यात फरक कोणता ? पहिले दोघे मराठी भाषेत प्रयोग करणारे प्रौढवृत्तीचे पंडित होते; तर केशवसुत हे स्वतःच्या पोटात न मावणारे

हर्ष-खेद, त्वेष-उत्साह, पद्यमय व गेय भाषेत आविष्कृत करणारे शिशुवृत्तीचे कवी होते. सहजप्रवृत्तींना जपणं, भावनांना पवित्र मानणं, दुसऱ्यांनी आणून दिलेले काव्यविषय न पत्करणं, सौंदर्यानं पुलकित होणं आणि तसं झाल्याचं सांगण्यात अभिमान मानणं, अन्यायानं संतप्त होणं आणि तो संताप व्यक्त करणं, हे एकशेआठ रामायण लिहिण्यापेक्षा पुण्यप्रद मानणं, निसर्गाशी गुजगोष्टी करणं, हा या नव्या शैशवपूजक, कवींचा संप्रदाय होता. यालाच इंग्रजीत (Romantic School) असं म्हणतात. आणि यालाच मराठीत ' सौंदर्यवाद ' म्हटलं पाहिजे. मनुष्य इंग्रजी वाङ्मय वाचून सौंदर्यवादी होत असता, तर कुंटे-महाजनीही होऊ शकते आणि आजचे डझनभर नवकवीही सौंदर्यद्वेष्टे का झाले असते ? सौंदर्यवाद हा पिंडात असावा लागतो. तो इंग्रजी शिक्षणानं अथवा इंग्लंडच्या बोटीनं ' इम्पोर्ट ' करता येतो असं नाही. पण रोमँटिसिझम म्हणजे काव्यातील केवळ एखादा रीतिभेद (Mere style) आहे, असं समजणारांचा पुन्हा कसा गोंधळ होतो हे पाहण्यासारखं आहे. आधी मराठी कवितेच्या आकलनास या पाश्चात्य संज्ञेच्या आकलनाची गरज आहे याचीच फारशी कल्पना आमच्या टीकाकारांना नव्हती. पुढे ती कल्पना देण्यात आल्यावरही त्या संज्ञेचा व्याप केवढा आहे हे समजून घेण्याची त्यांची तयारी नव्हती. उदाहरणार्थ, रोमँटिसिझम ऊर्फ सौंदर्यवाद या विषयावर मी एका वाङ्मयीन वादविषयक व्याख्यानमालेत व्याख्यान दिल्यावर एका शहाण्यासुर्त्या टीकाकारांनी मला म्हटलं, " काय हो ! केशवसुतही रोमँटिक संप्रदायी आणि रेव्ह. टिळकही रोमँटिक संप्रदायी हे तुमचं काही पटत नाही आपल्याला ! " तसंच तांबे आणि केशवसुत यांना परस्परविरोधी संप्रदायाचे समजणारे लोक आहेतच. मुंबई-साहित्य-संमेलनात हा वादाकरिता विषयच निवडला होता. व त्या दोघांचा संप्रदाय एकच म्हणजे ' सौंदर्यवादी ऊर्फ Romantic ' हे मी त्या वादाच्या उपन्यासादाखल वाचलेल्या निबंधात स्पष्ट केलं होतं. पण हेच गैरसमज Romanticism या शब्दाचं भाषान्तर करतानाही दिसून येतात. उदा. ' स्वैर संप्रदाय ' अथवा ' स्वच्छंद संप्रदाय ' असं भाषान्तर करणारे लोक, या संप्रदायातलं काव्यपरंपरा-विरुद्धत्वच तेवढं लक्षात घेतात. वस्तुतः ती त्यांची केवळ प्रतिक्रियात्मक अथवा Negative बाजू होय. या संप्रदायाची ' क्रियात्मक ' अथवा Positive बाजू म्हणजे सौंदर्यपूजन आणि भावनापूजन. या दोहोतील एखादा शब्दच या संज्ञेला मराठी प्रतिशब्द होऊ शकेल. प्रख्यात अमेरिकन मानस-शास्त्रज्ञ विल्यम जेम्स् यानं " Valuing experience for its own sake " हे या संप्रदायाचं लक्षण (Pragmatism वर लिहिताना जाता जाता) केलं आहे, तेही अर्थपूर्ण आहे.

पण केशवसुत संप्रदायाच्या आकलनाला मुख्य अडचण त्यांच्या प्रेषित भूमिकेतील तात्त्विक कवितांची होते असं दिसतं. ' तुतारी ', ' गोफण ' या सारख्या कवितांतील सामाजिक तत्त्वज्ञानानं केशवसुतांच्या भक्तांची आणि अभक्तांची सारखीच फसगत केली आहे ! भक्तांना वाटू लागलं की, सामाजिक पुरोगामित्वाचं चन्हाट बळलं, की केशवसुती

कविता झाली. आमचे सर्व द्रष्टे आणि दांभिक नवकवी, केशवसुतांशी सोयरीक करायला जातात ते अशाच सामाजिक संतापाच्या कवितांच्या बशिल्यानं ! पण ज्याला काही पूज्य आणि प्रिय आहे त्याचा राग आणि ज्याला सर्व तुच्छ आणि उपहास्य वाटत आहे अशा Cynic चा राग, यातील फरक खरे काव्यभक्त ओळखतात ! पण केशवसुतांचे हे खरेखोटे सगेसोयरे सोडून, त्यांच्या प्रामाणिक विरोधकांकडे वळलं तर कै. तांब्यांचंच नाव त्यात डोळ्यांपुढं उभं राहतं आणि टीकाकाराला एक धर्मसंकटच पडतं ! केशवसुतांच्या सामाजिक कवितांसंबंधी सात्विक संतापानं बोलताना मी स्वतः तांब्यांना पाहिल्याचं मला चांगलं आठवतं ! हे काव्यविषय त्यांना Negative ऊर्फ केवळ प्रतिक्रियात्मक वाटतं. तर काहींना ते विचारप्रधान ऊर्फ Didactic म्हणून दुय्यम दर्जाचे वाटतात ! पण या विचारप्रधान कवितांसंबंधीही अखेरची कसोटी भावनात्मकच आहे. निसर्गाच्या अथवा व्यक्तीच्या आकर्षणानं कवीची भावना आणि कल्पना प्रज्वलित होते, तशीच ती एखाद्या ध्येयानं अथवा उदात्त विचारानंही होऊ शकेल. मुख्य प्रश्न हा आहे की कुठल्या तरी मूर्त सौंदर्याच्या अगर अमूर्त आदर्शाच्या आकर्षणानं कवीचं रक्त अधिक वेगानं वाहू लागलं आहे, की 'नवकवींप्रमाणं' तो एक थंड (Cold–blooded) प्राणी आहे ! आणि या कसोटीवरून पाहता अमूर्त आदर्शासंबंधीही मूर्त सौंदर्याइतक्याच बेहोषीनं लिहिणारे कवी मराठीत केशवसुत हेच होऊन गेले हे पाहून त्याचं अधिकच कौतुक करावसं वाटतं !

किंबहुना प्रेषिताच्या भूमिकेमुळेच ते एक युगप्रवर्तक संप्रदायाचे कुलगुरू बनले. एक नवा प्रांत, एक नवी जाणीव आणि एक नवा आदर्श आपल्याला सापडला आहे, याची उन्मादकारी जाणीव केशवसुतांच्या शब्दाशब्दांतून दिसून येते. या संप्रदायाचे ते पहिलेच कवी असल्यामुळे असो की माधवराव पटवर्धनांप्रमाणं काहीशी 'कष्टप्रसू' प्रतिभा असल्यामुळं असो, त्यांच्या कल्पनांच्या आणि विचारांच्या वादळाला पुरं पडेल असं वाहन त्यांच्या वाणीत आढळत नाही. पण जेव्हा त्यांच्या प्रतिभेची भट्टी भरपूर तापते, तेव्हा तिजमधून बाहेर पडण्याऱ्या तप्तसुवर्णाच्या शारदामूर्ती मराठी काव्यात केव्हाही पहिल्या पंक्तीत बसविण्याच्या योग्यतेच्याच ठरतील !

'सतारीचे बोल', 'थकलेल्या भटकणारांचे गाणे,' 'तुतारी,' 'सिंहावलोकन,' 'वातचक्र' या कवितांसारख्या कविता केशवसुतांखेरीज कोणता कवी लिहू शकला असता ? 'आम्ही कोण ?', 'कवितेचे प्रयोजन,' आणि 'स्फूर्ति' या कवितांत दिसून येणारी कवींच्या जीवितकार्याविषयीची श्रद्धा दुसऱ्या कोणत्या कवीनं व्यक्त केली आहे ? "साध्याही विषयातली" अर्थपूर्णता केशवसुतांपूर्वी कोणाला दिसली होती ?– आणि त्यांच्यानंतर तरी त्यांच्याइतकी किती कवींना प्रतीत झाली ?

केशवसुतांच्या संप्रदायाचं मनन आणि आकलन, ते गेल्याला अर्धशतक झालं तरी अजून पुरतं व्हायचंच आहे !

● ●

प्रा. जोगकृत केशवसुत (परीक्षण)

प्रा. जोग यांचे " अर्वाचीन मराठी काव्य " हे अत्यंत उपयुक्त पुस्तक प्रसिद्ध होऊन वर्ष लोटते ना लोटते तोच त्यांचे केशवसुतांवरील तितकेच व्यासंगपूर्ण पुस्तक प्रसिद्ध होत आहे. केशवसुत, गडकरी, तांबे, माधव ज्यूलियन वगैरे आधुनिक कवींचा अधिक सांगोपांग अभ्यास व्हावयास हवाच होता. पैकी गेल्या दोन वर्षात केशवसुत व गडकरी यांच्या अभ्यासास बरीच चालना मिळाली आहे. प्रा. जोग यांच्या या दोन पुस्तकांनी तर केशवसुतांच्या अभ्यासाचे एकही अंग बाकी ठेवले नाही म्हटले तरी चालेल.

केशवसुत यांस आधुनिक मराठी कवितेत कुलगुरूचे स्थान आहे; व त्या स्थानास साजेसा त्यांचा आजवर विपुल अभ्यासही मराठी टीकालेखकांनी केला आहे. तथापि प्रा. जोग यांनी गेल्या दोन वर्षात वाचकांपुढे जी माहिती आणि चर्चा ठेविली आहे तिचे महत्त्व आजवरच्या चर्चेच्या मानाने फारच मोठे आहे. प्रा. जोग यांच्या वाङ्मयचर्चेत निःशेष साधनसामग्री, समतोल विवेचन आणि सहृदय मूल्यमापन हे हमखास सापडते व त्यामुळेच विद्यालयीन अभ्यासकास आणि अध्यापकास त्यांचे लिखाण अत्यंत उपयुक्त ठरते. किंबहुना आधुनिक कवींच्या साग्र अध्ययनाचा आदर्श म्हणून जोगकृत 'केशवसुत' हा ग्रंथ विद्यालयीन अभ्यासकांनी समोर ठेवण्यासारखा आहे. अर्थात इतक्या पद्धतशीर, सांगोपांग आणि समतोल अभ्यासानंतरही अशा विषयांची चर्चा उरतेच;— नव्हे त्यानंतरच (साधनें सर्वसुलभ झाल्याने) ती खरी सुरू होते. केशवसुतांसंबंधीही असेच होईलसे दिसते. यापूर्वी केशवसुतांच्या बंधूंनी केलेली उपयुक्त आणि माहितीयुक्त चर्चा, प्रा. राजवाडे यांनी केलेली खोल चर्चा, प्रा. माधवराव पटवर्धन यांनी केलेली तर्कटी पण खोल चर्चा, माडखोलकर यांनी केलेली परस्परविरोधी आणि भरमसाट चर्चा, या अभ्यासकास उपलब्ध होत्या, पण जोगांच्या पुस्तकामुळे तरुण विद्यार्थ्यापासून तो विद्वान टीकाकारापर्यंत सर्वांनाच पुरेलसे खाद्य पुरविले आहे. त्यामुळेच की काय कोण जाणे, अलीकडे आचार्य भागवतांसारखे अन्यक्षेत्रीय अभ्यासक देखील, " स्त्रीलंपट " अशा

आधुनिक कवींच्या या कुलगुरूकडे आदराने वळत आहेतसे दिसते !

केशवसुतांसंबंधी मुख्यतः पुढील प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यांनी मराठी कवितेत क्रांती केली काय ? ते सामाजिक व राजकीय विचारात क्रांतिकारक होते काय ? त्यांचे काव्य क्रांतिकारक असल्यास कशामुळे ? त्यांच्या गूढगुंजनात्मक कविता अस्सल की नकली ?

क्रान्तिकारकच ठरविले

यापैकी पहिल्या प्रश्नाचे उत्तर देतानाच अनेक मते व्यक्त केली जातात. कित्येकांच्या मते केशवसुतांच्या कवितेत क्रान्तिकारक–काव्यदृष्ट्या आमूलाग्र नवीन–असे काहीच नव्हते. अर्थात बाळकृष्ण अनंत भिड्यांसारखे सांप्रदायिक आणि माडखोलकरांसारखे 'क्रान्तिकारक' या दोषांनीही केशवसुतांच्या क्रान्तिकारकतेस मान्यता दिली नसूनही आधुनिक मराठी वाचक त्यांना क्रान्तिकारक मानीत आले आहेतच ! जोगांनी केशवसुतांना, अनेक आधार व आक्षेप विचारात घेऊन, क्रान्तिकारकच ठरविले आहे. पुरावा व निकाल या दोन्ही बाबतीत जोग बिनचूक असतात आणि तरीही त्यांच्या हाती असलेल्या पक्षकाराला आणि त्याच्या मायेच्या माणसांना, हा विद्वान वकील (अगर जज्ज !) काम करावे तसे करीत नाही असे वाटते ! या बाबतीत स्वतःसारखा 'फैसला' मिळाल्यावरही– 'लेकिन् वकील तो बडा बरफ' (पण वकील मात्र फारच थंड बुवा !) अशी तक्रार करणाऱ्या (दंतकथेतील) जुन्या पक्षकारासारखी वाचकांची स्थिती होते. इंग्रजी अमलातील केशवसुतपूर्व कवींच्या काव्यात केशवसुतांच्या काव्यातील सर्वच विशेष कुठेना कुठे आढळतात, हे बाळकृष्ण अनंत भिड्यांचे मत मान्य करूनही केशवसुतांस जोगांनी क्रान्तिकारक ठरविले आहे. अर्थात ही अशक्य करामत करताना त्यास 'आत्मलेखना'दी आधुनिक काव्यलक्षणांचे आणि क्रान्तिलक्षणांचे अर्थ, कोठे अधिक तर कोठे कमी करून घ्यावे लागले आहेत. केशवसुतांपूर्वीयया कवींनी वृत्तांत, विषयात आणि वृत्तीत बदल केले होते; केशवसुतांच्या कवितेत याच बदलांचे प्राचुर्य दिसते असा प्रा. जोग यांच्या म्हणण्याचा आशय आहे. पुष्कळदा संख्या परिमाणा (क्वॉंटिटी) चा फरक हा अखेर गुणा (क्वॉलिटी) चा फरक मानावा लागतो. त्यातील हा प्रकार होय असे जोगांचे म्हणणे दिसते.

पण कृष्णशास्त्री चिपळोणकर, आगाशे, लेंभे, लोंढे वगैरे कवी आणि केशवसुत, यांच्या जातीतच फरक होता हे न पटल्यास व न पटविल्यास केशवसुतांच्या बाबतीत न्याय केल्यासारखे होणार नाही. केशवसुतांचा अथवा आधुनिक कवितेचा विचार करताना, 'केवळ इंग्रजीच्या परिणामाने जन्म पावलेली कविता असेही तिचे निदान कित्येकांनी केले आहे' पण इंग्रजीचा परिणाम म्हणजे पोप, गोल्डस्मिथ, जॉन्सन्, मेकॉले यांच्या काव्यांचा, की शेली, कीट्स, बायरन, यांच्या काव्यांचा ? हा विचार महत्त्वाचा आहे. तसेच केवळ विद्यालयीन संस्काराने होणारे अनुकरण आणि 'समानधर्मे' असल्याने दोन हृदयांत होणारे समान स्पंदन यातीलही फरक ओळखला पाहिजे.

'आत्मलेखन' हे नवीन कवितेचे एक लक्षण म्हणून सांगून प्रा. जोग यांनी विवेचन पुष्कळच पुढे नेले आहे. तथापि कवींची जी जात केशवसुतांच्या पिढीपासून पुढे आली तीच नेमकी आत्मलेखन, निसर्गपूजन, स्वातंत्र्यपूजन, प्रेमपूजन, स्त्रीपूजन का करू लागली, हे कळण्यास पाश्चात्य कवींच्या एका विशिष्ट संप्रदायाशी असलेले तिचे सहोदरत्व ओळखले पाहिजे. हे न ओळखल्यास केशवसुतांच्या क्रान्तिकारकतेविषयीच नव्हे तर त्यांच्या "आम्ही कोण ?" या कवितेसारख्या सर्वथा स्पष्टार्थवाहक कवितेविषयीही चांगले चांगले टीकाकार किती हास्यास्पद गैरसमज व्यक्त करतात हे प्रसिद्धच आहे.

रोमँटिक संप्रदायाचे अनुयायी

केशवसुतांपासूनचे प्रसिद्ध मराठी कवी हे इंग्रजी रोमँटिक (सौंदर्यवादी) संप्रदायाचे अनुयायी अगर समानधर्मे होते हे ओळखल्याखेरीज नवीन मराठी कवितेचे निर्दोष आकलन व विवेचन करता येणार नाही, हे मत प्रस्तुत लेखकाने १९४४ मध्ये 'समीक्षक'च्या गडकरी खास अंकात मांडले व त्यानंतर 'वाङ्मयीन मूल्ये' या पुस्तकात अंतर्भूत केले. आधुनिक कवीतील 'तथाकथित' रडवेपणा, स्त्रैणपणा, अहंकार, क्रांतिवाद या सर्वांची संगती लावायची असल्यास 'रोमँटिक' संप्रदाय म्हणजे काय, हे समजून घेतले पाहिजे ते समजून न घेता केवळ चिपळूणकर, आगरकर, सावरकर यांच्या तुलनेनेच आधुनिक मराठी कवींचा विचार केल्यास माडखोलकरांसारखे श्रेष्ठ टीकाकारही कसे घसरतात, हे 'अर्वाचीन साहित्य' (बडोदे १९३५) या ग्रंथातील त्यांच्या लेखावरून दिसेल.

प्रा. जोग आणि इतर यांनी माडखोलकरांनी केलेल्या स्त्रैणपणाच्या आरोपाचे खंडन केले आहे. पण त्या अज्ञानाचे मूळ ओळखलेले नाही. 'आम्ही कोण ?' (केशवसुत) 'पुरे जाणतो मीच माझे बळ' (टिळक) या कविता वैयक्तिक अहंकाराच्या द्योतक म्हणून ठरविण्यात प्रा. द. के. केळकर यांनी जो संपूर्ण अर्थविपर्यास केला आहे, त्याचे मूळही यातच आहे. आधुनिक कवींचा संप्रदाय व पिंड त्यांनी ओळखला नाही.

केशवसुतांना नवसंप्रदायाचे श्रेय देताना प्रा. लागूंसारख्यांना इंग्रजीच्या ऋणाची थोडीशी पंचाईत पडल्यासारखी दिसते. केशवसुतांनी इंग्रजी काव्यातील गुण घेतले पण 'महाराष्ट्र भाषेच्या तेजस्वितेची, स्वातंत्र्याची हानी होऊ न देता' घेतले, हे त्यास केशवसुतांच्या करामतीचे स्वरूप वाटते !

जे काय घडले त्याच्या आकलनात व कथनात येथे अनेकविध दोष शिरल्याचे दिसून येईल. तेजस्विता आणि स्वातंत्र्य मूळ मराठीत होते व ते केशवसुतांनी इंग्रजीतील गुण घेताना घालविले नाही असे प्रा. लागूंचे म्हणणे. तसेच जुन्या कवितेहून केशवसुतांच्या कवितेत जे गुण दिसतात ते इंग्रजी कवितेतून घेतलेले आहेत, असेही त्यांचे म्हणणे दिसते. वस्तुस्थिती अशी आहे की जे गुण केशवसुतांच्या कवितेत दिसतात ते इंग्रजीतीलही सर्वच कवितात आढळतात असे नाही. ते गुण इंग्रजीतील एका विशिष्ट संप्रदायाच्या म्हणजे रोमँटिक स्कूलच्या कवितेत आहेत. कुंटे, कृष्णशास्त्री, आगाशे, लोंढे, लेंभे या मंडळींना

त्या कवितेत आपादमस्तक बुचकळून काढले असते तरीही ते केशवसुती वळणाची कविता लिहू शकले असते असे नाही.

जे घडले त्याचे यथार्थ स्वरूप सांगायचे झाल्यास– "इंग्रजी कवितेतील रोमँटिक संप्रदायी कवितेचा परिणाम महाराष्ट्रातील त्या प्रवृत्तीच्या कविमनावर झाल्यामुळे महाराष्ट्रात सर्वथा नवीन अंतरंगाची कविता जन्माला आली. अशा नव्या जातीची कविता प्रथम केशवसुत यांनी लिहिली; कारण त्यांच्यात ही प्रवृत्ती म्हणजे रोमँटिक प्रवृत्ती अत्यंत दुर्दम्य होती!"

केशवसुतांच्यापूर्वी ही प्रवृती महाराष्ट्रात होती की नाही? ही प्रवृत्ती प्रत्येक समाजातच असते. कारण ती अखिल मानवसमाजात असते. पण ती प्रवृत्ती, परंपरा आणि पोटभरूपणा यांच्या दडपणाखाली अर्धमृत झालेली असते. परंपरेने आवळलेले कवी केवळ भक्तिपर काव्यातच ही स्वतंत्र वृत्तीची झळक दाखवीत; तर पोटभरू लोक 'बे' च्या पाढ्याप्रमाणे रुक्ष काव्यरचना तरी करीत, नाही तर केशवसुतांसारख्यांना—

'या वेळे नकळे कवे! तुज सुचे गाणें अहारे कसें'? असे प्रश्न विचारीत.

जी दुर्दम्य प्रवृत्ती अनेक शतके धर्मभावना आणि संस्कृत साहित्यशास्त्र यांच्या दडपणाखाली गुदमरली होती– व जी क्वचित असंस्कृत शाहिरांच्या काव्यातच ग्राम्य वेशात वावरे आणि ग्राम्यच ठरे!–ती केशवसुतांच्या वाणीत प्रथम खळाळून वाहू लागली! ती इंग्रजीतून घेता येण्यासारखी असती, तर कुंटे, लेंभेही ती घेऊ शकते. ती कालाच्या ओघात सर्वांनाच, माधवराव पटवर्धन म्हणतात त्याप्रमाणे, लाभण्यासारखी असती, तर आजही केशवसुतांचे गुण न ओळखणारे लोक आहेत ते कसे निपजले असते?

हे सर्व विवेचन प्रस्तुत लेखकाने यापूर्वीच अनेकदा केलेले आहे. पण 'केशवसुत' किंवा 'आधुनिक कविता' हाच नेमका मयळा देऊन न केल्याने सदृश विचारी मंडळाच्याही ते यावे तितके ध्यानी आलेले नाही.

आत्मलेखन

प्रा. जोग म्हणतात–"केशवसुतांनी काव्यलेखनास प्रारंभ केला त्या वेळी कोणाही ज्येष्ठ कवीचे लेखन आत्मलेखनाच्या स्वरूपाचे नव्हते असे म्हटल्यास ते चूक होणार नाही. इंग्रजी कवितेचे अनुकरण स्फुट–लेखनाबाबत करणाऱ्या लेखकांनासुद्धा आत्मलेखनाची आवश्यकता वाटलेली दिसत नाही ... इंग्रजी काव्यलेखनपद्धती आत्मसात केल्याने केशवसुतांच्या काव्यात मात्र हे प्रामुख्याने झाले व नंतरच्या कवींनी त्याचा फार मोठ्या प्रमाणात पुरस्कार केला..."

जोगांच्या मते कुंटे–महाजनी वगैरे मंडळींना आत्मलेखनाची 'आवश्यकता' वाटली नाही! प्रा. जोग यांच्या लेखनातील भारदस्त संयमामुळे वाचकांचे अज्ञान अधून मधून तसेच शाबूत राहते ते हे असे! कुंटे–महाजनी यांना आत्मलेखनाची (सब्जेक्टिव्ह पोएट्री; सेल्फ् पोर्ट्रेचर इ.) आवश्यकता वाटली नाही की त्यांना 'लिखित' करून दुसऱ्यास दाखविण्याइतका आकर्षक आत्माच (सेल्फ) नव्हता? प्रा. जोग ज्या

कवितेला आत्मलेखनपर कविता असे नाव देतात, ती लिहिण्यास एक विशिष्ट 'आत्मनिष्ठता', 'आत्मपरता' लागते; व ती ज्यांचा आत्मा विशेष भावनाक्षम, सौंदर्यक्षम, स्वतःतही रममाण होणारा असतो–त्यांच्यातच असते. केशवसुती कविता लिहिणे हे 'आवश्यकता वाटण्यावर' ही अवलंबून नाही की, केवळ 'इंग्रजी कविता आत्मसात' करण्यावरही नाही. ते विशिष्ट जातीचे संस्कारक्षम, भावनाप्रधान, सौंदर्य-पूजक, आत्मपूजक मन लाभण्यावर अवलंबून आहे !

थोडी घीट उदाहरणे घ्यायची तर असे म्हणता येईल की, प्रभाकर, रामजोशी, सगनभाऊ ही मंडळी इंग्रजी शिक्षणाच्या काळात जन्मली असती तर त्यांनी केशवसुतांच्या कवितेतील काही वृत्ती खास व्यक्त केल्या असत्या. ज्ञानेश्वर इंग्रजी अमलात जन्मले असते तर त्यांनी काही बाबतीत इटालियन प्रेममार्गी महाकवी डांटे याची आठवण करून दिली असती, तर काही बाबतीत त्यास मागेही टाकले असते; तुकाराम बहुधा वर्ड्स्वर्थच्या वळणावर गेला असता; पण उलट असेही म्हणता येईल की मोरोपंत, रघुनाथ पंडित ही मंडळी इंग्रजी अमलात जन्माला आली असती तरीही त्यांनी लिहिली त्या वळणाचीच कविता लिहिली असती !

भागवतांचे भरमसाट विधान

आचार्य भागवत यांनी अलीकडे व्याख्यानातून केशवसुतांसंबंधीचे हेच प्रश्न हाताळण्यास सुरुवात केली आहे. मुक्त होण्याची धडपड हा केशवसुतांच्या कवितेचा आत्मा होय, असे सांगताना भागवतांनी जे विवेचन केले आहे ते पुष्कळसे वस्तुस्थितीस धरून आहे. पण आगरकरी व्यक्तिमत्त्व आणि केशवसुती व्यक्तिमत्त्व यात सादृश्य कल्पिणे व दोघांचीही स्फूर्ती मिलमध्ये पाहणे हे ठरीव दोष यांच्याही विवेचनात आढळतात. केशवसुतांच्या कवितेतील 'आत्मा' पुढील कवीत नाही, तंत्र तेवढे उरले, हे आचार्य भागवतांचे विधान तर 'भरमसाट' या संज्ञेस पात्र आहे असे म्हटले पाहिजे. केशवसुतांच्या तोडीचा कवी पुढे झाला नाही, हे विधान तितकेच धाष्ट्यांचे आहे. तांबे हे अनेक बाबतीत केशवसुतांहूनही श्रेष्ठ आहेत. अर्थात अशाही काही बाजू आहेत की ज्यात केशवसुत तांब्यांहून श्रेष्ठ आहेत. रे. टिळक, गडकरी माधवज्यूलियन, यशवंत या कवीत फक्त तंत्र आहे, आत्मा नाही असे म्हणणे हे अर्थातच हास्यास्पद होय.

केशवसुतांच्या कवितेत रडवेपणा नाही हे ठरविताना यशवन्त कवींना भागवत यांनी रडव्या कवींचे प्रतिनिधी बनविले आहे. इतकेच नव्हे तर केशवसुत कणखर होते, 'स्टोइक' वृत्तीचे होते, असेही म्हटले आहे. पण निदान केशवसुत स्टोइक वृत्तीचे नव्हते हे सिद्ध करण्यास त्यांची 'सिंहावलोकन' ही हळव्या हळहळीने भरलेली कविता– फार काय–

"प्रौढत्वीं निजशैशवास जपणे बाणा कवीचा असे" यासारख्या ओळी देखील, पुरेशा आहेत.

पण मुख्य प्रश्न केशवसुत रडवे की यशवंत रडवे हा नसून, रडवेपणा हा कवींचा

दोष आहे की काय हा आहे. शिवाय रडवेपणा आणि कणखरपणा एकाच मनात वास्तव्य करू शकतील की नाही, हाही महत्त्वाचा प्रश्न आहे. पण त्याकरिता क्रांतिकारकता–सामाजिक राजकीय बंडखोरी–हीच काय ती श्रेष्ठ वृत्ती हा चालू 'एकाक्ष' सिद्धांत सोडला पाहिजे. केशवसुतांच्या प्रीतीत सौंदर्य नाही असे भागवत म्हणतात, त्यातही हाच क्रांतिवादी एकांगीपणा आहे. केशवसुतांच्या क्रांतीत, अश्रूंत, प्रीतीत फार काय अपशब्दातही सौंदर्य आहे, हे कळण्यास केवळ क्रांती आणि मुक्ती यांचा विचार करून भागणार नाही; तर या दोहोंकरिता धडपडणारे जे मानवी मन, ते खरेखुरे जिवंत असल्यास ज्या अनंत गोष्टींकडे झेप घेते त्यांचा विचार करावयास हवा. म्हणजेच जिवंत, सौंदर्यवादी, प्रेममार्गी–'रोमँटिक'–मनाची सूरत माहीत असावयास हवी. केशवसुतांच्या प्रीतीत सौंदर्य नाही, या समजुतीसारख्या भागवतांच्या विचित्र समजुतींचे मूळ क्रांतीच्या घोपटमार्गी ध्यासात (आब्सेशन ? मध्ये) आहे. कवीच्या प्रत्येक भावनेतच सौंदर्य असते;–कारण काव्यातील भावना ही लौकिक भावनेसारखी बंधनरूप नसते. ती भावना नसून भावनेचे चित्र असते; रागद्वेष नसून साक्षीभूत कवीने रागद्वेषांचे काढलेले चित्र असते. आत्मनिष्ठ कवी देखील स्वतःच्या प्रेमाकडे, मत्सराकडे, दुःखाकडे, सुखाकडे काव्यात जितक्या वासनारहित तटस्थतेने पाहतो तितक्या तटस्थतेने व्यवहारी जीव पाहात नाहीत. शोकाला श्लोकरूप देण्याचे सामर्थ्य ज्याच्या अंगी असते, त्याच्या शोकाला रडवेपणा म्हणणे म्हणजे क्रांतीच्या ध्यासाने अनेकविध सौंदर्याकडे पाठ फिरवण्यासारखे आहे.

दोघांची दोन टोके

केशवसुतांच्या गूढगुंजनाबाबत प्रा. जोग व आचार्य भागवत हे दोघे दोन टोकांना गेले आहेत. पण प्रा. जोग यांनी गाठलेले टोक नेहमीप्रमाणेच थोडे व्यवहारनिष्ठ असले तरी अधिक सत्य आहे.

भागवतांच्या मते, बाहेरच्या जगाचे स्वरूप आकलन करण्याचा यत्न, ब्रह्मात एकरूप होण्याचा यत्न, जिच्यात असतो ती वृत्ती म्हणजे 'मिस्टिक' वृत्ती. आचार्य भागवतांची ही व्याख्याच गूढवादी कवितेच्या दृष्टीने फारशी उपयुक्त नाही; पण ते कसेही असले तरी "मराठी टीकाकारांना 'मिस्टिक' कविता आणि मिस्टिसिझम् म्हणजे काय हे कळलेच नाही." ही भागवतांची उक्ती म्हणजे अनेक श्रेष्ठ मराठी टीकाकारांचा अवमान करणारी दर्पोक्ती होय, असे न म्हटल्यास अन्याय होईल. ही गोष्ट खरी आहे की, 'अध्यात्म' म्हणताच कापरे भरणाऱ्या कित्येक विज्ञानवादी (पॉझिटिव्हिस्ट ?) लेखकांनी गूढवादाचे विवेचन फारच दिलगिरीच्या (अॅपॉलॉजेटिक) भाषेत केले आहे. हीही गोष्ट खरी आहे की, गूढगुंजन हा शब्द तितकासा समाधानकारक नाही. पण यातील कोणती गोष्ट अनेक टीकाकारांनी यापूर्वीच आणि भागवतांच्याहूनही आवेशाने सांगितली नाही अशी आहे ? प्रस्तुत लेखकाने केलेले तांबे, रवींद्रनाथ यांच्या गूढगुंजनाचे विवेचन; आत्माराम रावजी व वामन नारायण या देशपांडेद्वयाने अनेक जागी केलेले

विवेचन; ही जरी भागवतांनी उपेक्षिली–तरी कविवर्य तांबे यांनी काव्य, कला, सौंदर्य, गूढवाद यांचे केलेले नितांतरम्य व खोल विवेचन जोपर्यंत आधुनिक मराठी वाङ्मयात आहे, तोपर्यंत भागवतांचे उद्‌गार शोचनीय धाष्टर्याचेच म्हटले पाहिजेत.

'आत्मसाक्षात्कारा'चा घोटाळा

आचार्य भागवत यांनी मुंबई येथील व्याख्यानमालेत केलेली गूढवादाची मीमांसा हीच जर त्यांच्याजवळ असलेली संपूर्ण मीमांसा असेल, तर माधवरावांसारख्या आगरकरसंप्रदायी विद्वानाने केलेले घोटाळेच हे गांधी–टागोरवादी विवेचक पुन्हा करीत आहेत, असे खेदाने म्हणावे लागेल ! व हा घोटाळा आचार्यांनी मिस्टिसिझम् या अर्थी योजिलेल्या 'आत्मसाक्षात्कार' या शब्दाने सर्वसाधारण भारतीयांच्या मनात, धार्मिक साधुसंत आणि त्यांचे उपासतापासादी साधनमार्ग उभे राहतात. आणि मग "खुशालचंद, स्त्रीलंपट आधुनिक कवी आणि हा 'आत्मसाक्षात्कार' यांचा संबंध कुठचा ?" असे त्यास वाटते. पटवर्धन यांनी 'अर्वाचीन वाङ्मयसेवका'च्या प्रथम खंडामधील आपल्या लेखात हा घोटाळा चांगलाच करून ठेवला ! माधवरावांची ठसठशीत प्रतिपादनशैली हा घोटाळा उघडा करण्यास उलट साहाय्यभूतच झाली आहे !

आपल्यासारख्याच इंग्रजी शिकलेल्या, विपदग्रस्त आणि अपेशी आधुनिकाने "हर्षखेद मावळल्याच्या" आणि स्वतःची 'विभूती' विश्वात 'पसरल्याच्या' गोष्टी कराव्या, याचे माधवराव आणि तत्सदृश मंडळींना वैषम्ययुक्त आश्चर्य वाटे ! ही अवस्था जीवनात "विशिष्ट क्रमाने येणारी" असून केशवसुतासारख्या उपटसुंभाला कशी प्राप्त झाली ? अर्थात या सर्व अनुभवाशिवाय गप्पा असल्या पाहिजेत. निदान 'अचाट अत्युक्ती' असल्या पाहिजेत असे त्यांना वाटते.

गूढगुंजन आणि आत्मसाक्षात्कार एकच होत असे क्षणभर मानले तरी, आत्मसाक्षात्कार क्रमानेच झाला पाहिजे, हे या मंडळींना कुणी सांगितले ?

"The Wind bloweth where it listeth" असे बायबलात म्हटले आहे. पढिकपणा आणि कायाक्लेश यावर भर असलेल्या मंडळींना यदृच्छया हव्या त्या दिशेस वळणारा वारापाऊस आणि कृपाप्रसाद यांचे मोठे वैषम्य वाटते. स्वतःचीच प्रेमगीते गात बसलेल्या रोमँटिक कवीला जर असा अचानक साक्षात्कार होऊ लागला, तर शांकरभाष्य वाचणारे पंडित आणि शरीर सुकविणारे साधक यांचा यात अपमान नाही का ?

या मंडळींच्या निषेधयुक्त विस्मयाला प्रत्यक्ष सृष्टीत मात्र फारसा आधार आहेसे दिसत नाही. अशिक्षित, असंस्कृत, ... किंबहुना (बाह्यतः) अनीतिमान व्यक्तींनाही हे उच्च सत्याचे साक्षात्कार झाल्याचे दाखले सर्व देशांत, सर्व शतकांत आहेत.

पण मूळ या अनुभवासंबंधीच या पढिक मंडळींना किती अज्ञान असते, यासंबंधीची गमतीदार–पण अनुकंपनीय–आठवण मी १९४० साली 'सह्याद्री'च्या 'माधवराव खास' अंकात दिली होती. "समाधी म्हणजे दुसरे तिसरे काही नसून उत्कृष्ट–स्वप्न-

रहित झोप !" अशी माहिती बरोबर घेऊन मोठ्या हर्षाने माधवराव एक दिवस मजकडे आले ! आणि याच वाटेने पुढे जाऊन ही मंडळी गूढगुंजनात वर्णिलेली स्थिती ही कोणत्याही विषयात झालेल्या एकाग्रतेच्या स्थितीहून वेगळी नाही असेही ठरवितात !

अध्यात्मपराङ्मुख पंडितांनी करून ठेवलेल्या या घोटाळ्यात आचार्य भागवत यांचा 'आत्मसाक्षात्कार' हा शब्द आणखी भरच घालील, हा आमचा त्या शब्दावर आक्षेप आहे आणि केशवसुत किंवहुना तांबे देखील– ज्या स्थितीचे वर्णन करतात तिला आत्मसाक्षात्काराची स्थिती म्हणणे तितकेसे बरोबरही नाही. पण जोग तिला केवळ एकाग्रतेच्या आनंदाची स्थिती ठरवून केशवसुतांच्या 'अत्युक्ती'बद्दल तुच्छतेने किंवा क्षमाशील औदार्याने बोलतात तेही बरोबर नाही.

गूढगुंजनाचे खरे स्वरूप

गूढगुंजनात्मक काव्यात वर्णिलेली स्थिती मग असते तरी कोणती ? आधुनिक मराठी कवी हे ज्या संप्रदायातील आहेत त्या संप्रदायातील कवी अंतिम सत्य आणि सौंदर्य यांच्या शोधात असतात. ज्या ज्या क्षणी वस्तुजाताचे जे जे रूप दिसेल, ते ते तन्मयतेने व सचोटीने चित्रित करणे एवढेच ते जाणतात. कधी ते निराशेचे चित्र काढतील; कधी सौंदर्याच्या रूपात दंग होतील तर कधी सौंदर्याच्या विनाशित्वामुळे रडतील. सुखदुःखानुभूतीच्या अनेक अवस्थातून जात असता– मध्येच चुकून एखादे गुप्त रेडिओ स्टेशन लागावे त्याप्रमाणे !– त्यांना अचानक काही प्रकाश, काही आनंद; काही अंतिम सत्य; काही अमोघ सौंदर्य दिसून जाते आणि त्या विद्युत्क्षणाचे ते वर्णन करतात.

तो क्षण मिळविण्याचे मार्ग असतील, तो टिकविण्याचेही मार्ग असतील; त्या क्षणाचे सत्यत्व सिद्ध करण्याकरिता एखादे प्रमाणशास्त्रही असेल. पण कवीच्या वाट्याला आलेला क्षण मात्र...

" The wind bloweth where it listeth "

या यदृच्छान्यायाने आलेला असतो.

सामान्य स्त्रीसौंदर्यानेही पुलकित होणारा तो सौंदर्य–पिपासू जीव ! या अमोघ आणि असाधारण सौंदर्याच्या त्रुटित दर्शनानेही पुलकित होतो, तो त्याची चित्रे रेखाट लागतो; पण त्याच्यासारखे 'इहलोकी' काहीच नसल्याने त्याचे वर्णन गूढ होऊ लागते आणि ज्या दुर्दैवी तर्कजीवी पंडितांना असे क्षण लाभत नाहीत,– नव्हे लाभले तरी तर्कच्युतीच्या आणि 'अत्युक्ती'च्या भीतिस्तव नको असतात, त्यांना तर ही वर्णने खोटी आणि अचाट वाटू लागतात !

अशा मधुर आणि दुर्लभ क्षणी वाटते तरी कसे ? या अवस्थेत–एकदम जन्मभरचे कोडे उलगडल्यासारखे; विरोध, विसंगती, अन्याय, अचानक लुप्त झाल्यासारखे; आपण आणि हा विश्वसंसार यात नितांत सलोख्याचे नाते असल्यासारखे वाटते. मन अनंत मधुर भावनांनी भरून गेले, तरी बुद्धी धुंद न होता उलट अधिक स्वच्छ–अधिक 'ल्यूसिड'– होते ! उपासतापास अगर नामघोष करणारांना साक्षात्कार झाल्यास त्याचे

वृत्त दुसऱ्यांना सांगणे कठीण नसते. कारण अमुक देवतेचे दर्शन व्हावे अशा संकल्पाने केलेल्या साधनेनंतर त्याच प्रसिद्ध देवतेचे– " सुंदर ते ध्यान उभे विटेवरी " चे दर्शन होणार. पण आधुनिक सौंदर्यवादी कवींना होणाऱ्या त्रुटित साक्षात्काराचे वृत्त सांगणे सोपे नसते. पण ते सांगावयाचेच झाल्यास कीट्सच्या–

Beauty is truth, truth beauty—" that is all
Ye know on earth, and all ye need to know.

या दिव्यवाणीहून समर्पक शब्दात अथवा–

' God's in His Heaven
And all's right with the world '

या ब्राउनिंगच्या सूक्ताहून अधिक अपौरुषेय (इन्स्पायर्ड) सूक्तात सांगणे कठीण आहे.

गूढगुंजन आणि आधुनिक मानसशास्त्र

वर उद्धृत केलेल्या दोन मंत्रांपैकी पहिल्या मंत्रात दोन महाकूटांचे (सत्य आणि सौंदर्य) उत्तर एकत्र गवसल्याचा हर्ष व्यक्त झाला आहे; तर दुसऱ्या मंत्रात व्यक्तीचा व नियतीचा नित्य चाललेला लढा उभयपक्षी सलोख्याने निकालात निघाल्याचा आनंद आहे. मानव आणि जगत् या दोहोंचाही नियन्ता एकच दिसून आल्याने अपयश अगर दुःख यांना अर्थच उरला नाही !

पहिल्या मंत्राचा द्रष्टा ऋषी कीट्स हा कामक्रोधांनी सहज क्षुब्ध होणारा-एखाद्या अडाणी पोरीच्या दृक्शरांनी अगर अरसिक परीक्षण–लेखकाच्या वाक्शरांनी विव्हळ होणारा–केमिस्ट्च्या दुकानातील एक नोकर होता. माधवरावसारख्यांना त्याच्या जीवनात शब्दस्पर्शादी विषयांच्या अधीर सेवनाखेरीज काहीच साधन आढळलेले नसते ! आणि दुसऱ्या मंत्राचा द्रष्टा ऋषी ब्राउनिंग यास मरणावर विजय मिळविण्याकरिता स्वर्गात आपल्या मृत पत्नीची भेट होईल ही कल्पना बळ देई ! अर्थात वैयक्तिक प्रीतीत सौंदर्य नसते असे म्हणणारांना त्याच्याही जीवनात मोठीशी तपस्या आढळणार नाही !

आणि तरीही गूढानुभवाच्या क्षणीच्या वृत्तीचे वर्णन दोनच वाक्यात करायचे म्हटल्यास " That is all ye need to know " आणि " All's right with the world " याहून अधिक समर्पक शब्द सापडणार नाहीत; अगर त्या स्थितीत सृष्टीत असे काहीही उरत नाही की जे मनाला कळले नाही; अगर मान्य झाले नाही.

हेच आधुनिक मानसशास्त्राच्या भाषेत सांगायचे तर मनातील अन्तःकलह (कॉन्फ्लिक्ट) आणि असंतोष (सेन्स् ऑफ फ्रस्ट्रेशन) हे अशा वेळी अचानक नाहीसे होतात. त्यात 'नाहीसे होण्याला ' जितके महत्त्व तितकेच अचानकपणाला (कॅटॅक्लिझ्मिक्) महत्त्व आहे व म्हणूनच ज्यांचा भर नैसर्गिक शक्ती, प्रतिभा, ईश्वरी देणगी यापेक्षा वैयक्तिक प्रयत्न, कष्टाळूपणा, यावर अधिक असतो त्यांना हे अचानक प्राप्त होणारे सात्त्विक आनंदाचे 'घबाड ' म्हणजे थोतांड वाटते–' अचाट अत्युक्ती ' वाटते !

अर्थात या अचानक लाभाचीही काही वळणे सांगता येणार नाहीत असे नाही.

जुन्या परिभाषेत सांगायचे तर असे क्षण सात्त्विक आणि बालसदृश मनाला अधिक सहज लाभण्याचा संभव असतो. नव्या मानसशास्त्राच्या परिभाषेत सांगायचे तर प्रकट मनाच्या धडपडीपेक्षा हे अनुभव अप्रकट मनाच्या सुप्तशक्तीवर अधिक अवलंबून असतात.

आणि म्हणूनच मनुष्याची विद्वत्ता, नीतिमत्ता अगर व्रतनिष्ठा यावरून त्याच्या पात्रतेचा आणि ईश्वराच्या न्यायीपणाचा हिशेब करणारास पुष्कळदा या गोष्टींचा पत्ता लागत नाही !

गूढगुंजनाचे रहस्य

गूढगुंजनात्मक कवितेत अनंतात विहार करण्याचा, ब्रह्मात एकरूप होण्याचा 'यत्न' असतो, असे भागवत म्हणतात. वस्तुस्थिती मात्र उलट आहे. निमिषमात्र का होईना अन्तिम सत्याशी, आणि अन्तिम सौंदर्याशी एकरूप झाल्यावरच गूढवादाची सुरुवात होते. अन्तिम सत्यदर्शनाने आनंद होणे आणि तो आनंद अनिर्वचनीय ठरणे, यातच गूढगुंजनाचे रहस्य आहे. झालेला साक्षात्कार हा आत्म्याचा आहे, अगर ब्रह्माचा आहे, असे वेदान्ती मनुष्य म्हणेल; परंतु निर्लेप मनाच्या कवीला कोणतेच पूर्वगृहीत मत (डॉग्मा) मानावयाचे नसते. त्याला आलेला अनुभव नितान्त सत्य आणि नितान्त सुंदर आहे; इतका की, त्यामुळे पूर्वीचे सर्व परस्परविरोधी अनुभव आणि असंतोष विरलेल्या दुःस्वप्नाप्रमाणे भासावे !–एवढेच तो सांगत असतो व म्हणून वेदान्ती परिभाषेहून त्यास 'गूढगुंजन' हा शब्द अधिक परवडतो. कारण त्याचा भर साक्षात्कारापेक्षा त्याच्या अनिर्वचनीयतेवर व अपूर्वतेवर अधिक असतो.

झपूर्झा; सतारीचे बोल; हरपलेले श्रेय; या तिन्ही कवितात भागवत म्हणतात त्याप्रमाणे एकरूपतेचा 'यत्न' नसून एकरूपता प्राप्त झाल्याच्या शुभकथा आहेत. या तिहीत अनुभवाची स्पष्टता आणि वर्णनाची सूक्ष्मता या दृष्टीने सतारीचे बोल ही कविता अधिक सामर्थ्यवान आहे. 'हरपले श्रेय' या कवितेत देखील, 'प्रयत्न' अगर धडपड नसून एखादा सहज प्राप्त झालेला हा दैवी अनुभव पुनः प्रयत्नाने प्राप्त होऊ शकत नाही म्हणून हळहळ आहे. 'झपूर्झा' मध्येही या अनुभवाचे व त्याच्या माहात्म्याचे वर्णनच आहे.

प्रा. जोग यांनी गूढगुंजनात्मक कवितातील विरोधाभास, अतिशयोक्ती वगैरेसंबंधी क्षमायुक्त समर्थन देऊन माधवराव पटवर्धनांच्या आक्षेपांचे खंडन केल्यासारखे केले आहे. पण जोगांच्या समर्थनापेक्षा पटवर्धनांनी केलेला 'हल्ला' बरा असे बिचारे गूढगुंजनवादी कवी खास म्हणतील ! अशा कवितातील अतिशयोक्ती हा एक 'क्षम्य दोष' होय; आणि तो कवींनी 'टाळला असता तर बहार झाली असती' असा जोगांच्या म्हणण्याचा रोख आहे ! कवींना असे द्राविडी प्राणायामाने सांगण्याची एक खोड असते व तिकडे दुर्लक्ष करावे असे सांगण्यापर्यंत जोगांची मजल गेली आहे (जोगकृत केशवसुत १०५, १०६). तसेच गूढगुंजनाचे जे वर्ण्य विषय म्हणून त्यांनी सांगितले आहेत त्यातही अतिव्याप्ती आहे (जोगकृत केशवसुत पान १०४). तसेच गूढवादी कविता दुर्बोध

असायचीच असे जणू गृहीत धरून, ती दुर्बोध का होते याचे त्यांनी पुनः क्षमापूर्वक वर्णन दिले आहे.

वास्तविक गूढवादी कविता दुर्बोध असतात म्हणण्याऐवजी, खोल असतात असे म्हणणे अधिक बरोबर होईल. म्हणजे त्यातून काढावा तितका अधिक अर्थ निघतो; व तो काढण्यास अनुभूतीची–निदान कल्पक तादात्म्याची तरी गरज असते. जे सोपे आहे ते कवीने शैलीकरिता अगर गूढतेकरिता अवघड केले नसून, जे अत्यंत खोल आणि अचपळ आहे ते त्याने स्पष्ट आणि स्थिरलक्ष्य केलेले असते.

पण मुख्य अडचण म्हणजे, नित्य व्यवहारातील अनुभवाहून वेगळे अनुभवच असू शकतात ही गोष्टच ज्यांना कबूल नाही,–व्यावहारिक अनुभवावरच ज्यांचे काम भागते त्यांना असाधारण अनुभवांचे वर्णन करताना कवीची काय त्रेधा उडते याची कल्पनाच येत नाही ! कवीने जे सांगितले आहे त्याहूनही किती कमीत भागले असते–असा काटकसरीचा हिशेब हे 'संसारी' टीकाकार करीत असतात. तर उलट परमार्थापर्यंत पोहोचणारे कल्पक टीकाकार, "सांगितले आहे याहून किती अधिक कवीला दिसले होते व सांगायचे होते !" असे म्हणून कवीच्या शब्दात खोल, गूढ पाहू लागतात. अशा कल्पक समानधर्म्यांना त्यात काडीचीची अतिशयोक्ती दिसते नाही;–विरोध भासत नाही;–येथून तेथून एक सरळ पण सुंदर असे सत्यकथन वाटते !

आणखी एक घोटाळा

तत्त्वज्ञानात्मक कविता आणि गूढ कविता यात माधवराव पटवर्धन यांनी करून ठेवलेल्या घोटाळ्यांतून प्रा. जोग व आचार्य भागवत पुरतेसे बाहेर पडलेले नाहीत; व त्यातच प्रा. जोग यांनी आणखी एक घोटाळा जवळपास आणून सोडला आहे ! "यामुळे सरळ बुद्धिवादास धरून अर्थ करू पाहणारांना दोष काढता येतात, व अर्थही निःसंदिग्धपणे लावता येत नाही. पण यथार्थ संक्रमण (कम्युनिकेशन) हे गूढगुंजनवादी कवीस महत्त्वाचे वाटत नाही. म्हणून ते वाचकांची काळजी करीत नाहीत," (जोग, केशवसुत पा. १०६) हे जोग यांचे विधान गूढवादी कवितेस लागू नसून, जेम्स जॉइस् संप्रदायी अति आधुनिक कवितेस लागू आहे. "मरणांत खरोखर जग जगते" नववधू प्रिया मी बावरते यासारख्या कवितांत सुबोधताही आहे आणि गूढताही आहे. "वाचकांना कळले नाही तरी पर्वा नाही" ही वृत्ती तर मुळीच नाही. उलट त्यातील विरोधाभास, रूपक वगैरेमुळे अर्थ गूढ होत नसून स्पष्ट होत आहे.

केशवसुतांच्या गूढवादी कवितांत दुर्बोधता नाही असे नाही; पण तिचा संबंध गूढानुभवाशी नसून, तो सांगताना ढळलेल्या तादात्म्याशी आणी त्यांच्या मूळ पिंडातच असलेल्या तार्किकतेच्या भेसळीशी आहे. तर्कजीवी व्यक्तिमत्त्वाने मध्येच समाधिभंग केला, की गूढवादी कविता उलट दुर्बोध होते. तर्काचा प्रान्त पूर्णपणे ओलांडून गूढवादी कवी स्वतःस खास लाभलेल्या सौंदर्यसाक्षात्काराशी एकजीव आणि एकनिष्ठ असल्यास गूढवादी कविता किती स्पष्ट पण तरी किती खोल होतात, हे तांब्यांच्या गूढवादी कवितांवरूनच कळेल.

एक न मानवणारा उपसिद्धान्त

केशवसुत गोडीची पर्वा करीत नसत, असे म्हणून केशवसुतांच्या कवितेत कित्येक ठिकाणी शिरलेल्या रटाळपणाचे आचार्य भागवत यांनी समर्थन केले आहे. " काय सांगितले आहे, यापेक्षा, कसे सांगितले आहे " याला महत्त्व देणे म्हणजे कलावाद, या रूढ पण अर्धवट कल्पनेला धक्का देण्याचा त्यांचा प्रयत्न असावा. महत्त्वाचा आशय नसता गोडी आणि महत्त्वाचा आशय असून रटाळपणा; हे दोनच शैलीचे प्रकार संभवतात असे त्यांचे मत दिसते ! केशवसुतांचा आशयही याहून अधिक आकर्षकपणे आणि प्रभावीपणे सांगता आला असता, असे त्यांच्या टीकाकारांचे म्हणणे आहे. माधुर्य हाच शैलीचा एकमेव गुण नव्हे, हे प्रस्तुत लेखकाने तर अनेकदा प्रतिपादिले आहे. पण माधुर्याचा अभाव हा केशवसुतांचा दोष नसून, डायडॅक्टिझम अथवा रूक्ष तत्त्वबोध हा त्यांचा दोष आहे. तत्त्वबोधाला काव्यात स्थान आहे; नव्हे, त्याखेरीज श्रेष्ठ काव्यच नाही ! पण ' तत्त्वाने ' अगर ' सत्याने ' सौंदर्याचे रूप घेईपर्यंत– सादर्याच्या रूपाने दर्शन देईपर्यंत, त्याला काव्यात स्थान नाही ! सत्याच्या ' मांडणीत ' सौंदर्य अगर कला ' योजायची ' ही कल्पना गावंढळपणाची आहे. सत्याचे दर्शनच सौंदर्याच्या रूपाने व्हावे लागते; तरच त्याचे काव्य बनते ! या दृष्टीने बेनेदेत्तो क्रोचेच्या संप्रदायाचे स्पिनगार्न आदीकरून टीकाकार, काव्यातील सत्य आणि सौंदर्य, आशय आणि आकार, मॅटर आणि फॉर्म, यांत फरकच करीत नाहीत. पण यातून निघणारा उपसिद्धान्त आमच्या टीकाकारांना मानवेल की नाही कोण जाणे ! " ज्याला सत्य ' सुंदर ' करून सांगता आले नाही, त्याला सत्य ' सुंदर ' दिसलेच नाही " हा तो उपसिद्धान्त होय !

सत्य सुंदर केव्हा दिसते ?

सत्य सुंदर केव्हा दिसते ?–– कशाने दिसते ?–– सत्याच्या दर्शनाने आनंद झाल्यास, सत्यावर प्रेम असल्यास, सत्य सुंदर दिसते. केशवसुतांना शैलीची, माधुर्याची, कलेची पर्वा नव्हती असे म्हटल्याने ते सफाईदार पद्यकारांहून श्रेष्ठ ठरतील; पण खऱ्या, तांब्यांच्यासारख्या, कलावंताहून श्रेष्ठ ठरतील असे मात्र नाही व म्हणूनच भागवतांनी केलेले त्यांच्या दोषांचे समर्थन सर्वत्र पुरे पडत नाही.

आशय आणि आकार यात द्वैत कल्पिल्याने काही मर्यादेपर्यंत विवेचन सोपे होत असले, तरी अखेर ते कसे भलत्याच वळणावर जाते, याची उदाहरणे जोगांच्या ग्रंथात अनेक जागी आहेत. केशवसुतांच्या अत्यंत उत्कृष्ट कवितांतील नैराश्य, प्रेमार्तता वगैरे-वरून केशवसुतांच्या मनःस्थितीची अगर जीवनविषयक दृष्टीची कल्पना करणे चूक होईल, असे त्यांचे म्हणणे आहे. " काव्यरचनेच्या सोयीकरिता ते उसने घेतलेले होते, हे कोणाही निर्दोषदृष्टी वाचकास सहज दिसणारे आहे," असे जोगांचे म्हणणे आहे (पान २०). सतारीचे बोल, म्हातारी, घुबड वगैरे उत्कट कवितातील भावनांवरून देखील केशवसुतांच्या अंतःकरणाची कल्पना करण्यास जोग का भितात ?– तर त्या कवितांना निमित्तकारण

काही इंग्रजी कविता झाल्याचे दिसते ! आणि प्रेमकवितांतील प्रेमदेखील उसने घेतलेले का ?– तर केशवसुत प्रेमात सापडल्याचा दस्तऐवजी पुरावा उपलब्ध नाही म्हणून ! कवीच्या जीवनात बाह्य चरित्राहून भावनात्मक अंतस्थ चरित्रालाच अधिक महत्त्व असते आणि उत्कट भावगीते म्हणजे त्या अंतस्थ चरित्राचेच दस्तैवजी पुरावे होत, हे ध्यानी न घेतल्यास अर्वाचीन कवितेचे आणि कवींचे यथार्थ आकलन होणे दुरापास्त आहे.

कवीच्या उद्‌गारात सुसंगती शोधण्याच्या प्रवृत्तीमुळेही बिवेचनात अशा चुका शिरतात. ' तुतारी ' सारख्या कवितेत उद्दाम उत्साह दिसतो आणि ' सतारीचे बोल ' अगर ' घुबड ' या कवितात दारूण नैराश्य आढळते; त्याअर्थी दोहोंपैकी कोणती तरी एक वृत्ती उसनी घेतलेली असली पाहिजे ! अशी ही तर्कजीवी दृष्टी असते !

आधुनिक कवींचा पिंड ओळखला पाहिजे

पण या दृष्टीने आधुनिक कवींकडे पाहणे म्हणजे त्यांचा पिंडच न ओळखणे होय ! आधुनिक कवींचा पिंडच वेगळा आहे हे लक्षात न घेतल्याने, केशवसुतांच्या निसर्गविषयक कवितेचेही जोगांनी विचित्र आणि विपर्यस्त परीक्षण केले आहे. साध्याही विषयात मोठा आशय बघण्याची जी सवय बहुधा वर्डस्वर्थपासून त्यांनी घेतली, तीमुळे निसर्गाचे सौंदर्य, या बोधाच्या चष्म्याविरहित पाहणे त्यांना अशक्यच होऊन बसले." (पान १८८) " केशवसुतांच्या सृष्टिविषयक कवितांत भृंग, पुष्पाप्रत, फुलपाखरू इत्यादी कविता चांगल्या आहेत हे खरे; पण त्यातील निसर्गवर्णनाने नव्हे, त्यात आलेल्या इतर गोष्टींमुळे. निसर्गवर्णने चांगली व्हायची असली तर कालिदासाप्रमाणे सारी ज्ञानेंद्रिये संवेदनक्षम असावयास हवीत." (पान १८७) या जोगांच्या अभिप्रायावरून कालिदासभक्तांना निसर्गकवितेत काय हवे असते, हे कळेल; पण आधुनिक कवींच्या निसर्गप्रेमासंबंधी दृष्टी मात्र लाभणार नाही ! फुलांतले गुण सांगताना केशवसुतांसारखे कधी मार्दव, सुंदरता, नाजूकपणा इ. इ. आरोपित गुण सांगतात; पण रंग आणि गंध यांचा मात्र उल्लेख करीत नाहीत, अशी जोगांची तक्रार आहे ! आधुनिक सौंदर्यवादी (रोमँटिक) कवी निसर्गाकडे इमानी फोटोग्राफर अगर चोखंदळ पंडित म्हणून पाहत नसून, सखा आणि सहोदर म्हणून पाहतात. आपली दुःखे त्याला सांगतात; जगात सापडलेले गुण त्याला चिकटवितात. ते निसर्गाची ' माहिती ' देत नसून निसर्गाचे ' प्रेम ' देतात; निसर्गाचे सहोदरत्व देतात. कवीने वस्तुजाताचे " ज्ञान " (विज्ञान) द्यावे, की " प्रेम " (तादात्म्यमूलक अस्सल ज्ञान) द्यावे, हा प्रश्न जोग, माधवरावांच्या पंडिती पद्धतीहून वेगळ्या पद्धतीने सोडवतील अशी आम्हाला आशा होती !

पण हे सर्व दोष जोगांचे एकट्याचे नसून ज्या संप्रदायात ते वाढले, त्या संप्रदायाचे आहेत. सौंदर्यमापनाची बाह्य आणि सार्वत्रिक (एक्स्टर्नल आब्जेक्टिव्ह, युनिव्हर्सल) साधने शक्यतो वापरायची, या बाण्याने टीकाशास्त्र सोपे झाले, तरी सौंदर्याच्या गाभ्यालाच नेमके मुकते ! कारण तो गाभा सार्वत्रिक (युनिव्हर्सल) नसून ' असार्वत्रिक ' आणि अनन्यसाधारण (युनिक) असतो आणि तरीही आम्ही जोगांचे हे पुस्तक

अत्यंत मूल्यवान आणि उपयुक्त म्हणतो, ते केवळ उपचार अगर ऋणानुबंध म्हणून नव्हे. तर अशा पुस्तकांचे महत्त्व त्यातील निर्णयापेक्षा, त्यातील पद्धतशीर साधनसामग्री-मुळे असते. आपले हे पुस्तक म्हणजे केशवसुतांच्या काव्याविषयीचा शेवटचा शब्द नव्हे, याची जाणीव स्वतः जोगांनीही नम्रतापूर्वक दाखविली असली, तरी यापुढे केशवसुतांच्या काव्याचे विवेचन करणाऱ्या कोणालाही—जोगांच्या मताला विरोध दाखवणारालाही—या ग्रंथाचे परिशीलन करणे अपरिहार्य आणि उपयुक्त व्हावे, इतका हा ग्रंथ बहु-मोल आहे.

• • •

केशवसुत आणि तांबे

(१९५० च्या साहित्यसंमेलनातील चर्चेचा उपन्यास)

'केशवसुत आणि तांबे यांच्या संप्रदायात विरोध आहे की काय ?' हा प्रश्न खरोखर मोठा 'सूचक' आहे. आपली आजची काव्यविषयक मते, त्या प्रश्नात व त्या उत्तरात सूचित होणार आहेत.

पण या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी किंबहुना तो प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण केशवसुत हे कोणत्या संप्रदायाचे कवी होते, अथवा त्यांनी कोणता नवीन संप्रदाय प्रवर्तित केला, या प्रश्नाचे उत्तर स्वतःशी निश्चित केले पाहिजे. जिला आपण अर्वाचीन कविता असे संबोधू लागलो, तिचे जनक केशवसुत होत, याबद्दल आता फारसा वाद राहिलेला नाही. तथापी या कवितेचे—म्हणजेच केशवसुत—संप्रदायाचे विशेष लक्षण कोणते, याबद्दलच्या आजच्या कल्पना विसंगत आणि विपर्यस्त आहेत असे मला वाटते; व मी वेगवेगळ्या प्रसंगी माझे हे मत व्यक्त केलेलेही आहे. केशवसुत हे क्रान्तिकारक कवी होऊन गेले, असे म्हणण्यात येते, तेव्हा त्या मतात बऱ्याच कल्पना अंतर्भूत झालेल्या असतात. (१) केशवसुतांनी काव्याच्या क्षेत्रात क्रान्ती केली; (२) केशवसुत सामाजिक क्रान्तीचे पुरस्कर्ते होते; (३) आणि केशवसुत जीवन, काव्य, आणि समाजरचना या तिन्ही बाबतीत क्रांतिकारक होते, अशा तिन्ही मतांचा अंतर्भाव त्यात प्रसंगानुसार होत असतो.

तथापी केशवसुताचे वेगळेपण सांगताना,—विशेषतः ताम्ब्यांच्या संप्रदायाहून त्यांचा संप्रदाय भिन्न होता, असे प्रतिपादतांना, विवेचकाच्या मनात केशवसुतांचे सामाजिक क्रान्तिकारकत्वच प्राधान्ये करून अभिप्रेत असते असे आढळते. त्यांचे काव्यातील क्रान्तिकारकत्व मान्य करणेही कित्येकदा, 'त्यांनी लौकिक विषयांवर काव्य करण्यास सुरुवात केली' आणि 'वृत्तयमकादिकात प्रयोग केले, या गोष्टींनाच फाजील महत्त्व देतात. 'जे आगरकरांनी गद्यात केले,' तेच केशवसुतांनी पद्यात केले' हा विद्यालयीन, विवेचनातील सुटसुटीत 'फॉर्म्युला' अगर 'फैसला' हा या वैचारिक गोंधळाचा,

'शेवटचा पण अर्थपूर्ण' टप्पा होय! आणि हा टप्पा मान्य करावयाचा म्हटल्यास, केशवसुत आणि तांबे यांच्या संप्रदायांत मोठाच विरोध मानावा लागेल.

परंतु वरील सुटसुटीत 'फैसल्या'त सूचित झालेल्या लक्षणाने केशवसुतांच्या काव्याच्या समग्र वैशिष्ट्यांची कल्पना येत नाही; नव्हे त्यांच्या काव्यासंबंधी विपरीत कल्पना येण्यासच त्याची मदत होते. सामाजिक आणि काव्यक्षेत्रीय संकेताविरुद्ध बंड हे केशवसुतांच्या संप्रदायाचे 'एक' लक्षण होते, पण एकमेव लक्षण नव्हते. किंबहुना ते त्यांच्या संप्रदायाचे प्रमुख लक्षणही नव्हते. 'समकालीन सामाजिक संघर्षाचे पडसाद' हे केशवसुतांच्या काव्याचे वैशिष्ट्य म्हणून सांगण्यात येते; तर 'सामाजिक संघर्षासंबंधी उदासीनता', आणि 'क्रान्ती आणि सौंदर्य यामध्ये तल्लीनता हे तांब्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य म्हणून सांगण्यात येते व अशा प्रकारे एक 'क्रांतिवादी' आणि दुसरा 'सौंदर्यवादी' असे वर्गीकरण करण्यात येते, ... एक 'वास्तववादी' व दुसरा 'स्वप्नाळू' असे समजण्यात येते. पण केशवसुत हे सामाजिक क्रान्तीचे आणि वास्तववादाचे भोक्ते होते, एवढे म्हणण्याने त्यांच्या काव्याचे आणि व्यक्तिमत्त्वाचे समग्र लक्षण होत नाही. त्यांच्या कवितातील निसर्गपूजन, बाल्यपूजन, स्फूर्तिपूजन, सौंदर्यपूजन— आणि विशेषतः स्वप्नपूजन, वरील वर्णनात बसत नाही.

प्रत्येक मेघ वरती फिरता नभांत,
एकेक शब्द लिहितो मम पुस्तकात

या सारख्या पंक्तीत, किंवा--

'ज्याचा ध्वनी न उमटे खग–कूजनात
नाही विगूढ इतिहास असा जनांत!'

या ओळीत व्यक्त झालेली वृत्ती 'क्रांतिवादी' अगर 'वास्तववादी' या आजच्या महत्त्व पावलेल्या विशेषणांत अंतर्भूत होत नाही. तसेच—

'अम्हा भ्रमिष्ट बालकांस काव्य देवतेचिया
'जीव', निर्जिवातलाहि नेमिले पहावया।'

(पुष्पाग्रत, ७३)

यासारख्या ओळीत व्यक्त झालेली वृत्तीही वरील लक्षणात अंतर्भूत होत नाही, त्याचप्रमाणे—

नाडी माझी तव करी वाहताहे
हृदय माझे तव उरी हालताहे!

(पुष्पाग्रत, ६७)

या ओळीतील प्रेमाचे अद्वैत, किंवा माडखोलकरांसारख्या राजकीय क्रांतीच्या भक्तांच्या शब्दात म्हणजे— यातील 'स्त्रैणपणा' हा वरील क्रान्तिकारकतेत अंतर्भूत होत नाही. तसेच—

किती घसरलो किती चुकुनि शब्दते बोललो
करूनि भलते किती पतितहंत ! हे जाहलो !
स्वये बहकुनी उगा स्वजनमानसे टोचिली !
वृथा स्वजन लोचनीं अहह ! आसवे आणिली !
म्हणूनि अनिवार हे नयनवारि जे वाहते,
असे अहह ! का कवण ही टिपायासते ?

असे म्हणून 'हळव्या' शेलेप्रमाणे, अगर 'पश्चात्ताप-दग्ध' रॉबर्ट बर्न्सप्रमाणे वाचकांच्या गळी पडून रडणारे केशवसुत आजच्या क्रान्तिपूजकांच्या आणि वास्तवपूजकांच्या चौकटीत बसत नसून, त्याच्याकडून 'स्त्रैण' म्हणून हिणवले जाण्यालाच अधिक पात्र आहेत ! केशवसुतांच्या थोड्याफार मागासलेल्या पिढीतही, त्यांना स्त्रैण म्हणून हिणवणारे शूर महाराष्ट्रकवी होते, हे त्यांच्या, 'कवितेचे प्रयोजन' या प्रसिद्ध कवितेवरूनच स्पष्ट आहे–

'त्याचा 'स्त्रैणपणा' असा प्रकटला वाटेल कोणापरी।'

अशी शंका व्यक्त करून, ते कवींच्या बाण्यासंबंधीचे आपले महत्त्व सांगतात.

"प्रौढत्वी निजशैशवास जपणे बाणा कवीचा असे."

हा 'बाल्या'चा आदर्शही आजकालच्या क्रान्तिवादात बसण्यासारखा नाही !
तसेच—

तू आणिक मी पूर्वी होतो
खेळगडी रे ! स्मरुनि अहा तो !
काळसुखाचा आता चिंता खेद फार होतो ! (१०९)

या ओळीत आणि—

चिरतरुणा रे ! चिरतरुणा रे !
तुजसन्निध तो वास बरा रे !
तुजमजमध्ये परी केवढी...आहे रुंद दरा रे !

या ओळीत दिसून येणारे बाल्यपूजन आणि निसर्गपूजन, हेही वरील लक्षणात बसत नाही. अशा स्थितीत 'क्रान्तिपूजना'हून वेगळे आणि व्यापक लक्षण केल्याखेरीज केशवसुतांच्या प्रमुख वृत्तींचा आणि विषयांचा खुलासा होणार नाही.

केशवसुतसंप्रदायी काव्य म्हणजे इंग्रजी काव्यवाचनाने स्फुरलेले काव्यही नव्हे; की आगरकर– हरिभाऊ यांच्या समाजसुधारणेच्या कार्यक्रमाची पद्यात्मक आवृत्तीही नव्हे. इंग्रजी काव्याच्या वाचनाने झालेली परंतु आधुनिक कवितेत स्थान न मिळालेली इंग्रजी शिक्षणानंतरची कविता उपलब्ध आहे. अलेकझँडर पोपचा आदर्श ठेवून लिहिलेली कविता किंवा गोल्डस्मिथचा आदर्श ठेवून लिहिलेली कविता– फार काय मिलटनचा आदर्श ठेवून लिहिलेली कविता देखील इंग्रजीच्या संस्काराने स्फुरलेली कविता होईल;

पण ' केशवसुती ' वळणाची कविता मात्र होणार नाही !

केशवसुत–संप्रदायी कविता म्हणजे केवळ समाजक्रान्तिवादी कविताही नव्हे, की केवळ इंग्रजी–वळणाची कविताही नव्हे. इंग्रजी काव्यातील ज्या संप्रदायाला ' रोमँटिक स्कूल ऑफ पोएट्री ' असे म्हणतात, त्या संप्रदायात केशवसुतांची कविता अन्तर्भूत केल्याखेरीज केशवसुतांच्या कवितेचे संपूर्ण लक्षण होणार नाही. या संप्रदायाचे त्यांनी अनुकरण केले असे म्हणणे, म्हणजे वदतो व्याघात होईल ! ' तळमळ ' आणि ' रचना स्वातंत्र्य ' (Sincerity आणि freedom from Convention) हा या संप्रदायाचा गाभा आहे. अनुकरणाने ' तळमळ ' येऊ शकेल असे म्हणणे, म्हणजे सामाजिक फॅशन म्हणून अगर सरकारी हुकमावरून प्रेम करता येईल म्हणण्यासारखेच आहे ! केशवसुत हाडानेच ' रोमँटिक ' संप्रदायाचे—म्हणजे वर्डस्वर्थ, शेलि, कीटस, बायरन यांच्या संप्रदायाचे होते, हे मान्य केल्याखेरीज त्यांच्या काव्याची संगती लागत नाही. तुटपुंज्या इंग्रजी काव्यवाचनाने त्यांच्या अंतरंगातील दाहक रोमँटिक द्रव्यांना केवळ स्फुलिंग पुरवण्याचे काम केले.

' रोमँटिक ' संप्रदायात बाह्यतः विरोधी पण मूलतः संबद्ध, अशा अनंत, वृत्तींचा अंतर्भाव होतो हे इंग्रजी टीकाशास्त्राशी परिचित अशा विद्वान् श्रोत्यांना सांगायला पाहिजे असे नाही. निसर्गासंबंधी, सौंदर्यासंबंधी बाल्यासंबंधी आकर्षण, सामाजिक व कलात्मक संकेतासंबंधी तिटकारा, भावनांचे व काव्यान्तर्गत प्रामाणिकपणाचे (Sincerity) चे पूजन; आत्मपूजन,...प्रेमपूजन, स्त्रीपूजन–यासारखी विविध वैशिष्ट्ये, या संप्रदायात दिसून येतात. सामान्यतः हा संप्रदाय नव्या गोष्टींनी लवकर आकर्षित होतो; पण स्कॉट आणि बायरन् यांच्याप्रमाणे जुना इतिहास आणि जीर्ण प्रासाद यांनीही याची कल्पनाशक्ती कधी कधी चेतविलेली आढळते. याला कधी ' रेनॅसन्स ऑफ वंडर् ' असे म्हटलेले आढळते; तर कधी स्वातंत्र्यप्रेम हे याचे प्रमुख लक्षण केले जाते; तर कधी आत्मनिष्ठा आणि अंतर्मुख वृत्ती हे याचे प्रमुख लक्षण मानले जाते. याच्या आत्मनिष्ठेची आणि आत्मपूजनाची मजल कित्येकदा गूढानुभवापर्यंत जाऊन अल्लामा इक्बालप्रमाणे ती ' असरारे खुदी ' (Joys of the Self) गाण्यात दंग होऊन जाते. ' गोफणी ' पासून ' झपूर्झा 'पर्यंत आणि ' तुतारी 'पासून ' म्हातारी 'पर्यंत विविध वृत्तींना या संप्रदायात जागा आहे. फक्त संकेतबद्ध आणि पांडित्य–प्रदर्शक काव्याला यात जागा नाही. यात केशवसुत, टिळक व तांबे एकत्र बसू शकतील; परंतु वामन मोरोपंतांना मात्र जागा मिळणार नाही. एखादेवेळी ज्ञानेश्वर आणि प्रभाकरही या भावनापूजक संप्रदायात बिन-बोभाट एका पंक्तीत अन्नग्रहण व पाणिग्रहण करताना दिसतील !

पण स्वतः तांबेच केशवसुतांना तुच्छ लेखताना–निदान रुक्ष लेखताना दिसतात. त्याची वाट कशी लावायची ? केशवसुतांच्या ' तुतारी ' अगर ' झपूर्झा ' यासारख्या प्रसिद्ध कवितांना तांबे नीरस म्हणत हे प्रसिद्ध आहे; पण त्यासंबंधी साश्चर्य चर्चा अद्यापही होत आहे. व्यक्तिशः मला कै. माधव ज्यूलियन आणि कवी गिरीश यांचे घरी तांब्यांनी केलेली

अविस्मरणीय काव्यचर्चा अद्याप आठवते. केशवसुतांनी रूढिविरोधाचे माजवलेले स्तोम व त्याला काव्यात दिलेले अवास्तव स्थान, यासंबंधी दाखविलेली तुच्छता मला चांगली स्मरते. तांब्यांनी काव्य, कला व जीवन यासंबंधी जितकी निःसंदिग्ध, सुगम आणि बिनतोड चर्चा केली आहे, तितकी मराठीत इतर कवींनीच काय, पण रसिकांनीही केलेली नाही. तांब्यांचे हे श्रेष्ठत्व मान्य करूनही मला वाटते, की बोधप्रचुर व तत्त्वचर्चात्मक (Didactic) काव्यासंबंधी आपला तिटकारा जसाच्या तसा केशवसुतांवर आदळण्यात तांब्यांकडून अन्याय होत होता. तांब्यांच्या इतक्या आदरणीय 'तत्त्वज्ञ' कवीशी वाद करणे, हे माझ्या संप्रदायात बसत नसल्याने, पंधरा-वीस वर्षांपूर्वीच्या त्या बैठकीत त्यांच्या स्वतःकडून या गोष्टींचा खुलासा करून घेण्याची संधी मी साधली नाही.

काव्यात नीतिबोधपर आणि तत्त्वचिंतनपर भाग असावा की नाही, हा मुख्य प्रश्न नाही. एखाद्या 'अमूर्त' तत्त्वासंबंधी का होईना तुमच्या भावना पुरत्या 'तापल्या' व 'द्रवल्या' आहेत की नाहीत हा मुख्य प्रश्न आहे. तसेच रूढींचा, बंधनांचा व ठरीव जीवनाचा निषेध करीत असता, कवीच्या अंतर्मनात–अस्फुट का होईना?– एखादे संपूर्ण व संवादी सौंदर्याचे आदर्श चित्र चमकत आहे की नाही, हा मुख्य प्रश्न आहे. तांब्यांची टीका रुक्ष, तार्किक आणि अश्रद्ध अशा आजकालच्या अतिवास्तववादी काव्याला कदाचित् योग्य ठरेल. परंतु तुतारी, गोफण, निशाणाची प्रशंसा यासारख्या कवितांत अमूर्त ध्येयासंबंधीचा केशवसुतांचा उन्मादक आवेश;–इतकेच नव्हे तर अमूर्ताला मूर्त करण्याची तांब्यांच्या अंगची शक्तीही–केशवसुतात स्पष्ट दिसून येते. त्यांचा खडबडीतपणाही अशा आवेशात, एका सपाट्यात लिहिलेल्या कवितांत, जलप्रपाताप्रमाणे, मोहक भीषणता व रौद्र संगीत यांचा अनुभव घडवतो. अशा कवितांना तांबे नाक मुरडत असतील, तर तो साफ प्रमादाचाच प्रकार म्हटला पाहिजे. जीवनाच्या अगर सौंदर्याच्या विशिष्ट रूपात तांब्यांसारखे मोठे आत्मे, कित्येकदा इतके समरस होतात की त्यांच्या अन्यरूपासंबंधी ते प्रायः अंध बनतात; असे प्रकार वाङ्मयाच्या व तत्त्वज्ञानाच्याइतिहासात कमी नाहीत.

मला कधी कधी असे वाटते, की तांबे केशवसुतांच्या 'गद्यप्रायते'वर चिडत, आणि तिचे मूळ, 'बोधप्रधानतेत', असले पाहिजे असे मानून सुधारणावादी, क्रान्तिवादी कवितांना नाक मुरडत! क्रान्तीदेवता देखील भारतीयांच्या विद्वान पूर्वजांनी कल्पिलेल्या काव्यमय रूपात–रूद्राच्या रूपात,––वादन व नर्तन करीत काव्यात अवतरली पाहिजे, असे तांब्यांना वाटे! पण अस्सल शिवतांडवाचे नाते, तांब्यांच्या प्रमाणबद्ध आणि गानानुकूल 'रुद्रा'शी जितके आहे, त्याहून केशवसुतांच्या स्वैर आणि बेभान तुतारीशीच अधिक आहे, हे प्रत्यक्ष 'डमरूधारी' महारुद्रही मान्य करील, असे मला वाटते!

पण केशवसुतांची गद्यप्राय काव्यशैली, आवेशाची भट्टी मागे तेवत नसल्यास, कित्येकदा 'झपूर्झा'ही कविता मला अत्यंत अर्थपूर्ण वाटत असूनही तांब्यांची तक्रार काही दृष्टीनी खरी आहे.

(१) हर्षखेदांच्या पलिकडेच श्रेष्ठ जाणीव आणि श्रेष्ठ आनंद आहे; (२) व्यावहारिक (utilitarian worldly) शहाणपणा सोडल्यास खरा शहाणपणा हाती येतो, ... आणि वेडेपणाही पदरी येतो; (३) ज्ञान अनुभवा–पलीकडील अनुभवाची किती तरी न नांगरलेली भूमी पडलेली आहे; (४) सामान्य ज्ञानाच्या, लौकिक व्यवहाराच्या पलीकडे दिव्य अनुभवाचे केवढे तरी मोठे क्षेत्र आहे; ... वगैरे अत्यंत सत्य आणि चिंतनीय अशी तत्त्वे त्यात आहेत. पण अलौकिकाची जोरकस 'तरफदारी' म्हणजे गूढकाव्य नव्हे. तो एक वक्तृत्वपूर्ण 'निबंध' होईल. अलौकिकाच्या क्षणिक दर्शनाचे सुंदर आणि बेभान 'चित्र', म्हणजे गूढ काव्य होय. या दृष्टीने पाहता तांबे गूढानुभवाच्या प्रकाशात लिहीत; तर केशवसुत त्या प्रकाशाच्या अंदाजाने वा स्मरणाने लिहीत. एकाच्या कवितेत अपूर्व आनंदाचे प्रत्यक्ष ध्वनी आहेत; तर दुसऱ्यात त्या आनंदाची तरफदारी आहे व म्हणूनच

स्वरसंगम त्या क्रीडांचा–
ओळखणे हा ज्ञानाचा 'हेतू'!

... या सारखी गद्य वाक्ये या कवितेत आढळतात!! ही कविता दुर्बोध मुळीच नाही. (तो बोभाटा अज्ञ लोकांनी केला आहे.) ती गडकऱ्यांच्या 'फुटक्या तपेली' प्रमाणे नकली तर खासच नाही. पण ती गूढ अनुभवात लिहिलेली नसून, गूढ अनुभवाच्या प्रामाणिक पण तार्किक अंदाजाने लिहिलेली आहे. "अध्यात्मानुभवाची धडपड म्हणजे गूढ काव्य" अशी आधुनिक बुद्धिवादी आणि प्रयत्नवादी युगाला शोभेशी व्याख्या करणारांना ही कविता समाधान देईल; पण तांबे, रवींद्रनाथ, इक्बाल यांना ती अविवाहित माणसाने विवाहावर लिहिलेल्या प्रबंधासारखी वाटल्यास नवल नाही!

क्रान्तीवाद आणि सौंदर्यवाद यात विरोध आहे असे समजणे अज्ञानाचे आहे. कोणतेतरी संवादी सौंदर्य अन्तर्यामात स्फुरल्याखेरीज, विसंवादी वास्तवतेवर 'गोफण' हाणा म्हणून 'रणशिंग' फुंकण्याला आवेश येणार नाही. केशवसुत मूर्तिभंजनाच्या क्षणी जितके तन्मय होत, तितके सौंदर्य चिंतनाच्या आणि सौंदर्य–चित्रणाच्या क्षणी होत नसत व यातच त्यांची शैलीसंबंधीची 'वर्डस्वर्थी' कल्पना येऊन मिसळल्यावर ते सौंदर्याची, संगीताची आणि दिव्यतेची तरफदारी गद्यप्राय भाषेत–पण अधीरपणे व प्रामाणिकपणे करीत.

जीवनातील ध्वंसनीय गोष्टींचा ध्यास केशवसुतांनी घेतला होता; तर पूजनीय गोष्टीत तांबे आजन्म रममाण होत. आजच्या क्षुब्ध, बेचैन आणि अस्वस्थ युगाची वावटळ शांत झाल्यावरही तांब्यांच्या काव्यातील शाश्वत मूल्याचे पूजन व गायन भावी युगात मुदित आणि पावन करीत राहील!

पण केशवसुत भंजनात अधिक रमत असले, तरी त्यांचा संप्रदाय भंजनाचा नव्हता. संप्रदाय पूजनाचा, प्रेमाचा आणि भावनात्मकतेचाच होता. 'भंजन' हे सौंदर्यवादाचे Negative स्वरूप आहे; तर गूढगुंजन हे Positive आणि परिणत स्वरूप आहे.

सौंदर्यवादाचे पर्यवसान गूढवादातच होते. किंबहुना " ज्याला स्वतःची व स्वप्रेमाची अपूर्ण जाणीव आली आहे असा ' गूढवादी ', म्हणजेच सौंदर्यवादी ! ' Romanticism is mysticism in its adolascence ' असे माझे मत आहे. या दृष्टीने ज्या भावनापूजनाची, सौंदर्यपूजनाची आणि आत्मपूजनाची सुरुवात, केशवसुतांनी अस्फुट आणि अडखळत्या आवाजात केली, त्याचे निश्चित, रम्य व अनुभवाचे सूर तांब्यांनी काढले !

गूढवाद व सौंदर्यवाद या संबंधी महाराष्ट्रात कित्येक विद्वानांनी अपरिमित अज्ञान पसरविण्याचे कार्य केले आहे. " तांब्यांच्या कवितेत गूढगुंजन नाही ! " असे तांब्यांच्या सहवास लाभलेल्या विद्वान संपादकांनीच म्हटलेले पाहून मजप्रमाणे भावी पिढ्यांनाही हसावे की रडावे हे कळणार नाही ! उलटे तांब्यांच्या गूढवादाच्या मानाने रवींद्रांचा गूढवादही पातळ आणि आलंकारिक आहे, हे मी अनेकवार प्रतिपादले आहे.

तांबे गूढवादी नसतील तर गूढवाद कशाला म्हणायचे हा प्रश्नच आहे ! पण जे गूढवाद म्हणजे मद्यपानासारखी गर्ह्य गोष्ट समजतात. त्यांच्या मनाला या प्रान्तात किंमत देणे गैर होईल किंबहुना...

To be dispraised by
When is no small—

या मिल्टनच्या वचनाप्रमाणे, त्यांच्या इन्काराने तांबे अधिकच गूढवादी ठरण्याचा संभव आहे ! गूढवादाप्रमाणे Romanticism ऊर्फ सौंदर्यवाद या संप्रदायासंबंधीही आजकालच्या विद्वानांत बऱ्याच विपर्यस्त कल्पना दिसून येतात. रोमँटिसिझम म्हणजे ' स्वप्नाळूपणा ' या उथळ आणि विकृत व्याख्येपासून, तो रोमँटिझम म्हणजे ' इंग्लंडमध्ये कोणे एकेकाळी होऊन गेलेली चळवळ ', या अर्धवट कल्पनेपर्यंत, या संप्रदायासंबंधी चमत्कारिक कल्पना आमच्यातील विद्वानांच्या तोंडी ऐकावयास सापडतात.

रोमँटिसिझम् ही कोण्या एकेकाळची गोष्ट नसून ती जिवंत आणि शाश्वत प्रवृत्ती आहे. ठरीव जीवनामुळे, काही माणसे रुक्ष, पोटभरू, विटकी आणि अश्रद्ध बनतात, तर उलट काही माणसे जीवनाकडे ज्याच्या हृदयातील उत्कंठा, कौतुक, लडिवाळपणा, विश्वास मेलेला नाही अशा बालकाच्या चैतन्यमय डोळ्यांनी पाहतात. सारांश, जे जीवनाला ' इस्पितळ 'ही समजत नाहीत की गिरणीही समजत नाहीत, ते सौंदर्यवादी होत.

आपल्याला एकट्यालाच सौंदर्य नावाची चीज सापडली आहे असे सौंदर्यवादी समजतात की काय ? हा प्रश्न वेगळा; सौंदर्यवाद्यांसंबंधीपण असा गैरसमज घरून घेणारांना मी असे सांगेन की आपणाला एकट्यालाच जीवनातील वास्तवता सापडली आहे आणि ती ' विटकी ', ही कल्पनाही आमच्या विशिष्ट संप्रदायी लोकांनी खरी समजू नये.

जीवनाकडे पाहण्याची खरी दृष्टी इंग्लंडच्या अगर अमेरिकेच्या बोटीकडे तोंड करून मिळणार नाही; तर स्वतःच्या हृदयाची ' कोवळीक ' जतन करूनच मिळणार आहे.

या बाण्याकडे पाहता केशवसुत व तांबे एका संप्रदायाचे होते.

" प्रौढत्वी निजशैशवास जपणे " हे महावाक्य किंवा " पांडित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासीत " हे उपनिषदातील महावाक्य म्हणजेच सौंदर्यवाद होय !! व म्हणजेच केशवसुत संप्रदाय होय !!

रोमँटिक प्रेम आणि कविवर्य तांबे

आधुनिक वळणाच्या कवितेचा प्रारंभ केशवसुतांपासून झाला; आणि त्या कवितेसंबंधी चुकीच्या कल्पना करून घेण्यालाही प्रारंभ तेव्हापासूनच झाला ! केशवसुतांना 'क्रांतिकारक' हे विशेषण लावण्यात येऊ लागले; पण त्यांनी केलेल्या किंवा त्यांच्यापासून झालेल्या क्रांतीसंबंधी टीकाकारांच्या कल्पना मात्र धड नव्हत्या. केशवसुतांनी रूढीविरुद्ध आणि मजुरासंबंधी लिहिले, म्हणून ते 'क्रांतिकारक', अशी काहींची कल्पना; तर त्यांनी वृत्त, यमक आणि सुनीत यांच्यासंबंधी नवे उपक्रम केले, म्हणून ते क्रांतिकारक अशी काहींची कल्पना ! तसेच केशवसुत–संप्रदायी कवी म्हणजे केशवसुतांपासूनच स्फूर्ती घेणारे, किंबहुना त्यांचे अनुकरण करणारे कवी, अशीही काहींची कल्पना ! क्रांतिकारकता आणि संप्रदाय यांच्या संबंधीच्या या चुकीच्या कल्पनांमुळे केशवसुतांच्या पिढीतील व नंतरच्या पिढीतील कवींच्या कार्याचे मूल्यमापनही चुकीच्या निकषांनी होऊ लागले. रे. टिळक, भास्करराव तांबे यांच्यासारखे प्रमुख आधुनिक कवी केशवसुत–संप्रदायाचेच होते की नाही, यासंबंधीचा वाद या चुकीच्या प्रारंभ–कल्पनांतूनच निर्माण झाला. सामाजिक विषयांमुळे नव्हे, तर आत्मनिष्ठ आणि जीवननिष्ठ अंतरंगामुळे आधुनिक कविता वेगळी ठरली, हे प्रथम लक्षात घ्यायला हवे. तसेच केशवसुत–संप्रदाय म्हणजे 'केशवसुतांनी स्थापन केलेला' संप्रदाय नव्हे, तर ज्या आत्मनिष्ठ, जीवननिष्ठ संप्रदायाचा (म्हणजेच रोमँटिक संप्रदायाचा) केशवसुतांनी अंगीकार केला, तो संप्रदाय होय. संप्रदायाच्या संदर्भातील षष्ठीचा अर्थ न समजल्यामुळे जो गोंधळ होतो, त्याचा अनुभव व्यक्तिशः माझ्याही वाट्याला आलेला आहे. सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी, 'मी आणि माझा संप्रदाय' या मथळ्याचा लेख मी एका खास अंकात लिहिला होता. त्यातील 'माझ्या' या षष्ठीचा अर्थ एकजात सर्व विद्वानांनी 'मी स्थापन केलेला' असा घेऊन, माझ्यावर अत्यंतिक अहंकाराचा आरोप केला ! मी त्यांना हसून प्रतिप्रश्न केला, "एखाद्या स्त्रीने 'माझे सासर' असे म्हटल्यास, 'तिने स्थापन केलेले सासर' असा अर्थ आपण घेता काय ?"

१९५० सालच्या मुंबईच्या साहित्य संमेलनातील परिसंवादाचा उपन्यास करण्याच्या निमित्ताने मी जो निबंध वाचला होता, त्याचा विषय "केशवसुत-संप्रदाय आणि तांबेसंप्रदाय हे भिन्न आहेत काय ?" हा होता. या दोघांचे काव्य भिन्न असेल, शैली भिन्न असेल,—फार काय जीवनविषयक दृष्टिकोन भिन्न असेल; आणि तरी दोघे एकाच म्हणजे रोमँटिक संप्रदायाचे आहेत, असे मी प्रतिपादिले होते. या एका व्यापक संप्रदायात जशी कित्येक ठळक सामान्य लक्षणे आहेत तशीच कित्येक भिन्न वैशिष्ट्येही आहेत. वर्डस्वर्थ, बायरन्, शेले, कीटस् हे सर्वच रोमँटिक वृत्तीचे होते आणि तरी प्रत्येकाच्या काव्याची वैशिष्ट्ये म्हणून वेगळी आहेतच. केशवसुत, टिळक, गडकरी, तांबे, माधव ज्यूलियन्, अनिल, बोरकर सर्वच सौंदर्यवादी (रोमँटिक); पण म्हणजे लगेच ते केशवसुतांचे अनुयायी असे मात्र नव्हे ! उलट केशवसुतांपासून बोरकरांपर्यंत सर्वच आधुनिक कवी 'रोमँटिक' या व्यापक संज्ञेने ओळखल्या जाणाऱ्या वृत्तीचे आहेत हा अर्थ लक्षात घ्यायला हवा.

या वृत्तीत आणि या काव्यसंप्रदायात अनेक परस्परविरोधी स्वभाव-विशेषांचा अंतर्भाव होतो. निसर्गप्रेम, नावीन्यप्रेम, स्त्रीप्रेम, सौंदर्यप्रेम प्रेमासंबंधीचे प्रेम, जुन्या वस्तूसंबंधीचे, वातावरणासंबंधीचे आणि कालासंबंधीचे प्रेम, गूढ वातावरणासंबंधीचे प्रेम, या सर्व वैशिष्ट्यांचा अंतर्भाव रोमँटिक वृत्तीत होतो. हे लक्षात घेतले म्हणजे "तांबे समाजक्रांतिवादी होते की नव्हते ?" व "ते क्रांतिवादी नसल्यास केशवसुतसंप्रदायात कसे बसणार ?" असल्या हास्यास्पद शंका घेण्याचे कारण नाही. तसेच तांब्यांच्या कवितांत जुनाट, सरंजामशाही वातावरण आहे, यामुळे तांबेभक्तांना खजील होण्याचेही कारण नाही !

तांबे हे प्रामुख्याने रोमँटिक प्रेमाचे कवी आहेत. आधुनिक मराठी काव्यात स्त्री-पुरुषप्रेमाला एक विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली हे खरे. प्रेम हे जीवनातील एक साफल्य, एक पुरुषार्थ होय असेही मानण्यात येऊ लागले. चार पुरुषार्थांत या पाचव्या पुरुषार्थाला काहींनी प्रायः मोक्षाशेजारीही स्थान दिले.

निष्प्रेम चिरंजीवन ते ।
जगिं दगडालाही मिळते ॥ धिक् तया ॥
क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव पडो मरणांचा । मग पुढे ॥

या प्रख्यात कडव्यात गोविंदाग्रजांनी प्रेमाला हीच जीवन—मूल्याची अथवा पुरुषार्थाची पदवी दिली आहे. माधवराव पटवर्धनांनी प्रेमाचे माहात्म्य अशाच शब्दात वर्णिले आहे.

प्रेम करी मी, दगड नसे हे नसे काय काही ?
हृदयी ही अमृतगंगा !

•

पडली आहुती या जन्माची प्रेमाच्या होमी,
आणखी काय दुजे मागू ?

पण या साफल्याच्या आणि धन्यतेच्या आविष्कारालाही वेगवेगळी रूपे येत,— वेगवेगळ्या पार्श्वभूमी लाभलेल्या असत. सामान्यतः रोमँटिक प्रेमाचे स्वरूप हे विवाहपूर्व प्रेमाचेच असे, व ते स्वाभाविकही आहे. कारण ओढ, प्यास, आर्तता किंवा तळमळ हा रोमँटिक प्रेमाचा आत्मा आहे. वैवाहिक प्रेमात आर्ततेपेक्षा समाधानाचीच शक्यता अधिक. विवाहपूर्व प्रेमातही विरही, अप्राप्त किंबहुना अप्राप्य प्रेमाला रोमँटिक काव्यात अधिक महत्त्वाचे स्थान मिळेल. फारसीत ज्याला 'इश्क' म्हणतात ते या प्रकारचेच असते.

या प्रकारच्या प्रेमात आर्ततेचे सौंदर्य असले तरी पुष्कळदा प्रेमापेक्षाही त्यात प्रियेला महत्त्व प्राप्त झालेले दिसते. अनेकदा त्यात वैयक्तिक दुःखाची वा दुर्दैवाची 'कथा' असते—"फसाना" असतो, पण रोमँटिक प्रेमकाव्याची परिसीमा केवळ दुःखात होत नाही, तर प्रायः दुःखावरील विजयात होते. म्हणूनच उर्दू काव्यात वाचकाच्या किंवा श्रोत्यांच्या मनावर स्त्रीपूजनाचा ठसा उमटत नाही, दुःखपूजनाचा (Miserymongering चा) ठसाही उमटत नाही, तर प्रेमपूजनाचा किंवा 'अहं-पूजना'चा ठसा उमटतो. या ठिकाणी प्राकृत 'अहम्' चे पूजन निर्दिष्ट नाही. प्रेम हे मूल्य मानणारा 'अहम्' उल्लेखित समजावयाचा. आणि तरीही अशा अप्राप्त प्रेमाच्या काव्यात वैयक्तिक सुख-दुःखाचेच गाणे गायिलेले असते. आधुनिक मराठीतील प्रेमगीते किंवा उर्दूतील गझला, वैयक्तिक प्रेमासंबंधीच्याच असतात. यामुळेच त्यात 'मी' आणि 'तू'ची भाषा असते.

तांब्यांच्या प्रेमगीतांची तऱ्हा यापेक्षा थोडी वेगळी आहे. त्यांची रोमँटिक प्रेमाची गीते 'मी' आणि 'तू'ची नसून 'तो' आणि 'ती' ची आहेत. त्यांनी स्वतःच्या प्रेमावर, अथवा 'प्रथम पुरुषी' लिहिले नाही असे नाही. पण ते, स्वपत्नीसंबंधी म्हणजे सफल आणि सांसारिक प्रेमासंबंधी, आहे या प्रेमाला रोमँटिक प्रेमात महत्त्वाचे स्थान नाही.

Our sweetest songs are those
that tell of saddest thought.

दुःखी प्रणयाच्या गीतांत जे माधुर्य असते ते सुखी संसाराच्या गीतांत नसते. तांब्यांची सुखी संसाराची गीते सुंदर आहेत; पण ती आर्त असणे शक्य नाही. त्यात हृदयाचे 'प्रसरण' आहे, पण 'पीळ' नाही. स्वतःच्या दुःखी प्रणयावर, विवाहपूर्व प्रणयावर, वा विवाहबाह्य प्रणयावर तांब्यांनी लिहिले नाही. कदाचित तारुण्यातील ज्या कविता जाळल्याचे त्यांनी स्वतःच सांगितले आहे, त्यात अशा आर्त आणि अप्राप्त प्रेमाच्या कविता जाळल्या गेल्याही असतील. तांबे पराकाष्ठेचे 'सेन्सिटिव्ह' होते,— संवेदनशील होते. त्यांनी तारुण्यातील हा बहुमोल दुःखानुभव घेतला नसेल असे म्हणवत नाही. पण आज त्यांच्या ज्या वैयक्तिक प्रेमाच्या, प्रथमपुरुषी कविता उपलब्ध आहेत,

त्या सफल सांसारिक प्रेमाच्याच आहेत. एखादी वैयक्तिक आकर्षणाची कविता लिहिली असली तरी तिला त्यांनी शुद्ध सौंदर्यपूजनाचे रूप दिले आहे. विशाल गौर भाल, नितंबावर रुळणारा काळाभोर केशकलाप, यांची तांब्यांच्या मनावर पडलेली भुरळ त्यांच्या १९१० सालच्या एका कवितेत नमूद आहे. मात्र त्या कवितेचा आरंभ प्रत्यक्ष शरीर-वर्णनाने करून व पुढे काही बहारीच्या उत्प्रेक्षा करून, तांब्यांनी शेवटी पापवासनेचा म्हणजे शारीरिक आकर्षणाचा धिक्कारच केला आहे !

पापाची स्मृति राहिली जर नरा पाहूनि ही सुंदरी
धिग्धिक् ! त्या कळली अगाध हरिची नाहीच कारागिरी.

तांब्यांच्या वैयक्तिक आर्ततेच्या कवितांत प्रेमकविता कमी आहेत, मृत्यूसंबंधीच्याच कविता अधिक आहेत. मला वाटते आजकालच्या पिढीपुढे आपले तारुण्यातील प्रेम व्यक्त करणे त्यांना आपल्या स्वाभिमानाशी सुसंगत वाटत नसावे. त्यांनी प्रेमाच्या आर्ततेच्या कविता लिहिण्यापेक्षा, प्रेमाच्या धन्यतेच्या कविता अधिक लिहिल्या. दुसऱ्याच्या आर्ततेवर वा प्रेमभंगावर त्यांनी लिहिले. पण त्यातील त्यांची भूमिका प्रेमाचे सार्वभौमत्व पाहून मुग्ध आणि सस्मित झालेल्या प्रेक्षकाचीच होती !

कोणिकडे जादुगरिणी, आज सांग धावा ?
दडपित का तरुणमने चरण हा पडावा ?

या ध्रुवपदाने आरंभणारी सुंदर " चीज " ही नाट्यगीत नसल्याने " वैयक्तिक " म्हणण्यास हरकत नाही. पण तिलाही ' प्रेमगीत ' म्हणता येत नाही. माधवराव पटवर्धनांच्या ' भिल्लीण न तू सुंदरि ... ' या गझलमध्ये जसे केवळ एका सुसज्ज सौंदर्याचे, व त्याच्यापुढे झालेल्या कवीच्या शरणागत मनःस्थितीचे चित्र आहे, तसेच किंबहुना त्याहूनही अलिप्त असे तांब्यांचे या जादुगारिणीचे चित्र आहे. माधवराव म्हणतात :

उत्फुल्ल मिजाशीत पदे टाकित जाशी,
मार्गात किती लोळण घेतात बिचारी !

हे चित्र तांब्यांच्या जादुगारिणीच्या चित्रासारखेच आहे; पण त्याच्याही आधी—

मी होउनि होई वश तूते वनबाले,
आकर्ण धनुष्ये तर का व्यर्थ तयारी ?

या ओळी माधवरावांच्या गझलमध्ये आहेत. म्हणजे त्या वन्यसुंदरीच्याही आधी कवीची तयारी आहे ! पण तांब्यांच्या कवितेत मात्र,

तरुण कवण लक्षिशि जो चरणि लोळवावा ?

असा प्रश्न विचारून कवीने आपली अलिप्तता दाखविली आहे. म्हणजे याही कवितेत केवळ सौंदर्याकर्षण आहे, अभिलाषा नाही.

याचा अर्थ वैवाहिक प्रेमापलीकडे अन्य प्रेम तांब्यांना मान्य नव्हते असे नाही. विवाहपूर्व वा विवाहबाह्य उत्कट प्रेमाची चित्रे तांब्यांनी काढली आहेत. पण ती त्यांच्या वैयक्तिक जीवनातील नसून अन्य व्यक्तींच्या जीवनातील आहेत. विशेष म्हणजे त्यात व्यक्तींचे, प्रसंगांचे आणि नात्यांचे जितके विविधत्व आहे, तितके अन्य कोणाही मराठी कवीने रंगविलेले नाही. त्यातील काही तांब्यांची 'नाट्यगीते' म्हणून ओळखली जातात. कवीच्या स्वतःच्या भावना रंगविणारी भावगीते मराठीत विपुल आढळतात. त्यात उत्कटताही विपुल आढळते. माधवरावांच्यासारखा एखादा आदर्शपूजक कवी ती भावगीते उदात्त पातळीवरही नेऊन ठेवतो. पण वेगवेगळ्या व्यक्तींचे वेगवेगळ्या अवस्थांतील प्रेम रंगविताना, सारखीच उत्कटता आणि प्रत्ययकारिता टिकविणे हे तांब्यांखेरीज कोणासही साधले नाही;—तसे चित्रण करण्याचे कोणाच्या मनातही आले नाही!

भावगीतकार कवी मूलतः आत्मनिष्ठ[1] असतो. मग तांब्यांना अन्य भूमिकांशी एवढे समरस होणे कसे काय साधले? हा प्रश्न मूलतः काव्यासंबंधीचा नसून तांब्यांच्या मनासंबंधीचा व चरित्रासंबंधीचा आहे. माळव्यातील प्रसिद्ध कवी श्री. काळेले यांनी आपल्या ग्रंथात तांब्यांच्या चरित्राचा, वातावरणाचा व मनोरचनेचा विचार मोठ्या मार्मिकपणाने आणि माहीतगारपणाने केला आहे. तांब्यांवर लिहिणाऱ्या इतर प्रसिद्ध लेखकांनी तोच विचार कानावर हात ठेवून, अथवा 'नॉनकमिटल' पद्धतीने केला आहे. काही काल्पनिक उपपत्तीही सुचवल्या आहेत. पण त्यांचा एखादा समवयस्क आणि समानधर्मा मित्रच या प्रश्नावर अधिक प्रकाश पाडू शकला असता. तांब्यांनी आपल्या नाट्यगीतांतील विविध व्यक्ती आणि प्रसंग आपल्या आयुष्यात प्रत्यक्ष पाहिले असतील काय? तेही अशक्य नाही. कारण इतर काही आधुनिक कवींप्रमाणे त्यांचे जीवन एकमार्गी नव्हते. राजपुत्राचे शिक्षक, डाकूंच्या प्रदेशातील पोलिस सुपरिंटेंडेंट, येथपासून ते शिक्षणखात्याचे रजिस्ट्रार येथपर्यंत विविध प्रकारचे व्यवसाय त्यांनी केले होते. दोन–तीन राज्यांतल्या जवळ जवळ चौदा–पंधरा गावी त्यांचे वास्तव्य झालेले होते. एवढ्या संचारात त्यांनी अनेकांच्या संसारकथा ऐकल्या असतील, अनेकांची सुखदुःखे पाहिली असतील. त्यांनी चितारलेल्या प्रेमकथांपैकी आणि सौंदर्यचित्रांपैकी काहींची पार्श्वभूमी,—रसिक श्रोते भेटल्यास क्वचित, ते स्वतःही सांगत असत. त्यातील प्रसिद्ध म्हणजे 'पन्नास वर्षांनंतर' या हृदयविदारक प्रेमगीताची पार्श्वभूमी होय. १९२७ च्या सुमाराला तांबे पुण्यास आले असता, त्यांच्या स्वतःच्या तोंडून ती ऐकल्याचे मला स्मरते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, माधवराव पटवर्धन यांनी संपादिलेल्या व नंतर प्रो. जोग यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध झालेल्या आवृत्तीत मात्र (मायदेवांच्या आवृत्तीत अग्रभागी असलेल्या) या महत्त्वाच्या पार्श्वभूमीला शेवटी टीपांत स्थान देण्यात आले आहे. अशाच विविध सूचक सत्यकथा

---

[1] *'आत्मनिष्ठ' हा शब्द मराठीत* subjective *या अर्थाने रूढ होता व त्याच अर्थाने तो येथे वापरला आहे. त्याचा मर्ढेकरी वापर मला मंजूर नाही.*

तांब्यांच्या विविध नाट्यगीतांमागे होत्या काय ? या प्रश्नाचे उत्तर त्यांचे भक्तही देऊ शकणार नाहीत, की त्यांचे अधिक्षेपकही देऊ शकणार नाहीत. तांब्यांच्या नाट्यगीतांच्या बाबतीत पुष्कळदा ब्राउनिंगच्या नाट्यगीतांचा आणि ' स्वगतां 'चा उल्लेख केला जातो. पण ब्राउनिंग् हा एक प्रकारचा मनोविश्लेषक होता. त्याला आपल्या वाचकांच्या अवधान-शक्तीला आणि आकलनशक्तीला आव्हान देऊन लिहिण्याची खोड होती ! तांबे त्या भानगडीत पडत नसत. त्यांची भूमिका मल्लाची वा मानसविदारकाची नसे. म्हणूनच त्यांची नाट्यगीते,—Dramatic lyrics, ' ड्रॅमॅटिक् 'पेक्षा अधिक ' लिरिक् 'कडेच झुकत होती. ज्या परभूमिकेत तांबे शिरत तिचे रोगनिदान करणारे डॉक्टर बनण्याची त्यांची इच्छा नसे ! त्या नाट्यात्मक पात्रांवरही त्यांचे प्रेम असे व आपल्या काव्याच्या वाचकां-वरही त्यांचे प्रेम असे. प्रेमाची कथा ते जणू प्रेमी जनांनाच सांगत आहेत,—नव्हे, गाऊन दाखवत आहेत, अशी त्यांच्या प्रेमगीतांची रचना आणि लय असे !

पण मुख्य समस्येची गाठ अद्याप सुटलेलीच नाही ! छप्पन्न व्यक्तींच्या छप्पन प्रेमप्रसंगावर लिहिलेल्या परलक्षी भावगीतांत, तांबे एवढी उत्कटता कशी भरू शकले ? मी वर म्हटलेच आहे की, हा प्रश्न माझ्यापुरता तरी काव्यशास्त्रविषयक नसून चरित्र-विषयक आहे. सुमारे चाळीस–पंचेचाळीस वर्षांमागे तांब्यांच्या पुण्यात होणाऱ्या मुक्का-मात, मला तांब्यांना जवळून पाहायला ऐकायला मिळालेले आहे,—ती पर्वणी मी सुवर्णसंधी समजून साधलेली आहे. पण जवळ गेल्यावरही ते मला ' दूरच ' वाटले ! मी आज देखील संकोची आहे, त्या वेळी तरुण आणि अप्रसिद्धही होतो. पण तांबे ' दूर ' वाटण्याचे कारण हे नव्हे. मायदेव, गिरीश, माधवराव, गोपीनाथ तळवलकर हेही तांब्या-पासून माझ्याइतकेच दूर आहेत, असे मला वाटले. पुण्यातील या बैठकांत हा मालवीय महाकवी ' मनमोकळा नव्हता ', ' उच्चभ्रू आणि प्रतिष्ठापूजक होता,' असे खासच नव्हे. मायदेव, माधवराव, गिरीश यांच्याशी ते पुष्कळच मोकळेपणाने व प्रेमाने वागत. त्यांचे काव्यगायन म्हणजे नुसते काव्यवाचन नसे, ते (आवाज अनुकूल नसूनही) राग-दारीत काव्यगायन असे. पण ते नुसते गायनही नसे. ते तल्लीन, खेळकर, साभिनय गायन असे. त्यात मधूनच इंग्रजी कवींच्या सदृश ओळी उद्धृत केल्या जात; त्यात उत्स्फूर्त इंग्रजी वाक्यात अप्रतिम काव्यचर्चा ऐकवली जाई; इतर नव्याजुन्या कवींनी आपल्या कविता म्हणून दाखवल्यावर त्यांचे भरपूर प्रेमळ कौतुक होई; आणि तरीही भास्करराव कुठेतरी दूर आपल्यापेक्षा उंच जागी रमले आहेत असे वाटे !

आणि ते खरेच होते. तांब्यांच्या काळीच काय, पण नंतरही त्यांच्याइतका अस्सल भारतीय आणि नितान्त सश्रद्ध कवी झालेला नाही. एक अपवाद रे. टिळकांचा मनात येईल. पण या भारतीय कवीच्या श्रद्धेला धर्मान्तराचा डाग लागलेला होता. दुसरा अप-वाद चंद्रशेखरांचा खासच आहे. पण ते सश्रद्ध असले, तरी खऱ्या अर्थाने ' आधुनिक ' नव्हते. तांबे आधुनिकही होते, भारतीयही होते, आणि ईश्वरनिष्ठही होते. म्हणजेच ते त्यांच्या पूर्वगामी कवींहून आणि समकालीन कवींहून वेगळे होते. आपण आधुनिक मंडळी

तोंडाने काहीही बोललो, तरी अंतरंगात डोकावून पाहिल्यास संशयवादीच असतो ! आपण पुरते भारतीयही नसतो. आपल्यावर इंग्रजीचा दाट संस्कार असतो, हा मुख्य फरक नव्हे. तांब्यांच्या मनावर इंग्रजी काव्याचे संस्कार आपल्याहूनही खोल झालेले होते. पण त्यांच्यावर जुन्या मराठी आणि संस्कृत काव्याचेही संस्कार तितकेच खोल झालेले होते. त्याहूनही मुख्य गोष्ट म्हणजे, ते अस्सल मराठी आणि अस्सल स्वदेशी वातावरणात वाढलेले होते. अस्सल मराठी वातावरण मला इंदूर–ग्वाल्हेरकडे जेवढे पाहायला मिळाले, तेवढे पुण्या–मुंबईकडे पाहायला मिळाले नाही. म्हणजे तांब्यांना, लेले मास्तरांसारख्या गुरुजनांचा जेवढा फायदा झाला, तेवढाच ते संस्थानी वातावरणात जन्मले व वाढले याचाही झाला. पण विपरीत गोष्ट ही की, आमचे टीकाकार, त्यांचे संस्थानी संस्कार म्हणजे त्यांच्यातील एक दुर्दैवी वैगुण्य समजतात ! पण त्यांच्या भारतीयत्वामुळे व सश्रद्धतेमुळे त्यांच्या उत्कट नाट्यगीतांचा आणि परलक्षी प्रेमगीतांचा खुलासा होत नाही. उलट प्रेमचित्रातील या उत्कटतेला आणि मोकळेपणाला इंग्रजी कवींनी निश्चित बळ दिले असले पाहिजे. स्त्रीपुरुषप्रेमसंबंधाकडे निर्मळ आनंदाने पाहण्याचे बळ हिंदू कवींना इंग्रजी कवींनी दिले, हे नाकबूल करता येणार नाही. पण इतर कवींहूनही तांब्यांच्या प्रेमगीतांत उत्कटपणा आणि प्रसन्नपणा आला आहे, याचे कारण केवळ इंग्रजीने दिलेले बळ हेही नव्हे. ते केवळ स्वतःच्या सुखदुःखावर, स्वतःच्या सौंदर्याकर्षणावर, स्वतःच्या प्रेमावर वा प्रेमभंगावर लिहिणारे कवी नव्हते. त्यांना केवळ स्त्रीचेच आकर्षण जाणवले होते असे नाही; तर प्रेम ही भावना कुठेही दिसो, कशीही दिसो, ती जाणत्यांची असो किंवा अजाणांची असो, तिचे सौंदर्य त्यांना आकृष्ट करीत असे. स्वतःच्या वैयक्तिक भावनांपेक्षाही, हे विश्वाला वेढून टाकणारे प्रेम त्यांना अधिक तल्लीन करीत असे. पण म्हणून त्यांनी कधी विश्वात्मक प्रेमाची 'वेडगाणी' लिहून 'दुर्बोध' या अर्थाने गूढगुंजन केले नाही. त्यांची प्रेमचित्रे स्पष्ट, ठळक आणि व्यक्तिविशिष्ट (Concrete) अशीच आहेत. केशवसुतांना, 'सतारीचे बोल' या त्यांच्या प्रमुख कवितेच्या अखेरीस 'आपली विभूती सर्व विश्वात स्फुरत पसरली' असे वर्णन करावे लागले आहे. आणि ते वर्णन थोडे 'अहं ब्रह्मास्मि' च्या वळणावरच गेले आहे ! उलट व्यक्तीचे–प्रेम आणि विश्वाचे प्रेम या दोहोंत तांबे एक सहज लय साधू शकते. या सुंदर लयीचे प्रत्यन्तर "या क्षिप्राचमळा परस्पर कशा" या कवितेत येते. त्यात स्वतःच्या पत्नीप्रेमाचे स्मरण आहे, निसर्गातील भव्य सौंदर्याचे दर्शन आहे, आणि शेवटी आनंदाच्या वाटेने सृष्टीशी वेदान्तररहित एकरूपताही आहे ! 'केशवसुतांप्रमाणे'–

दिक्कालांसही अतीत झालो;
उगमी विलयी अनंत उरलो.

अशी, वेदांताच्या स्टॅम्पवर गद्य ग्वाही देण्याचे तांब्यांना कारण पडले नाही ! ते आनंदाच्या भाषेत सरळ बोलून जातात,—

आरोळ्या पिटतो मदे शिशुपरी नाचोनी मी या स्थळी,
संवादीच गभीर, खोल घुमते आरण्य शब्दावली.

भारतीयता, आनंदमयता, सुस्पष्टता (Concreteness) आणि 'गेयता'– नव्हे, 'गानस्वरूपता', ही तांब्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये होत. ही कोणाही आधुनिक कवीच्या काव्यात––केशवसुतांतही, गडकऱ्यांतही, माधवरावांतही', अनिलांतही––एवढ्या प्रमाणात आढळून येत नाहीत. त्यांची, 'वाटेच्या वाटसरा!', 'आज फिरुनि का दारी', 'ते कोण या ठायि?', 'वायो, खुणव तीस', 'पन्नास वर्षांनंतर' यांसारखी प्रेमभंगाची चित्रेही तल्लीनतेने आणि संगीताने भरून आली आहेत, याला कारण त्यांची समकालीन समाजापासून दूर आणि उंच अशी भूमिकाच होय.

आजच्या काळात,––नव्हे, केशवसुतांच्या काळापासूनच, आपण अंतःकलहाच्या (Conflict च्या) कवितेला महत्त्व देऊ लागलो आहोत. तांबे 'कलहा'च्या पलीकडे गेले होते. त्याला कारणे दोन : एक म्हणजे त्यांना जीवितातील अंतिम मूल्य सापडले होते. प्रेम हेच अंतिम मूल्य आणि अंतिम सौंदर्य होय, या प्रतीतीपर्यंत ते पोचलेले होते; व त्या 'हद्दीपलीकडील' ठिकाणाहूनच ते प्रेमभंगाचीही चित्रे काढीत होते. म्हणून त्यात चीड नाही, Chafing नाही! व्यक्तीविरुद्धही नाही, दैवाविरुद्धही नाही, की समाजाविरुद्धही नाही! चित्र आहे, लय आहे, सौंदर्य आहे, पण चीड नाही. त्यांच्या जीवनदृष्टीत आणि जीवनचित्रात कृतज्ञ स्वीकारवृत्ती आहे! शाश्वत सृष्टिक्रमाचा स्वीकार करणे ही गोष्ट समकालीन संस्थांविरुद्ध बंडाची भाषा करण्यापेक्षाही अधिक महत्त्वाची आहे. ज्यांची भिस्त सामाजिक क्रांतीवर असते, त्यांच्या वाट्याला असंतोष येतो; ज्यांचा विश्वास ईश्वरी योजनेवर असतो, त्यांच्या वाट्याला चिर समाधान आणि कृतार्थता येते. सध्या पाश्चात्त्य देशांत काय, की आपल्या देशात काय, असंतोषाच्या काव्याचा (Poetry of revolt चा) उदोउदो होत असतो. फार तर अर्धसत्य म्हणून या मताचा स्वीकार केला, तरी तेवढ्याने संतोषाची काव्ये दुय्यम प्रतीची ठरविण्याला समर्थन प्राप्त होत नाही!

समकालीन प्रश्नांचा विचार हा संपूर्ण जीवनाचा विचार नसून जीवनाच्या क्षणिक बाजूचा विचार असतो. असा क्षणिक प्रश्नांचा विचार गद्यावर सोपवणे बरे! किंबहुना वृत्तपत्रांवर सोपविणे बरे, असा तांब्यांचा सूर दिसे. या भूमिकेवरूनच ते केशवसुतांच्या कित्येक विषयांवर आणि राग–लोभांवर टीका करीत. संपूर्ण जीवन हा कवीचा प्रांत होय. त्यावरही एखादा उमरखय्याम वा भर्तृहरी नैराश्यगीत लिहू शकेल; पण तांब्यांना जीवनात सौंदर्य, आनंद आणि संतोष आढळला हे त्यांच्या अन्तरात्म्याचे सामर्थ्य आणि सौंदर्य होय. उर्दू कवी जौक म्हणतो––

"बाई दीपज्योती, तुझं आयुष्यच मुळात एक रात्र! मग ती तू रडून काढण्यापेक्षा हसून का काढीत नाहीस?"

ऐ शमा! तेरी उम्रे तबई है एक रात।
रोकर गुजार या उसे हंसकर गुजार दे॥

जे दीपज्योतीला लागू, तेच जीवनज्योतीलाही लागू !

पण जौकसारखे उर्दू कवी काहीसे नाइलाजाने हा आनंदमार्ग सांगत आहेतसे वाटते. ज्यांना प्रेम हे अन्तिम मूल्य सापडले, त्यांचे जीवन, मूलतःच आनंदमय बनते. आर्ततेप्रधान रोमँटिसिझमचा परिपाक अखेर तृप्तिप्रधान, आनंदमय गूढवादात होतो. जो अग्नी केशवसुतांच्या काव्यात नुसता 'धुमसत' होता, म्हणजेच 'धुमावृत' होता, त्याचीच तांब्यांच्या काव्यात स्वच्छ तेजस्वी ज्योत बनली ! प्रेमरूपी जीवनाधारापर्यंत हात पोहोचल्याचा तो परिणाम होता.

नारद भक्तिसूत्रात म्हटले आहे :

"यत् प्राप्य न किंचित् वाञ्छति, न शोचति
न द्वेष्टि, न रमते, नोत्साही भवति ।
यत् ज्ञात्वा मत्तो भवति, स्तब्धो भवति
आत्मारामो भवति !"

"जे (प्रेम) मिळाल्याने मनुष्याला कुठलीच इच्छा राहात नाही; शोक, द्वेष राहात नाही, इतर कशात 'राम' राहात नाही, इतर कशाची धडपड राहात नाही—
जे जाणल्याने मनुष्य बेहोश बनतो, अवाक् बनतो, आत्मानंद–निमग्न बनतो !"

त्या 'प्रेमा'नेच तांबे मत्त आणि धुंद होते ! त्यांच्या सौंदर्यवादाचा परिपाक, गूढवादी तृप्तीत झाला होता !

• •

गूढवाद : केशवसुत आणि तांबे

'क्षणात नाहीसे होणारे दिव्यभास' ही केशवसुतांची कविता एका वेगळ्याच दृष्टीने चिंतनीय आहे. एक अदृष्टपूर्व अशी सुंदरी कवीच्या अंतरात्म्याला एकदा दिसली. सर्व जगप्रसिद्ध सुंदरींच्या नावांनी त्याने तिला संबोधून पाहिले, पण ती ढुंकून देखील पाहिना. अखेर सर्वस्वी अभिनव असे नाव तिला दिल्यावरच तिने मागे वळून पाहिले. या अपूर्व सौंदर्यामुळे बेभान बनलेला कवी, अखेर रूक्ष व्यवहाररूपी 'आक्काबाई'च्या कर्णकटू हाकेमुळे शुद्धीवर आला. अर्थात ते दिव्यदर्शन तो विसरून गेला. पुन्हा त्याच परिसरात फिरत असता, त्याला त्या घटनेची पुसट आठवण झाली. परंतु त्या सुंदरीचे नामरूप मात्र त्याला मुळीच आठवेना. कवी शेवटी विलाप करून म्हणतो–

हा ! हा ! हे जर सर्व भास धरता येतील माते तर
पृथ्वीचा सुरलोक की बनवुनी टाकीन मी सत्वर.

केशवसुतांची ही कविता गूढवादी आहे असे वाटण्याचा संभव आहे. एखाद्या दुर्लभ क्षणी कवीला अपूर्व सत्याचे किंवा सौंदर्याचे त्रुटित दर्शन झाले, तर तो एक प्रकारचा काव्यातील साक्षात्कारच होय. अशा प्रकारचा अपूर्व आणि अलौकिक 'Glimpse' हा गूढगुंजनात्मक काव्याचा विषय खास होऊ शकेल आणि हाच केशवसुतांच्या या कवितेचा विषय आहे, अशी कल्पना होण्याचा संभव आहे. परंतु या कवितेचा विषय अपूर्व सौंदर्यदर्शनाने मनाची झालेली अनिर्वचनीय स्थिती हा नसून, अशा त्रुटित सौंदर्यदर्शनाचा अचपळपणा किंवा Elusiveness हा आहे आणि सौंदर्यदर्शनाच्या चांचल्याची तरी कवीला खंत का वाटत आहे ? तर ही सर्व त्रुटित-दर्शने अथवा Glimpses त्याला 'धरता' येत नाहीत म्हणून ! (अत्युत्कट क्षणीही केशवसुतांचे भाषा-दारिद्र्य त्यांना किती रूक्ष भाषेचा आश्रय करायला लावी, ते 'भास धरतां येणे' या रसापकर्षक शब्दप्रयोगावरून सहज ध्यानात येईल !)– सारांश, ही कविता गूढानुभवाने अमर झालेल्या क्षणासंबंधी नसून, ते अनुभव अमर करण्याविषयीच्या असमर्थतेसंबंधी आहे.

' शब्द बापुडें केवळ वारा ' हेच तत्त्व आणि हाच अनुभव कवीला येथे सांगावयाचा आहे. कवींना काही अपूर्व क्षणी जे भास होतात, ते जर त्यांना काव्यात चिरस्थायी करता आले असते, तर केशवसुतांचे लाडके ' सुरलोकसाम्य ' त्यांनी पृथ्वीला अर्पण केले असते. ' मर्त्य जगाच्या आणि शाब्दिक अभिव्यक्तीच्या अपूर्णतेसंबंधी विलाप ' हा या कवितेचा विषय आहे; ' दिव्य जगाची आणि अमूर्त सौंदर्याची अपूर्वता ' हा तिचा विषय नव्हे. खिन्नता आणि व्याकुळपणा ही तिजमधील वृत्ती आहे; धन्यता आणि स्तिमितता ही नव्हे. व्याकुळपणा अथवा Yearning हा रोमँटिक कवितेचा विषय होय; तर धन्यता आणि स्तिमितता हे गूढगुंजनात्मक कवितेचे विषय होत.

' हरपले श्रेय ' ही कविताही गूढगुंजनाच्या विवेचनात एक कसोटीची कविता ठरण्यासारखी आहे. ' बी 'च्या गूढगुंजनात्मक कवितांप्रमाणे, या कवितेतही प्रथमपुरुषी स्त्रीलिंगातच निवेदन आहे.

होत्यें अजाण माहेरीं,
तों खेळ खेळल्यें परोपरी

' ज्या लेखनाला उघड अर्थाव्यतिरिक्त आणखी एखादा गूढ अर्थ असतो, ते गूढगुंजनात्मक लिखाण होय ' या कामचलाऊ व्याख्येप्रमाणे ही कविता शंभर टक्के गूढगुंजनात्मक म्हणता येईल. ' पण गूढ म्हणजे खोल ' या अर्थाने पाहता या कवितेतील गुप्त अर्थ एकदा कळला, की तिजमध्ये फारसा खोल अर्थ उरत नाही. ही कविता गूढगुंजनाचा एक नमुना म्हणून उल्लेखिण्यासारखी आहे; परंतु गूढगुंजनात्मक कवितांपैकी श्रेष्ठ कविता म्हणून उल्लेखिण्यासारखी मात्र नाही. आपल्या जुन्या कवींच्या ' भारूडात ' कोड्यासारख्या किंवा उखाण्यासारख्या काही कविता आहेत. उखाण्याचे उत्तर उघड नसते, या अर्थाने तो ' गूढ ' असतो; परंतु एकदा ते उत्तर सुचले किंवा कळले, म्हणजे मग त्या उखाण्यात ' गूढ 'ता मुळीच राहात नाही. उलट इतका वेळ आपणाला हे उत्तर का सुचले नाही म्हणून ते कोडे सोडविणाराला नवल वाटत राहाते. खऱ्या गूढगुंजनात उत्तर सुचणे किंवा गूढार्थ सापडणे हे हिकमतीचे काम नसून, ते कवीच्या भूमिकेत शिरण्यावर अवलंबून असते आणि एकदा गूढ अर्थ सापडला की संपले, असे वाटत नसून त्या गूढार्थाचा जितका विचार करावा, तितका अधिक अर्थ सापडत जातो. तांब्यांच्या ' नववधू 'मध्ये ' मृत्यू म्हणजे जीवात्म्याचा नाश नसून प्राणसख्याच्या घरून आलेले मूळ होय.' हा अर्थ प्रतीत झाल्यावर, ' उखाणा ओळखल्यासारखे वाटत नाही, तर एका नव्या भूमिकेत, नव्या साक्षात्कारात प्रवेश केल्यासारखे वाटते. उलट ' हरपले श्रेय ' या कवितेतील काही गूढ उद्‌गार पाहा. या कवितेतील ' ती ' कोण ? तिचे ' माहेर ' म्हणजे बाल्यांतील निष्पापपणा की काय ? जे हरवले आहे ते काय ? मथळ्यावरून ' श्रेय ' हरवले आहे एवढेच मोघम कळते. ' खऱ्या घरी ' देखील या कवितेतील श्रेयवादीनीला ' लटकिच झाल्यें संसारी ' असे का वाटते ? ' दिलें हिरण्मय । हाती मृण्मय । ' या अनुप्रासयुक्त

ओळींनी काहीतरी आतबट्ट्याचा व्यापार सूचित होतो, परंतु जीवनाविषयीच्या खोल अनुभूती जागविल्या जाण्याऐवजी चमत्कृतिपूर्ण शब्दयोजनेकडेच लक्ष अधिक वेधते.

मी न करिन का तेवि तधीं ?
माझे मज लाभेल जधीं

असेही या कवितेतील ' ती ' सती जाणाऱ्या स्त्रीचा आणि दीपशिखेवर उडी घेणाऱ्या पतंगाचा दाखला देऊन म्हणते. यावरून तिला, ज्यात जीवनाचे व त्यागाचे सार्थक होईल असे ध्येय सापडत नाही, असा उघड अर्थ होतो. तर उलट पहिल्या काही ओळीवरून ' जे काही हरपले आहे ' ते म्हणजे बाल्यातील मुग्धता होय असे वाटते.

सारांश, ही कविता खोल या अर्थाने गूढ नसून ' कूट ' व ' संदिग्ध ' या अर्थाने ती गूढ आहे. मात्र या कवितेत गूढत्वाचे एक वेगळेच कारण दिसून येते. ते म्हणजे ' अनामिक हुरहूर ' हे होय. अर्थाने गूढकाव्यापेक्षा रोमँटिक काव्याशीच या लक्षणाचे नाते अधिक जवळचे आहे. काय हवे आहे, तेच न कळणे हे अपक्व मनाचे अथवा ' ॲडोलेसन्स 'चे लक्षण आहे. रोमँटिसिझम् हे अर्थातच अपक्व वयातील मनोरचनेला अधिक जवळ आहे. सारांश, ' हरपले श्रेय ' ही कविता अभिव्यक्तीच्या अस्पष्टतेच्या दृष्टीने गूढ, पण अनुभूतीच्या दृष्टीने पाहता रोमँटिक संप्रदायाची आहे, असेच म्हणावे लागेल. तिचा बाह्य आविर्भाव मात्र जुन्या वेदान्ती गूढगीतांसारखा असल्याने, तिला गूढगुंजनात्मक म्हणण्याचा मोह पुष्कळांना झाला आहे.

भीडभाड माझी फिटली
जग म्हणतें की ' ही उठली ! '
जनमर्यादा धरूनी कसें
अमर्याद तें मज गवसें ?
एक शब्द बोलेन जरी
सकलां कुंठित करिन तरी !

ही या ' श्रेयवादिनी 'ची भाषा,—

लोक कहे मीरा भयी बावरी

या मीराबाईच्या भाषेसारखी आहे, पण मीराबाईला स्वतःला, ' काय हवे ' हे माहीत होते. तर या कवितेतील ' ती ' ला काय हवे आहे, ते तिचे तिलाच माहीत नाही. एका कडव्यात मात्र तिने तिच्या श्रेयाची पुसट कल्पना दिली आहे.

जेथें ओढे वनराजी
वृत्ति रमे तेथें माझी;
कारण कांहीं साक्ष तिथें
मग त्या श्रेयाची पटते.

जर निसर्गसान्निध्यात तिला आपल्या श्रेयाची साक्ष पटत होती, तर मग जे 'हरपले' होते, ते निसर्गसान्निध्यात तरी तिला सापडत असे, असेच नव्हे का? पण नव्हे! कारण इथे पुन्हा कवीने 'क्षणांत नाहीसे होणारे दिव्य भास' या कवितेतील चुणुक दाखविली आहे. निसर्गाच्या सान्निध्यात ज्याची 'काही साक्ष' पटते, तेही

स्वभाव दावुनि
परि तें झटदिनि
जाई लोपुनि
मग मी हाका मारितसें.

असे या कवितेतील 'ती' म्हणते! या कडव्यातील 'स्वभाव' शब्द लक्षात घेण्यासारखा आहे. येथे पुन्हा स्वतःचा अनुभव सांगण्याऐवजी, कवी जुन्या वेदान्त परिभाषेच्याच गळ्यांत पडत आहे!

कवीने कवितेला जी स्वतःची प्रास्ताविक टीप जोडली आहे, तिच्यात तो 'ती' म्हणजे उदात्त बुद्धी असे म्हणतो. जे 'हरपले' आहे ते, म्हणजे 'अलौकिक असे जे काही' ते, असे सांगतो हे 'अलौकिक' मुळात प्रत्येक जीवाला लाभलेले असते, असेही कवीला म्हणायचे आहे. म्हणजे बाल्यातल्या निष्पाप अवस्थेतून व्यवहारी जीवनात आल्यावर पुन्हा निष्पाप अशा आदर्श अवस्थेची जी ओढ लागते, ती म्हणजेच 'हरपले श्रेय' की काय? कारण हा आक्रोश केशवसुतांनी 'पुष्पाप्रत' या कवितेत, व अप्रत्यक्षपणे 'म्हातारी' या कवितेतही केला आहे. तात्पर्य, या कवितेचा बराबाईट 'आशय' सांगता येतो; तो 'कूट' या अर्थाने 'गूढ' आहे, हेही सांगता येते, परन्तु आपण या विवेचनात गूढगुंजनाच्या ज्या कसोट्या ठरविल्या, त्यांच्याद्दष्टीने पाहता, 'हरपले श्रेय' ही कविता 'गूढगुंजनात्मक' आहे का? हा प्रश्न पुन्हा उरतोच. खऱ्या आणि खोल गूढगुंजनात ही कविता बसत नाही, हेच या प्रश्नाचे उत्तर आहे. उलट 'अनामिक हुरहूर' हा ज्या रोमँटिक कवितांचा विषय असतो, त्यांच्या वर्गातही ही कविता नीट बसत नाही. कारण यांतील असंतोष प्रायः आध्यामिक असल्यानेच तो वैयक्तिक नसून सार्वत्रिक आहे, व त्याचे मूळही सुप्रसिद्ध आहे.

'रोमँटिक' आणि 'गूढवादी' यांच्या सीमेवरील एक सुंदर कविता म्हणून तांबे यांची 'घट भरा शिगोशिग' ही प्रसिद्ध कविता निर्देशिता येईल. मानवी सुखातील अपूर्णता हा या कवितेचा विषय आहे. अथवा ही कविता ज्या अनुभूतीतून सुचली तिच्यातून हा स्वाभाविक निष्कर्ष निघतो, व त्याबरोबरच कवीच्या तोंडातून एक प्रार्थनाही बाहेर पडते. कवी 'मानवी सुखाच्या अपूर्णते'वर कविता लिहावयास बसलेला नाही. एका अपूर्व आनंदाच्या क्षणी, त्याला सर्वच मानवी सुखे अपूर्ण आणि डागळलेली आहेत, हे जाणवते, व तो परम आस्तिक असल्याने, एका आर्त प्रार्थनेने या कवितेचा प्रारंभ करतो.

घट भरा शिगोशिग भरा भरा
वाहुं द्या दयेचा वरूनि झरा

ही प्रार्थना त्याला ज्या वैयक्तिक अनुभूतीच्या क्षणी सुचली ती वैयक्तिक अनुभूती शेवटच्या कडव्यात बाहेर पडली आहे,

ज्योतिर्मय जी सखिची ही कान्ती
वाटे कीं मुरवावी स्वान्ती
'झकाण्डीच दे येइ न हातीं
ही माया निज संहरा, हरा ॥

घट भरा. ध्रु.

कवीच्या काव्यलेखनाच्या वेळच्या वृत्तीच्या दृष्टीने, या शेवटच्या कडव्याला सर्वांत अधिक महत्त्व आहे; त्याच्या खालोखाल महत्त्व ध्रुवपदांत केलेल्या आर्त आक्रोशाला आहे. खालोखाल म्हणण्याचे कारण, प्रियेच्या शरीरावरील कान्ती स्वतःच्या अन्तरंगात मुरवावी ही अनिवार लालसा आणि त्या धडपडीत येणारे सम्पूर्ण अपयश, हा कवीचा स्वतःचा उत्कट अनुभव आहे; तर 'मानवी सुखांचा घट अपुरा भरू नका!' ही त्याला त्या अनुभवातून स्फुरणारी प्रार्थना आहे. ही प्रार्थना तितकीच उत्कट असली, तरी अनुभव खास स्वतःचा व वेदनामय आहे; तर उलट प्रार्थना सार्वलौकिक व आशामय आहे. (अंधुक का होईना, पण 'आशा' हा कोणत्याही प्रार्थनेचा पायाच होय, हे विसरता येत नाही.) या वैयक्तिक वंचनेतून कवीला सर्व दुनियेची राहाटीच तशी आहे हे सुचते. ही राहाटी वर्णिताना मात्र कवी काहीशी सांकेतिक उदाहरणेही घेतो. पुत्रजन्मापेक्षा अधिक मोठा आनन्द कोणता असू शकेल? पण त्या आनन्दाच्या क्षणी स्वतः माता मात्र तो आनन्द भोगण्याला शरीरतःच असमर्थ असते. मानवी जीवनातील अशी कित्येक ठराविक "शल्यें" व "न्यूनें" कवीने उल्लेखिली आहेत. व ती दूर करण्यासंबंधी परमेश्वराला प्रार्थना केली आहे ही सार्वत्रिक आणि सांकेतिक शल्यें उल्लेखिल्यावर कवी कलात्मक स्वानुभूतीला अधिक जवळ अशा इतर शल्यांचा उल्लेख करतो. चित्र, गायन आणि काव्य या तिन्ही कलांच्या क्षेत्रात जे अभिव्यक्तीचे साधन तेच अभिव्यक्तीतील विघ्न ठरावे, यापेक्षा दुर्दैव ते कोणते? मानवी आनन्दाच्या मागे अपूर्णता जणू हात धुऊन लागली आहे, असे कवीला आढळून येते. या सार्वत्रिक शल्यांचा उल्लेख केल्यावर मगच, कवी वैयक्तिक प्रेमजीवनातील व सौंदर्यानुभूतीतील

---

[1] *मी येथे तांब्यांनी मुळात लिहिलेली ओळ उद्धृत केली आहे. त्याऐवजी झुळकाण्डी दे' असा बदल दुसऱ्या आवृत्तीचे संपादक माधवराव पटवर्धन यांनी, वृत्तविषयक पुस्तकी आग्रहामळे केला. परंतु त्यामुळे या ओळीच्या आघातातील जोर जाऊन ती दुबळी होते, हे त्यांनी लक्षात घेतले नाही.*

शल्य, अखेरचा बाण म्हणून उघड करतो. यात निःसंशय स्वाभाविकताही आहे आणि कलात्मकताही आहे. शेक्सपियरच्या ज्यूलियस् सीझरमधील एका गौण परंतु नितान्त हृदयविदारक प्रवेशात कॅशस् आणि ब्रुटस् या मित्रांचा खाजगी खटका उडालेला दाखविलेला आहे. ते जणू राजकारणातील मतभेदावरून व चुरशीवरून भांडत आहेत, असे प्रथमदर्शनी वाटते. परंतु काही वेळ एकमेकांच्या मर्मावर आघात केल्यावर त्या दोघांपैकी ब्रूटस् अचानक एक दुःखद वृत्त सांगतो, आणि त्या प्रवेशाचे स्वरूप एकदमच पालटते.

Cassius : I did not think you could have been so angry
Brutus : O Cassius I am sick of many griefs.
Cassius : Of your philosophy you make no use.
If you give place to accidental evils.
Brutus : No man bears sorrow better Portia is dead[१]

कुरबूर आणि भांडण हे ज्या संवादाला बाहेरून रूप आले, त्याच्या आत एका बाजूला असह्य दुःख आणि दुसऱ्या बाजूला शीघ्र सहानुभूती लपलेली होती. पण वैयक्तिक दुःख नाइलाजाने अगदी अखेरीला बोलण्याचा गंभीरप्रकृती व्यक्तींचा स्वभाव शेक्स्पियरने येथे ज्या कलात्मक रीतीने दाखविला आहे, त्याच कलात्मकतेमुळे तांब्यांच्या या कवितेतील प्रमुख भावना शेवटच्या कडव्यात येते.

या कडव्यातील विशिष्ट रोमँटिक हळहळीचा विस्तार 'सौंदर्यवादा 'वरील विवेचनात थोडाफार झालाच आहे. सौंदर्यवादी मनाची ठेवण ज्याला समजली नाही, त्याला या कडव्यातील दुःख खुळेपणाचेच वाटण्याचा संभव आहे. सौंदर्यवादी मनाची ठेवण समजण्याला वाचनाचा किंवा बुद्धिमत्तेचा उपयोग नसून सहानुभूतीचा किंवा सहृदयतेचाच उपयोग आहे, हे मात्र येथे पुन्हा सांगितले पाहिजे. प्रियेची कान्ती अन्तरंगात मुरवायची म्हणजे काय ?– व ती कशाकरिता ? आणि ती कान्ती हाती लागत नाही या गाऱ्हाण्याचा अर्थ तरी काय ? आरशातल्या बाळाचा गालगुच्चा घेण्याकरिता आरशाची काच चिमटीत धरू पाहणाऱ्या खुळ्या पोरात आणि पन्नाशीच्या घरातील भास्करराव तांब्यांत फरक काय ? अशा प्रकारचे प्रश्न सौंदर्यवादासंबंधी आत्मीयता नसलेले लोक विचारण्याचा संभव आहे.

सौंदर्यवादावरील विवेचनात निसर्गविषयक भावनेसंबंधीचा इमर्सनचा जो उतारा उल्लेखिला आहे, त्यातच या सौंदर्यवादी भावनेची उपपत्ती मिळेल. सौंदर्यपूजक मनाचे हे लक्षणच आहे की, त्याला सौंदर्य नेहेमीच 'पुरेसे जवळ आले नाही'[२] असे वाटावे. कलेतही रेखीव, वस्तुनिष्ठ, अशा बाह्यवर्णनांच्या ते हाती लागत नाही, म्हणून तर

१. Julius Caesar : Act IV Sc. III.
२. 'Near but not near enough' Emerson Essays :

सौंदर्यवादी कवी वस्तुवर्णनापेक्षा स्वतःच्या मनःस्थितीचे वर्णन करणेच अधिक पसंत करतात. प्रत्यक्ष जीवनातही, केवळ शरीरालिंगनात प्रियेचे सौंदर्य हाती लागते, असे समजण्याचा बहिर्मुख वेडेपणा सौंदर्यवादी लोक कधीच करीत नाहीत. उलट प्रत्यक्ष सान्निध्यात वा मीलनातही पुरेसे 'मीलन' नसल्याची रुखरुख राहणे, हे सौंदर्यवादी विरहाचे, तळमळीचे आणि yearning चे रहस्य आहे. हे दुःख खुळेपणाचे किंवा निदान स्वनिर्मित असते, असा सौंदर्यवाद्यांच्या टीकाकारांचा आरोप आहे.[1] सौंदर्यवादी मने खास स्वतःची म्हणून दुःखे निर्माण करतात, हा आरोप सौंदर्यवाद्यांचे सजातीय आणि समानधर्मेही मान्य करतील. परंतु ती स्वनिर्मित असली, तरी अर्थशून्य आहेत, असे मानणे मात्र अरसिकपणाचे वा 'Philistine' वृत्तीचे म्हणावे लागेल.

'व्यर्थी अधिकचि अर्थ वसे'

हे केशवसुतांचे वचन, सौंदर्यवाद्यांच्या 'व्यर्थ' रुखरुखींच्या बाबतीत जितके सार्थ आहे, तितके इतर फार थोड्या बाबतीत असेल. जे मीलन सौंदर्यवादी कवी पार्थिव भूमिकेवर साधू पाहतात आणि हताश होतात, तेच मीलन गूढ आध्यात्मिक भूमिकेवर साध्य आहे, असे गूढवादी कवींना आढळून येते. किंबहुना ते कुठच्या तरी भूमिकेवर शक्य आहे, म्हणून तर स्वतःचाच शोध स्वतःला न लागलेल्या खुळ्या सौंदर्यवादी कवींना त्याचे वेड लागते. 'इंडिया'चा शोध लागला, असे समजत समजत पश्चिमेकडील इंडिज-मध्ये जाऊन पडणारे युरोपीय शोधक बहकले आणि फसले, हे जितके खरे, तितकेच त्यांचे ध्येय भ्रामक नसून पुढे कुणाला तरी साध्य होण्यासारखे होते; हेही खरे. 'आध्यात्मिक मीलनाच्या शक्यतेची चाहूल आणि ओढ लागलेला, परंतु ते मीलन पार्थिव रूपाच्या द्वारे साधू पाहणारा आत्मा असेही सौंदर्यवादी कवींचे एक वर्णन होऊ शकेल! किंबहुना हे वर्णन सौंदर्यवादी 'कवी'चे आहे, असे न म्हणता सौंदर्यवादी 'भूमिके'चे आहे, असे म्हणणे अधिक बरोबर होईल. कारण हेच भास्करराव तांबे अन्यत्र आध्यात्मिक भूमिका घेऊ शकतात, हे आपण पाहतोच.

स्थूल शारीरिक भूमिकेवर मीलनाची अभीप्सा धरणाऱ्या प्रेमिकाला, अध्यात्म-भूमिकेवर आरूढ झालेली प्रिया एका उर्दू गझलमध्ये जे उत्तर करते, त्यात या दोन भूमिकांमधला संबंध सापडण्यासारखा आहे.

सैयादसे गुल्शनमें रो रो कहा बुलबुलने।
क्यूँ हो गया दीवाना जो तूं है वोहि मैं हूँ।

(जीवनरूपी) बगीच्यात बुलबुल पक्ष्याने रडत रडत पारध्याला म्हटले– "अरे इतका वेडा होऊन माझा पाठलाग कशाला करतोस? जो तू आहेस तोच मी आहे!"

सौंदर्यवादी भूमिकेवर मीलनाची जी पिपासा 'वेड' ठरते, तीच गूढवादी भूमिके-

[1] American Critical Essays "Romantic Melancholy." Irving Babbit

वर आध्यात्मिक सत्य ठरते. नव्हे, एका वरिष्ठ भूमिकेवर ते वेड सत्य असल्यामुळेच, त्याच्या पूर्वगामी भूमिकेत ते वेड लागू शकते आणि जाणत्यांना ते सुन्दरही वाटते आणि जे सुन्दर वाटू शकते ते पूर्णतः असत्य म्हणता येत नाही; ते कुठल्या तरी अर्थाने, कोणत्या तरी जगतात, सत्य असलेच पाहिजे, असा सौंदर्यवाद्यांचा हट्ट असतो आणि गूढवाद्यांचा अनुभव असतो.

Truth is beauty, beauty truth
This is all Ye know on earth and all Ye need to know

या कीट्सच्या महावाक्याचा अर्थही हाच आहे.

तांब्यांच्या या सुन्दर कवितेतील एक सूर मात्र सौंदर्यवादालाही पोषक नाही की गूढवादालाही पोषक नाही. तो सूर म्हणजे ईश्वराला आवाहन करण्याचा. वास्तविक परमेश्वराला मानवी सुखाचा घट पूर्ण भरता आला असता, त्याने तो शिगोशीग भरला नाही एवढेच काय ते असे एकदा मानले, म्हणजे जीवनातल्या ज्या अपूर्णतांचे तांब्यांनी मर्मभेदक वर्णन केले आहे, त्यांच्यातील शल्य कमी होते. निदान त्या शल्याने विद्ध झालेल्या मानवाच्या आक्रोशाची तीव्रता तरी कमी होते. ज्या बालकाला आई कोणत्याही क्षणी जवळ घेऊन सुखी करू शकेल, त्याच्या रडण्याला ज्याप्रमाणे गंभीर दुःखाचे स्वरूप येणे शक्य नाही, त्याप्रमाणेच जो मानव सर्व दुःखे म्हणजे 'माया' होत, असे समजून–

ही माया निज संहरा हरा

अशी प्रार्थना करू शकतो, त्याच्या दुःखांना अन्तिम आणि अनिवार्य दुःखांची तीव्रता येऊ शकत नाही.

Oh Thou, who Man of base Earth didst make And who with Eden didst devise The Snake; For all the Sin wherewith the Face of Man Is blackened, Man's Forgiveness give–and take![1]

या उमरखय्यामच्या उद्दाम ओळींत आस्तिक्यभाव आहे, की नास्तिक्य आहे, हे सांगणे कठीण असले, तरी 'घट भरा शिगोशीग' या कवितेत तांबे जी तक्रार करतात, तीच तक्रार उमरखय्यामही करीत आहे हे उघड आहे. पण तांब्यांची शल्ये 'ईश्वरी दये'च्या आटोक्यात असल्याने

वाहु द्या दयेचा वरूनि झरा

या शब्दांनी त्या शल्यांची बोच कमी होते. भावनापूजक, मानवतावादी, निराधार मानवाच्या आक्रोशाऐवजी आपणाला तांब्यांच्या कवितेत ईश्वरावर भार टाकणाऱ्या मनुष्याची आशायुक्त प्रार्थना ऐकू येते. याच्याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की रोमँटिक् दुःखाची तीव्रता आस्तिक्यभावामुळे कमी होते, तर ईश्वरनिरपेक्ष मानवतावादाने वाढते. सौंदर्यवाद हा धर्मश्रद्धेपेक्षा मानवतावादाला जवळ आहे, असे म्हणता येते, तेही यामुळेच.

● ●

[1] Rub'aiy'at of Omar Khayy'am. (VII)

कविवर्य तांबे : जन्मशतसांवत्सरिक उत्सव

व्याख्यान पहिले

तांबे–काव्यप्रेमी बंधुभगिनींनो,

काही महिन्यांपूर्वी मला मुंबईच्या साहित्यसंघाकडून तांबे–जन्मशताब्दिनिमित्त होणाऱ्या व्याख्यानासंबंधी सूचना देण्यात आली. या शताब्दिनिमित्त दोन व्याख्याने देण्याकरिता संघाने माझी निवड केली आहे, असे मला कळविण्यात आले.

अर्थात माझ्या दृष्टीने ही दुहेरी सुवार्ता होती. मुंबई साहित्यसंघ तांबे शताब्दी साजरी करीत आहे, ही पहिली सुवार्ता; आणि साहित्यसंघातर्फे होणाऱ्या जन्मशताब्दी उत्सवामध्ये मुंबईकर रसिकांपुढे बोलण्याची संधी मला मिळत आहे, ही दुसरी सुवार्ता ! साहित्यसंघातर्फे माझी व्याख्याने प्रथमच होत आहेत,–असे नव्हे. कशाच्या निमित्ताने ते आता स्मरत नाही, पण १९४५ साली माझे एक व्याख्यान साहित्यसंघातर्फे, साहित्यसंघाच्या वास्तूत झालेले होते. त्यानंतर सुमारे तीस वर्षांनी साहित्यसंघात माझे आज व्याख्यान होत आहे. मध्यन्तरीच्या काळात काही ना काही निमित्ताने साहित्य-संघात यावे लागले–नाही, असे नव्हे. १९५९ साली नियोजित संमेलनाध्यक्ष या नात्याने होणारा सत्कार स्वीकारण्याकरिता मी साहित्य–संघात आलो होतो, याचे मला स्मरण आहे. पण आजचा प्रसंग पूर्वीच्या सर्व प्रसंगाहून वेगळा आणि अधिक आनंदाचा आहे. आधुनिक कवींतील सर्वश्रेष्ठ, व व्यक्तिशः मला अत्यंत प्रिय, अशा भास्करराव तांबे यांच्या जन्मशताब्दिनिमित्त व्याख्यान देण्याची संधी मिळणे, हा मी एक बहुमान समजतो.

ज्ञानकोशकार केतकर यांनी विद्वानांच्या मतापेक्षाही, कालाच्या ओघात निश्चित झालेले ' लोकमत ' हे काव्यासंबंधीचे श्रेष्ठ मत मानले आहे. केशवसुतांपासून उदयाला आलेल्या आधुनिक कवितेने महाराष्ट्राला जे अनेक लहान मोठे कवी दिले, त्यात केशवसुत आणि तांबे हे आपोआपच सर्वश्रेष्ठ ठरले आहेत. केशवसुत हे प्रवर्तक आणि प्रक्षोभक म्हणून श्रेष्ठ आहेत, तर तांबे हे स्वानंदमग्न, रससिद्ध कवीश्वर म्हणून श्रेष्ठ

आहेत. त्यांच्या जन्मशताब्दीचा उत्सव ग्वाल्हेरपासून बेळगाव धारवाडपर्यंतच्या आणि बडोद्यापासून हैद्राबादपर्यंतच्या मराठी रसिकांनी प्रेमाने साजरा करावा, हे स्वाभाविकच आहे. ज्यांचे मस्तक कालाच्या प्रवाहातूनही वर राहते, तेच खरे 'अमर' किंवा 'अक्षर' कवी होत. या कसोटीप्रमाणेही आधुनिक कवीतील केशवसुत आणि तांबे हेच श्रेष्ठ ठरतात. पण कालाच्या ओघातूनही डोके वर काढीत असता, सामान्य जनांप्रमाणे कवींनाही बरेवाईट दिवस येतात, धक्केचपाटे खावे लागतात ! केशवसुतांच्या बाट्याला यशातील हा चढउतार फारसा आला नाही, तरी तांब्याच्या वाट्याला तो आला असे म्हणावे लागते.

तांबे हे केशवसुताहून श्रेष्ठ की कनिष्ठ, आधुनिक वळणाचे की जुन्या वळणाचे, येथपासून ते तांबे 'खरे कवी आहेत की नुसते पद्यकार आहेत,' यासारख्या अनेक प्रश्नांवर तांब्यांच्या निधनापासूनच्या गेल्या तीस पस्तीस वर्षांत अधूनमधून वाद झालेले आहेत. आज विस्तीर्ण मराठी भाषिक प्रदेशात साजरा होत असलेला शतसांवत्सरिक उत्सव, म्हणजे या सर्व वादांना काळाने आणि सर्वसामान्य रसिकांनी दिलेले एक उत्तरच होय ! आणि तरीही हा उत्सवप्रसंग म्हणजे आपली आधुनिक काव्यविषयक मते तपासून घेण्याची एक संधीच आहे !

पण त्याहीपूर्वी म्हणजे आधुनिक काव्याविषयीची आपली मते तपासून घेण्याच्याही पूर्वी एकंदर 'काव्य' या वस्तुसंबंधीचीच आपली मते तपासून घेतली पाहिजेत. मी ही व्याख्याने देणार आहे असे कळल्यावर एक सव्यसाची पत्रपंडित मला म्हणाले, "कवींच्या जन्मशताब्दी का साजऱ्या करायच्या याचेही उत्तर तुमच्यासारख्यांनी आपल्या व्याख्यानात द्यायला हवे." ते म्हणाले, "मला तर वाटते तांबे आणि केशवसुत यांच्या-सारख्या अग्रगण्य कवींचा देखील माझ्यासारख्याच्या जीवनाशी काडीचा संबंध येत नाही. त्यांच्या जन्मशताब्दी का साजऱ्या करायच्या मला सांगा."

म्हणजे केशवसुतांच्या काळी

'काव्येही करुनी घरीच बसल्या पोटास का हो मिळे ?'

हा प्रश्न विचारणारे होते, तसेच आजही आहेत. काव्यचर्चा आणि जन्मशताब्द्या म्हणजे 'साहित्यिक लोकांनी आपापसात चालविलेले पण समाजाशी संबंध नसलेले असे रिकामटेकडे उद्योग आहेत,' अशी आजही अनेकांची समजूत आहे. आपल्या काळच्या काव्यविषयक 'Skepties' ना केशवसुतांनी दिलेले उत्तर दोन तीन प्रकारचे आहे. एकेकाळी सम्राटही कवीपुढे मान लवबीत, असे म्हणून त्यांनी काव्याच्या ऐतिहासिक प्रतिष्ठेवर बोट ठेवले आहे. पण पुढे लगेच–

'गाण्याने कविच्या प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेईल'

हा गाण्याचा राष्ट्रीय उपयोग सांगितला आहे. त्याच्यापुढे "प्रेतेही उठवील जी निजरवे, ती तो तुतारी करी । आता नादवती" असे म्हटले आहे. म्हणजे कर्तृत्वाला

उत्तेजन देण्याचे कार्यच कवी एकंदरीत करतो, असा केशवसुतांचा रोख आहे. पण काव्याचे प्रयोजन एवढेच आहे असे म्हणणे, म्हणजे काव्याला खालच्या पायरीवर आणणे होय. केशवसुतांनी काव्याचे केलेले समर्थन काव्याच्या 'कैफियती'सारखे किंवा 'apology'-सारखे वाटते! निदान कर्तृत्वाच्या मानाने काव्याला दुय्यम स्थान आहे अशी केशवसुतांना भूमिका घ्यावी लागली आहे. पण पुढे तर त्यांनी त्याहूनही apologetic भूमिका घेतली आहे.

"गाण्याने श्रम वाटतात हलके, हेही नसे थोडके;"

पण हे सर्व, काव्याचे दुय्यम उपयोग झाले. श्रम, उद्योग, पराक्रम हाच काय तो जीवनातील सर्वात महत्त्वाचा भाग, असे या उपयुक्ततावादी 'कैफियती'त गृहीत धरले आहे! अर्थात् प्रश्न विचारणारा उपयुक्ततावादाच्या अथवा 'फिलिस्टाइन्'च्या भूमिकेवरून विचारीत आहे, म्हणून केशवसुतांनाही त्या भूमिकेवरूनच उत्तर द्यावे लागले आहे. पण खरे उत्तर वेगळे आहे. श्रम आणि पराक्रम ज्याकरिता करायचे ते जीवनाचे सार्थक्य वेगळेच आहे. कादंबरीकार शरदबाबू यांनी क्रांतिकाऱ्यांचे उद्दिष्ट सांगताना 'भारती'सारख्या गोड मुलीच्या नाजुक भावनांना संरक्षण देणे व त्यांचा सन्मान राखणे, हे राजकीय क्रांतीचे उद्दिष्ट म्हणून सांगितले आहे. मला वाटते चर्चिल यांनी एकदा "To make the world safe for democracy" हे जागतिक युद्धाचे उद्दिष्ट सांगितले होते! "जीवनाचा सर्वात मूल्यवान भाग पराक्रम हाच आहे," अशी कित्येकांची समजूत असते. पण पराक्रमी पुरुष एकसारखे पराक्रमच करीत नाहीत! प्रेम, आदर, कृतज्ञता, नम्रता इत्यादी भावनांचा अनुभव घेण्यात त्यांना पराक्रमापेक्षाही धन्यता वाटत असते. पेटरसारख्या कलामीमांसकांनी जीवनाचे सार्थक्य उत्कट, नाजूक आणि पवित्र मानसिक अवस्थांचा अनुभव (States of Consciousness) हे मानले आहे. अशा तऱ्हेच्या उत्कट मानसिक अनुभवांची नोंद कोणत्याही भाषेच्या काव्यात आणि कलेतच आढळते. मला प्रश्न विचारणारा पत्रकार पराक्रमाचा भोक्ता असो, त्यालाही अशा उदात्त अनुभवांची मातब्बरी कळत असणारच. प्रत्यक्ष जीवनात तसे अनुभव येणे हे अनिश्चित असते; पण काव्याच्या द्वारे तसे अनुभव घेणे, हे हुकमी असते. 'कवितेचे प्रयोजन' याच कवितेत केशवसुतांनी—

"आशा, प्रेम तसेच वीर्यकवनी तो आपल्या गाइल,"

असे म्हटले आहे, त्याचा अर्थ तोच आहे. पराक्रम आणि क्रान्ती यांना महत्त्व नाही, असे नाही. पण ती 'साधने' आहेत. जीवनाचे 'सार्थक्य' उदात्त आणि नाजूक भावनांचा अनुभव हे आहे. ज्यांनी अशा भावनांचे चित्र कर्णमधुर आणि छंदोबद्ध भाषेत काढून ठेवले, ते समाजाचे उपकर्ते होत. त्यांच्या शताब्दी साजऱ्या करणे, हा केवळ 'परस्परं प्रशंसन्ती'चा भाग नव्हे. ते एक पितृतर्पण आणि ऋषितर्पण आहे.

मला अशी आशा आहे की अशा समारंभात सहभागी होणारे सर्वजण या

पवित्र भावनेने सहभागी होत आहेत. कवी आणि काव्य यांच्यासबंधी आदर नसून केवळ सरकारी आदेश आणि सरकारी अनुदान यांच्या लोभाने ते सामील होतात, हा त्या पत्रकाराचा आरोप खोटा आहे असे मी समजतो !

अर्वाचीन मराठी कवितेचा विचार करताना 'अर्वाचीन कविता' आणि 'नव-कविता' असे दोन प्रकार मान्य करावे लागतात. केशवसुतांपासून पृथक्स्वरूपाने जन्माला आलेली कविता एकप्रकारे क्रांतिकारक आणि बंडखोर होती; तर मर्ढेकरांनी परदेशातून परत आल्यावर ज्या प्रकारची कविता लिहायला प्रारंभ केला, तीही बंडखोरच होती. कोणत्याही बंडाला ते केवळ 'बंड' आहे, एवढ्याकरिताच महत्त्व देणे, मला मान्य नाही. ते कशाविरुद्ध बंड आहे, याला मी अधिक महत्त्व देतो. केशवसुतांची कविता म्हणजे जुन्या पारमार्थिक आणि पौराणिक कवितेच्या युगाविरुद्ध बंड होते. या जुन्या कवितेत पुष्कळदा वाङ्मयीन गुण आढळत असले, तरी वाङ्मयीन 'स्वातंत्र्य' आणि वाङ्मयीन 'सर्वांगीणता' नव्हती. त्या काळच्या भावकाव्यात अथवा आत्मनिष्ठ काव्यातही भक्ती आणि वैराग्य यांनाच प्रतिष्ठा होती; आणि कथानकपर काव्यात पौराणिक विषयांनाच स्थान होते आणि यामुळे वैचित्र्याचा अभाव होता, पण हा मुख्य दोष नव्हे, तर विषयाच्या स्वातंत्र्याचा अभाव होता, हा मुख्य दोष होय. भक्तीखेरीज अन्य वैयक्तिक भावना क्षुद्र समजल्या जात; तर रामायण महाभारतातील कथानकाखेरीज अन्य कथानके प्रतिष्ठित समजली जात नसत. कुंटे यांनी शिवाजीसंबंधीचे काव्य लिहून कथा-काव्यात क्रांती करण्याचा यत्न केला. तर केशवसुतांनी 'मुमुक्षु' नसलेल्या माणसाच्याही हर्षखेदादी भावनांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

जी स्थिती मराठी काव्याची होती तीच स्थिती इतर प्रांतातील काव्याचीही होती. अर्वाचीन भारतीय भाषांत म्हणजे कानडी, हिन्दी, बंगाली वगैरे भाषांत निधर्मी कवितेची परंपराच खुंटलेली होती. संस्कृतात निधर्मी अथवा प्रपंचवादी कविता होती, पण तीही अर्वाचीन मराठी कवितेसारखी 'आत्मनिष्ठ' नव्हती. ('आत्मनिष्ठ' हा शब्द मी मर्ढेकरी अर्थाने वापरत नाही, त्या शब्दाच्या मूळ अर्थाने वापरत आहे.) जुन्या वाङ्मयात आत्मनिष्ठ कविता असलीच तर ती बहुधा भक्तिपर किंवा वैराग्यपर असे. शाहिरी वाङ्मय हा त्याला अपवाद होता. पण शाहिरी कवितेला संतकाव्याची किंवा पंडिती-काव्याची प्रतिष्ठा नव्हती. निधर्मी, प्रपंचपर काव्याला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य मराठीत केशवसुतांनी केले.

या देशात निधर्मी ऐहिकपर काव्याची परंपरा इंग्रजी संपर्कापूर्वी नव्हती, हे विधान हिंदूपरंपरेपुरतेच करता येईल. मुसलमान कवीत म्हणजे उर्दू भाषेत प्रेम, स्त्रीसौंदर्य, आत्मपूजन या रोमँटिक विषयांना प्रथमपासूनच महत्त्व होते. आत्मपर आणि आत्मनिष्ठ कविता हे जर आधुनिक कवितेचे वैशिष्ट्य असेल तर उर्दू कविता प्रारंभापासूनच आत्म-निष्ठ होती. त्या कवितेत मानवी सुखदुःखांना, रागलोभांना, सौंदर्याकर्षणाला, सौंदर्य-पूजनाला, अहंपूजनाला आरंभापासून स्थान होते. वैयक्तिक रागलोभांना अहंपूजनाला

आणि प्रेमपूजनाला मानाचे स्थान मिळवून देण्याचे कार्य केशवसुतांनी केले व त्याबरोबरच आपोआपच त्यांनी संस्कृत आलंकारिकता, कृत्रिमता आणि पांडित्य यांची प्रतिष्ठा हिरावून घेऊन भावना आणि Sincerity यांची स्थापना काव्याच्या सिंहासनावर केली.

केशवसुतांनी काव्यप्रांतात जे केले, ते 'प्रयोग' म्हणून, वाङ्मयाची 'सेवा' म्हणून अथवा 'काव्यप्रकारात भर' म्हणून केले, अशी काही लोक समजूत करून घेतात! आणि मग तांब्यांच्या सारख्या त्यानंतरच्या कवींनी तसे काही केले की नाही, अशी तपासणी करून त्यांचे मूल्यमापन करतात. तसेच केशवसुतांनी समाजसुधारणेकरिता काय काय लिहिले याचीही हे लोक तपासणी करतात इतकेच नव्हे तर आगरकरांनी जे गद्यात केले, तेच केशवसुतांनी पद्यात केले, असेही प्रशंसापत्र देऊन टाकतात आणि मग तांबे, गडकरी यासारख्या कवींनी समाजक्रांतिकरिता काही लिहिले की नाही, हे तपासणेही प्राप्त होते. पण वस्तुस्थिती अशी आहे की केशवसुतसंप्रदायी कवी—यात मी तांब्यांचाही अंतर्भाव करतो— काव्यातील क्रांती किंवा समाजातील क्रांती यांच्यापेक्षाही आत्माविष्काराला अधिक महत्त्व देत होते. जुन्या कवितेत या आत्माविष्काराचीच गळचेपी होती आणि म्हणून केशवसुतांच्या आत्माविष्काराने काव्यात महत्त्वाची क्रांती झाली.

केशवसुतांप्रमाणेच ऐहिक आनंदविषयांना,— स्त्रीसौंदर्याला, स्त्रीप्रेमाला, बालक्रीडांना, निसर्गदृश्यांना— तांबेही महत्त्व देतात, या अर्थानेच मी तांब्यांना केशवसुतसंप्रदायी म्हणतो. अर्थात 'केशवसुतसंप्रदायी' याचा अर्थ केशवसुतांचे 'अनुयायी' असा मुळीच नव्हे, हे येथे मुद्दाम सांगितले पाहिजे. केशवसुत आणि तांबे दोघेही पाश्चात्य विद्येच्या संस्काराने आपल्याकडे दिसू लागलेल्या मुक्त व्यक्तिमत्त्वाचे नमुने होते. 'परमार्थाच्या पांघरुणाशिवाय काव्यप्रांतात प्रवेश नाही', ही जुनी कल्पना त्यांना मान्य नव्हती. परमार्थापेक्षाही ते प्रपंच-सौंदर्याला अथवा ऐहिक सौंदर्यविषयांना महत्त्व देत. भक्तीइतकेच ते स्वतःच्या मनातील इतर भावनांनाही महत्त्व देत. किंबहुना फॅशन म्हणून ईश्वरभक्तीच्या आणि विरक्तीच्या कविता लिहिण्यापेक्षा स्वानुभव म्हणून शृंगाराच्या कविता लिहिणे ते अधिक पवित्रपणाचे मानीत. दोघांनीही 'सॉनेटस्' लिहिली; ('सुनीत' या शब्दाचा त्यांच्या काळी जन्म झालेला नव्हता.) दोघांनीही विधवांवर कविता लिहिल्या, दोघांनीही क्रांतीला किंवा रुद्राला आवाहन केले. यापेक्षा दोघेही स्वतःच्या जीवनातील उत्कट अनुभवांना आणि त्या अनुभवांच्या प्रामाणिक अभिव्यक्तीला महत्त्व देत होते, यात त्यांचे समानधर्मित्व आहे.

या त्यांच्या 'भावनापूजक' 'Sincerity पूजक' समानधर्मालाच रोमँटिसिझम अथवा सौंदर्यवाद हे नाव आहे आणि या अर्थानेच ते 'एका' संप्रदायाचे आहेत. मराठी काव्यातील सौन्दर्यवाद म्हणजे जुन्या काव्यातील सांप्रदायिकतेविरुद्ध बंड होते! पण म्हणजे ते केवळ जुन्या 'रचनाप्रकारा'विरुद्ध बंड नव्हते तर जुन्या जीवनदृष्टीविरुद्धच बंड होते. मनुष्य मुमुक्षु असो अगर नसो, भक्तिमार्गी असो अगर नसो, विरक्त असो अगर नसो, त्याने तुकारामरामदासांच्या सुरातच लिहिले पाहिजे, या कल्पनेमुळे काव्याच्या

प्रवाहाला बांध घातला गेला होता व तो प्रवाह कुजला होता. तो फोडून मोकळा करण्याचे कार्य केशवसुतांनी केले. पूर्वीची कविता ईशभक्तीवर होती तर केशवसुतानंतरची कविता जीवनपूजक, भावनापूजक, सौंदर्यपूजक आणि व्यक्तिस्वातंत्र्यपूजक आहे. तांब्यांच्या कवितेत हे जीवनपूजन आणि सौंदर्यपूजन पराकोटीला पोचले आणि या अर्थानेच ते केशवसुतसंप्रदायातील किंवा रोमँटिक संप्रदायातील सर्वश्रेष्ठ कवी आहेत.

पण जुन्या काळी काव्यप्रवाह कुजण्याचा धोका होता, तर नव्या काळी तो फाजील वेगाने धावण्याचा धोका आहे. केशवसुतांची कविता १८८५ साली लोकांपुढे आली, तांब्यांची कविता १९२० साली महाराष्ट्रात प्रसार पावली. तांब्यांचा जाहीर गौरव (षष्ठ्यब्दिपूर्तीच्या निमित्ताने) १९३४ मध्ये झाला, तर तांबे १९४१ मध्ये स्वर्गवासी झाले. १९३९ च्या अखेरीस माधव ज्यूलियनही स्वर्गवासी झाल्याने सौंदर्यवाद्यांची दुसरी पिढी संपल्यासारखी होती आणि तांब्यांच्या निधनानंतर पाचच वर्षात सौन्दर्यवादी कवितेविरुद्धही बंड झाले. ते बंड मर्ढेकर संप्रदाय किंवा नवकाव्य या नावाने नमूद आहे. केवळ बंड म्हणूनच बंडाला महत्त्व देणारांपैकी मी नाही, तसाच मी बंडाला बंड म्हणूनच विरोध करणारांपैकीही नाही; 'केशवसुतसंप्रदायी बंड' कशाविरुद्ध होते याचा विचार केला, तसाच नवकवितेने केलेले बंड कशाविरुद्ध होते, याचाही विचार करणे जरूर आहे. कारण तो विचार केल्याशिवाय तांब्यांचे काव्यप्रांतातील स्थान निश्चित होणार नाही.

ते अर्थातच जीवनानंदवादी आधुनिक कवितेविरुद्ध बंड होते. इंग्रजी संपर्कापूर्वीची कविता एक प्रकारे जीवनानंदविरोधीच होती. ऐहिक गोष्टीत, बायकामुलात, संसारात काय रमता ? परमार्थाकडे वळा, देवाचे नामस्मरण करा, हे तिचे घोषवाक्य होते. त्यातील अर्धसत्य आणि अपूर्णता जाणवून इंग्रजीशिक्षित कवींनी ऐहिकातील म्हणजेच बायकामुलातील, निसर्गातील आनंदाची गाणी गाइली. त्यांना जुन्या कवितेतील खऱ्याखोट्या वैराग्याचा उबग आला होता. आणि ऐहिक जीवनाविषयी नव्याने उत्साह वाटू लागला होता. मर्ढेकरांनंतरच्या कवींना केशवसुतसंप्रदायी जीवनानंदाचा उबग आला. ते उबगाची किंवा 'नॉशिया'ची कविता लिहू लागले. त्यांना स्त्रीसौंदर्य, निसर्गसौंदर्य, प्रेमपूजन हे सर्व स्वप्नाळूपण आहे, 'ड्रिमिंग्' आहे, असे म्हणायचे होते. त्यांना खरोखरीच जीवनाचा उबग आला होता, की खोट्या जीवनानंदवादी कवितेचा उबग आला होता, हा प्रश्नही चिंतनीय आहे. पाश्चात्यदेशात जी नवकविता निर्माण झाली, ती खऱ्या रोमँटिसिझमविरुद्ध बंड नसून रोमँटिक् कवितेचे जे क्षीण स्वरूप व्हिक्टोरियन युगाच्या उत्तरार्धात दिसू लागले होते, त्याविरुद्ध बंड होते आणि तरीही त्या क्षीण कवितेप्रमाणेच बायरन्, शेले, कीट्स यांची जीवनरसाने रसरसलेली कविताही पाश्चात्य नवकवितेच्या युगात मागे पडली. निदान त्या तऱ्हेची कविता लिहिणे मागे पडले, आपल्याकडेही सौंदर्यपूजनाला विरोध सुरू होताच सौंदर्यपूजक कविता मागे पडण्याचा धोका उत्पन्न झाला. हा धोका केशवसुतांच्या कीर्तीला आणि आस्वादाला जितका बाधला नाही, तितका कविवर्य भास्करराव तांबे यांच्या कीर्तीला आणि आस्वादाला बाधला असे दिसून येईल. केशवसुत सौंदर्यवादी

असले तरी त्यांच्या कवितेत एक प्रकारची चीड आणि एक प्रकारची सामाजिक बंडखोरी आहे. तेवढ्यापुरते त्यांचे स्तवन नवकवितेच्या जमान्यानंतरही चालू राहिले. तांबे हे निर्भेळपणे आत्मरत आणि आनंदवादी असल्याने नवीन उद्वेगवादी कवींना ते आपल्यापासून अधिकच दूर वाटू लागले.

एखादा नवीन संप्रदाय वाङ्मयीन फॅशन किंवा Voque निघताच जुन्या कवितेचे खरेखुरे अवमूल्यन होते काय, हा महत्त्वाचा प्रश्न आहे आणि केवळ तात्पुरते आणि विशिष्ट कविमंडळापुरते अवमूल्यन होत असेल तर ते सर्वसामान्य रसिकांच्या काव्यास्वादाच्या आड येत आहे काय, याचाही विचार होणे जरूर आहे. इंग्लंडमध्ये जर काही काळ ब्लेक, बर्नस्, वर्डस्वर्थ, बायरन्, शेले यांच्या आस्वादनावर पडदा पडला असता तर इलियट् संप्रदायी कवींनी कितीही आणि कशीही कविता लिहिली असली तरी ती वाङ्मयाची हानीच समजावी लागली असती. इलियट् संप्रदायी कवितेनंतरही इंग्रजी भाषिकांतील खरे काव्याभ्यासक वर्डस्वर्थ, बायरन्, शेले यांच्या काव्याकडे पाठ फिरवीत नाहीत, असेच दिसते. आपल्याकडेही काही काळ काही वर्तुळात तांब्यांच्या कवितेचे अवमूल्यन झालेले दिसले, तरी ते वाङ्मयेतिहासात टिकून राहू शकत नाही, असेच दिसून येईल. आज ग्वाल्हेरपासून बेळगाव-धारवाडपर्यंत आणि बडोद्यापासून हैद्राबादपर्यंत तांब्यांचा जो जयजयकार होत असेल त्यावरूनीही हेच दिसत आहे.

तांबे व केशवसुत हे दोघेही इंग्रजी वङ्मयाच्या संपर्काने उत्तेजित झालेल्या रोमँटिक संप्रदायाचे कवी असले तरी त्यांचे व्यक्तिमत्व भिन्न होते व त्यावरील संस्कारही भिन्न होते. किंबहुना स्वतंत्र व्यक्तीविकास रोमँटिक् संप्रदायात जेवढा शक्य असतो तेवढा अन्य संप्रदायात नसतो. कारण आपण सोयीकरिता त्याला 'संप्रदाय' म्हटले तरी रोमँटिसिझम् हा संप्रदाय वा वाङ्मयीन चळवळ नसून ती एक मूलभूत मानवी प्रवृत्ती आहे. ती प्रवृत्ती वेगवेगळ्या वातावरणात वेगवेगळी पोषणद्रव्ये शोषून घेते. केशवसुतापेक्षा तांब्यांचे पोषण वेगळ्याच प्रदेशात आणि वेगळ्याच संस्कृतीत झाले होते.

इंग्रजी शिक्षणाने अँग्लोइंडियन बनत चाललेल्या पुण्यामुंबईपासून तांबे जन्मतःच दूर होते. रूढीविरोध आणि इंग्रजविरोध यांचे वारे पुण्यामुंबईत जोराने वाहात होते, तर तांब्यांच्या विकासभूमीत अद्याप सरंजामी निष्ठांचे आणि सरंजामी राहणीचे वातावरण जोरात होते. म्हणजे तांबे जुन्या संस्कृतीत वाढत असले तरी काव्यापुरते नवीन म्हणजे भावनास्वातंत्र्यवादी होते. त्यांना कॉलेजचे शिक्षण मिळू शकले नाही व त्यामुळे त्या वयात ते थोडेफार खट्टूही झाले. पण कॉलेजच्या शिक्षणाहूनही मूल्यवान असे संस्कार त्यांना लहानपणापासूनच मिळत गेले होते. श्रीधर कवीची प्रसादपूर्ण कविता वाचण्यात आल्याने कोवळी आणि प्रासादिक काव्यशैलीच त्यांच्या अंगी मुरली होती. हिंदीतील सर्वश्रेष्ठ कवी तुळशीदासजी यांचे काव्य तरुण वयात वाचण्याचा योग आपल्या भागातील कोणाही कवीस आला नसेल. जन्म आणि वास्तव्य माळव्यात असल्यानेच भास्करराव तांबे यांच्यावर तुळसीदासजींच्या भक्तिमान प्रतिभेचे संस्कार झालेले होते. तांब्यांचे इंग्रजी

काव्याचे वाचनही भरपूर होते, नुसते वाचन नव्हते तर आवडत्या कवींचे पचनही त्यांनी उत्तम प्रकारे केलेले होते. केशवसुतादी आपल्याकडील कवींचे इंग्रजी काव्याचे वाचन भरपूर होते, नव्हे त्यातूनच त्यांनी पोषण घेतले. पण त्यांनी केवळ इंग्रजी काव्यातूनच पोषण घेतले, हेच तांब्यांशी तुलना करता केशवसुत, माधव ज्यूलियन यासारख्या आधुनिक कवींचे वैगुण्य होय निदान दुर्दैव होय.

केशवसुत आणि माधव ज्यूलियन यांच्या काव्यात अशा अनेक जागा दाखवता येतील की ज्यातील शब्दयोजनेमुळे वा रचनेमुळे त्यांच्या मनातील मूळ इंग्रजी रचनेची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. कधीकधी या भाषिक चणचणीचे वा ओढाताणीचे समर्थन Grappling with expression या गौरवपर शब्दांनी केले जाते आणि तरी या कवीवर प्रासादिक मराठी काव्याचे संस्कार कमी होते, हे कबूल करावे लागते. जुन्या ओवीलेखक कवींच्या काव्यात पुष्कळ जागी काव्य बेताचे असेल, पण मराठी भाषेची कोवळीक आणि कुलीनता म्हणजे अस्सलपणा सर्वत्र आढळेल. श्रीधर कवीच्या वाचनाचा सुपरिणाम तांबे यांच्या अस्सल आणि कोवळ्या मराठी शब्दयोजनेत सर्वत्र आढळतो. त्यांच्या कवितेत अधूनमधून हिंदी आणि राजस्थानी शब्द आणि वातावरण आढळते. पण त्याने विजोडपणा न जाणवता रम्य वैचित्र्य अनुभवाला येते. परिचित शब्द आणि अपरिचित शब्द, मधुर शब्द आणि कठोर शब्द यांचा योग्य जागी योग्य प्रमाणात वापर हेच काव्यशैलीचे खरे रहस्य होय, असे श्रेष्ठ युरोपीय कवी डांटे याने आपल्या शैलीवरील ग्रंथात म्हटले आहे. निदान रोमँटिक शैलीचे रहस्य या मिश्रणात आहे. Strangeness added to beauty हे त्या शैलीचे सूत्र आहे आणि तांबे यांच्या शैलीचे सूत्रही तेच आहे.

विषयांच्या बाबतीतही तांब्यांनी असेच दोन सूर एकत्र केलेले दिसतील. त्यांना नव्या वा जुन्या विषयांचे वावडे नाही. ते लोकमान्यांवर लिहितील, गांधीजींच्यावर लिहितील, झाशीवालीवर लिहितील आणि प्रेमावर तर सदैव लिहितच होते. पण विषय सामाजिक असो, राजकीय असो, की विभूतिपूजनात्मक असो, तो तांब्यांच्या काव्यागाराचा ठसा घेऊन बाहेर पडत असे. लोकमान्यांवरील कवितेतील खास तांबेशाही ठसे माडखोलकरांसारख्या टीकाकारांनी अप्रासंगिक आणि अस्थानीही ठरवले आहेत. लोकमान्यांना 'राजराजेश्वर' म्हणणे, त्यांना 'नाथ' म्हणून संबोधणे आणि त्यांच्यावरील शोकपर गीतात–

कुक्कुटाचा नसे शब्द झाला
पाहटेचा न तारा उदेला

यासारख्या ओळी लिहिणे, हे माडखोलकरांना विसंगत वाटले आहे आणि ते एका दृष्टीने खरेही आहे. पण तांब्यांच्यासारखे कवी अशा एका उंचीवरून लिहीत असतात की, त्यांना सर्व विषय जणू एकाच रंगाचे वाटत असतात ! लोकमान्यांवरील कवितेतही त्यांनी

'यमदूताचे शिंग' आणले आहेच. एवढेच नव्हे, तर 'आपण एवढ्या तातडीने का निघाला' असे विचारताना–

कोठली हो स्मृति होय जागी ?
... ...
दुर्ग कोठील, कोठील वाडे
बाग कोठील, कोठील झाडे
मोह घालोनी नेती तुम्हांला
तातडी का असे हो निघाला

अशाही कल्पना केल्या आहेत. त्या कल्पना लोकमान्यांच्या जीवनमरणाशी विसंगत असतील, म्हणजे वास्तवाला धरून नसतील. पण कवीच्या 'मूड'ला आणि कल्पना-सृष्टीला मानवणाऱ्या आहेत. त्या लोकमान्यांसंबंधी काही सांगत नाहीत, तर तांब्यांच्या रोमँटिक अंतःसृष्टीसंबंधी सांगतात.

गांधीजी यांच्यावरील सुप्रसिद्ध कवितेत तर त्यांनी गांधीजी आणि त्यांचे राजकारण जणू गुंडाळूनच ठेवले आहे आणि ईश्वराचा धावा केला आहे. आर्त महात्म्याचा हंबरडा ऐकून आणि आत्मयज्ञ पाहून देवच खाली उतरत आहे, असा तांब्यांच्यासारख्या लोकांना काही काळ भास झाला होता आणि त्यामुळे गांधीजींच्या असहकारितेवरील ही आधुनिक कविता मध्येच द्रौपदीच्या धाव्यासारखी भक्तीची आणि काकुळतीची बनते !

घेतली धाव हो तुम्ही द्रौपदीसाठी,
गरिबांस्तव धरिली तुम्ही कांबळी काठी,
गुरगुरला होऊनि पशुहि गांजल्यापाठी
ती वेळ वाटले आली.

तसेच,

उखळात दिले शिर, काय अता ?
दणकवा मुसळ ढोंग न करता

ही कविता देखील गांधीजींच्या सत्याग्रहावरीलच आहे. पण तिजमधील सर्व उल्लेख आपल्या प्राचीन पुराणातील आहेत. 'चिलयाबाळ', 'प्रल्हाद' या सत्याग्रही बाळांचाच आत्मा या नव्या युगात या मोहनदास गांधींमध्ये एकवटून उतरला आहे, असे तांबे म्हणतात. म्हणजे ब्रिटिश राजवट गांधीजींचे नवे तंत्र, त्या तंत्राची सफलता वा निष्फलता यांच्यापेक्षा तांब्यांच्या मनात पुराणांतरीची भारतीय परंपराच अधिक आहे. त्यामुळे ही कविता गांधीजींच्या पहिल्या सत्याग्रहाच्या सुमारास म्हणजे १९२२ साली लिहिली असूनही समकालीन न ठरता जवळजवळ पौराणिक ठरत आहे. पण त्या कवितेचे बळ समकालीनतेत नाही की पौराणिकतेतही नाही; ते बळ आहे, तिजमधील शाश्वत ध्येयवादात आणि त्या ध्येयवादाला साजेशा शब्दयोजनेत !

आपल्या स्थिर ध्येयवादामुळे तांबे ज्याप्रमाणे समकालीनालाही चिरंतनात नेऊन बसवतात त्याप्रमाणेच सामान्य दृश्याला ते सहज अलौकिकात नेऊन बसवतात.

साईहुनि मऊमऊ बोटे ती
झुरुमुरु झुरुमरु धार काढिती,
रुणुझुणु कंकण करिती गीती,
का गान मनांतिल त्यांत मिळे ?
अंधुक शामल वेळ, टेकडी,
झरा, शेत तरु मधे झोपडी,
त्यांची देवी धारहि काढी,
का स्वप्नभूमि बिंबुनि मिसळे ?

या दोन कडव्यातील दृश्य एका गरीब झोपडीतील सामान्य स्त्रीचे आहे. पण कवीने तिच्या भोवतालच्या दृश्याचे आणि तिच्या त्या धार काढण्याचे साधेच पण इतके रमणीय चित्र काढले आहे की सामान्याला असामान्यत्व आणि उदात्तत्व प्राप्त झाले आहे. धार काढण्याची केवळ दैनंदिन आणि तीही शेतकरी जीवनातील क्रिया, पण त्या क्रियेतील मार्दव आणि संगीत कवीने नेमके वेचले आहे. साईपेक्षाही मऊमऊ बोटे, झुरुमुरु झुरुमुरु अशी निघणारी धार त्यातच धार काढणाऱ्या हातातील कंकणाचा रुणुझुणु रव यांनी कवी इतका मोहित होतो की त्या धार काढणाऱ्या स्त्रीच्या मनातील संगीत तर त्या दोहन क्रियेत मिसळत नाही ना, अशी गोड शंका कवीच्या मनाला स्पर्शून जाते. तेथील वातावरणाचे कवीने जे चित्र काढले आहे ते, इंग्रजीत ज्याला idyllic म्हणतात, त्या जातीचे आहे. अंधुक आणि धूसर अशी वेळ, शेजारी टेकडी, त्याच्याच शेजारी झरा, तिथेच त्या शेतकरी तरुणीचं शेत, झरा आणि शेत यांच्या दरम्यान झोपडी, त्याच्याच शेजारी एक तरु आणि या निसर्गदृश्याची जणू देवीच अशी ती धार काढणारी. कवी म्हणतो स्वप्नभूमी तर त्या दुधात प्रतिबिंब रूपाने मिसळत नाही ना !

तांब्यांना आपण कधी प्रेमाचे कवी म्हणतो, कधी महाप्रस्थानाचे कवी म्हणतो, कधी नाट्यगीतकार म्हणतो. पण या कवितेत ते यापैकी कोणीच नाहीत. ते येथे शुद्ध आणि शांत सौंदर्यदृश्याचे चित्रकार बनले आहेत. इथे ते शेले नाहीत, ब्राउनिंग् नाहीत, टेनिसन् नाहीत ते वर्डस्वर्थ बनले आहेत.

Behold her single in the field
Yon Solitary highland lass
Reaping and Singing by herself;
Stop here or gently pass !

* * *

Will no one tell me what she sings ?
Perhaps the plaintive numbers flow

For old unhappy faroff things,
And battles long ago

या प्रसिद्ध कवितेत कवी वर्डस्वर्थ त्या स्कॉटलंडमधील शेतकरी मुलीकडे ज्या वात्सल्याने पाहातो, तिचे ते शेतकाम आणि तिचे ते गीत यामध्ये जे मीलन अनुभवतो त्याहूनही अलौकिक असा अनुभव तांब्यांनी त्या साध्या दृश्यातून घेतला आहे, Behold her single ... ह्या कवितेचा आरंभ तांबे श्रोत्यांना जणू हर्ष भराने आरोळी दिल्यासारखा करीत.

तांबे केवळ सामान्यातून असामान्यापर्यन्त जातात असे नाही. ते सामान्यात एका काव्यमय दृष्टिक्षेपाबरोबर असामान्य आणि अद्भुत पाहू लागतात. 'तृणाचे पाते' ही कविता जणू एका Cosmic Vision सारखी,–'विश्वात्मक साक्षात्कारासारखी' आहे. त्यातील एक कडवे किंचित बोधवादी भासले तरी (मग या पायि कसे तुडवीता) एकंदर कविता सौंदर्यदर्शनातून विश्वदर्शनाकडे जाणारी आहे. पहिल्या कडव्यात इंद्रियगम्य रूप अनुभवणारा कवी, दुसऱ्या कडव्यात त्यामागील तेज आणि प्राण (vital force) यापर्यन्त पोहोचतो. त्यापुढील कडव्यात, 'पाहणारा' मानव आणि 'पाहिले जाणारे' तृण यांचे पोषण त्याच शक्ती कशा करीत आहेत, हे कवीला जाणवते. आणि शेवटी एकदम कवीला एका तृणाच्या पात्यात विविध रूपांनी आविष्कृत होणारी ईश्वरी सत्ता दिसू लागते. ती सत्ता मधूरही आहे आणि भयानकही आहे. हे सांगण्याची तांब्यांची तऱ्हा तत्त्ववेत्त्याची नाही. अगदी साध्या शब्दात त्यांनी एक अद्भुतभीषण साक्षात्कार सांगून टाकला आहे.

यातुनि कृष्ण मुरलि वाजविते,
वामन बळिस यात दडपीतो
यातुनि नारसिंह गुरगुरतो,
भियारे याते

यातील शेवटच्या दोन ओळी तांब्यांच्या शैलीचे उत्स्फूर्तत्व आणि असामान्यत्व दर्शवितात. तांबे या दोन ओळी अशा पद्धतीने म्हणत की श्रोत्यांना त्या विश्वदर्शनाने भयच वाटे. आणि त्यांचे शब्द मात्र जितके बाळबोध तितकेच अनपेक्षित आहेत. त्या अनपेक्षिततेने श्रोत्याला धक्का बसतो आणि एकदम परिचितातून तो अपरिचितात आणि पार्थिवातून अपार्थिवात जागा होतो.

सौंदर्याकर्षण आणि गूढानुभव या दोन विजातीय गोष्टी नसून एकीतून दुसरीचा उगम होतो. माझ्या 'टीकाविवेक' या ग्रंथात सौंदर्यवादासंबंधीच्या विवेचनात मी "Romanticism is mysticism in its adolescence." असे एक सूत्र दिले आहे. ते सूत्र मी सूत्रमयतेकरिता मुद्दामच इंग्रजीत बनवले. सौंदर्यपूजनाचे मर्म वासनात्मक आकर्षणात नसून आश्चर्यभावनेत असते. ज्याला गुलाबाचे फूल पाहून ते हुंगावेसे वाटेल,

वा त्याचा गुलकंद करावासा वाटेल तो सौंदर्यवादापासून म्हणजेच रोमँटिसिझम्पासून फार दूर आहे. ज्याला ते स्त्रीच्या केशबंधात खोवावेसे वाटेल, तोही सौंदर्यवादापेक्षा भोगवादाला अधिक जवळ आहे. ज्याला फुलझाडावरील फूल पाहून आश्चर्याचा धक्का बसेल तो सौंदर्यवादातून गूढवादापर्यन्त पोहोचेल. तांब्रे याद्दष्टीने गूढवादी होते. ते गोचर-सौंदर्यातून अगदी सहज अगोचर सौंदर्याचा अनुभव घेत. रवींद्रनाथापेक्षा ते ब्लेक्च्या गूढवादाला अधिक जवळ होते. आणि तरी त्यांचे पहिले भक्त आणि भाष्यकार मायदेव त्यांच्या कवितात गूढगुंजन नाही असे आग्रहपूर्वक सांगतात.

गूढगुंजनासंबंधी मराठी टीकावाङ्मयात कित्येक विचित्र कल्पना वेळोवेळी मानण्यात आल्या आहेत. दुर्बोध वेदान्त म्हणजे गूढगुंजन अशी काहींनी काही काळ कल्पना करून घेतली होती, बी कवींच्या ' चाफा ' आणि ' वेडगाणे ' या कवितांतील गूढगुंजन या कल्पनेला अधिक जवळ आहे. गूढगुंजन म्हणजे काहीतरी धुक्यासारखे तरल आणि विरल लिहिणे ही दुसरी एक कल्पना होय. इंग्रजीत प्रकट झालेल्या रवीन्द्रनाथांच्या कित्येक कवितांवरून ही कल्पना बनलेली होती. काहींना ' सुफी काव्य ' ऐकून माहीत होते, त्यांनी ईश्वराला प्रिया मानणे हे गूढवादाचे लक्षण मानले. तर काहींना गूढगुंजन हे मुळातच नकली नाणे वाटल्याने आमच्या आवडत्या भास्कररांव तांब्यात तसले काही नाही, असे ते तळतळून सांगू लागले. प्रथमतः गूढवाद म्हणजे काही गौण आणि दुर्बोध वस्तू आहे, ही कल्पना गूढवादविरोधकांनी टाकली पाहिजे. गूढ याचा काव्यापुरता अर्थ खोल या अर्थाने गहन असा आहे. दुर्बोध या अर्थाने गहनतेचा गूढकाव्याशी संबंध नाही, निदान नसावा. पाण्यात संचरताना मनुष्य जसा नकळत खोलात जातो. सामान्य स्त्रीहृदयाचा परिचय करून घेताना मनुष्य ज्या गूढतेने चकित होतो. तीच गूढता सौंदर्याच्या दुनियेत बालकाप्रमाणे विहरणाऱ्या कवीला अचानक येऊन भिडते, तो दचकतो, त्याला विश्वाच्या रहस्याचा स्पर्श होतो. नकळत त्याचे शब्द खोल आणि विरोधाभासात्मक सत्ये बोलू लागतात. या दृष्टीने तांब्यांची ' भयचकित नमावे तुज रमणी ' आणि ब्लेक् याची The tiger ही कविता या दोन कविता पाहण्यासारख्या आहेत. तांब्यांची भयचकित ... ही कविता तसे पाहता गूढवादी नाही आणि तरी गूढवादी कवीचा अनुभव समजण्यास तिचा उपयोग आहे. साधारण मनुष्य वा साधारण कवी रमणीला पाहून भयचकित होणार नाही. त्याला वर्णसौंदर्याचा अनुभव येईल, प्रमाणसौंदर्याचा अनुभव येईल. शरीराच्या आणि हृदयाच्या कोमलपणाचा अनुभव येईल. पण भय आणि आश्चर्य यांनी मनाला स्तिमितता येऊन स्त्रीच्या पायावर डोके ठेवावेसे वाटणे, हा वेगळाच आणि साकल्यात्मक अनुभव, Total experience आहे. तो अनुभव घेण्याला एक वेगळी वृत्ती लागते. मी असेही म्हणेन की सर्वसामान्य माणसालाही तो अनुभव येतो पण जीवनात तसा क्षण यावा लागतो. तांब्यांच्या या कवितेचा आरंभ गूढानुभवाने झालेला आहे. किंबहुना आरंभीच्या एकाच ' भयचकित या शब्दात तो गूढानुभवी Shock आहे; की पुढे लगेच

तांबे केशवसुती वळणाच्या सामाजिक कल्पनात शिरतात. "अशा तुला लोक पायी तुडवतात ना ?" असे म्हणून ते हळहळतात. महाकवी वीर आणि स्थितप्रज्ञ पुरुष यांनादेखील तुझ्याच पोटी जन्म घ्यावा लागतो. हा विचारही सामाजिकच म्हणावा लागेल. शेवटच्या कडव्यातील–

फुला फूलपण मुली तुजमुळे
रत्नी राग तुझा गे उजळे

यासारख्या कल्पना विश्वात्मक अनुभवाच्या म्हणजे गूढवादाच्याच आहेत. पण संपूर्ण कविता गूढवादी आहे असे म्हणता येत नाही. किंवा ब्लेक् याच्या Tiger या कवितेप्रमाणे तांब्याच्या कवितेच्या शेवटच्या ओळीत गूढानुभवाचा स्फोट नाही. त्यांचा प्रारंभ स्फोटाने आहे, तर पुढील दोन कडवी सर्वपरिचित सामाजिक अनुभवाची आहेत. उलट ब्लेक् याची Tiger ही कविता प्रारंभी लहान मुलाकरिता लिहिलेल्या वर्णनात्मक कवितेप्रमाणे आहे. आणि पुष्कळदा ती कविता हायस्कूल सिलेक्शनमध्ये असेही. पण शेवटची—

Did he who made the lamb make thee ?

ही ओळ आश्चर्य आणि गूढानुभव यांना धक्का देते. तांब्याच्या भाषेत म्हणजे ब्लेकची कविता वाचून वाचक भयचकित होतो. त्याला वाघाचेच नव्हे तर कोकराचेही भय वाटू लागते. कारण दोघांचाही निर्माता एकच आहे, या कल्पनेने मनुष्य भयचकित होतो.

पुष्कळदा तांबे आपल्या गूढानुभवाचे गूढत्व आपल्या आस्तिक्याने पातळ करतात. किंबहुना मी तर असे म्हणेन की परंपरागत आस्तिक्य हे गूढगुंजनात्मक कवितेला मारकच आहे. रवीन्द्रनाथांनी परंपरागत धर्म खळखळ न करता स्वीकारला असता तर त्यांची गीतांजली झाली तितकी सुंदर झाली नसती. या दृष्टीने तांब्यांची 'घट भरा शिगोशिग' ही सुप्रसिद्ध कविता पाहण्यासारखी आहे. मानवी जीवनात दुःख असते एवढेच नव्हे तर सुखही दुःख बरोबर घेऊन येते. किंबहुना दुःखातूनच प्राप्त होते. हे कवीला सलणारे एक शल्य, तर सौंदर्यानुभवातही येणारे अडथळे हे दुसरे शल्य.

वर्ण जखडती कोमल कवना,
शृंखला खिळति या त्वरा करा

ही तांब्याची तक्रार प्रामाणिक असली तरी सर्वस्वी नवी नाही. पण शेवटच्या कडव्यातील त्यांचे गाऱ्हाणे सौंदर्यवादी मनाची एक वेडी पण गोड धडपड चित्रित करणारे आहे.

ज्योतिर्मय सखिची ही कांती
वाटे की मुरवावी स्वांती

झुकांडीच दे येइ न हाती,
ही माया निजसंहरा हरा !

या कडव्यात कवीने गाईलेले गाऱ्हाणे आणि कवीला बोचलेले शल्य सामान्यांना अपरिचित पण ज्यांनी अनुभव घेतला आहे, त्यांच्या हृदयाला भिडणारे आहे. सौंदर्याचे बाह्य वर्णन करणारांना नाकडोळे, त्वचेचा रंग एवढी पुरेशी होतात. सौंदर्याचाच अधिक साकल्याने किंवा Totality ने अनुभव घेणाऱ्यांना प्रियेच्या तरल ज्योतीसारख्या कांतीचा अनुभव येतो. पण नुसत्या अनुभवाने या कवीला समाधान नाही. त्याला ती तरल कांती किंवा ते सौंदर्यरूप तेज स्वतःच्या अंतरंगात मुरवावेसे वाटते. माधवराव पटवर्धन यांनी एका गझल मध्ये म्हटले आहे—

प्राशितो सौंदर्य तूझे मी दुरूनी,
प्राशुनी पियूष का जातो झुरूनी

माधवरावांच्या या इराणी सौंदर्यप्राशनात रोमँटिक अनुभवापेक्षा विरोधाभासाची चमत्कृतीच अधिक आहे. तांब्यांच्या कवितेत रोमँटिक् मनाची सनातन तगमग आहे. रोमँटिक् कवींना सौंदर्याचा शारीरिक उपभोग घ्यायचा नसतो तर त्याचे तेजोमय तरल रूप अन्तरंगात पकडायचे असते, मुरवायचे असते. आणि इथेच त्यांचा निसर्गाकडून पराभव होतो. तांबे म्हणतात " झुकांडीच दे येइ न हाती " Beauty always eludes the persuer ! ही ' Romantic hunt ', हा सौंदर्यवादी शिकारीचा खेळ अखेर फसतो. वास्तववादी लेखक, भौतिकशास्त्रज्ञ आणि जुने वैराग्यवादी कवी सौंदर्यालाच मिथ्या ठरवून मोकळे होतात. आणि मग–

मुखं श्लेश्मागारम् तदपिच शशांकेन तुलितम्

यासारख्या वैतागाच्या ओळी लिहितात. इतके कडवट न बनता इमर्सन्ने याच रोमँटिक पाठशिवणीचे वेगळेच वर्णन केले आहे. निसर्गसौंदर्याबद्दल तो म्हणतो, कवींना त्याबद्दल एक विचित्र मत्सर वा प्रेमसंशय वाटतो. ' Near yet not near enough ' अशी कवीची भावना असते. म्हणजे सौंदर्य यावे तितके आपल्या नजीक कधीच येत नाही, असे त्यांना वाटते. तांबे तेच म्हणत आहेत. " झुकांडीच दे ! "– It eludes ही ती रोमँटिक तक्रार आहे. रोमँटिक कवीचा सर्व जन्मच्याजन्म सौंदर्याच्या शोधात गेलेला असून ते सौंदर्य तर अखेरपर्यन्त झुकांडी देत असते. म्हणजे मग रोमँटिसिझमचे विरोधक जे म्हणतात तेच खरे ठरते की काय ? सौंदर्य हा भ्रम असून त्याच्या मागे लागणे हा मूर्खपणा मानायचा की काय ?

तांब्यांनी आपले गाऱ्हाणे या झुकांडीपाशीच संपवले असते तर ते रोमँटिसिझमला अधिक जवळचे झाले असते. त्यांच्या आस्तिक्यवादाने आणि पारंपरिक श्रद्धेने त्यांच्या सौंदर्यवादी दुःखाची तीव्रता कमी झाली आहे. कवितेचा शेवट–

ही माया निजसंहरा, हरा !

या ओळीने झाला आहे. म्हणजे तांब्यांनी या कवितेतील रोमँटिक वेदनेवर आस्तिक्य-वादाचा बोळा फिरवला आहे. वास्तविक रोमँटिक् तीव्रतेचे पर्यवसान गूढवादी ऐक्यानुभवात तरी व्हायला हवे,– नाही तर ती तीव्रता तशीच सलत, बोचत तरी ठेवायला हवी. या तीव्र मीलनेच्छेचे पर्यवसान एका उर्दू गझलमध्ये कसे होते ते पाहण्यासारखे आहे–

सय्यादसे गुलशनमे रो रो कहा बुलबुलने
क्यूं हो गया दिवाना
जो तू है वही मैं हूँ

" बगीच्यात बुलबुलाने रडतरडत पारध्याला म्हटले ' अरे माझ्याकरिता इतका वेडा का होतोस ? जो तू आहेस तोच मी आहे."

म्हणजे तांब्यांना सतावणाऱ्या झुकांडीचा आणि इमर्सन्ला प्रतीत होणाऱ्या विचित्र jealousy चा प्रश्न गूढवादी कवी अशा अद्वैतानुभवाने मिटवितात !

" घटभरा शिगोशिग " या कवितेत तांबे गूढगुंजनाच्या काठावरच थबकले असले तरी अन्यत्र त्यांनी गूढानुभवपर आणि तत्त्वज्ञानपर कविता लिहिल्या आहेत. त्या कविता मुख्यत्वेकरून मृत्यूसंबंधीच्या आहेत. ' प्रेम आणि मरण ' या दोन अनुभवामुळेच मनुष्य गूढवादाकडे आणि तत्त्वज्ञानाकडे वळतो. गूढानुभव किंवा Mystic experience हा अद्वैताचा ऐक्याचा किंवा Unitive experience असतो. त्यातील प्रेमाचा अनुभव घेतल्यावर मनुष्य मागे उरतो; पण मरणाचा अनुभव घेतल्यावर तो सांगायला मनुष्य मागे उरत नाही. आणि तरी मरण हा एक महत्त्वाचा काव्यविषय होऊन राहिला आहे. मरणासंबंधीच्या तत्त्वज्ञानपर कविता दोन प्रकारच्या संभवतात. एक प्रकार म्हणजे स्वतःच्या मरणाच्या कल्पनेने स्फुरलेल्या; तर दुसरा म्हणजे अगदी जवळच्या आणि जिव्हाळ्याच्या व्यक्तीच्या निधनाने स्फुरलेल्या. तांबे आणि ब्राउनिंग् यांच्या काही प्रसिद्ध कविता स्वतःच्या मरणाच्या कल्पनेने सुचलेल्या आहेत. तर रवीन्द्रनाथ आणि टेनिसन् यांना प्रिय व्यक्तीच्या निधनामुळे मृत्यूबर चिन्तन करावे लागले होते.

तांबे यांच्या मृत्यूविषयक किंवा महाप्रस्थानविषयक कवितांपैकी ' नववधू प्रिया मी बावरते,' ' जन पळ भर म्हणतिल हाय हाय ! '; ' आलो, थांबव शिंग,' या कविता विशेष सुंदर आहेत. त्यातील ' नववधू प्रिया मी... ' ही कविता म्हणजे एक प्रकारचे दीर्घरूपक किंवा allegory आहे. पण दीर्घरूपकात जी पुष्कळदा ओढाताण करावी लागते, ती मात्र या कवितेत बिलकूल नाही. आपण स्वतः म्हणजे नववधू आणि परमेश्वर म्हणजे त्या वधूला घेऊन जाण्याला आलेला नवर, असे हे केवळ काव्यातले रूपक नसून कवीला एका कोमल कातर क्षणी आलेला तो ' अनुभव ' किंवा झालेला ' साक्षात्कार ' होय. त्यात कवीने महाप्रस्थानाच्यावेळी होणाऱ्या क्लेषांचे जसे वर्णन केले आहे, तसेच परलोकासंबंधीच्या त्याच्या श्रद्धेचेही निवेदन केले आहे. रूपकात्मक आणि गूढानुभवा-

त्मक कविता म्हणून या कवितेचे स्थान आधुनिक मराठी कवितेत फार उच्च आहे. या कवितेतील शब्दयोजनाही साधीच, पण हृदयाला भिडणारी आहे.

कळे मला तू प्राणसखा जरी
कळे तूच आधार सुखा जरी
तुजवाचुनि संसार फुका जरी
मन जवळ यावया गांगरते

हे पहिले कडवे आणि

आता तूच भयलाज हरी रे
धीर देउनी ने नवरी रे !
भरोत भरतिल नेत्र जरी रे
कळ पळभर मात्र ! खरे घर ते

यात पहिले घर सोडतानाची मनःस्थिती,– अर्थात इहलोक सोडतानाची मनःस्थिती– आणि दुसऱ्या घराविषयीची 'जाणीव' म्हणजेच परमेश्वरासंबंधीची ज्ञानप्रेमयुक्त जाणीव, यांचे सहज, उत्कट आणि गानानुकूल शब्दात चित्र आहे. 'जन पळ भर' या शेवटच्या क्षणाच्या चित्रात तांब्यांच्या मनावरील ब्राउनिंग्च्या मृत्यूविषयक कवितांचा ठसा नकळत उमटला आहे. Prospice या कवितेत ब्राउनिंग् म्हणतो, "... One fight more the best and the last !" आणि मग आधीच स्वर्गात पोचलेल्या आपल्या पत्नीला भेटण्याच्या आशेमुळे ब्राउनिंग्ला मरण सह्य होते. त्याचा भरवसा परमेश्वरापेक्षाही पत्नीच्या पुनर्भेटीवर आहे.

" O thou soul of my soul ! I shall clasp thee again,
And with God be the rest ! "

तांब्यांचा भरवसा परलोकात असलेल्या आपल्या प्रियकरावर आणि प्रभूवर आहे.

या कवितेत तांब्यांच्या मनाचा झगडाही आहे आणि ईश्वरनिष्ठाही आहे. पण यांतील झगडा केवळ इहलोक सोडतानाचा नव्हे, त्यांचे मन परलोक पत्करण्याचीही येथे तयारी करीत आहे. त्यांच्या इतर मृत्यूविषयक कवितातही मरण स्वीकारण्याची तयारी नसून ती तयारी करण्याचा प्रयत्नच अधिक आहे. तांब्यांच्या कवितेत गूढगुंजन वगैरे कुछ काही नाही, अशी ग्वाही देताना त्यांचे पहिले भाष्यकार मायदेव यांनी सुफी mysticism चा निर्देश केला आहे. सुफी mystics परमेश्वराला प्रिया मानतात, तांब्यांनी तसे मानलेले नाही. म्हणून तांब्यांच्या कवितेत mysticism नाही, असे मायदेव म्हणतात. mysticism मध्ये परमेश्वराला प्रिया मानणे हे प्रमुख नव्हे, ऐक्यानुभवाची अथवा Unitive experience ची अतीव ओढ व प्रसंगी त्या अनुभवाची अपूर्व अभिव्यक्ती हे मुख्य आहे. सुफी कवी परमेश्वराला प्रिया मानतात, तेही तो, स्त्री आहे म्हणून नव्हे, तर उत्कट मीलनेच्छा व्यक्त करायला 'माशूक'चे रूपक घेणेच अधिक समर्पक म्हणून

होय. आपले कवी स्वतःवर जारिणीचे रूपक करून घेत. तांब्यांनीही 'रतले परपुरुषाशी' या कवितेत जारिणीच्या प्रेमाचेच वर्णन केले आहे. या दोन्ही रूपकात प्रियेलाही महत्त्व नाही, की जारिणीलाही महत्त्व नाही. तर उत्कट आकर्षणाला महत्त्व आहे. पतीपत्नींचे आकर्षण व्यावहारिक कर्तव्यांनी इतके बेजार आणि हतबल झालेले असते, की गूढवादी कवींची ओढ ते व्यक्त करू शकत नाही. ज्ञानेश्वरीवर प्रत्येक प्रवचनात प्रतिभावन्त भाष्य करणारे सातारकर संत दादामहाराज म्हणत असत. संतलोक अनेकदा जारिणीच्या प्रेमाचे उदाहरण घेतात, तसेच आपल्या भक्तिमार्गात राधेच्या प्रेमाचे महत्त्व आहे, याला कारण ती दोन्हीही उत्तम प्रकारे उत्कटता व्यक्त करू शकतात, हे होय. तांब्यांनी देवाला 'प्रिया' मानले नाही तर 'प्रियकर' मानले आहे, व स्वतःला प्रिया मानले आहे!

पण या रूपकाचे महत्त्व तांब्यांना केवळ काव्यातील रूपक म्हणून नाही. ते त्यांच्या जीवनात एक प्रकारच्या साधनासारखे झाले आहे. परमेश्वर हा प्रियकर भासेल व परलोक हेच आपले 'खरे घर' भासेल, तरच मरण सह्य होईल. तांब्यांच्या मरणविषयक कवितांत मरणावर मात नाही, तर मरण सह्य करून घेण्याची धडपड आहे. ते करताना कधी तांबे स्वतःला धीर देतात, तर कधी मरणाचे रूपच सौम्य आणि स्वीकार्य करण्याचा प्रयत्न करतात. पण मरणाचा अर्थच वेगळा करून टाकण्याचा त्यांचा यत्न नाही. तुम्हा-आम्हांला मरण जसे वाटते तसेच ते तांब्यांना वाटते. मरण म्हणजे 'सर्व प्रिय वस्तू सोडून जाणे', 'मरण म्हणजे या जगातून नाहीसे होणे,' हीच त्यांची भावना असल्याने, त्यांना मरणाचे आपल्याइतकेच भय वाटते. या भयंकर प्रसंगाला तोंड द्यायला आपण तयार आहो, असे ते 'आलो थांबव शिंग' या कवितेत सांगतात. तर मरणाशिवाय नवजन्म नाही, असे ते 'मरणात खरोखर जग जगते' या कवितेत सांगतात. ही सर्व मन घट्ट करण्याची तयारी आहे. मन घट्ट झालेल्या वेदान्त्याचे ते बोलणे नाही, की मरणावर केवळ गुलाबी पडदा टाकणाऱ्या कवीचेही ते बोलणे नाही. माता बालकाला एका स्तनापासून काढून दुसऱ्या स्तनाला लावते, तेवढाच फरक जीवन आणि मरण यात आहे, असे रवीन्द्रनाथांनी 'गीतांजली'त म्हटले आहे. कल्पना गोड आहे, पण मरणाच्या तयारीला तिचा कितपत उपयोग आहे, हा प्रश्नच आहे. "Men fear death, as children fear to go in the dark" असे लॉर्ड बेकनने म्हटले आहे. बेकनचे मरणभयाविषयीचे निवेदन टागोरांच्या निवेदनाहूनही वास्तववादी आहे;— पण पुढे काय? लहान मुले अंधारात जाण्याला भिणारच? आणि आपण सर्व मोठी मुले मरणानंतरच्या अंधारात जायला भिणारच! तांब्यांच्या मरणविषयक कवितांत तत्त्वज्ञानापेक्षा तयारीचाच भाग अधिक आहे.

शेक्सपियरच्या एका टीकाकाराने त्याच्या काही ट्रॅजिक् हिरोजसंबंधी म्हटले आहे की ते स्वतःला cheer up किंवा buck up करीत आहेत. तांब्यांच्या मरणविषयक कवितांतही त्यांचे तत्त्वज्ञान किंवा मरणाला तोंड देण्याचा निर्धार दिसण्यापेक्षा मरणाला

तोंड देण्याची तयारी करण्याचीच धडपड दिसते. 'जन पळ भर म्हणतील हाय हाय' ही सुंदर, हृदयस्पर्शी आणि प्रत्येकाला केव्हा ना केव्हा तरी आपल्याच मनःस्थितीचे चित्र वाटण्यासारखी कविता या दृष्टीने पाहण्यासारखी आहे.

जन पळ भर म्हणतील हाय हाय
मी जाता राहिल कार्य काय
* * *
सखे सोयरे डोळे पुसतील
पुन्हा आपल्या कामी लागतील
उठतील बसतील हसुनी खिदळतील
मी जाता त्यांचे काय जाय ? ।
(जन पळ भर.)
* * *
अशा जगास्तव काय कुढावे
मोहि कुणाच्या कां गुंतावे ?
हरिदूता कां विन्मुख व्हावे ?
कां जिरवुं नये शान्तीत काय ?

तांब्यांच्या या उद्‌गारात हरिदूताला सामोरे जाण्याची तयारी आणि लोकांच्या शोकासंबंधी बेपर्वाई दिसत असली तरी ती बाह्यतःच आहे. जीवनाबद्दलचे प्रेम लोकांना अधिक काळ हळहळ वाटावी ही इच्छा,– किंबहुना जगाचे आपल्यावाचून अडत नाही, ही खन्त हाच या सुंदर, हृदयविदारक कवितेचा मुख्य Import आहे ! म्हणजे कविता बाह्यतः तत्त्वज्ञानपर, पण आतून आसक्तिपर आणि 'Self-love' चीच आहे. अर्थात आपले त्यात काही बिघडत नाही ! कवितेत तत्त्वज्ञान कमी असल्याने ती अधिक हृदयस्पर्शी झाली आहे. तांब्यांनी मूळ ती 'कालंगडा' रागात म्हणण्याकरिता लिहिली होती असे स्मरते. निदान तांब्यांच्या हयातीत आम्ही त्याला 'कालंगडा' राग लावीत असू. 'एकच प्याल्या'तील 'बघु नको मजकडे केविलवाणा' हे बालगंधर्वांनी म्हटलेले 'कालंगडा' रागातील पद ज्यांना स्मरत असेल त्यांना 'पळ भर म्हणतील हाय हाय' ही कविता त्या रागात किती करुण लागत असेल याची कल्पना येईल. 'दीपचन्दी'च्या संथलयीत हा राग म्हणायचा असतो, या उलट लताबाईंसारख्या गुणी गायिकेने तेच गीत उडत्या लयीत म्हटल्यास त्याचे रूपच पालटून जाते.

ज्या आणखी एका कवितेत तांब्यांनी अकल्पितपणे शेवटच्या कडव्यात श्रोत्यांच्या डोळ्यांपुढे आपल्या अंतकाळाचे दृश्य धरले आहे, त्या 'मधु मागसि माझ्या सख्या, परी...' या कवितेचीही स्थिती हीच आहे. या खिन्न आणि करुण वृत्तीच्या गीताला लताबाईंनी द्रुत लयीतील उडती चाल लावली आहे. इतकेच नव्हे तर या कवितेतील

जी ' प्राणभूत ' किंवा ' Key note ' अशी ओळ, तीच लता मंगेशकर यांच्या ध्वनि-मुद्रिकेत घसरून पायरीवरून पडल्यासारखी— " ढल्लारे, ढल्रा दिन... " अशी म्हटलेली आढळते. ज्यांना तांब्यांची कविता स्वतः तांब्यांच्या तोंडून किंवा तांब्यांच्या समक्ष, त्यांना पसंत असलेल्या चालीत ऐकायला सापडलेली असेल, त्यांना लता-बाईंच्या रेकॉर्डस् त्यांच्या अप्परेसारख्या आवाजातूनही तांब्यांच्या कवितेच्या विडंबना-सारख्या वाटतात !

तांब्यांच्या कविता गेय आहेत, हा त्यांचा दोष नसून हे त्यांचे एक सौंदर्य आणि हा त्यांचा एक अलंकार आहे. अनुरूप चालीने त्यांचे सौंदर्य अधिक कळते, वा अधिक वाढते, याची जाणीव केवळ संगीत जाणणारांना नसते ! यावरून रेडिओवरील एका प्रसंगाचे स्मरण होतें. एका कार्यक्रमात वेगवेगळ्या कवींच्या सहा स्वातंत्र्य–गीतांत तांब्यांची ' वाटले नाथ हो ' ही कविता मी अन्तर्भूत केली होती. पुणे रेडिओवर गोळवलकरांच्या सारखा रसिक संगीतज्ञ Music director होता, आणि उषा अत्रे या त्यावेळच्या सुस्वर मुलीची काव्यगायिका म्हणून निवड झाली होती. कार्यक्रमाचा नियोजक आणि कॉमेंटेटर् मी होतो. म्युझिक डायरेक्टरने लावलेल्या चालीत मी जेव्हा ती कविता ऐकली, तेव्हा मला मी कोणती कविता ऐकत आहे तेच समजेना. ही कविता असहकारितेची चळवळ फसल्या वेळची आहे, हे मी मागे सांगितलेच आहे. ' हंबरडा फोडी आर्त महात्मा जेव्हा ' ही या कवितेतील मी ' Key line ' समजतो. कारण या गीताला हंबरड्याचेच रूप आहे ! आणि तांब्यांच्या समक्ष जेव्हा माधवराव पटवर्धनांच्या पत्नी हे गीत आपल्या सुंदर आवाजात म्हणत, तेव्हा त्या सुंदर गायनातही एक हंबरडाच ऐकू येई ! म्हणजे या कवितेचे सौंदर्य केवळ गायनावर अवलंबून आहे असे मात्र नव्हे. पण त्यातील ' मूड ' ला प्रतिकूल अशी चाल लावण्याने मात्र कवितेचा परिणाम बिघडतो. त्यापेक्षा केवळ लयबद्ध गद्याप्रमाणे ती कविता वाचली, तरीही चांगली लागते. आज मात्र ज्यांना संगीत कळते,– पण काव्य कळत नाही, अशांच्या हाती तांब्यांच्या कविता जात आहेत, व त्यांच्या ध्वनिमुद्रिकाही घरोघरी पसरत आहेत.

तांब्यांच्या अनेक कवितांत ' गेयतेला प्राधान्य असल्यामुळे वैचारिकतेला स्थान नाही ', हा दोष म्हणून दाखविण्यात येतो. त्यात असेही सूचित करायचे असते की या दृष्टीने केशवसुतांची कविता अधिक सकस किंवा ' आशयघन ' असते. काव्या-संबंधीचा एक अर्धवट समज यांच्या बुडाशी असतो. तो म्हणजे वैचारिकता किंवा Intellectual Element कमी असले, की ती कविता निकृष्ट, क्षीण किंवा उथळ होय. आपण Lyrical कवितेविषयी किंवा भावगीताविषयी बोलत आहोत, हे या ठिकाणी विसरले जाते. भावगीताला किंवा Lyric ला केवळ वैचारिकतेने घनता येते ही समजूत चुकीची आहे. वैचारिकतेपेक्षाही उत्कटतेला भावगीतात अधिक महत्त्व आहे आणि तांब्यांच्या गीतांचे सौंदर्य उत्कटतेत आणि ' Ecstacy ' त असते. कोणत्याही भाषेतील उत्तमातील उत्तम Lyrics घेतल्यास, त्यात वैचारिकतेपेक्षाही उत्कटतेचे सौंदर्य अधिक

असते असे दिसून येईल. मागे उल्लेखलेल्या वर्डस्वर्थच्या Behold her single in the field या कवितेत, वैचारिकता काडीचीही नाही आणि तरी ती कविता वर्डसवर्थच्या विख्यात कवितांपैकी आहे. तसेच–

Hail to thee, blithe spirit !
Bird thou never wert...

या शेलेच्या कवितेत केवळ Rhapsody सारखीच पहिली सोळा सतरा कडवी आहेत आणि नंतर एकाच प्रसिद्ध कडव्यात–

We look before and after

–या कडव्यात कवी वैचारिकतेत शिरतो. पण म्हणून तांब्यांच्या गीतावर घेतले जाणारे आक्षेप शेलेच्या या विख्यात– गीतावर घेण्याचे साहस कोणी करीलसे वाटत नाही. वैचारिकता आणि प्रचार या गोष्टी काव्याला मारक असतात, हे तांब्याचे मत, वैचारिकतेवर आक्षेप घेणाऱ्या मतापेक्षा अधिक खरे आहे. भावनेने तापून आलेल्या विचारांनाच फार तर काव्यात स्थान असू शकेल. म्हणजे मुख्य स्थान उत्कटतेला आहे.

पण उत्कटता वैचारिकता या दोहोंच्याही पेक्षा एक वेगळेच Element तांब्यांनी आपल्या काव्यात आणून सोडले. ते म्हणजे उत्कट प्रसंगाकडे किंवा भावनेकडेही तल्लीन पण तटस्थ अशा प्रेक्षकाच्या भूमिकेने पाहणे. स्त्रीपुरुष प्रेमाकडे अशा तटस्थ भूमिकेवरून पाहणे तर अधिकच अवघड आहे. ज्याला तांब्यांची नाट्यगीते आणि प्रेमगीते म्हणतात ती म्हणजे त्यांच्या प्रतिभेचा परमोच्च बिंदू होय. त्यांचा विचार आपणाला पुढच्या व्याख्यानात करायचा आहे.

● ●

कविवर्य तांबे : जन्मशतसांवत्सरिक उत्सव

व्याख्यान दुसरे

काल आपण तांबे यांचा संप्रदाय, त्यांची सर्वसामान्य शैली आणि जीवनदृष्टी यासंबंधी बोललो. आज त्यांच्या प्रेमकवितेसंबंधी विचार करावयाचा आहे.

आधुनिक काळात म्हणजे इंग्रजी संपर्कानंतरच्या काळात आपण जिला प्रेमकविता म्हणू लागलो तशी प्रेमकविता आपल्याकडे पूर्वी नव्हती. म्हणजे संस्कृतातही नव्हती आणि मराठीतही नव्हती. संस्कृतातील प्रेमकविता ही प्रायः शृंगारकविता होती. मराठी शाहिरी वाङ्मयात जी प्रेमकविता होती, ती उत्तान आणि वैषयिक होती. म्हणजे संस्कृत वाङ्मयातील प्रेमकवितेला आलंकारिकतेमुळे आणि वैदग्ध्यामुळे प्रतिष्ठा होती, तर लावणी वाङ्मयाला प्रतिष्ठाच नव्हती. आधुनिक काळातच प्रेम या 'भावने'ला काव्यात प्रतिष्ठा प्राप्त झाली. प्रेमकाव्यात संभोगशृंगाराचीही अपेक्षा उरली नाही, की कृत्रिम अलंकार आणि ध्वनी यांचीही अपेक्षा उरली नाही. भावनेच्या प्रामाणिकपणाला आणि उत्कटतेलाच काय ते महत्त्व आले. याचे कारण प्रेम या भावनेलाच शृंगार म्हणून नव्हे तर जणू अध्यात्म म्हणून महत्त्व आले. गडकऱ्यांच्या 'क्षण एक पुरे प्रेमाचा। वर्षाव पडो मरणांचा। मग पुढे। या प्रसिद्ध ओळीत प्रेम हे जणू एक जीवितसाफल्य मानले आहे. नुसते चिरंजीवित्व हे दगडाच्या दीर्घायुष्यासारखेच होय, म्हणून त्याचा धिक्कार केला आहे. माधव ज्यूलियनही बडोद्याकडे त्याच सुमारास जणू तेच शब्द लिहीत होते!

प्रेम करी मी दगड नसे हे नसे काय काही ?
हृदयी ही अमृतगंगा

* * *

पडली आहुति या जन्माची प्रेमाच्या होमी,
आणखी काय दुजे मागू

प्रेमाच्या यज्ञात बलिदान करण्याची ही वृत्ती संस्कृतातही नव्हती की लावणी वाङ्मयातही नव्हती. संभोग आणि विप्रलंभ याखेरीज यांना प्रेमास्वादाची तिसरी तऱ्हा

माहीत नव्हती. विप्रलंभातदेखील प्राप्त झालेल्या अथवा प्राप्त होण्यासारख्या व्यक्तीचा 'विरह' हाच काव्यविषय झालेला असे. प्रेमभंग वा अप्राप्तप्रेम काव्यविषय होऊ शकत नसे. एका आधुनिक संस्कृत पंडितांनी तर आधुनिक प्रेमभंगाच्या कवितेचा पन्नास टक्के प्रेमाची कविता म्हणून उपहासही केलेला आहे. परंतु आधुनिक कवितेत अप्राप्त किंवा भग्न प्रेमविषयाला महत्त्वाचे स्थान आहे. कारण अशा विषयातही प्रेमिकाच्या आकर्षणाची आणि तळमळीची उत्कटता नाकारता येत नाही आणि साफल्य किंवा यश हा रोमँटिक् प्रेमाचा विषय नसून उत्कटता हाच प्रेमाचा सर्वश्रेष्ठ विषय होय.

ही उत्कटता एक विवाहपूर्व प्रेमात तरी असेल किंवा कोणत्याही कारणाने अप्राप्य अशा प्रेमात तरी असेल. फारसीत प्रेमाला 'मुहब्बत' हा शब्द असला, तरी 'इष्क' म्हणजे विरही हाच प्रेमकाव्याचा प्रमुख विषय आहे. अशा आर्त, विरही प्रेमगीतात अप्राप्य व्यक्तीला अतिरिक्त महत्त्वाचे स्थान प्राप्त होणे साहजिक असते म्हणजे ते कधी कधी स्त्रीपूजनाचे काव्य होते, तर कधी कधी दुःखपूजनाचा वा misery mongering चा आरोप होतो. पण उर्दू गझल या दोहोंच्याही पलिकडे गेलेली आढळते. त्यात स्त्रीपूजन आणि दुःखपूजन या ऐवजी प्रेमपूजन आणि प्रेमिकपूजन केलेले आढळते. माधवराव पटवर्धनांच्या–

प्रेम करी मी दगड नसे हे नसे काय काही
हृदयी ही अमृतगंगा

या ओळीत हेच प्रेमपूजन आणि प्रेमिकपूजन आहे.

आधुनिक मराठी कवितेत आरंभापासूनच स्त्रीपुरुषप्रेमाची गीते असली तरी ज्याला खरी उत्कट प्रेमानुभवाची कविता म्हणता येईल, तिचा प्रारंभ गडकरी आणि माधव ज्यूलियन यांच्या कवितेतच दिसतो. गोफ, हृदयास, 'निर्दय बालेस', 'तुटे स्नेहसंबंध सर्वस्वी आता'– (अखेरचे प्रेमगीत) यासारख्या कवितांत हृदय पिळवटून टाकणारा प्रेमभंगानुभव गडकऱ्यांनी नमूद करून ठेवला आहे. त्यात कलाकौशल्य, आलंकारिकता यांना जागा नाही. त्यांची भाषा जणू सरळ आक्रंदनासारखी आहे. त्यांना, 'पन्नास टक्के प्रेमाची गीते' म्हणणाऱ्या पंडितांना कौटुंबिक वात्सल्याव्यतिरिक्त प्रेमाचा अनुभवच नसावा, असे म्हणावे लागते! मी तर अशा प्रेमगीतांना 'दीडशे टक्के प्रेमाची गीते म्हणतो. कारण अन्य व्यक्तीचा प्रतिसाद नसतानाही ते प्रेम टिकलेले असते. पण गडकऱ्यांच्या प्रेमभंगाच्या कवितांत, मनुष्यस्वभावास अनुसरून थोडाफार कडवटपणा आलेला आहे. त्याच असफल प्रेमाला माधवरावांनी ध्येयात्मक आणि उदात्त बनवले आहे. कारण त्याचा विषय 'प्रिय व्यक्ती' हा राहिलेला नसून, 'प्रेम' हाच झालेला आहे आणि प्रिय व्यक्ती हाच विषय उरला तरी त्यात कटुता किंवा राग नाही.

कवीच्या दुःखाचीही गीते मधूर बनतात. किंबहुना दुःखाची गीते सुखी संसाराच्या गीताहूनही मधूर बनतात. तांब्यांची सुखी संसाराची गीते सुंदर आहेत, पण ती आर्त

असणे शक्य नाही. त्यांनी स्वतःच्या विवाहपूर्व प्रणयावर वा विवाहबाह्य प्रणयावर लिहिले नाही. कदाचित तारुण्यातील ज्या कविता जाळल्याचे त्यांनी स्वतःच सांगितले आहे, त्यात अशा आर्त आणि अप्राप्त प्रेमाच्या कविता जाळल्या गेल्याही असतील. पण आज त्यांच्या ज्या वैयक्तिक प्रेमाच्या प्रथमपुरुषी कविता उपलब्ध आहेत, त्या सफल सांसारिक प्रेमाच्याच आहेत. Domestic love आणि Romantic love यात फरक करायला हवा. जिला प्रेमकविता म्हणतात ती Romantic प्रेमाचीच असणार. तांब्यांनी एखादी वैयक्तिक आकर्षणाची कविता लिहिली असली, तरी तिला त्यांनी निष्काम सौंदर्यपूजनाचे रूप दिले आहे. १९१० सालच्या एका कवितेत विशाल गौर भाल, नितंबावर रुळणारा काळाभोर केशकलाप यांची तांब्यांच्या मनावर भुरळ पडलेली नमूद आहे. मात्र त्या कवितेचा शेवट तांब्यांनी पापवासनेचा धिक्कार करूनच केलेला आहे.

पापाची स्मृति राहिली जर नरा पाहूनि ही सुंदरी
धिग्धिक् ! त्या कळली अगाध हरिची नाहीच कारागिरी.

पण म्हणजे तांब्यांचा संबंध केवळ निष्काम प्रेम आणि सांसारिक प्रेम यांखेरीज अन्य प्रेमाशी नाही असे नव्हे. या दोन प्रेमप्रकारांव्यतिरिक्तही त्यांनी अनेक सुंदर प्रेमगीते लिहिली आहेत. त्यातील काही नाट्यगीते या नावाला पात्र आहेत, तर काही कठोर व्याख्येप्रमाणे नाट्यगीते नसली तरी सर्वसामान्य वैयक्तिक प्रेमगीतापेक्षा वेगळी आहेत. सर्वसामान्य प्रेमगीते ही आत्मनिष्ठ असतात. म्हणजे स्वतःच्या प्रेमाकर्षगाविषयी वा प्रेमभंगासंबंधी असतात. मग ती गडकऱ्यांच्या प्रेमगीतांसारखी अगदी उघड वैयक्तिक संबंधाची असोत, की माधवराव पटवर्धनांच्यासारखी ध्येयरूप किंवा idealized प्रेमाची असोत, तांब्यांचे विशेषत्व अथवा 'युनिक्नेस' हे होय की त्यांनी दुसऱ्याच्या प्रेमावर आणि दुसऱ्याच्या तिसऱ्याविषयीच्या आकर्षणावर इतकी सुंदर प्रेमगीते लिहिली आहेत की त्यांना तोड नाही. तांब्यांचे अद्वितीयत्व बालगीतांत नाही, मृत्युविषयक कवितांत नाही की सांसारिक प्रेमगीतांत नाही. त्यांचे अद्वितीयत्व स्वतःच्या प्रेमापेक्षाही अन्य व्यक्तींच्या प्रेमात रंगण्यात आहे.

यातील काही नाट्यगीते असल्याने त्यांची तुलना ब्राउनिंगच्या नाट्यगीतांशी करण्यात आली आहे. पण तांब्यांची ही प्रेमगीते सामान्यतः Objective किंवा परलक्षी आहेत, हा त्यांचा वेगळेपणा होय. ज्याने स्वतःच्या यौवनातील प्रेमाकर्षणाची गीते लिहिली नाहीत, त्याने यौवन संपून गेल्यानंतर दुसऱ्यांच्या प्रेमाची चित्रे इतक्या तल्लीनपणे आणि रम्यपणे काढावीत, हे वाङ्मयक्षेत्रातील एक आश्चर्यच होय. त्यांच्या नाट्यगीतांचा उगम ब्राउनिंगच्या नाट्यगीतांत आहे काय ? ज्यांचा ब्राउनिंगच्या नाट्यगीतांशी साक्षात परिचय आहे, ते या theory ला मान्यता देणार नाहीत. ब्राउनिंग हा मुख्यतः मनोविश्लेषक होता व त्याला Monologue अथवा आत्मविश्लेषणात्मक भाषण हे माध्यम विशेष सोयीचे वाटे. त्या monologues मध्ये Conscience चे प्रश्न अथवा कर्माकर्म-

विषयक कूट प्रश्न तो सोडवीत असे. म्हणजे त्याचे Dramatic monologue हे विचारी व्यक्तींच्या कबुलीजबाबासारखे असत. तसेच त्याच्या काव्यात प्रमुख स्थान मनोविश्लेषणाला असे, कलेला स्थान दुय्यम असे. इतकेच नव्हे, तर त्याच्या काव्यात वाचकाच्या आकलनशक्तीला आणि अवधानशक्तीला एक प्रकारचे आव्हानच असे. त्यात पांडित्याचा आणि तज्जन्य अपरिचित ग्रंथोल्लेखांचा तो अनिर्बद्ध मारा करी. आपल्या वाचकांनाही हे सर्व कोनाकोपऱ्यातले ग्रंथोल्लेख माहीत असतील असे तो गृहीत धरी ! सारांश, एका टीकाकाराने म्हटल्याप्रमाणे, " It was, 'excess of thought over art', which imperilled Browning's poetry ! " इंग्लंडमधून भारतात व्याख्याने देण्याकरिता आलेल्या एका ऑक्सफर्ड प्रोफेसराने तर इलियट् एझ्रापौंड् वगैरे नवकवींच्या काव्यात अतिरेकाला गेलेल्या घातुक क्लिष्टतेचे– 'blighting obscurity चे मूळ ब्राउनिंग्च्या काव्यात आहे, असे म्हणण्याचे धाडस केले होते.

तांब्यांच्या शैलीचा वा आकृतिबंधाचा ब्राउनिंग्च्या क्लिष्ट शैलीशीही संबंध नाही, की त्याच्या monologue च्या आकृतिबंधाशीही संबंध नाही. तांब्यांच्या प्रेमगीतांत मनोविश्लेषण व नाट्यात्मकता यांच्यापेक्षाही तल्लीन परलक्षी objective चित्रणाचाच भाग अधिक आहे. म्हणून केवळ नाट्यगीते हे तांब्यांचे वैशिष्ट्य नसून, तल्लीन वस्तुनिष्ठ चित्रण हा त्यांच्या काव्यातील अद्वितीय भाग आहे.

तांब्यांची नाट्यगीते ब्राउनिंग्च्या नाट्यगीताप्रमाणे क्लिष्ट मनोविश्लेषणाने तर भरलेली नाहीतच, पण त्यात साध्या भावगीतापेक्षाही कलात्मकतेला आणि ढंगदारपणाला अधिक स्थान आहे. सामान्यतः मराठी भावगीतात उत्कटता आणि उत्कटतेला साजेशी शैली यापलीकडे कलेला स्थान नसते. उर्दू गझलमध्ये आणि इंग्रजी सॉनेटमध्ये 'बांधणीचे कौशल्य' म्हणून शैलीव्यतिरिक्त आणखी काही असते. त्यात जबाबसवाल, कलात्मक आक्षेप आणि तितकेच कलात्मक निरसन यांसारखे अनेक रंगढंग असतात. म्हणजे केवळ भावनांचा 'आवेग' नसतो, तर भावनांचा 'विलास' असतो आणि म्हणूनच काही उर्दू पंडित इंग्लिश lyric आणि उर्दू गझल यात भेद आहे, हे आग्रहाने प्रतिपादितात. तांब्यांचे नाट्यगीत हे केवळ नाट्यप्रसंगामुळे आणि जबाब-सवालामुळे वेगळे ठरते असे नव्हे; तर त्यातील कल्पित पात्रांची भूमिकाच विलासी, कल्पनारम्य आणि ललित अशी असते आणि म्हणूनही केवळ ब्राउनिंग्च्या Dramatic lyric शी त्याचे साम्य कल्पिणे म्हणजे त्याचे अवमूल्यन करणे होय. त्यांचे–

मुशाफिर आम्ही । आम्ही वनवासी
कशास्तव भुललीस आम्हासी ?

हे नाट्यगीत या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. ते मूलतः करुण वृत्तीतील आहे आणि बाळ अभिमन्यू... या स्त्रीगीताच्या अत्यंत करुण आणि संथ चालीत ते लिहिले आहे. त्यात जबाबसवालही आहेत, पण गेयता, कारुण्य आणि उर्दू गझलसारखा कारुण्यातही सुचणारा खेळकरपणा मुख्य आहे.

" मुली कुलशीला ।
कुलशीला बघुनी । करावा पती तो युवतींनी ॥ "
" महाकुल दिसता ।
दिसता रजपूत । जाहले भाग्य जरी अस्त ॥ "
" वनी कोठोनी ।
कुठुनी कुसुमशय्या ? । टाकितो दगडावर काया ॥ "
" तुम्हाविण शय्या ।
शय्या कुसुमांची । रुते मज काट्याहुनि साची ॥ "

अशा प्रकारचे जबाबसवाल व पहिल्या चरणात दुसरा चरण ओवून घेणे, हे या गीताचे वैशिष्ट्य आहे. त्यातील नायक चढत्या क्रमाने आपल्या विपन्नतेचे वर्णन करीत आहे व नायिका तितक्याच चढत्या सुरात आपला निर्धार व्यक्त करीत आहे. कवितेचा शेवट केवळ सॉनेट्च्या last Couplet सारखा वैचारिक धक्क्याने होत नसून प्रत्यक्ष घटनात्मक आश्चर्यानेच झाला आहे. तो रजपूत मुशाफिर म्हणतो–

" कशाचे आम्हां । आम्हां घरदार ? ।
कशाचा अमुचा संसार ? । "

आणि असे म्हणून त्याने घोड्याला टाच दिली. त्या रमणीला महालातच सोडून तो चालू लागला. म्हणजे त्याने आपल्या दृष्टीने तो प्रेमप्रसंग अथवा ते Episode संपविले होते. पण ती रजपूत रमणी त्याच्या मागे धावून त्याला आपणांला आश्चर्याचा धक्का देते.

" चालला वारू । वारू तेथोनि ।
धावली अबला मागोनी ॥ "

या नाट्यगीतात जबाबसवाल आणि शेवटी प्रत्यक्ष घटनेचा, आश्चर्याचा धक्का एवढेच आहे. पण ' राजकन्या आणि तिची दासी ' या नाट्यगीतात दोन स्त्रियांचे खवचट, तिरकस नर्म विनोदाने भरलेले जबाबसवाल आहेत !

" प्रेम तयावर होते तर मग तुमचे ना भारी "
" छे ! छे ! कसले लेक नृपाची मी, तो व्यापारी ! "

या कवितेत अशीच एक प्रेमकथा आणि दासीने नर्म विनोदाने खुलविलेला राजकन्येचा असाच एक अनुराग वर्णिला आहे. याही गीतात उत्कटतेपेक्षा प्रणयपोषक थट्टामस्करी आणि खेळकरपणा यांना महत्त्वाचे स्थान आहे. ' फेरीवाला ' या कवितेतही एका दासीने राजकन्येच्या प्रणयभावनेला आणि प्रणयपूर्तीला दिलेले नाट्यपूर्ण उत्तेजनच आहे. त्यात संस्कृत कवींना आवडणाऱ्या ध्वन्यर्थाचाही भरपूर विलास आहे.

फेऱ्या दारावरी कुणी हा फेरीवाला करी ! ॥
प्रभातकाळी दीपविसर्जनी ।

सायंकाळी दीपदर्शनी ।
पुकार करिता खिडकीवरूनी ।
नजर फेकितो वरी ।

यातील ' पुकार करिता ' हे शब्द उच्चारताच तांबे खरोखरीच " जरी ऽ पल्ले ऽ !" असे जणू फेरीवाल्याच्या आवाजात ओरडत आणि मग ते कडवे पूर्ण करीत. या कवितेत शब्द-चित्रांचे आणि साध्याच परंतु नाट्यपूर्ण शैलीचे सौंदर्य विशेष आहे.

पलीकडे वटवृक्षाखाली ।
पारंब्यांची ज्याला जाळी ।
गर्द साउली ज्या कवटाळी ।
उभा आज तो परी ।

या कडव्यात वडाच्या पारंब्यात लपलेल्या त्या फेरीवाल्याचे ते चित्र आहे. ती ' चावट दासी ' केवळ फेरीवाल्याच्या फेऱ्यांची वार्ता सांगूनच थांबत नाही, पुढच्या घटनांची शक्यताही सूचित करते !

विशाल त्याचा बळकट बाहू ।
तरुणि फुलापरि शकेल वाहू ।
टोळांपरि मग शत्रू येवू ।
उडविल मशकापरि ।

याच्या पुढील कडव्यात मस्तीला आलेल्या ' घोडी ' चा उल्लेख सूचक आहे. ती दासी इतिहासपुराणातल्या कन्याहरणाच्या कथाही सांगते. सारांश, एक प्रसंग आणि त्या प्रसंगाला अनुरूप कृतीची सूचना यांचे चित्रण या कवितेत दासीच्या मुखाने केले आहे. त्यातली नाट्यात्मकता तांबे आपल्या अभिनययुक्त काव्यगायनाने जितकी प्रकट करीत तितकी नुसत्या वाचनात वा संगीतप्रधान वाचनातही प्रकट होत नाही.

पण ही नर्मविनोदी नाट्यगीते आणि त्यातील रजपूत अथवा ' मिडीव्हल् ' वातावरण म्हणजे, " तांब्यांनी वास्तवातून स्वप्नरंजनात केलेले पलायन होय, "— Escape into phantacy होय, अशी कित्येकांनी उपपत्ती बसविली आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तांब्यांचे प्रमुख भाष्यकार कवी काळेले हे देखील या उपपत्तीच्या आहारी गेले आहेत ! मनुष्य जेव्हा जेव्हा स्वानुभवाबाहेरचे एखादे दृश्य रंगवतो तेव्हा तो लहानमुलासारखा स्वप्नरंजनात आणि त्याद्वारे पलायनात गुंग असतो, ही कल्पना बरोबर नाही. तसे म्हटल्यास प्रतिभेच्या द्वारे केलेली प्रत्येक निर्मिती म्हणजे वास्तवातून काल्पनिकात केलेले पलायन असे म्हणावे लागेल. ही उपपत्ती म्हणजे कलेचा आणि कलावंतांचा उपमर्द होय. एखाद्या आधुनिक कवीने मध्ययुगीन वातावरण रंगविले, किंवा रजपूतकालीन रमणी रंगविली तरच नेमकी ही स्वप्नरंजनाची उपपत्ती का आठवावी ? आजच्या एखाद्या कवीने विधवेच्या किंवा मजरांच्या दुःखाचे चित्र काढले

तर तेही स्वप्नरंजनात का दाखल करू नये ? सारांश, सामान्यांचे अनुभव आणि प्रतिभावंतांचे अनुभव एक नव्हेत, हे वास्तववाद्यांनीही लक्षात घ्यायला हवे. सामान्य मनुष्य प्रत्यक्ष अनुभव घेतो आणि म्हणून त्याचे अनुभव मर्यादित असतात. प्रतिभावंत माणूस प्रतिभेने अनुभव घेतो, आणि म्हणून त्याच्या अनुभवांना मर्यादा नसते. म्हणूनच केशवसुतांनी म्हटले आहे.

... आम्ही असू लाडके
देवाचे, दिधले असे जग। तये आम्हास खेळावया,
विश्वी या प्रतिभावले विचरतो चोहीकडे लीलया,
दिक्कालातुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके

प्रतिभेचे मूळ सार्वत्रिक आवडीत, अथवा Interest मध्ये आणि सार्वत्रिक सहानुभूतीत (Sympathy मध्ये) असते. तांब्यांना जुन्या काळाबद्दल आणि जुन्या रजपूत वातावरणाबद्दल सहानुभूती होती, आवड होती, प्रेम होते. त्यांनी आपली सहानुभूती समकालीनापुरती मर्यादित केलेली नव्हती.

काव्यविवेचनात ' पुरोगामी ' आणि ' प्रतिगामी,' ' वास्तव ' आणि ' स्वप्नरंजन' ह्या कसोट्या लावल्याने काव्याच्या आकलनात कसा अडथळा निर्माण होतो, हे यावरून दिसून येईल. वास्तविक जेव्हा एखादा मध्यमवर्गीय कवी मजुरावर किंवा अस्पृश्यावर लिहीत असतो, तेव्हा तो सहानुभूतीयुक्त कल्पकता किंवा ' Imaginative sympathy ' च वापरीत असतो; तसाच जेव्हा तो रजपुतकालीन सरंजामशाही राहणीचे चित्र काढीत असतो, तेव्हाही तो ' Imaginative sympathy ' च वापरत असतो. रोमँटिक् मनाला जशी नावीन्याची आणि परंपराविरोधाची ओढ असते, तशीच प्राचीन इतिहासाचीही ओढ असते. सर वॉल्टर स्कॉट, इतिहासाकडे या प्राचीनते-संबंधीच्या ओढीनेच आकृष्ट होई; तर लॉर्ड बायरन ग्रीसमधील राजकीय क्रांतीसंबंधी जेवढी ओढ दाखवी, तेवढीच इटलीतील प्राचीन वास्तूसंबंधी दाखवी. तो इटलीत राहावयास गेल्यावर मुद्दाम जुन्या (Counts) सरदारांचे वाडे, राहण्याकरिता घेत असे. ही त्याची जुन्याची आवड त्याच्या नावीन्यप्रेमाशी आणि बंडखोरीशी विसंगत होती, असे कोणी म्हणत नाही. कारण रोमँटिक् मनात जी अनेक परस्परविरोधी आकर्षणे असतात, त्यात ही दोन आकर्षणे आहेत, हे रोमँटिसिझमच्या अभ्यासकांना माहीत असते. आपल्याकडे हरीभाऊ आपटे सामाजिक कादंबऱ्यांत ' प्रागतिकता ' दाखवीत असूनही ऐतिहासिक कादंबऱ्यात प्राचीनतेचे आणि सरंजामशाहीचे चित्र तितक्याच प्रेमाने रंगवितात. तांब्यांच्या आकर्षण विषयांचा अभ्यास करताना ते सरंजामशाहीचे भोक्ते आहेत की काय ? हा प्रश्न वाङ्मयदृष्ट्या महत्त्वाचा नाही. ते रोमँटिक् कवी आहेत की ' Classical school ' चे कवी आहेत, हा प्रश्न वाङ्मयदृष्ट्या अधिक महत्त्वाचा आहे. आणि तांबे हे रोमँटिक् स्कूलचेच आहेत, म्हणजे केशवसुत ज्या

प्रवृत्तीचे कवी आहेत त्याच प्रवृत्तीचे तांबेही आहेत, हे या प्रश्नाचे उत्तर आहे. पण आधुनिक रोमँटिक् वृत्ती ही किती 'संकुल' अथवा Complex आहे, हे मात्र याबरोबरच समजावून घेतले पाहिजे, म्हणजे तांबे आणि केशवसुत एकाच संप्रदायात घातल्याचे नवल वाटणार नाही !

पण तांब्यांच्या नाट्यगीतांपेक्षाही त्यांच्या वस्तुनिष्ठ प्रेमगीतांचे सौंदर्य अधिक आहे. अशा गीतात 'घट भरे प्रवाही बुडबुडुनी' आणि 'घट तिचा रिकामा झऱ्यावरी' ही दोन गीते मी अग्रगण्य समजतो. ती हेतुशून्य, प्रसन्न, बौद्धिकतेपासून पूर्ण अलिप्त, अत्यंत उत्कट आणि तरीही वस्तुनिष्ठ अशी अद्वितीय चित्रे आहेत. त्यातील एक कविता तांब्यांनी सेहेचाळीसाव्या वर्षी लिहिली, आणि दुसरी अठ्ठेचाळीसाव्या वर्षी म्हणजे पन्नाशीच्या घरात असताना लिहिली. झऱ्यावर पाण्याला गेलेल्या पण हातातील कामापेक्षा प्रियकराचेच चिन्तन करणाऱ्या दोन ग्रामवधूंवरील त्या कविता आहेत. ज्या कन्यका प्रेमात सापडल्या आहेत, त्यांच्या तोंडचा त्यात एकही शब्द नाही. एका कवितेत प्रेमकथा सूचित आहे. दुसरीत प्रेमकथाही नाही. फक्त प्रेममग्न ग्रामीण वधूचे चित्र आहे. पण बालकवींच्या 'औदुंबर'सारखे किंवा I met a little cottage girl सारखे ते तटस्थ चित्र नाही. वस्तुनिष्ठ आहे पण तटस्थ नाही ही मौजेची गोष्ट आहे. झऱ्यावर जाऊन पाण्यात घागर बुडवून तशीच उभी असलेल्या त्या मुलीला उद्देशून कवी जणू आश्चर्याने आणि वात्सल्याने म्हणतो : तुझी घागर भरली आहे, बुडबुडे वर आले आहेत, अग तुला दिसत नाही का ? नजर दुसरीकडे असेल, पण बुडबुडण्याचा आवाजही ऐकू येत नाही का ?" असे म्हणून त्याने तल्लीनपणे त्या प्रमदेचे जणू कुंचल्याने चित्र काढले आहे.

पदर गळाला, उडे वायुवर,
कुरळे उडती केसही भुरभुर,
प्रमदे, बघ त्यां सावर, आवर—
कां उभी प्रवाही शून्य मनी ?

घागर बुडवून पाण्यात उभ्या असलेल्या प्रणयिनीचे इतके सुंदर चित्र मी मराठीतही वाचले नाही की इंग्रजीतही वाचले नाही ! इंग्रजीतील साम्ये शोधीत बसणाऱ्या टीकाकारांनी Enoch Arden मधील 'साडे तीन' ओळी शंभर वेळा उद्धृत केल्या आहेत ! पण त्या साम्यदर्शनाने तांब्यांच्या या अद्वितीय कवितेचे मोल, रतिभरही कमी होत नाही ! पहिली गोष्ट म्हणजे Enoch Arden मध्ये टेनिसन्ने " as a village girl who sets her pitcher underneath... असे म्हणून केवळ दृष्टान्तादाखल साडेतीन ओळीत एक चित्र काढले आहे. अर्थात त्यात कवीच्या जिव्हाळ्याचा विषय बेगळाच आहे. इथे मराठी कवितेत कवी स्वतःच जणू त्या झऱ्यावरील खेडवळ मुलीवर अनुरक्त झाला आहे ! पंचेचाळिशी उलटलेला, प्रतापगडास संस्थानी नोकरी करणारा,

हा पोक्त संसारी कवी ही कविता लिहीत आहे, ही गोष्ट असाधारण होय. तो त्या चित्रात इतका तल्लीन झाला आहे की, त्या झऱ्यावरच्या गार झुळुकाही त्याच्या अंगाला लागू लागल्या आहेत. पाण्याचे थेंब रानातील मातीवर पडल्याने सुटलेला वासही त्याच्या नाकाला जाणवू लागला आहे. संध्याकाळच्या वेळी ढग क्षितिजावर चढत आहेत म्हणून त्याला पावसासंबंधी चिंताही पडली आहे. कवी म्हणतो–

स्वैर गार या झुळका वाहति
मातीचा ये वास सभोवति
क्षितिजी ढग बघ वरवर चढती,
बघ घरा निघाल्या सोयतिणी !

यात आलेल्या रम्य, शान्त, उदास ग्रामीण वातावरणावरून शंभर तथाकथित ग्रामगीते ओवाळून टाकता येतील ! या पुढील कडव्यातील 'word-music' प्रश्नांची खोच आणि रसानुरूप बदलणारी लय शब्दांनी स्पष्ट करणेही मुष्किल आहे.

सळ डोळ्यांवर, काय पाहशी ?
कान देउनी काय ऐकशी ?
अचंचळ उभी व्याकुळ दिसशी–
का उचलिल घट येवोनि कुणी ?

या पुढील कडव्यात भ्रान्तिमान किंवा तत्सदृश एखादा अलंकार आहे, असे म्हणून जुने टीकाकार त्याची वासलात लावतील. पण शेवटच्या कडव्यात चेतनगुणोक्तीचा तांब्यांनी जो अद्‌भुत उपयोग केला आहे, त्याने तोच अलंकार जणू नव्याने जन्माला आलेला आहे. कवी म्हणतो पाण्यात उभ्या असलेल्या त्या तरुणीच्या पायाला स्पर्श करून पाणीच पुलकित होत आहे !

'कवळुनि पद जल थरारुनि हले,'

आणि तिच्या शरीराला स्पर्श करून वारा बहकून जाऊन वेडेवाकडे शब्द काढू लागला आहे !

'स्पर्शुनि शरिरा वारा बरळे,'

आणि फुललेल्या फुलांच्या मुखाने वेली त्या तरुणीला हसत आहेत !

'वेलि हसति तुज फुलुनि बघ फुले'

आणि वृद्ध तरू तुझी मौज पाहून डोलत आहेत !

'डोलती विनोदे तरु बघुनी !'

काव्यात केवळ अलंकार आणि ध्वनी शोधणारे जुने टीकाकार, निषेध आणि संघर्ष (Poetry of protest and conflict) शोधणारे 'नवटीकाकार' या चित्रात काय शोधतील, मला माहीत नाही. पण मी मात्र या कवितेला, 'स्वतःच्या प्रेमावर

नसलेली आणि तरुण वयात नव्हे तर पोक्तपणी लिहिलेली, वस्तुनिष्ठ असून उत्कट असलेली अशी एक अद्वितीय प्रेमकविता मानतो. आत्मनिष्ठ, आणि विचारघन अशी प्रेमकविता देखील उत्कट असू शकते. तांब्यांची कविता 'आत्मलक्षित्व आणि बौद्धिकता, यातून मुक्त आहे,' म्हणून 'ती श्रेष्ठ आहे,' असे माझे म्हणणे नाही. कारण या दोन्ही घटकांनी भारलेली अशी शेलेची एक कविता प्रेमकवितांत मी सर्वश्रेष्ठ मानतो.

"One word is too often profaned for me to profane it....."

अशी प्रेम या शब्दाची महती गाऊन शेलेने शेवटी

"Wilt thou accept not...

"The devotion to something a far

From the sphere of our sorrow ?

अशी प्रेमाची एक गूढ, तत्त्वज्ञानपर व्याख्या करून आपली 'To—' ही कविता संपविली आहे. ही कविता Over-mind च्या पातळीवरून म्हणजे आध्यात्मिक पातळीवरून लिहिली आहे, असे शेलेच्या या कवितेचे वर्णन योगी अरविन्दांनी केले आहे. अगदी वेगळ्या सुरात, अगदी सोप्या भाषेत तांब्यांनी लिहिलेल्या 'घट भरे प्रवाही बुडबुडुनी' या कवितेचे वर्णनही मी तेच करीन. ही कविता, या पोक्त संसारी कवीने तटस्थ, पण तल्लीन अशा आध्यात्मिक पातळीवरून लिहिली आहे. स्वतः प्रेमातुर नसता प्रेमावर इतक्या बेहोषीने लिहिलेले दुसरे गीत दाखवणे कठीण आहे.

वर्डस्वर्थची कविता वर्डस्वर्थने लिहिली, त्याबेळी तो वयाने तांब्यांच्या-इतकाही नव्हता आणि तांब्यांच्या इतका थकलेला तर नव्हताच. शिवाय त्या कवितेतील वर्डस्वर्थची बेहोषी त्या मुलीच्या प्रेममग्न अवस्थेविषयी नाही, तर केवळ तिच्या स्वतःशीच गुणगुणण्यासंबंधी आहे. पन्नाशीच्या घरात आलेल्या कवीने 'प्रेमावरील प्रेमा'ने बेहोष होऊन आणि त्या बेहोषीतही 'objectivity न सोडता लिहिलेली' हे 'घट भरे प्रवाही बुडबुडुनी' या कवितेचे अद्वितीयत्व होय.

'घट तिचा रिकामा झऱ्यावरी' या कवितेत जणू 'घट भरे प्रवाही...' या कवितेचा उत्तरार्ध आहे. यातील सौंदर्य कवीच्या बेहोषीचे नसून केवळ कवीने त्या स्थळा-भोवतालच्या काढलेल्या विविध सुंदर चित्रांचे आहे. नुसता 'सूर्य मावळत आहे,' याचे चित्र तांब्यांनी संस्कृत अलंकारांच्या मागे न लागता शुद्ध मराठीत सुंदर काढले आहे. त्याच्याच शेजारी 'शेतकरी बाया थट्टामस्करी करीत बसल्या आहेत' या दृश्याचे चित्र आहे व त्यातच कवीला झऱ्यावरून बघता बघता हरपलेल्या त्या भ्रमरीचे स्मरण झाले आहे. त्याच्याच पलीकडे वडाच्या पाळीभोवती नवसाकरिता जमणाऱ्या स्त्रियांचेही चित्र काढले आहे.

नवसास्तव मृगनयना जमती;
कुजबुजुनी गुजगोष्टी हसती,

असे तो त्या स्त्रियांचे वर्णन करतो. की लगेच–

तांदुळ पदरी, बिल्वदळ करी
चरण क्षाळुनि जवळ तळ्यावरि

अशा ' मंजुळ ' शब्दात कवी त्या खेड्यातील पोक्तसुंदरींचे वर्णन करीत आहे. शेवटी

अशी कशी ही जादू घडली ?

या आरंभीच्या प्रश्नाचे उत्तर कवी–

' पलीकडे वेळूंची जाळी
तेथे वारा घुडगुस घाली
शीळ गोड, तीमधुनि निघाली,
ही झुळुक हरपली लकिरिपरी '

या शेवटच्या कडव्यात देतो. कवीचे प्रेम तरुणतरुणींच्या या गोड उन्मादावस्थेवर आहे. स्वतःच्या प्रेमविव्हलतेवर कविता करणे सोपे असते, निदान तशा बऱ्यावाईट कवितांना तोटा नसतो. पण जगतातील तरुणतरुणींमधील आकर्षणानेच बेहोष होणारा तांब्यांच्या सारखा कवी दुर्मिळ होय ! पण दुसऱ्याच्या प्रेमावरील असल्या तरी, या प्रेमकथा नव्हेत, की नाट्यगीतेही नव्हेत. यांना ' प्रेमावरील प्रेमगीते ' म्हणायचे. ती lyrics च आहेत.

' दृष्ट हिला लागली ' या कवितेत तांब्यांचे हे मुलखावेगळे प्रेमवेड, this unique ' love of love ' अधिकच पोक्तपणाच्या माध्यमात व्यक्त झाले आहे. प्रेमाने झपाटलेल्या आणि त्यामुळे रोडावलेल्या, फिकटलेल्या एका मुलीच्या अवस्थेसंबंधी तिची आई (किंवा आजी ?) कशी फसते, याचे वर्णन करण्याच्या निमित्ताने तांब्यांनी आणखी एका प्रेमविव्हल मुलीचे चित्र काढले आहे. तिच्या आईची कल्पना तर तिला कुणा पाप्याची दृष्ट लागली अशीच आहे. ती तिला अंगारे लावण्याच्या आणि लिंबलोण उतरण्याच्या विचारात आहे. कवितेच्या दुसऱ्या कडव्यात येणारं सौंदर्यवर्णन आईच्या नजरेतून असल्यानं, पुन्हा unique किंवा अद्वितीय आहे.

चाफ्यापरि गोरेपण पिवळं,
काकडीपरी अंग कोवळं,
मैद्यापरि लुसलुशीत सगळं
दृष्ट पडुनि करपली !

या तिन्ही कवितांत ज्यांना माधवराव पटवर्धन ' गोचर ' वर्णने म्हणतात ती Sensous वर्णने बहारीची आहेत. पण इंद्रियस्पर्शी वर्णन करायचे म्हटले की मिश्र प्रतिमा आणि विचित्र विशेषणे वापरलीच पाहिजेत ही काही नव्या कवींची कल्पना तांब्यांच्या शब्दचित्रावरून खरी ठरत नाही. ' गार वारे वाहत आहेत, मातीचा वास सुटला आहे ' एवढे वर्णन संध्याकाळ आणि नदीप्रवाह यांच्या पार्श्वभूमीवर वाचकांच्या

गात्रांना हटकून स्पर्श करून जाऊ शकते, हे तांबे ओळखतात. त्याकरिता 'हिरवा वारा पाऊस, वास-यासारख्या मिश्र कल्पना (Compound images) वापरून वाचकांना दचकविण्याची त्यांना गरज भासत नाही.

पण तांब्यांच्या सुंदर वस्तुनिष्ठ शब्दचित्रांचे काय की धुंद लयीचे काय, मूळ त्यांच्या प्रेमोन्मादात किंवा ecstacy त आहे. विशिष्ट स्त्रीसंबंधीच्या वैयक्तिक आकर्षणामुळे धुंद होणारे अनेक आहेत. पण व्यक्तीपेक्षाही अखिल सृष्टीत दिसून येणाऱ्या प्रेमबंधनामुळे धुंद होणारा तांब्यांच्यासारखा कवी एखादाच.

भीतीने मरतील मानवकुले प्रीती निमाली तर

असे उद्घोषणारा विनायकासारखा कवी एक बौद्धिक सिद्धान्त थंडपणे सांगत आहे. प्रीतीच्या अनुभूतीने तो त्यावेळी नाचत असलेला दिसत नाही. तांबे अनेक Subjective आणि Objective कवितांत प्रीतीची मदिरा पिऊन जणू नाचत आहेत, असा भास होईल.

चल जळो ज्ञानविज्ञान गड्या

या कवितेतील नायिका म्हणते—

कडकड मोडिल गगनमांडवा
फाडुनि उधळिल दिशात अथवा,
अशा वादळा सोड भैरवा,
बंद तटातट तोड सख्या,
काय जागणे ? कसले निजणे ?
टाक फाडुनी सारी स्वप्ने ?
चिंध्या चिंध्या करुनी उधळणे !
काळशिरी चल नाचाया !
तू राजा मी राणी कान्ता,
भीड लाज मग कशास आता ?
होउनि केवळ निसंग नाथा,
रंगि रंग मिसळी सदया

हे प्रेम निर्विषय तर नव्हेच पण वैषयिकही नव्हे. ज्या प्रेमामुळे जगाचे बंध तोडण्याची उर्मी आणि ताकत येते, असे ते निःसंग प्रेम आहे. भीड आणि लाज सोडायला लावणारे ते प्रेम आहे. लावणीकार शाहीर, हाच उन्माद असंस्कृतपणे व्यक्त करून आपल्या नायिकेला

ये दिवसा नवऱ्यावाणी

असे बेमुर्वत आणि निर्लज्ज शब्द उच्चारायला लावतो. ही कविताही तांब्यांनी सेहेचाळीसाव्या वर्षी प्रतापगड येथेच लिहिली आहे.

जनखुळे म्हणती तर आपण खुळे

या कवितेतही हीच धुंदी आणि हाच निःसंगपणा आहे. ह्या दोन्ही गीतांना कौटुंबिक म्हणणे कठीण आहे. ती परलक्षी नाट्यगीतेही नव्हेत. पण एखाद्या अन्य व्यक्तीच्या आकर्षणाने ती लिहिली आहेत असेही म्हणता येत नाही. तांब्यांचा प्रेमोन्माद व्यक्तिमूलक नसून प्रेममूलकच असतो असे भासेल.

व्यक्तिनिरपेक्ष प्रेमोन्मादाने भारलेले, आस्तिक्यामुळे अधिकच 'उन्मत्त' झालेले, अंगात मुरलेल्या मालवीय संगीताने आपोआपच लयबद्ध भाषा बोलणारे असे या पोक्त, संसारी, नोकरीपेशातील कवीचे अद्भुतरम्य मन होते.

ते सामाजिक क्रान्तीकरिता लिहीत नव्हते. ते राजकीय क्रान्तीकरिताही लिहीत नव्हते, ते केवळ हृदयात धगधगणाऱ्या प्रेमोन्मादाला वाट करून देण्याकरिता लिहीत होते. समाजसुधारणा आणि पाश्चात्य वाङ्मयाचे अनुकरण यांच्या युगात तांबे एकमेवाद्वितीय (Unique) असे अंतर्जीवन जगत होते. बाह्य जीवनात ते संस्थानी नोकर होते. ते ईश्वरनिष्ठ होते. काही काळ तर ते मृत्यूच्या सन्निध होते आणि तरी त्यांच्या आंतरजीवनातले अमरत्व आणि आनंदीवृत्ती सदैव टवटवीत होती. आधुनिक मराठी वाङ्मयात इतके स्वतंत्र आणि प्रबल असे आंतरजीवन जगणारा दुसरा कवी दाखविता येणार नाही. कारण या जमान्यात सर्वांच्याच आंतरिक आनंदाला संशयवादाचे ग्रहण लागलेले आहे.

• •

पूर्णाहुती

तांबे यांच्या कवितांतील, 'प्रेमकविता अधिक सुंदर की मरणविषयक कविता अधिक सुंदर' यावर रसिकांचे एकमत होणार नाही. त्यांच्या मरणविषयक कविता सर्वच सारख्या सुंदर आहेत, असेही नाही. कवीची एखादी कविता सर्वोत्कृष्ट नसूनही तिला त्याच्या एकंदर काव्यात महत्त्वाचे स्थान असू शकते. 'पूर्णाहुति' या कवितेचेही तसेच आहे. माझ्या मते तांब्यांच्या मरणविषयक कवितांतही ती सर्वोत्कृष्ट आहे असे नव्हे, पण त्यांच्या काव्यातच केवळ नव्हे, तर त्यांच्या जीवनातही या कवितेला फार महत्त्वाचे स्थान होते. याचे एक गमक म्हणजे तारीख ७ डिसेंबर १९४१ रोजी तांब्यांच्या पार्थिव देहाला मंत्राग्नी देण्यापूर्वी 'पूर्णाहुति' हीच कविता त्या स्मशानात त्यांच्या एका भक्ताकडून गाऊन घेण्यात आली होती !

मरण म्हणजे व्यक्तीचा नाश नसून जीवनरूपी यज्ञात व्यक्तीने टाकलेली शेवटची आणि संपूर्ण आहुती होय, ही या कवितेतील प्रमुख कल्पना. तांब्यांचे काही आक्षेपक त्यांच्या कवितांसंबंधी म्हणतात त्याप्रमाणे, या कवितेतील पहिल्या दोन ओळींतच कवितेचा आशय सांगून झाला आहे. पण कविता म्हणजे नुसता आशय सांगणे नव्हे. उदाहरणार्थ हीच कविता घ्या. या कवितेत कवीला जीवन म्हणजे यज्ञ, आणि मरण म्हणजे आहुती एवढेच सांगून मोकळे व्हायचे आहे, असे नव्हे. त्याला तार्किक आशय सांगायचा नसून आपल्या मनःस्थितीत किंवा 'मूड'मध्ये प्रिय वाचकाला सहभागी करायचे आहे. कवीचा तो मूड म्हणजेही केवळ दुःख वा केवळ धैर्य नसून त्याच्या डोळ्यांसमोर उभी राहिलेली चित्रमालिका आहे.

त्या चित्रमालिकेत यज्ञकुंड आहे, आहुती आहेत, भोवताली गोळा झालेल्या इष्टमित्रांच्या लोचनांतली आसवे आहेत, आणि तशीच इतर अनेक दृश्ये आहेत. ही दृश्ये कवीच्या मनःस्थितीतून जशी निघाली आहेत, तशीच ती त्याच्या मनावर जन्मभर झालेल्या वैदिक संस्कृतीच्या संस्कारांचीही ती अपत्ये आहेत. तसाच पहिल्या दोन ओळीं-

तील आशय म्हणजेही कवीने जन्मभर गिरविलेल्या धीट आणि उदात्त सिद्धांताचा उद्‌गार आहे. म्हणजे ही कविता जेवढी मृत्यूसंबंधी आहे तेवढीच तांब्यांच्या अंतरंगातील भारतीय संस्कृतीच्या चित्रांसंबंधी आहे.

तरी बाह्यतः ती मरणसमयी गोळा झालेल्या इष्टमित्रांना उद्देशून आहे. त्या मित्रांच्या डोळ्यांत 'आसवे' दिसत आहेत. कारण त्यांना आपला प्रिय महाकवी 'नाहीसा' होणार म्हणून दुःख होत आहे. पण तांब्यांच्या दृष्टीने मरण म्हणजे नाश नसून मरण म्हणजे पूर्णता होय. जे (जीवन) सदुसष्ट वर्षांपूर्वी या जीवलोकात सुरू झाले, त्याची आज पूर्णता होत आहे, अशी तांब्यांची कल्पना.

'कोणि आणू नका आसवे लोचनी,
छे ! न ही शून्यता ! पूर्णता, सद्‌गती !'

तांब्यांच्या अंगात 'नाट्यगीत' मुरलेले होते ! कित्येक प्रेमकवितांत ज्याप्रमाणे ते नाट्यात्मक प्रसंग (Dramatic Situations) गृहीत धरतात, त्याप्रमाणे मरणविषयक कवितांतही ते विशिष्ट प्रसंग गृहीत धरतात. आपल्या सग्यासोयऱ्यांची आपल्या अंत्यसमयी आपण समजूत घालीत आहोत, त्यांचे सांत्वन करीत आहोत ही या गीतातील नाट्यात्मक भूमिका आहे. अंतकाळचा विचार मनात आला म्हणजे सर्वांत तापदायक असा जर कोणता विचार मनात येत असेल तर तो आपल्या प्रिय जनांच्या अश्रूंचा होय. पण तांबे केवळ प्रिय जनांचीच समजूत काढीत आहेत, असे समजण्याचे कारण नाही. बहुतेक सर्व मृत्युविषयक गीतांत तांबे स्वतःची समजूत काढीत आहेत, स्वतःला धीर देत आहेत, असे मला वाटते.

जीवनरूपी यज्ञात आज माझी 'पूर्णाहुति' पडल्याने,— म्हणजे माझी स्वतःचीच आहुती मी दिल्याने मी 'कृती' अथवा धन्य झालो आहे, असे जरी तांबे म्हणत असले, तरी त्यात स्वतःला धैर्य देण्याचाही भाग आहे. शेक्सपीरियन ट्रॅजेडीच्या नायकासंबंधी लिहिताना एका टीकाकाराने, 'ते स्वतःला "Buck up" करीत आहेत' असे म्हटले आहे. कवी म्हणजे संन्यासीही नव्हे की जीवनमुक्तही नव्हे. जीवनप्रेम हे त्याचे बलस्थानही असते आणि मर्मस्थानही (Weak point) असते. आपण पत्करलेले पूर्वजांचे तत्त्वज्ञान मरणसमयी आपल्या कामी यावे, ही त्याची मनापासूनची इच्छा असते. आपल्या प्रिय भारतीय, वैदिक सिद्धांताचा तांबे अंत्यसमयी धावा करीत आहेत, एवढाच या कवितेतील तत्त्वज्ञानात्मक उल्लेखांचा अर्थ आहे. पण त्याच तत्त्वज्ञानाला त्यांनी आपल्या प्रतिभाबळाने कवितेच्या उत्तरार्धात म्हणजे ३, ४, ५ या कडव्यांत चित्रमालेचे रूप दिले आहे. आधुनिक परिभाषेचे भोक्ते त्यांना कदाचित 'प्रतिमा' म्हणतील. पण त्यांचे स्वरूप प्रतिमांपेक्षाही प्रतिमारूप प्रार्थनांचे आहे.

कवी म्हणतो, 'आज या माझ्या अंतकाळी देवी शारदा आपल्या वीणेवर सामवेदातील मंत्रांचे आलाप गावो.' ही नुसती प्रार्थना नाही. भारतीय परंपरेत 'फ्रेम'

केलेले ते एक सुंदर आणि गंभीर चित्र आहे. एका मराठी कवीच्या अंत्यसमयी स्वतः भगवती सरस्वती आपल्या वीणेसह तेथे अवतरावी ही इच्छाच किती भव्य आणि उदात्त आहे ! तिने जे मंत्र गावेत असे कवी इच्छितो त्यांनाही जगातील प्राचीनतम संगीताची सामगानाची परंपरा लाभावी अशी कवीची इच्छा आहे. कवीच्या दृष्टीने त्याची स्मशान-भूमी ही 'स्मशानभूमी' नसून 'सवनभूमी' म्हणजे यज्ञभूमी आहे. ती आज वेदघोषाने भरून जावो, अशी कवीची इच्छा आहे. तो वेदघोष मानवी पुरोहितांच्या मुखाने न होता प्रत्यक्ष षड्दर्शनांच्या मुखाने होवो अशी कवीची प्रार्थना आहे. ही कल्पना मात्र भव्य असली तरी सुसंगत नाही. सांख्य, न्याय, वेदांतादी दर्शने ही स्वतंत्र तत्त्वज्ञाने किंवा Systems of Philosophy आहेत. त्यांचे कार्य वेदघोष करणे हे नव्हे किंवा वेदघोषालाही त्यांच्या मुखामुळे अधिक प्रतिष्ठा प्राप्त होणारी आहे, असे नव्हे. म्हणजे कवीची ही कल्पना भव्य असली तरी काहीशी अप्रयोजक वाटण्यासारखी आहे.

यानंतर लगेच कवी आपल्या भोवतालच्या लोकांना 'शंखघंटादिकांचे' आवाज घुमविण्याला सांगत आहे. 'चौघडा झडू द्या' असेही सांगत आहे. कारण कवीच्या दृष्टीने ही आरतीची वेळ आहे. म्हणजेच एक धार्मिक विधी संपविण्याची वेळ आहे. आरतीच्या वेळी आपल्याकडील मोठमोठाल्या देवालयांत चौघड्यासह अनेक वाद्यांची एकच गर्दी उसळते, हे अनेकांच्या पाहण्यात असेल. त्या गर्दीचा आणि घोषाचा उद्देश श्रोत्यांच्या मनातील– व स्वतः याजकाच्या मनातील असंख्य किरकोळ विचार एकाच घोषात गुदमरवून टाकण्याचा असतो. अलीकडे नाटकात वा चित्रपटात ध्वनीच्या कल्लोळाचा उपयोग अशाच प्रसंगी पार्श्वभूमी म्हणून केलेला आढळेल. या कडव्यात मुख्यतः दृश्यचित्र नसून, कर्णाने आस्वाद्य असे चित्र आहे. 'या करा आरती' या चरणातील 'या' ह्या छोट्याशा आज्ञार्थी शब्दाने त्या श्राव्य चित्रात दृश्याचीही भर घातली आहे. थबकून अश्रू गाळीत उभ्या असलेल्या आपल्या सख्यासोयऱ्यांना कवी आता 'पुढे या ! आता आरतीची वेळ झाली आहे' असे सांगत आहे. शेवटच्या कडव्यातही विधिसमाप्तीचीच कल्पना आहे. कवी आपल्या चितेला 'चिता' समजण्यासच तयार नाही. तिचा उल्लेख तो 'यज्ञवेदी' म्हणूनच करीत आहे. या यज्ञवेदीवर पुष्पांजली वाहा आणि शेवटी 'स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः' इत्यादी स्वस्तिवचने म्हणून या यज्ञकर्माची सांगता करा, असे कवी आपल्या अंत्यसमयी जमलेल्या इष्टमित्रांना म्हणत आहे.

या संपूर्ण कवितेत शोकाचे वातावरण नाहीसे करून यज्ञाचे आणि आहुतिदानाचे गंभीर वातावरण उभे करणे हा कवीच्या शब्दयोजनेचा आणि चित्रयोजनेचा उद्देश आहे. शोकाचे दृश्य केवळ दुसऱ्या कडव्यात उल्लेखून झटकन त्यावर पडदा टाकला आहे. यज्ञसंस्थेतील विविध विधी आणि पारिभाषिक शब्द कवी किती सहजतेने योजतो, हे पाहण्यासारखे आहे. 'जीवनाध्वर' (जीवनरूपी यज्ञ), 'पूर्णाहुति', 'अन्त्येष्टि घटी', 'हवी', 'सवनभूमि', 'स्थंडिल', 'स्वस्तिवच', 'सांगता– सिद्धि',

इतके भारतीय यज्ञपरंपरेतील शब्द केवळ या चौदा ओळींच्या कवितेत आहेत. आणि त्यांची ही भरती, माधव ज्यूलियन यांनी 'विरहतरंगा' त केलेल्या ज्योतिषशास्त्रीय शब्दांच्या भरतीप्रमाणे केवळ प्रदर्शनाकरिता केलेली नसून ती समर्पक आणि सुबोध आहे. इतकेच नव्हे तर त्या शब्दांनी अर्थवाहनापेक्षा चित्रांची आणि वातावरणाची निर्मिती केली आहे. हाच या कवितेचा उद्देश आहे आणि हेच तिचे यश आहे.

ही कविता भैरव रागात गावी अशी कवीची योजना आहे. समग्र आवृत्तीचे संपादक माधवराव पटवर्धन यांनी या कवितेला 'बरमंगला' जाती लाविली आहे. भैरव राग हा संथ आलापनाला विशेष अनुकूल आहे. व त्या रागात अथवा त्याच्या विलंबित 'आलाप– क्रिये' त 'री' व 'ध' या स्वरातील मूळच्या करुण भावनेला गांभीर्याचे रूप येते. संस्कृत ग्रंथातील भैरवाच्या स्वरमूर्तीचे वर्णन महादेवाच्या पुराणातील वर्णनाप्रमाणेच आहे. 'शारदा' नाटकातील 'ईश चिंता निवारील सारी... 'या पदाचा करुणगंभीर परिणाम ज्यांनी अनुभवला असेल, त्यांना तांब्यांनी आपल्या पूर्णाहुतीला भैरव रागच का योजला हे कळेल. पण त्या रागाचे 'जातिकरण' केल्याने ही कविता तिजमधील वातावरणाला प्रतिकूल अशा 'झंपा' तालात गायिली जाण्याचाही धोका आहे ! जुन्या 'स्त्रिविणी' या अक्षरवृत्ताचे कोणी मात्रावृत्त केले तर त्याला वेगळे नाव म्हणून पटवर्धनांनी 'बरमंगला' हे नाव काढले असावे. तांब्यांनी येथे अक्षरवृत्ताचे 'मात्रावृत्त' केले आहेच पण तांब्यांना चिंता 'वृत्ता'ची नव्हती, तर 'रागा'ची होती. भैरव या करुणगंभीर रागात गाण्याकरिताच त्यांची ही रचना आहे !

तांब्यांच्या मरणविषयक कवितांतून त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान शोधून काढण्याचाही प्रयत्न झालेला आहे. पण या बाबतीत टी. एस. इलियट यांचे– 'All great poetry gives the illusion of a view of life'[1] हे उद्‌गार लक्षात घेण्यासारखे आहेत. श्रेष्ठ काव्यात त्याच्या श्रेष्ठतेमुळेच तत्त्वज्ञानाचा भास होतो, पण ते प्रत्यक्ष 'तत्त्वज्ञान' नसते. तांब्यांच्या महाप्रस्थानविषयक कवितांचा विचार करताना तर ही गोष्ट विशेषच लक्षात ठेवायला हवी. सर्वसामान्य हिंदू व्यक्तीच्या मनात 'मरणे म्हणजे देवाघरी जाणे' ही कल्पना बालपणापासून ज्या अर्थाने रुजलेली असते त्या अर्थानेच तांब्यांच्या मनातही ती होती. पण त्या समजुतीचे रूपांतर, दृढ तत्त्वज्ञानातही झालेले नव्हते, की दृढ श्रद्धेतही झालेले नव्हते. त्या सार्वजनिक समजुतीला वैयक्तिक श्रद्धेचे व मानसिक बलाचे रूप देण्याचा तांब्यांचा प्रयत्न होता.

एवढे मात्र खरे की, तो प्रयत्न केवळ 'Amateurish' किंवा गमतीखातर नव्हता. तो त्यांचा एक गंभीर आणि अटीतटीचा प्रयत्न होता. अशा कवितांत ते जण स्वतःचे संपूर्ण विचारविश्व आणि व्यक्तिमत्त्वच बदलू पाहत होते. अशा, स्वतःच्याच मनाशी केलेल्या झटापटीच्या त्यांच्या कविता प्रख्यात आहेत. त्यांतील ज्या कवितेत

---

[1] *T. S. Eliot : Shakespeare Association Lecture, 1927.*

गांभीर्याबरोबरच कोमलपणाही आला आहे, अशी कविता म्हणजे 'नववधू प्रिया...' ही होय. 'भरोत भरतिल नेत्र जरी रे! कळ पळभर मात्र! खरे घर ते!' या, त्या कवितेतील शेवटच्या ओळीत, ही श्रद्धा अंगी बाणवण्याचा एक निकराचा प्रयत्न आहे. 'कविता' म्हणून ही कविता सुंदर आहे. पण तिजमधील श्रद्धा तांब्यांची श्रद्धा नसून, जी श्रद्धा मिळविण्याचा तांब्यांचा प्रयत्न आहे, अशी एक उदात्त पारंपरिक श्रद्धा आहे. 'जन पळभर म्हणतिल' ही कवितादेखील तांब्यांच्या मरणविषयक कवितांतील एक नितांतसुंदर कविता आहे. पण त्यात तत्त्वज्ञानापेक्षा काव्यच अधिक आहे. अगदी शेवटच्या कडव्यात मात्र, 'अशा जगास्तव काय कुढावे' हा विरक्तीचा कडवट विचार आहे आणि 'हरिदूता का विन्मुख व्हावे' हा पारंपरिक धार्मिक विचार आहे. बाकीच्या कडव्यांत आत्मप्रेमामुळे व मरणाच्या विचारामुळे मनाला आलेल्या खिन्नतेचेच चित्र आहे.

'आलो, यांबव शिंग' या कवितेत यमदूताला सामोरे जाण्याचा आविर्भाव आहे खरा; पण त्या अंत्य क्षणी कवीला आठवलेल्या दुनियेच्या दृश्यमालेत कवीचे संसारप्रेमच अधिक प्रतीत होते. 'अता पुकारो फेरीवाला। गवळी नेवो गायि वनाला।' यांसारख्या चित्रात; किंवा 'जरि नाटकगृह हे गजबजले। जरि नानाविध जन हे सजले।' या गोचर दृश्यात कवीची इहलोकासंबंधीची मधुर आसक्तीच व्यक्त होते. सारांश, तांब्यांच्या मरण-विषयक कवितांत, 'विरक्ती' पेक्षा त्यांच्या रम्य आसक्तीचेच चित्र अधिक उमटलेले आहे. तांब्यांच्या कवितेचे प्रमुख भाष्यकार काळेले यांचेही मत हेच असल्याचे दिसून येते. पण हा तांब्यांचा दोष नसून कवी या नात्याने गुणच आहे. 'विरक्ती' नव्हे,—तर 'अनुरक्ती' हेच कवीचे बळ आहे! विरक्तीच्या कवितेतही त्याची अनुरक्ती लपत नाही. सारांश, तांब्यांची मरणविषयक गीते ही मरणाला सामोरे जाण्याच्या 'प्रयत्नां'ची गीते होत; सामोरे जाण्याच्या 'तयारी'ची गीते नव्हेत!

या दृष्टीने तांब्यांच्या या गीतांची तुलना, त्यांच्या आवडत्या टागोर आणि ब्राउनिंग यांच्या मरणविषयक गीतांशी करून पाहणे मनोरंजक होईल. 'गीतांजली'तील ९०, ९१ आणि ९५ ही गीते त्या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत. टागोर म्हणतात, 'मृत्युरूपी अतिथीपुढे मी माझ्या आयुष्याचे भरलेले पात्र वाढून ठेवीन.' येथे तांब्यांच्या 'पूर्णाहुति' चीच आठवण होते. तसेच टागोर मरणाला 'The last fulfilment of life' हे अभिधान लावतात. येथे तांब्यांच्या, 'छे! न ही शून्यता? पूर्णता...' या ओळीची आठवण होते. 'मुलाला एका स्तनापासून काढून घेऊन, आई दुसऱ्या स्तनाला लावते...', तशीच जन्ममरणांची स्थिती आहे, ही टागोरांची कल्पना तांब्यांच्या 'खरे घर ते' या कल्पनेपेक्षा रमणीय असली तरी मानवांच्या डोक्यावरून जाणारी आहे! टागोरांच्या या अमानुष 'मरणस्वीकृती'पेक्षा, तांब्यांची आसक्ती आणि खळखळच अधिक खरी वाटते. ब्राउनिंग याची 'Prospice' ही कविता, तांबे आणि माधवराव यांच्या तोंडी असे. 'One fight more! The best and the last!' या ब्राउनिंगच्या ओळीने तांब्यांची 'जन पळभर...' ही ओळ मनात येते.

ब्राऊनिंगने मात्र मरणाला तोंड देण्याकरिता वेगळाच आधार घेतला होता. त्याची पत्नी परलोकी त्याच्यापुढे निघून गेलेली होती. तिला स्मरून तो म्हणतो– ' O Thou soul of my soul ! I shall clasp thee again, I And with God be The rest ! '

ब्राउनिंगच्या या श्रद्धेत मानवी प्रेम आणि दैवी श्रद्धा यांचे मिश्रण आहे. पण गूढवादी ब्लेकसारखे, किंवा आमच्या संत कवींच्यासारखे खरे साक्षात्कारी कवी सोडल्यास, इतर कवींना धार्मिक श्रद्धेपेक्षा रम्य आसक्तीच अधिक जवळची, असे म्हटले पाहिजे. तांब्यांनाही तीच जवळची होती, आणि म्हणूनच ते आम्हा आधुनिकांना अधिक जवळचे आहेत ! मरणाच्या संदर्भात आसक्ती आणि विरक्ती यांचा सर्वांत अधिक मिलाफ उर्दू कवी जौक याच्या एका सुप्रसिद्ध गझलमध्ये आढळतो–

' लाई हयात, आये ! कजा ले चली, चले ! ।
अपनी खुशी न आये, न अपनी खुशी चले ! ॥ '

[आयुष्याने आम्हांला जगात आणले,–आम्ही आलो ! मृत्यू (कजा) आम्हांला घेऊन चालला,–आम्ही निघालो ! आम्ही स्वखुषीने आलोही नाही, की स्वखुषीने येथून जातही नाही !]

जौकच्या या गझलमध्ये, जी ' दैवशरणता ' (Resignation) आहे, जी सहज (जग) ' सोडण्याची तयारी ' दिसत आहे, ती मला ब्राउनिंग, टागोर, किंवा भास्करराव तांबे यांपैकी कोणातच दिसत नाही. या तिघांना, स्वतःला ' Buck up ' करण्याची, कशाचा तरी टेकू घेण्याची, गरज भासत आहे ! त्यांच्या त्या ' टेकणां 'ना तत्त्वज्ञान म्हणणे कठीण आहे,–श्रद्धा म्हणणेदेखील कठीण आहे. श्रद्धेपर्यंत पोहोचण्याची ती एक धडपड आहे. मरणाची भीती जिंकण्याची ती एक ' शिकस्त ' आहे !

मरणावर मात करण्याचा,–' अमृतानुभवा 'चा कवींचा खास मार्ग वेगळाच आहे. तो मार्ग तत्त्वज्ञानाचाही नव्हे, की श्रद्धेचाही नव्हे. ' प्रेम ' हा तो मार्ग होय. व्यक्तीवरचे प्रेम नव्हे,–कारण त्यात आसक्ती असते, म्हणजे दुःखाचे मूळ असते. स्वतःच्या प्रेमजीवनावरची नव्हेत, तर इतरांच्या प्रेमजीवनावरची गीते, ही तांब्यांची खरी प्रेमगीते, खरी श्रेष्ठ गीते, आहेत ! त्यांत आसक्ती नाही, वेदना नाही ! प्रेमाच्या वेदनेकडे सौंदर्यवाद्याच्या भूमिकेवरून पाहून साक्षित्वाने आणि ऋषित्वाने घेतलेला ' केवल आनंद ' आहे ! ' घट भरे प्रवाही बुडबुडुनी ', ' घट तिचा रिकामा ', ' दृष्ट हिला लागली ' यांसारख्या प्रेमदृश्यांवरील गीतांत तांब्यांचे ' तांबेपण ', नव्हे, ' सोनेपण ' साठवलेले आहे ! !

' तांब्यांची मृत्युविषयक कविता श्रेष्ठ, की प्रेमविषयक कविता श्रेष्ठ ? ' या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या वैयक्तिक प्रेमाच्या कवितांपेक्षा त्यांच्या दुसऱ्यांच्या प्रेमावरील कवितांत सापडेल. पण त्यांना आमचे टीकाकार ' नाट्यगीते ' हे लेबल लावून बाजूला काढणार ! परलक्षी प्रेमाचे शाहीर आणि चित्रकार म्हणूनच तांबे श्रेष्ठ आहेत ! त्या चित्रणाच्या क्षणी

ते अमृतत्वाला स्पर्श करतात,—मरणावर मात करतात ! प्रेमचित्रे काढीत असता त्यांना त्या 'सर्वभक्षक' दूताला, 'शिंग थांबव' म्हणून सांगावे लागत नाही, की भावी 'पूर्णाहुती'च्या दिवसाचे स्मरण होत नाही !

• •

नामसूची

या सूचीत केशवसुतांचे निर्देश तांब्यांच्या वरील लेखांत येतील तेवढेच व तांब्यांचे निर्देश केशवसुतांवरील लेखांत येतील तेवढेच केले आहेत. सर्व उल्लेखांची नोंद करावयाची म्हटल्यास प्रायः प्रत्येक पृष्ठाचीच नोंद करावी लागेल, म्हणून ते गाळले आहेत.

तसेच लेखकाने लेखनाच्या ओघात व्यक्तिनामांचा उल्लेख ज्या स्वरूपात केला आहे, त्याच स्वरूपात सूचीतील नोंद सापडेल.

सौ. श. क्षी.

अत्रे, उषा – १०६.
अनंततनय – ४३.
अनिल (आ. रा. देशपांडे) – ३, ४१, ५४, ७२, ७८.
आगरकर – १, ६, १३, २५, २६, २७, २८-२९, ३७, ३८-४०, ४४, ४५, ५१, ५३, ६५.
आगाशे – १०, ११, ५०, ५१.
आपटे, ह. ना. – ९, १०, १७, २८, ४२, ४३, ६५, ११४.
आवळीकर – ४५.
इकबाल – ६६, ६८.
इब्सेन – २, ५, २८, २९, ३१, ३८, ४०, १०२.
इलियट, टी. एस. – ४०, ४१, ९४, १११, १२४.
उमरखय्याम – ८७.
कझॅमियन – २९.
कर्वे, र. धों. – ६.
कानिटकर – १०, ११.
कार्लाइल – २९.
कीट्स् – १३, १७, ३३, ५०, ५७, ६६, ७२.
कुंटे – १०, ११, ३०, ४६, ४७, ५१, ५२, ५३, ९१.
कुसुमाग्रज – ४१.
कृष्णशास्त्री – ४६, ५०, ५१.
केतकर (ज्ञानकोशकार) – ८८.
केशवसुत – ७७, ७८, ८०-८१, ८३, ८९-९०, ९२, ११४.
केळकर, द. के. – ५१.
कोलरिज – २९.

गटे – ५, २९.
गडकरी (गोविन्दाग्रज) – ४, १०, १३, १७, १८, ४२, ४३, ४६, ६८, ७२, ७८, १०८, १०९, ११०.
गांधीजी – ९६.
गालिब – २४.
गिरीश – ६६.
गोल्डस्मिथ – ५०, ६५.
गोळवलकर – १०६.
ग्रे – ४२.
चट्टोपाध्याय, शरदचंद्र पाहा शरदबाबू
चर्चिल – ९०.
चंद्रशेखर – ४३, ४६.
चिपळूणकर, कृष्णशास्त्री पाहा कृष्णशास्त्री
चिपळूणकर, विष्णुशास्त्री पाहा विष्णुशास्त्री
जॉन्सन – ५०.
जिगर मुरादाबादी – २६.
जेम्स, विल्यम – ४७.
जोग, रा. श्री. – २१, २३, २६, २८, ४४, ४९-५३, ५४, ५८-६२, ७५.
जौक – ७८-७९, १२६.
टागोर, रवीन्द्रनाथ पाहा रवीन्द्रनाथ
टिळक, ना. वा. (रेव्हरंड) – ४, १७, २५, २८, ४२, ४३, ४६, ४७, ५१, ५३, ६६, ७२, ७६.
टिळक (लोकमान्य) – ९५-९६.
टेनिसन – ९७, १०२, ११५.
डाण्टे – ५३, ९५.
तळवलकर, गोपीनाथ – ७६.
तांबे – २१, २८, ४३, ४७, ४८, ५३, ५४, ५५, ५६, ६६-७०.
तुकाराम – ५, ५३.
तुळशीदास – ९४.
देशपांडे, वा. ना. – ३, ५४.
पटवर्धन, माधवराव – २, ४, १८, १९, २१, २२, २३, २५, २८, ३१, ३३, ४१, ४३, ४८, ४९, ५२, ५३, ५५, ५६, ५८, ६६, ७२-७५, ७६, ७८, ९३, ९५, १०१, १०८, १०९, ११०, ११८, १२४.
पटवर्धन, वा. ब. – ४२.
पंडित, भ. श्री. – २८, ३०, ३१, ३३, ३४-३५.
पो, एडगर ॲलन – २५.
पोप – ५०, ६५.
पौंड, एझ्रा – ४०, ४१, १११.
प्रभाकर – ५३, ६६.
फिक्टे – २९.
फ्रॉइड – २५.
बॅबिट, आयर्व्हिंग – ८६.
बर्न्स्, रॉबर्ट – ६५, ९४.
बायरन – ५, ५०, ६६, ७२, ९४, ११४.
बालकवी – ११५.
बालगंधर्व – १०५.
बी – ८१, ९९.
बेहेरे, ना. के. – २५.
बोरकर – ४१, ७२.
ब्रॅडले – ३२.
ब्राउनिंग – ७६, ९७, १०२, १०३, ११०-१११, १२५-१२६.
ब्लेक – ९४, ९९-१००.
भागवत (आचार्य) – ४९, ५३-५५, ५९-६०.
भिडे, बा. अ. ५०.
मंगेशकर, लता – १०५-१०६.
मर्ढेकर – १, ३, २६, ३७, ४०-४१, ७५, ९३.
महाजनी, वि. मो. – १०, ११, ४६, ४७, ५२.
माटे – २.
माडखोलकर – २, १९, २३, ४३, ४९, ५१, ६४, ९५.

माधवज्यूलियन, पाहा पटवर्धन, माधवराव
मायदेव – ७५, ७६, १०३.
मिल, जॉन स्टुअर्ट – ३९, ४०, ४५.
मिल्टन – ६५.
मीराबाई – ५, ८२.
मेकॉले – ५०.
मोरोपंत – ५३.
यशवंत (य. दि. पेंढरकर) – ५३.
रघुनाथपंडित – ५३.
रविकिरण मंडळ – ३, १०.
रवीन्द्रनाथ – १, ५, २०, ५४, ६८-६९, १००-१०२, १०४, १२५.
रहाळकर – २८.
राजवाडे, वै. का. – २८, ३०, ३१, ३३, ४९.
रामजोशी – ५३.
रूसो – ५, ३५.
लागू – ५१.
लेखा – २९.
लॅंमे – ५०, ५१, ५२.
लोंढे – ५०, ५१.
वर्डस्‌वर्थ – २, ५, ३८, ५३, ६२, ६६, ९४, ९७-९८, १०७, ११७.
विष्णुशास्त्री – ४३.
व्हिटमन – २, ५, ३८.
शरदबाबू – ९०.
शॉ, बर्नार्ड – ३०.
शातोब्रियाँ – ५, २५.
शेक्सपियर – ३०, ८५.
शेलिंग – २९.
शेले – ५, १३, १७, २०, २३, २४, ३२-३३, ५०, ६६, ९४, ९७, १०७, ११७.
सगनभाऊ – ५३.
सयाजीराव – ४३.
सावरकर – ५१.
श्रीधर – ९५.
स्कॉट – ६६, ११४.
स्पेन्सर – ४५.
हॅम्लेट – ४०.
ज्ञानेश्वर – ५३, ६६.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
२८७९
दा. क्र. २३२७९
निबंध
२८७९

शुद्धिपत्र

(१) सामासिक शब्द बहुतेक ठिकाणी तोडून छापले गेले आहेत. ते शुद्धिपत्रात दाखविलेले नाहीत. ते अर्थानुरोधाने समजून जोडून वाचावेत. उदाहरणार्थ– केशवसुत संप्रदाय; मर्ढेकर संप्रदाय.

(२) ज्या चुकांमुळे अर्थविपर्यास होईल त्याच फक्त शुद्धिपत्रात दाखविल्या आहेत. इतर दाखविल्या नाहीत.

पान क्रमांक	ओळ क्रमांक	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
१०	२२	बाह्य	बाह्य
१३	१३	विचारणाच्या	विचारणाऱ्या
१७	ओळ खालून सातवी	केशवसुत–पूर्वमूल्यांच्या	केशवसुतपूर्व मूल्यांच्या
२०	११	सलील	सलिल
२०	२० व २१	होत	होय
२९	२१	वाङ्मयइतिहासकार	वाङ्मयेतिहासकार
३३	८	फुलपाखरू–मरण	फूलपाखरू–मरण
३३	२६	असाह्यतेचा	असाहाय्यतेचा
३४	१६	आहे.	आहे !
३४	ओळ खालून तिसरी	जीवन–मुक्तावस्थेच्या	जीवन्मुक्तावस्थेच्या
३५	२१	मुसलमानात	मुसलमानांतील
३५	२४	Philistanism	Philistinism
३५	३२	Sopistication	Sophistication
३८	११	उपयुक्तवादाचे	उपयुक्ततावादाचे
३९	२	विषय मंडळींच्या	विषय या मंडळींच्या
४०	८	कोठेही जा–डोईवर ते	कोठेही जा–डोईवरते
४१	१२	पलिकडे गेले	पलिकडे ते गेले
४१	१६	' लवाळे '	' लव्हाळे '

४४	१९	अंतस्थपणे	अंतःस्थपणे
४६	१४	पुराण	पुराणं
४७	४	रामायण	रामायणं
४८	१	सर्व द्वेष्टे	सर्वद्वेष्टे
४८	१७	त्याचं	त्यांचं
५०	२२	केशवसुतांपूर्वीयया	केशवसुतांपूर्वीच्या
५०	ओळ खालून तिसरी	शेली	शेले
५८	२३	एखादा	एकदा
५९	८	अनुभवच	अनुभव
५९	१५	दिसते	दिसत
६३	ओळ खालून चवथी	करणेही	करणारे
६४	ओळ खालून पाचवी	नाडी	नाडि
६९	१५	When is no small–	Whom is no small– Praise
६९	ओळ खालून सहावी	सौंदर्यबाह्यांसंबंधीपण	सौंदर्यबाह्यांसंबंधी
६९	ओळ खालून चवथी	' विटकी ' ही	' विटकी ' आहे, ही
७७	ओळ खालून आठवी	शकते	शकत
९०	ओळ खालून सातवी	प्रेम तसेच वीर्यकवनी	प्रेम तसेच वीर्य कवनी
९५	वरून चवथी	Voque	Vogue
१०१	शेवटची	ही माया निजसंहरा, हरा !	ही माया निज, संहरा हरा !
१०२	ओळ खालून दुसरी	क्लेषांचे	क्लेशांचे
	पाचवी	अप्परेसारख्या	अप्सरेसारख्या
१०४	ओळ खालून सहावी	भिणारच ?	भिणारच !
११२	१८	त्याला आपणाला	त्याला व आपणांला

REFBK-0023249



केशवसुत आणि तांबे यांच्या काव्याच्या अभ्यासाला नवीन दिशा लावण्याचा यत्न त्या दोघांच्या शतसांवत्सरिक वर्षात लेखकाने केला. केशवसुत आणि तांबे यांचे काव्य समजून घेण्याला अभ्यासकांत त्यांच्याशी सजातीयत्व असण्याची गरज आहे. मुळात सजातीयत्व नसले, तरी 'सहृदयत्व', 'सजातीयत्वा'चेच कार्य करू शकेल. या सजातीयत्वाच्या आणि सहृदयत्वाच्या बोटनेच लेखकाने या दोन कवींच्या काव्याची व प्रतिभेची या ग्रंथात मीमांसा केली आहे. लेखकाने आपल्या इतर अनेक ग्रंथात या दोन कवींसंबंधी व त्यांच्या वेगळ्या संप्रदायासंबंधी लिहिले आहे. त्यातील मीमांसेची पूर्तता या ग्रंथात केलेली आढळेल. 'आधुनिक' अथवा केशवसुतसंप्रदायी कवितेचे मर्म समजून घेण्यास या दोन प्रमुख कवींची श्री. के. क्षी. यांनी या ग्रंथात केलेली मीमांसा समजून घेणे उपयुक्त ठरेल.